


जगाच्या राजकारणांत

किंमत
तीन रुपये

१९
नवभारत ग्रंथमाला

लेखक,
गो. प्र. भावे

न व भा र त ग्रं थ मा ला

१९

जगाच्या राजकारणांत

क्षमायाचना

आज जवळजवळ दोन अडीच वर्षांनी नवभारत-ग्रंथमाला आपल्या प्रिय आश्रयदात्यांच्या भेटीस येत आहे. प्रस्तुत महायुद्धाने आणिलेल्या अनिवार संकटपरंपरेमुळे व कांही वैयक्तिक कारणांनी आलेल्या शिथिलतेमुळे मध्यंतरी बराच काळ मालेचें पुस्तक निघूं शकलें नाही. मालेवर आजपर्यंत अखंड लोभ करणाऱ्या शेकडों आश्रयदात्यांची आम्ही याबद्दल मनःपूर्वक क्षमा मागतों. नवभारत ग्रंथमाला बंद झाली; खपली, चालकांचा उत्साह जिरला, अशा तऱ्हेचे समज प्रचलित होऊं लागले. परंतु यांपैकी एकही गोष्ट झालेली नसून मध्यंतरी आलेल्या अडचणींमुळे हें काम मागे पडलें असलें, तरी पुन्हा तें पूर्वी इतक्याच नेटाने चालविण्याचा चालकांचा दृढ संकल्प आहे, हें येथे निवेदन करितों.

निवेदन

होतांहोईतों मालेच्या किमतींत वाढ करावयाची नाही असा आमचा कृतसंकल्प होता. परंतु तो आता चालू शकत नाही, असें अत्यंत खेदाने म्हणावें लागतें. प्रस्तुत पुस्तकाची व मालेच्या यापुढील पुस्तकांची किंमत सध्याची भयंकर महागाई कायम असेतों, **तीन रुपये** राहील. नागपूरच्या ग्राहकांस प्रत्येक पुस्तक दोन रुपये किंमतीस मिळेल. बाहेर गावच्या ग्राहकांस पोस्टेजसह अडीच रुपये पडतील. एजंटामार्फत घेणाऱ्या कायम ग्राहकांसही अडीच रुपये किंमत पडेल.

बाहेरची सार्वत्रिक महागाई कमी होतांच हे दरही कमी केले जातील हें सांगणें नकोच. सध्या देखील मुंबई पुण्याकडे प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांच्या किंमती पृष्ठसंख्येच्या प्रमाणांत ताडून पाहिल्यास मालेच्या पुस्तकांच्या या किंमती फारच स्वस्त ठरतील. विशेषतः प्रस्तुत पुस्तकाची पृष्ठसंख्या, त्यांतील नकाशे व आकृति लक्षांत घेतल्यास ही स्वस्ताईची कमालच आहे, असें आम्हांस सहज सिद्ध करतां येईल. हें पुस्तक किंमतीच्या दृष्टीने जितकें स्वस्त तितकेंच आंतील माहितीच्या व विवेचनाच्या दृष्टीने मूल्यवान व अपूर्व, असें वाचकांस आढळेल, याविषयी आम्हांस शंका नाही.

नवें शकवर्ष 'नवभारता'स मंगलकारक होवो!

प्रकाशक

जगाच्या राजकारणांत

(११ नकाशे व आकृतींसह)

लेखक :

गोविंद प्रभाकर भावे,

(संपादक, आत्मोद्धार माला)

प्रस्तावनाकार :

नामदार डॉ. मु. रा. जयकर

M. A., D. C. I. (Oxon.),
LL. D., P. C.

सुविचार प्रकाशन मंडळ, लिमिटेड,
नागपूर

शके १८६७] किंमत तीन रुपये [सन १९४५

प्रथमावृत्ति—हनुमानजयंती, २७ एप्रिल १९४५

मुद्रक व प्रकाशकः-**पांडुरंग नारायण बनहट्टी**, बी. एस्‌सी.,
व्यवस्थापक, **नारायण मुद्रणालय**, धनतोली, नागपूर.
आणि
डायरेक्टर, **सुविचार प्रकाशन मंडळ, लि०**
धनतोली, नागपूर.

प्रस्तावना

भूराजनीति किंवा भूगोलनीति (Geopolitics) हें अलीकडे पुढे आलेलें नवीन शास्त्र आहे. हें आधुनिक जगांतील मानवी जीवनाच्या जिव्हाळ्याचें शास्त्र आहे. अशा ह्या शास्त्रावर रा. गो. प्र. भावे ह्यांनी ' जगाच्या राजकारणांत ' हा अमूल्य ग्रंथ योग्य वेळीं लिहून वाचकांना उपकृत करून ठेविलें आहे. त्यांनी या विषयाचा खोल अभ्यास करून अति-परिश्रमाने अमोलिक अशी माहिती जमा केली आहे. त्यांनी आपल्या ग्रंथाचे चार खंड ('प्राचीन इतिहास', 'अर्वाचीन इतिहास', 'नवीं राष्ट्रें नवे प्रश्न' व 'भावी संघर्षाची पूर्व तयारी') करून जगाच्या इतिहासाचें व त्यांत अनुस्यूत असलेल्या भूराजनीतिशास्त्राचें धावतें दर्शन घेतलें आहे. असा हा विचार-प्रवर्तक बहुमोल ग्रंथ मराठी भाषेंत तरी पहिलाच आहे! पण मला वाटतें भारतीय प्रांतिक भाषांमध्येही पहिलाच आहे. ह्या दृष्टीनेही हा त्यांचा ग्रंथ अभिनंदनीय तर खराच, पण अभिमानास्पदही आहे.

भूगोलनीतिशास्त्र (Geopolitics) हें नवीनच शास्त्र आहे. ह्याचा उगम Anthropo Geography मध्ये आहे. या विषयाला खरी चालना गेल्या महायुद्धापासून मिळाली व त्या युद्धानंतर त्याचा पाश्चिमात्य विद्वानांत खोल अभ्यास सुरू झाला.

या शास्त्राचे मुख्य द्रष्टे Sir Halford McKinder (इंग्रज), Dr. Rudolf Kijllen (स्वीड), Dr. Hauschofer (जर्मन) व Issiah Boman (अमेरिकन) हे आहेत. अमेरिका दुसऱ्या युद्धांत पडल्यापासून, या नवीन विषयाचा खल व मंथन फार जोराने चालू आहे. (ग्रंथकाराने दिलेली-ह्या विषयाच्या ग्रंथांसंबंधीची पृष्ठ २५७ वरील टीप व संदर्भ ग्रंथांची यादी हीं वाचनीय असून त्यावरून रा. भावे ह्यांनी ह्या नवीन विषयाचें अवगाहन किती सशास्त्र, खोल व अद्यतन केलें आहे ह्याची खात्री पटेल.)

पश्चिम युरोपांतील या विषयाचे अभ्यासू व ज्ञाते आणि मध्य युरोपीय विद्वान हे जरी Geopolitics व Political Geography

ह्यांमध्ये सूक्ष्म भेद मानीत असले तरी दोघांच्या विचारसरणीचें अंतिम ध्येय एकच असून तें म्हणजे ' जगदाक्रमण ' हें होय.

भूगोलनीतिवाले (Geopoliticians) भूगोल (Space) हान्न सत्तेचा आधार व सामर्थ्य आहे असें मानितात. ह्या Space मध्ये भूमि (Land), जल (Blue Water) व आकाश (Blue Sky) ह्या तिहींचा अंतर्भाव आहे. कोणी ह्या तीन निरनिराळ्या आधारांवर विचारांची उभारणी करितात तर कोणी ह्या तिहींचा मिळून एक आधार समजून त्यावर आपल्या विचारांची उभारणी करितात. ह्यांच्या मतें ह्या तिहींवर जे प्रभुत्व ठेवूं व टिकवूं शकतील तेच जगाचें सार्वभौमत्व प्राप्त करूं शकतील. कसाही विचार केला तरी भूगोलाचा मानवी जीवनाशीं व त्याने निर्मिलेल्या राजकीय, सामाजिक व व्यावहारिक घडामोडींशीं अगदी घनिष्ट संबंध आहे हें मात्र खास. हा संबंध ग्रंथकर्त्यानें सविस्तर, सुलभ व साधकबाधक प्रमाणांनी स्पष्ट करून वाचकांपुढे मांडिला आहे. इतकेंच नव्हे तर भावी संघर्षाच्या राजकारणांत व व्यवहारकारणांत ज्या कटकटी व दगदगी संभाव्य आहेत त्यांचें अत्यंत दूरदृष्टीने दिग्दर्शन केलें आहे. ' भारताच्या भावी ऐतिहासिक घडणीची परिस्थिति ' अगदी सूक्ष्म, मोजक्या पण सूचक शब्दांनी दर्शित केली आहे, ती अत्यंत मननीय आहे. Dr. Hauschofer हा ह्या शास्त्रांतील जर्मन अग्रणी ह्या शास्त्राला ' जगाच्या राजकारणाचें व कलहाचें मूळ शास्त्र ' असें म्हणतो.

आपल्या देशांत अशा ह्या शास्त्राचा अभ्यास व्हावा असें वाटणें साहजिक आहे. निदान कॉलेजांतील अभ्यासक्रमांत हें शास्त्र ऐच्छिक विषय म्हणून तरी असावें असें वाटतें. या शास्त्राच्या अभ्यासाने जगांतील निरनिराळ्या भागांतील मानवी स्वभावाचें चांगलें ज्ञान होऊन, कदाचित परस्परांबद्दल सहिष्णुता व बंधुभावही वाढूं लागेल! " माझ्याजवळ जें अधिक असेल तें मी माझ्या विश्वबंधूला देऊन त्याच्याजवळ जें मला घेण्यासारखें असेल तें मी घ्यावें, त्यायोगें दोघांचेंही जीवन सुखावह व्हावें, आणि एकमेकांशीं समरस होऊन, गुण्यागोविंदाने ही जीवनयात्रा पूर्ण करावी " ही भावना या शास्त्राच्या अभ्यासाने उद्दीपित होते असें जर कोणी प्रतिपादन केलें तर तें संभवनीय असून त्याला कोणाचा फारसा विरोध

होणार नाही. नीटपणें या शास्त्राचा अभ्यास केला, तर Haves and Have-nots हा वाद उपस्थित होणार नाही. अखिल मानवजात ही ह्या भूगोलाची संतति आहे व त्यामुळे प्रत्येक मनुष्य दुसऱ्याचा विश्वबंधु होतो, ही कल्पना उत्पन्न होऊन ती मूर्त स्वरूपांत येणें शक्य आहे. म्हणून अशा ह्या प्रभावी शास्त्राचा अभ्यास होणें अत्यंत जरूर आहे. या दृष्टीने पाहतां रा. भावे ह्यांचा हा प्रयत्न नुसताच स्तुत्य नसून नवीन लेखकांना प्रोत्साहन देणारा व योग्य मार्गदर्शन करणारा आहे असें वाटतें. रा. भावे ह्यांनी अगदी संक्षेपांत जगाच्या अतिप्राचीन कालापासून आजतागायतच्या राष्ट्रांच्या इतिहासाचें महत्त्वपूर्ण रीतीने अवलोकन करून, भूगोल हा राष्ट्रांचा इतिहास घडवून आणण्यास, त्यांचें राजकारण व व्यवहारकारण ह्यांच्यामागे, कसा उभा आहे हें थोडक्यांत पण स्पष्टपणें विशद केलें आहे. आज जगांत चाललेल्या धुमाकुळीचें बीज कोणतें, कोठे व कसें रुजलें गेलें आहे तें ह्या पुस्तकाच्या वाचनाने सरळपणें ध्यानांत येण्याजोगें आहे.

त्यांनी आपल्या ग्रंथांत भूगोलाचे अत्यंत महत्त्वाचे मननीय सिद्धांत वाचकांपुढे ठेविले आहेत, ते पुढे वाचनांत येतीलच. तथापि उदाहरणेंच द्यावयाचीं झालीं तर ईजिप्त घ्या. ईजिप्तच्या भोवतीं असलेल्या समुद्रामुळे व वाळवंटामुळे मिसरी संस्कृतीची वाढ अबाधितपणें चालू राहिली. बाहेरील परचक्राची भीति नसल्यामुळे ही वाढ खुंटली नाही. पण एका कालीं सुरक्षिततेचीं असलेलीं साधनें कालांतराने तींच पुढे वाढीला घातुक झालीं, असें रा. भावे यांचें मत आहे व तें बरोबरही आहे. कारण ह्याच अडथळ्यामुळे मिसर देशाची संस्कृति प्रादेशिकच (territorial) राहिली. ती फार दूरवर पसरूं शकली नाही. पुढे पुढे हे अडथळे दूर करण्याचीं साधनें सांपडल्यानंतरच ह्या संस्कृतीचा थोडा थोडा प्रसार होऊं शकला.

याच्या उलट इंग्लंड, जपान, इ. सारख्या द्वीपवासी राष्ट्रांचीं उदाहरणें पहा. चौफेर समुद्र असल्यामुळे व स्वदेशीं बऱ्याच गरजू सामग्रीची उणीव असल्यामुळे तेथील लोकांना आजूबाजूंच्या देशांत जाण्याची व तेथून आणलेल्या वस्तूंनी आपली उणीव भरून काढण्याची धडपड केल्याशिवाय जगणेंच शक्य नव्हतें. आणि ह्याच धडपडीमुळे या व यांच्यासारख्या राष्ट्रांनी आपली प्रभावी प्रगति सर्वांच्या प्रत्ययास आणून दिली.

आपल्या इकडीलच गोष्ट घ्या. मारवाडांतील जमीन सुपीक नसून पाणी पावसाचें दुर्भिक्ष म्हणून तेथील लोकांना परप्रांतीं गमन करून आपल्या जीवनकलहाच्या अडचणी दूर करून घेणें प्राप्त होतें. ते हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत आढळतात; तेथे ते आपला धंदा व संसार चिकाटीने करतात. पाण्याचें दुर्भिक्ष व अन्नाची उणीव जाणून ते या वस्तूंचा काटकसरीने उपयोग करून भावी कालाची तरतूद करितात. त्यामुळे ते साहजिकच काटकसरी बनूं शकले. ह्या अमोलिक गुणामुळे मारवाडी लोक सधनही बनले आहेत. त्यांचा हा गुण अनुकरणीय आहे. याच्या उलट बंगाल प्रांतांतील परिस्थिति पहा. तेथील जमीन सुपीक व त्यामुळे सुखवस्तु लोकांची संख्या फार. ह्यामुळे व्यापारउदिमाच्या साह्याने पैसा मिळविण्याची, बाहेरून वस्तु आणण्याची किंवा नवीन तयार करण्याची गरज राहिली नाही. अर्थातच यांनी व्यापार व उद्योगधंद्यांकडे लक्ष दिलें नाही. जीवनकलहाचा बोजा न वाटल्यामुळे जीवनाला लागणाऱ्या उच्च कलाकौशल्याकडे मात्र लक्ष पुरविलें गेलें व वाङ्मय, वाद्य व संगीत, नाटय, गृहकृत्यांतील कला, ख्यालीखुशालीचे पदार्थ, बागबगीचे व सुंदर गृहें इत्यादि गोष्टींत त्यांनी लक्ष घातलें. आज बंगाल ह्या बाबतींत हिंदुस्थानांत अग्रेसर आहे असें म्हणण्यास बाध येणार नाही. ह्यामुळे कांही काळपर्यंत ते लढवय्ये बनूं शकले नाहीत. कारण कोणत्याही गोष्टीची ददात नसल्यामुळे, लढून बाहेरून पुरवठा आणण्याची त्यांना जरूर नव्हती. यावरून भूगोल हा इतिहास बनविण्याला कसा कारणीभूत होतो हें समजून येईल. या दृष्टीने विचार केला असतां ‘ भौगोलिक–राजकारण–शास्त्राचा ’ जास्त कसोशीने अभ्यास केला जावा, असें म्हणणें प्राप्त होतें.

अशा रीतीने हें छोटेखानी पण बोधपर असें पुस्तक श्री. भावे ह्यांनी मराठी भाषेंत लिहून ती भाषा जाणणाऱ्या लोकांवर अत्यंत उपकार करून ठेवले आहेत असें म्हणण्यास हरकत नाही.

पुस्तकाची भाषा अत्यंत सोपी व सरळ आहे. लहान मुलांनासुद्धा समजण्याइतकी ती साधी आहे. रा. भावे हे भूगोल व इतिहास ह्या विषयांचे शिक्षणखात्यांतील एक तज्ज्ञ आहेत. सदरहू पुस्तक शालोपयोगी आहे, एवढेंच नव्हे तर तें माझ्या मतें शाळा व महाविद्यालयें यांतून अभ्यासण्या-

सारखें आहे. तसेंच राजकारण, इतिहास व भूगोल ह्या विषयांच्या जिज्ञासु वाचकांना तें वाचनीय व मननीय आहे.

पुस्तकांतील शीर्षकें, नकाशे व त्यांखालील स्पष्टीकरण ह्या गोष्टी सूचक व चित्तवेधक आहेत. पुस्तकांतील संदर्भ व शेवटीं दिलेली संदर्भग्रंथ-मालिका हीं तद्विषयक ज्ञानाच्या खाणी आहेत.

शेवटीं श्री. भावे ह्यांच्या ग्रंथाचें मर्म व ध्येय त्यांच्याच शब्दांत सांगून हा त्रोटक उपोद्घात पुरा करितों.

रा. भावे म्हणतात–

"मनुष्यप्राणी हा एक भूगोलाचाच भाग–भूपृष्ठावरील सृष्टीचा अंश–आहे. पण तो भौगोलिक परिस्थितीचा दास आहे असें मात्र नाही. एवढेंच नव्हे, तर त्याने स्वाभाविक विभागांचा व परिस्थितीचा कालपरत्वें कसा उपयोग करून घेतला हें पाहणें, हा ह्या पुस्तकाचा एक महत्त्वाचा उद्देश आहे."

आश्रम, मलबार हिल,
मुंबई, ता. ४-१०-४४

मुकुन्द रा. जयकर

पुरस्कार

माझे परममित्र रा. गो. प्र. भावे यांनी हें पुस्तक अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलें आहे. "कोणत्याही देशाचा इतिहास तेथील भौगोलिक परिस्थितीवर बऱ्याच अंशाने अवलंबून असतो, या नियमाला अनुसरून" जगांतील निरनिराळ्या देशांतील इतिहास कसा बनत गेला आणि तो तसाच कां बनत गेला हा या पुस्तकाचा प्रतिपाद्य विषय आहे. या विषयाचा केवढा विस्तार व व्याप आहे हें फार थोडया विचारानेही लक्षांत येण्यासारखें आहे. या विषयाचा सांगोपांग ऊहापोह करण्याकरितां रा. भावे यांस अनेक प्रकारच्या पुष्कळ ग्रंथांचें अवलोकन व अभ्यास करावा लागला ही गोष्ट हें पुस्तक वरवर चाळणाऱ्याच्याही लक्षांत आल्यावाचून राहणार नाही. इतका मोठा व्यासंग व दृढ अभ्यास करून हें पुस्तक लिहिल्याबद्दल श्री. रा. भावे यांचें मी अत्यंत मनःपूर्वक अभिनंदन करतों. या पुस्तकाने मराठी वाङ्मयांत अत्यंत बहुमोल भर घातली आहे, एवढेंच नाही, तर मराठी वाचकांस विचाराची एक नवी दिशा दाखवून दिली आहे. अशा दृष्टीने या विषयाचा विचार करणारें दुसरें पुस्तक मराठी वाङ्मयांत उपलब्ध नाही, असा माझा समज आहे; निदान माझ्या पाहण्यांत तरी आलें नाही.

कोणत्याही देशाचा जो इतिहास बनत जातो तो यदृच्छेने बनत नसून त्याच्या भौगोलिक परिस्थितीचा त्यावर फार मोठा परिणाम झालेला असतो. एवढेंच नव्हे तर त्या इतिहासाचा उगम व परिपोष या भौगोलिक कारणांतच बहुतांशीं असतो ही गोष्ट रा. भावे यांनी जपान, चीन, इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी इत्यादि देशांच्या इतिहासाचा संक्षेपतः विचार करून सप्रमाण दाखविली आहे व याच विचारप्रणालीचा अवलंब केल्यास पुढे जगाचा इतिहास कसा बनत जाण्याचीं पूर्वचिन्हें दिसत आहेत, याचें चौथ्या खंडांत विवरण केलें आहे. या खंडांत 'संतुष्ट व असंतुष्ट' राष्ट्रांची जी माहिती व मीमांसा दिली आहे ती अत्यंत उद्बोधक व विचारार्ह आहे.

काळ्या गोऱ्यांचा जो हल्ली जगभर संघर्ष व एकप्रकारचा लढा सुरू आहे त्यांत भावी युद्धाचें बीज आहे असें जें रा. भावे यांनी प्रदिपादिलें आहे, त्याचा सर्व सुज्ञ विचारवंतांनी निर्लोभ वृत्तीने विचार केला पाहिजे.

विविध ग्रंथांतून अनेक प्रकारची सद्यःकाळीं अत्यंत उपयुक्त माहिती एके जागीं संकलित करून रा. भावे यांनी महाराष्ट्रावर फार उपकार केले आहेत. पुस्तकाची भाषा फार सुबोध आहे आणि विचारसरणी तर्कशुद्ध आहे.

रा. भावे यांनी 'भूगोल' विषयाचा फार दिवस सतत व्यासंग केला आहे आणि या आवडत्या विषयासंबंधीचा बहुविध व बहुमोल पुस्तक-संग्रहही स्वतःच्या परिश्रमाने व द्रव्याने संकलित केला आहे. त्यांनी परदेशीं पुष्कळ प्रवास केलेला असल्यामुळे या पुस्तकाच्या रचनेंत त्याचा त्यांना फार उपयोग झाला हें साहजिकच आहे.

रा. भावे यांच्या पुस्तकामुळे महाराष्ट्रांत नवीन विचारास चालना मिळेल आणि त्याची राष्ट्रोद्धारास मदत होईल अशी मला आशा आहे. परमेश्वर त्यांच्या यत्नास सुयश देवो असें मी त्याचे चरणीं प्रार्थितों.

२१-११-४४ **बा. ग. खापर्डे**

राजकारणाच्या अंतरंगांत

प्रयोजन—'ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी' ही स्थिति जशी खासगी व्यवहारांत आढळते, तशी जागतिक व्यवहारांतही आढळते. पण जेव्हा तसा प्रकार घराशेजारींच आढळतो तेव्हा त्याबद्दल ज्यास्त चौकसपणाने पाहण्याची इच्छा होते.

इ. स. १९३७ सालचाच चीनजपानच्या लढयाचा प्रसंग. पीपिंग पडल्याचें रेडियोचित्र तावडतोब जपानांतच जपानी वर्तमानपत्रांत पाहावयास मिळालें. त्यानंतर लवकरच शांघाय, नांकिन, हाँग्काँग येथील वस्तुस्थिति पाहावयाचा योग आला. चीनला उपमर्दकारक वाटणाऱ्या शांघायच्या एकवीस मागण्यांमागील राजकारण लगलीच आठवलें.

स्पेनमधील युद्ध हें सध्याच्या द्वितीय महायुद्धाची नांदी होतें असें म्हटलें तर चीनजपानचें युद्ध हा नटीप्रवेश समजून युरोपांत भडकलेला युद्धाग्नि हा नाटकाचा मुख्य भाग होय असें म्हटल्यास तें शोभणार नाही असें नाही.

राजनीतीचें स्वरूप जरी 'वारांगनेव' असें असलें तरी तिची उभारणी कांही मूलभूत तत्त्वांवर झालेली असून ती राजनीति त्या त्या कालांतील भिन्न भिन्न समाजगटांच्या व्यक्त जीवनकलहाचें प्रतिबिंब असतें.

आधुनिक भौतिक आविष्कार-प्रधान कालांतील समाजजीवन प्राचीन कालच्या समाजजीवनापेक्षा जास्त गुंतागुंतीचें, बिकट व कटकटीचें आहे. तें केवळ आर्थिक स्वावलंबनाच्या मदतीने निभणारें नसून आर्थिक परस्परावलंबनाने टिकणारें आहे अशी वस्तुस्थिति आहे.

परंतु ती स्थिति खरी मानून त्याप्रमाणे वागण्यास जगांतील मुख्यतः सबळ समाजगट तयार नाहीत. त्यांचा स्वार्थ व्यापक स्वरूपाचा नाही. त्यांनी त्यांच्या स्वार्थी वृत्तीलाच खरेपणाचें स्वरूप देण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्याला अनुरूप असें एक नवीन भूराजनीतीचें शास्त्र (Geo-Politics) त्यांनी बनविलें, तें मत्स्यन्यायपूर्ण आहे. त्यामुळे सर्व समाजगटांमध्ये अनेक स्वरूपांचे खटके उडूं लागले. सध्याचें जागतिक महायुद्धरूपी आंदोलन त्याच भूराजनीतिशास्त्रीय विचारसरणीचें कटु फळ आहे. (ह्या राजनीतिशास्त्राचें खरें स्वरूप प्रस्तुत पुस्तकांत थोडक्यांत व्यक्त केलें आहे.)

प्रत्येक समर्थ समाजगटाचा स्वार्थ दुसऱ्या समाजगटाच्या स्वार्थाच्या आड कसा येतो, मागसलेल्या समाजगटांना त्याचे धक्काबुक्के कां खावे

लागतात, त्याचप्रमाणे युरोपांतील कांही सबळ खिस्ती समाजगट हेच सर्वांत ज्यास्त भांडखोर वृत्तीचे कां आहेत, वगैरे प्रश्नांचीं उत्तरें त्यांनीच उत्पन्न केलेल्या त्या भूराजनीतिशास्त्राच्या भस्मासुरांत आढळतील.

गेल्या २५ वर्षांच्या युरोपियन लोकांच्या जागतिक राजकारणाच्या इतिहासाचा अभ्यास करीत असतांना वरील विचारसरणीला पोषक अशीं अनेक उदाहरणें आढळलीं, एवढेंच नव्हे तर त्यांचे भविष्यकालीन डाव व कारस्थानें, त्यांची ते डाव टाकण्याची पद्धति वगैरे गोष्टींकडे लक्ष वेधलें. त्याचबरोबर आपल्या हिंदु समाजगटांतील वरच्या थरांपैकी बहुतेक लोकांना सदरहू गोष्टी फारशा माहीत नाहीत असेंही ध्यानांत आलें.

इ. स. १९३८ अखेर जपानांतून परत आल्यानंतर तर वरील गोष्टीची जाणीव जास्त तीव्रतेने झाली. म्हणून प्रस्तुत स्वरूपाच्या ग्रंथलेखनाला हात घातला. प्रस्तुत ग्रंथ तज्ज्ञ राजकारणपटूंसाठी नव्हे. सामान्य जनांसाठी आहे.

माहिती व मांडणी:—सदरहू ग्रंथाचे ४ खंड केले आहेत. **पहिला "प्राचीन इतिहास."** हें खरोखरच अगदी प्रास्ताविक विहंगावलोकन आहे. **दुसरा खंड "अर्वाचीन इतिहास."** हा भाग महत्त्वाचा व विस्तृत ऊहापोहाचा आहे. त्यांत अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स व जपान ह्या राष्ट्रांच्या जागतिक राजकारणाचा व कारस्थानांचा, त्यांच्या पार्श्वभागांसह विचार केला आहे. **तिसरा खंड "नवीन राष्ट्रें व नवे प्रश्न"** हा आहे. ह्यांत इटाली, रशिया, व जर्मनी ह्यांचा जरूर तेवढा सविस्तर विचार केला आहे. **चवथा खंड "जगाच्या भावी घडणीच्या वाटेवर"** ह्यांत जूट राष्ट्रांच्या आकांक्षांचा व ध्येयाचा, त्याचप्रमाणे युरोप, अमेरिका व आशिया ह्यांतील अनेक अल्पसंख्य वा बहुसंख्य समाजगटांचा, तसेंच इस्लामी, भारतीय आणि चिनी समाजगट यांचा व त्यांच्या सद्यःस्थितीचा अल्प विचार केला आहे. आणि उपसंहारांत दोस्त राष्ट्रांचीं ध्येयें व डाव ह्यांचें जरूर तेवढें ओझरतें दर्शन घेतलें आहे. पृष्ठसंख्येच्या मर्यादितपणामुळे सर्वच लिखाण आखडतें घेणें भाग पडलें.

सारांश, बहुजनसमाजाला आधुनिक जगांतील मुख्य प्रभावी राष्ट्रांची, त्यांच्या राजकीय डावपेचांची आणि तद्द्वारें त्यांच्या भूराजनीतिशास्त्राची (Geo-Politics) तोंडओळख व्हावी व त्यामुळे कांही

विचारांना उद्बोधक चालना मिळावी, असा प्रयत्न केला आहे. तो कितपत साधला आहे, हें वाचकवर्ग ठरविणार. आपल्या देशांत ह्या शास्त्रावर ग्रंथच क्वचित्. तशांत देशी भाषांत तर मुळीच नाही. हाच पहिला असें वाटतें.

प्रकाशकांकडे ग्रंथ जरी दोन वर्षे पडून होता, तरी त्याची शक्य ती अद्यतनता कायम ठेविली आहे.

नकाशे व आकृतिः—भौगोलिक व ऐतिहासिक नकाशे ह्यांत बराच फरक असतो. ऐतिहासिक नकाशे काढण्याचें एक स्वतंत्र तंत्र (Map Techniq) बनत आहे. हर्मन हॅक, राजकमन्, होरॅबिन, हे त्यांतील तज्ज्ञ आहेत; त्यांच्या शास्त्राप्रमाणें प्रस्तुत ग्रंथांत उपयोगी पडावे व तद्द्वारें उद्बोधन व्हावें या हेतूने नकाशे व आकृति हीं घातलीं आहेत. आकडयांची माहिती शक्य तितकी अलीकडची घेतली आहे. तथापि ती कांही ठिकाणीं अगदी अद्यतन ठेवतां आली नाही.

संदर्भः—संदर्भ हें ग्रंथाचें एक अत्यंत महत्त्वाचें अंग समजलें जातें. अभ्यासकांसाठी दिलेला संदर्भ अधिकृत, अद्यतन, असा दिला असून ऐतिहासिक घटनांचा शक्य तितक्या साधक बाधक प्रमाणांनी व पुराव्यांनी विचार व्हावा म्हणून इंग्रज, अमेरिकन, जर्मन, आयरिश, जपानी, चिनी व भारतीय लेखकांच्या ग्रंथांचा सुगावा घेतला आहे. संदर्भाचें वर्गीकरण लेखकवार तसें विषयवारही केलें आहे. शिवाय अनेक उत्कृष्ट व सुलभ मासिकांचा व संदर्भग्रंथांचा (Reference) पण नामनिर्देश केला आहे.

आभारः—ग्रंथकार आधाराला घेतलेल्या अनेक ग्रंथकारांचा आभारी आहे. पण त्याशिवाय रा. रा. स. पिंपुटकर ह्यांचा त्यांनी केलेल्या सूचनांबद्दल, रा. भा. स. कासखेडीकर व ना. गो. सहस्रबुद्धे ह्यांचा त्यांनी हस्तलिखित तयार करतांना केलेल्या मदतीबद्दल आभारी आहे.

राइट ऑ. डॉ. मुकुंदराव जयकर ह्यांनी आपला वस्तुतः अमोलिक वेळ खर्च करून प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल आणि श्री. बाबाराव खापर्डे ह्यांनी अभिप्राय दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. त्याचप्रमाणें माझे मित्र चीनमधील प्रसिद्ध इंग्रजी वर्तमानपत्रकार रा. वैद्य ह्यांनी केलेली मदत मुद्दाम गुलदस्तांत ठेविली आहे.

गो. प्र. भावे.

अनुक्रमणिका

खंड पहिला : प्राचीन इतिहास

	विषय	पृष्ठें
प्रकरण पहिलें	इतिहासांत भूगोलाचें स्थान	१ ते ६
प्रकरण दुसरें	जगाच्या इतिहासाचे टप्पे (अ) सरित्तटीय संस्कृति	६ ते १२
प्रकरण तिसरें	जगाच्या इतिहासाचे टप्पे (आ) भूवेष्टित समुद्र व तेथील राज्यें	१३ ते २३
प्रकरण चवथें	जगाच्या इतिहासाचे टप्पे (इ) महासागरावलंबी राज्यें	२३ ते ३१
प्रकरण पांचवें	जगाच्या इतिहासाचे टप्पे (ई) खुष्कीवरील वाहतूक	३१ ते ३९

खंड दुसरा : अर्वाचीन इतिहास

प्रकरण सहावें	आधुनिक जगाचें विहंगमावलोकन	४० ते ४९
प्रकरण सातवें	आधुनिक जगांतील महाजन (१) अमेरिका (संयुक्त संस्थानें)	४९ ते ६३
प्रकरण आठवें	आधुनिक जगांतील महाजन (२) ब्रिटिश साम्राज्य	६४ ते ७८
प्रकरण नववें	आधुनिक जगांतील महाजन (३) जपान—पूर्वेचें सवाई ब्रिटन	७८ ते १०८
प्रकरण दहावें	जुन्या जगांतील पोखरलेला महाजन (४) फ्रान्स व त्याचें साम्राज्य	१०८ ते १२७

खंड तिसरा : नवीं राष्ट्रें व नवे प्रश्न

प्रकरण अकरावें	रशिया—युरोपांतील लाल बावटा	१२८ ते १४८

प्रकरण बारावें	इटली—भूमध्य समुद्रांतील कैदी	१४९ ते १५९
प्रकरण तेरावें	जर्मनी—मध्ययुरोपांतील राजकीय कैदी	१५९ ते २१६

खंड चवथा : जगाच्या भावी घडणीच्या वाटेवर

प्रकरण चवदावें	जूट राष्ट्रें व जगाची विभागणी	२१७ ते २३१
प्रकरण पंधरावें	भावी संघर्षांची पूर्व तयारी	२३२ ते २६१
प्रकरण सोळावें	उपसंहार	२६१ ते २६८
परिशिष्ट पहिलें	लोकसंख्येची वाटणी	२६९ ते २७२
परिशिष्ट दुसरें	कांही धार्मिक संख्याबल	२७३
पुरवणी उपसंहार	युद्ध समाप्तीनंतरची जगाची नवीन घडण	२७४ ते २८१
कांही संदर्भ ग्रंथ	... ...	२८२ ते २९३
सूची ...	... ...	२९४ ते ३००

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१४८	३	३० कोटी मुसलमान	सुमारे ४० कोटी मुसलमान
१८५	टीप	Corporation	Cooperation Publi. Co.
१९९	टीप	नको	—
२४३	१२	९¾	९
,,	१४	५¼	६
११४	२०	कोमेट	कोमे
१८६	टीप	Ransch Mine	Rauschning

जगाच्या राजकारणांत

खंड पहिला : प्राचीन इतिहास

प्रकरण पहिलें

इतिहासांत भूगोलाचें स्थान

इतिहास आणि भूगोल यांचा संबंध अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. देशाची भौगोलिक रचना बऱ्याच अंशीं देशाच्या इतिहासास वळण लावीत असते. देशांतील हवा-पाणी, नदी-नाले, गिरि-कंदरें, इत्यादिकांचा परिणाम मानवी जीवनावर प्रत्यहीं होत असतो. देशाच्या नैसर्गिक रचनेनुसार मानवी कृत्यांना वळण मिळतें. इतिहासाची उत्क्रांति देशाच्या भौगोलिक रचनेवर बव्हंशीं अवलंबून असते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मनुष्य हा एक भूगोलाचाच भाग—भूपृष्ठावरील सृष्टीचाच एक अंश—आहे. पण मनुष्य हा भौगोलिक परिस्थितीचा दास आहे, असा मात्र ह्याचा अर्थ नाही.

जगाच्या स्वाभाविक नकाशाकडे पाहिलें तर असें दिसून येईल की उत्तर व दक्षिण ध्रुवाकडील प्रांत निर्मनुष्य आहे. या प्रांतांत अतिशय थंडी असल्यामुळे मनुष्य व त्याला लागणाऱ्या खाद्यपेय पदार्थांचें अस्तित्वच नाहीसें होतें. जगांतील विषुव वृत्तावरील भागांत कडक ऊन व अत्यंत वृष्टि असल्यामुळे त्या प्रदेशांत घनदाट अरण्यें आहेत. कांही अरण्यांत सूर्याचे किरण थेटपावेतो

पोचूं शकत नाहीत. अशा परिस्थितींत या झाडावरून त्या झाडावर माकडाप्रमाणेच जाणें येणें करावें लागतें. कांही ठिकाणीं शेंकडो मैल लांब वाळवंटें पसरलीं आहेत. असह्य ऊन व पाण्याचें दुर्भिक्ष या दोन कारणांमुळे या विभागांत मनुष्यवस्ती होणेंच अशक्य.

आधुनिक काळांतील यांत्रिक सुधारणांमुळे या अडचणी थोडया फार कमी झाल्या आहेत. या सर्व अडचणी, सोयी, गैरसोयी इत्यादिकांना मनुष्याने मोठया शिताफीने मुरड घातली व त्यांच्यापासून कालप्रमाणें त्याने फायदाही पण करून घेतला आहे.

भूगोल हा इतिहासाचा पार्श्वभाग आहे

भूगोल आणि इतिहास परस्परनिगडित आहेत. इतिहासाचा अभ्यास करणें असल्यास भूगोलाकडे दुर्लक्ष करतां येत नाही. तसेंच भूगोलाचें आकलन करावयाचें असल्यास (मानवी जीवनाशीं संलग्न असलेल्या भूगोलाचें) ऐतिहासिक दृष्टयाच भूगोलाचें वाचन करणें भाग आहे. आता इतकें खरें की, पर्वतांच्या उंचींत, पृथ्वीतलाच्या आकारांत आणि स्वरूपांत, नद्यांच्या गतींत, समुद्राच्या आकारमानांत व हवापाणी इत्यादि नैसर्गिक घटनांमध्ये कालमानाने फारसा फरक पडत नाही. मानवी जीवनांत या सर्व बाबी बहुतांशीं जशाच्या तशाच आहेत. तेव्हा प्रश्न असा उपस्थित होतो की मग भूगोलाचें वाचन ऐतिहासिक दृष्टया अगर ऐतिहासिक पद्धतीने करावयाचें म्हणजे काय व तें कसें? याचें उत्तर असें आहे की मानवी जीवन जसजशी सामाजिक आणि औद्योगिक प्रगति करीत जाईल तसतसें या नैसर्गिक घटनांचें व परिस्थितीचें महत्त्व कमी अधिक होईल. आणि याच गोष्टींचा आपणास प्रस्तुत विचार करणें आहे. सुरवातीस कांही प्रदेशांमध्ये तेथील विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे मानवी जीवन अत्युच्च शिखरास पोचलें. परंतु पुढे

त्याच नैसर्गिक परिस्थितीमुळे त्या जीवनाचा ऱ्हास झाला. केव्हा केव्हा असें दिसून येईल की विशिष्ट नैसर्गिक अडचणीमुळे मनुष्याची प्रगति होऊं शकली नाही; परंतु कालांतराने त्याच अडचणीने मनुष्याची आर्थिक व भौतिक उन्नति करून दिली.

वरील विवेचन अधिक स्पष्ट करण्याकरितां कांही उदाहरणें दाखल करणें वाजवी ठरेल.

१. ईजिप्त व तेथील वाळवंट. आजमितीला सुद्धा हीं जगांतील वाळवंटें बव्हंशीं अनुल्लंघनीयच आहेत. सबंध दळणवळणाचा मार्ग या वाळवंटाने रोखून धरला आहे. येथे पाण्याच्या टंचाईमुळे मनुष्य समुदायरूपाने वस्ती करूं शकत नाही. परंतु हें तितकेंच खरें की, या अनुल्लंघनीय वाळवंटांमुळेच ईजिप्त देशांतील प्राचीन संस्कृतीचें रोपटें झपाट्याने फोफावलें. मिसरी संस्कृतीचें बालपण सुखरूपपणें पार पडलें. रानटी लोकांकडून या संस्कृतीला कोणत्याही प्रकारचा धोका पोचला नाही. कारण तीन्ही बाजूंना हीं अनुल्लंघनीय वाळवंटें पसरलीं होतीं. चतुर्थ दिशेला समुद्र. हा समुद्रही त्या प्राथमिक काळांत दळणवळणाच्या कामांत मोठा अडथळा होता. अशा रीतीने चारही बाजूंनी संरक्षित असलेल्या नाइल नदीच्या खोऱ्यांत अत्यंत जुनाट संस्कृति जोपासली गेली. यावरून असें दिसून येईल की, अनुल्लंघनीय वाळवंटें व समुद्र हीं दोन भौगोलिक परिस्थितीचीं अंगें निःसंशय फायदेशीर ठरलीं.

परंतु जसजशी या खोऱ्यांतील संस्कृतीची वाढ होत गेली तसतशीं वरील वाळवंटें व समुद्र ह्या गोष्टी संस्कृतीला पोषक राहिल्या नाहीत. कारण खोऱ्यांतील लोकांनी शक्य तितकी सुधारणा केली; परंतु बाहेरील लोकांशीं संबंध आणि बाहेरील अडचणींशीं झगडण्याची संधि नसल्यामुळे येथील संस्कृतीची वाढ खुंटली. साहित्य, कला, ललित वाङ्मय, धर्म, चालीरीती ह्या सर्व गोष्टी कांही

मर्यादेपर्यंत वाढल्यानंतर थबकून राहिल्या. अशा रीतीनें तींच वाळवंटें व तोच समुद्र नाइल नदीच्या खोऱ्यांतील संस्कृतीच्या ऱ्हासास कालपरत्वें कारण झाला.

२. अमेरिका व दोन महासागर. पंधराव्या शतकाच्या शेवटीं या जोड खंडाचा शोध लागला, तोंपर्यंत उत्तर व दक्षिण दोन्ही अमेरिकांत काय स्थिति होती ? युरोपच्या मानानें अमेरिका घोर निद्रेंत होती. अगाध समुद्रवलयांकित असलेलीं दोन्ही खंडें निबिड अंधकारांत चाचपडत होतीं. सारांश, अमेरिकेंतील संस्कृतीची वाढ खुंटविण्यास दोन्ही सागरच कारण झाले.

परंतु आजमितीला काय परिस्थिति आहे बरें ? अटलांटिक व पॅसिफिक हे दोन्ही महासागर इतर जगाशीं दळणवळण करण्याकरितां दोन महत्त्वाचे दुवे होऊन बसले आहेत! जसजशी नौकानयनशास्त्राची प्रगति होत गेली, तसतसे दोन्ही महासागर दळणवळण आणि व्यापार ह्यांचे राजरस्ते बनत गेले. आणि सांप्रत कालीं या सागरांचीं यत्किंचितही अडचण नाही. परिणामीं अमेरिकेंत संस्कृतीची प्रगति वायुगतीने झाली व आज अमेरिका संस्कृतींत अग्रेसर आहे. खुद्द युरोपला संस्कृतीचे धडे गिरविण्यास अमेरिकेकडे धाव घ्यावी लागते! हें कशामुळे? तर दोन महासागरांमुळे.

३. ब्रिटनची भौगोलिक स्थिति. ब्रिटन युरोपच्या वायव्य दिशेस आहे. अनादि कालापासून येथेच स्थित आहे. परंतु ब्रिटनचा दरारा आणि वैभव ह्या गोष्टी केवळ गेल्या तीन शतकांपासूनच्या आहेत.

कोणत्याही देशाची भौगोलिक परिस्थिति चांगली किंवा वाईट आहे, हें केवळ सापेक्षत्वाने ठरवावें लागतें. त्या देशांतील लोकांची आर्थिक आणि औद्योगिक दशा कशी आहे, त्याच्या शेजारचीं राष्ट्रें कोणत्या प्रतीचीं आहेत, वगैरे बाबींचा पूर्ण विचार केल्याशिवाय

या गोष्टीचा निर्णय करतां येत नाही. भूमध्य समुद्राच्या आसपासच्या प्रदेशांत सामाजिक व आर्थिक उन्नति नांदत होती असें हजारों वर्षांचा इतिहास सांगतो. जोंपर्यंत संस्कृतीची वाढ या भागांत होती, तोंपर्यंत ब्रिटनला महत्त्व नव्हतें. कारण उघडच आहे की, ब्रिटन या काळांत व्यापारी कक्षेच्या आणि दळणवळणाच्या मार्गाच्या कक्षेच्या अगदी बाहेर होतें. परंतु **फिनीशिअन** व **रोमन** लोकांच्या आक्रमणामुळे ही परिस्थिति थोडीशी बदलली; पुनः रोमन सत्ता कमी होतांच ब्रिटन मागे पडलें तें जवळजवळ एक हजार वर्षें तसेंच अंधारांत चाचपडत होतें. कालांतराने व्यापाराचा ओघ भूमध्य समुद्राकडून उत्तरेस म्हणजे बाल्टिक समुद्राकडे येऊं लागला. इंग्लंडच्या पूर्वेस असलेला उत्तर समुद्र व बाल्टिक समुद्र ह्यांच्या काठीं वसलेल्या नगरांनी 'हंसा संघ' (Hansa League) स्थापन करून भूमध्य समुद्राकडील व्यापार उत्तरेकडे आणला व येथून ब्रिटनच्या महत्त्वाला प्रारंभ झाला. तरी ब्रिटन या वेळीं उत्तरेकडील व्यापारी रहदारीच्या क्षेत्राचें शेवटचें टोक म्हणूनच होतें; व्यापारी केंद्र बनलें नव्हतें. पुढे अमेरिका खंडाचा शोध लागला व अगम्य असा अटलांटिक महासागर आगबोटांच्या येजाखाली जसजसा तुडवला जाऊं लागला, तसतसें युरोपच्या पश्चिम किनाऱ्यावरील राष्ट्रांना महत्त्व मिळूं लागलें. सांप्रतकालीं महत्त्वाचे व्यापारी रस्ते व दळणवळणाचे राजमार्ग वायव्य युरोपांतूनच निघतात. या कारणामुळे आज ब्रिटनला युरोपांत तर महत्त्व आहेच, परंतु जगांतही तें एक मध्यवर्ती ठिकाण होऊन बसलें आहे. एके काळीं ब्रिटन अगदी आडमार्गांत पडलें होतें; परंतु आज तें हमरस्त्यावर आहे.

वरील विवेचनावरून इतिहासांत भूगोलाचें स्थान किती महत्त्वाचें आहे याची स्पष्ट कल्पना येईल. तसेंच त्यांचा परस्परसंबंध किती जिव्हाळ्याचा आहे हेंही कळलेंच असेल. भूगोलाचा

अभ्यास ऐतिहासिक चष्म्यांतून करावयास पाहिजे असें जें सांगितलें तें आता स्पष्ट झालें असेलच.

मानवाने प्रचंड औद्योगिक व आर्थिक प्रगति कशी केली आणि ती करीत असतां त्याला भौगिलिक परिस्थितीची कशी मदत होत गेली याबद्दलचें विवरण करण्याचा हा प्रस्तुतचा प्रयत्न होय.

प्रकरण दुसरें

जगाच्या इतिहासाचे टप्पे : (अ) सरित्तटीय संस्कृति

आर्थिक परस्परावलम्बन

भौगोलिक ज्ञानाच्या अभावीं कोणत्याही देशाच्या इतिहासाचें परिशीलन करतां येत नाही व तसेंच इतिहासाशिवाय देशाचा भूगोल नीटसा कळत नाही, याचा खुलासा उदाहरणांसहित आपण पाहिला. प्रस्तुत पुस्तकाचा विषय केवळ पृथ्वीतल, नद्या, डोंगर यांचें वर्णन करणें हा नसून, या सर्व स्वाभाविक विभागांचा उपयोग मानवाने कालपरत्वें कसा करून घेतला हें पाहणें, हा आहे.

प्रारंभापासून जगाचा इतिहास पाहिल्यास असें दिसून येतें की, परस्पर येजा व परस्परावलम्बन वाढत्या प्रमाणांत होत आहे. समाजांतील एक वर्ग दुसऱ्या वर्गाच्या पोटावर पाय देऊन आपलीच उन्नति करून घेत आहे. एका प्रदेशांतील समाज दुसऱ्या देशांतील बहुजनसंख्येस राबवून आपली तुंबडी भरीत आहे.

उष्ण आणि समशीतोष्ण कटिबंध

पृथ्वीच्या कोणत्या विभागांत मनुष्यजातीची उत्पत्ति झाली हें कोणासही विदित नाही. मानवाने आपल्या इतिहासाला आरंभ उष्ण कटिबंधांत केला की समशीतोष्ण कटिबंधांत, हेंही सांगणें अत्यंत कठीण आहे. परंतु मानवाने प्रगति कोठे केली हें निश्चितपणें सांगतां येतें. '३० ते ६० अक्षांश ह्या विभागांतील इतिहास हाच जगाचा इतिहास होय' असें एका ग्रंथकाराने म्हटलें आहे.* पण यापेक्षा, २९ ते ६० अक्षांशांमधील विभाग हा जगाच्या इतिहासाचा मुख्य भाग होय, हें विधान अधिक बरोबर ठरेल.

सामान्यत: मागासलेल्या मानवजातीवर भौगोलिक परिस्थितीचा परिणाम फार स्पष्ट होतो. पृथ्वीच्या पाठीवरील मानव ही एकच प्राणिजाति अशी आहे की ती कोणत्याही परिस्थितीशीं आपलें जीवनतंत्र जुळवून घेऊं शकते. खाद्य पदार्थांचा पुरवठा असल्यास मग हवापाणी कसेंही असो, मनुष्य आपला जीवनक्रम परिस्थित्यनुरूप आखून घेतोच. हा सिद्धांत विसाव्या शतकांतील मानवाला तर तंतोतंत लागू पडतो. असें जरी असलें तरी कांही विभागांतील हवापाणी मानवजातीला प्रगतिपर होण्यास विशेष प्रोत्साहन देणारें आहे. अशा उत्साहवर्धक हवामानामुळे समशीतोष्ण कटिबंधांतील मनुष्याने आपली उन्नति लवकर करून घेतली.

विषुववृत्ताच्या आसपासच्या विभागांत मनुष्याचा जीवनक्रम सोपा असतो. येथे मनुष्याला खाद्यपेयादि पदार्थ मिळविण्यास फारसे श्रम करावे लागत नाहीत. पदार्थ बहुतांशीं आयतेच सापडतात. फक्त ते नीटपणें गोळा करावे लागतात. समशीतोष्ण विभागांत मनुष्याला अंगमेहनत केल्याशिवाय खाद्य पदार्थ मिळतच

* 'Geography and World Power' by *Fairgrieve*. Page 19.

नाहीत. या विभागांत मनुष्याला धडपड केल्याविना जीवनक्रम चालवितां येत नाही. 'उष्ण विभागांत, कांही अपवाद वगळल्यास, प्रगति खुंटलेली आढळते. उष्ण विभागांत सर्व दिवस सारखेच असतात त्यामुळे मनुष्याचा जीवनक्रम सोपा आणि ठरीव साच्या-प्रमाणें अव्याहत चालतो.'* याच्या उलट समशीतोष्ण कटिबंधांतील परिस्थिति आहे. उन्हाळा लोटला की पावसाळा व नंतर हिवाळा असा सृष्टिक्रम तेथे आहे. कांही ऋतूंत धान्यादिकांची विपुलता असते तर कांही कालांत धान्यादिकांचा अभाव असतो. यामुळे या विभागांतील रहिवासी पुढील कालाकरितां तरतूद करून ठेवतात. पुढचा विचार केल्याशिवाय त्यांचें भागतच नाही. परंतु विषुववृत्तवर्ती आफ्रिकेंत तशी स्थिति नाही. येथे ऋतुमानाचें कांही कालप्रमाण नाही. सर्व दिवस सारखेच, म्हणून उद्याची काळजी येथील लोक करीत नाहीत. सृष्टीचा उदारपणा सर्व काळीं सारखाच असतो. युरोपांतील लोकांना हातपाय हालविल्याविना पोटाला अन्न मिळत नाही. कष्टाशिवाय यांना फळच नाही. म्हणूनच तेथील लोक कणखर, साहसी आणि दीर्घोद्योगी आहेत. हा त्यांचा गुण स्वयंभू नसून युरोपांतील सृष्टिक्रमाने ते लाचार होऊन तसे बनले. आराम व स्वास्थ्य कोणाला नकोसें आहे काय ? परंतु हे सुखासीन बनले तर यांना आजच खाद्यपेयादिकांची चणचण भासेल. 'कष्टेंविण फल नाही!'

मानवी प्रगतीला सहायभूत होणारी परिस्थिति

आतापर्यंत उष्ण प्रदेशांपेक्षा समशीतोष्ण विभागांत मानवाने उन्नति कां केली हें पाहिलें. आता समशीतोष्ण विभागांत विशेषतः कोणत्या प्रदेशांतील लोकांनी आपली उन्नति केली हें पाहूं.

*'Principles of Human Geography' by *Semple*. Page 619.

आद्य मानवजात शिकार करून व मासे पकडून आपली उपजीविका करीत असे. तदनंतर मनुष्य थोडी थोडी शेती करावयास शिकला. या अवस्थेंत तो बराचसा फिरस्ता असे. जेथे चांगली जमीन पाहिली तेथे त्याने थोडी कालक्रमणा केली व पुढे चांगल्या जमिनीच्या शोधार्थ तो पुन्हा भटकला. या काळांत मानव धनगरी राहणीचा होता. हळूहळू शेतीच्या तंत्राचें ज्ञान त्याला होऊं लागलें व मग तो एका जमिनीच्या तुकडयास चिकटून राहूं लागला. येथून त्याच्या राहणीला स्थैर्य येत गेलें. जमिनीवर मालकी हक्क निर्माण झाल्यामुळे एक प्रकारचा समाज तयार झाला. पूर्वीप्रमाणें थवेच्या थवे या प्रांतांतून त्या प्रांतांत जाणें बंद झालें. पूर्वी देखील हे थवे स्वयंशासित व स्वयंपूर्ण असत. आता फरक एवढाच पडला की हे थवे स्थायी बनले. प्रत्येकजण आपले मालकी हक्क प्रस्थापूं लागला. येथून संस्कृतीच्या खऱ्या ओनाम्यास सुरवात झाली! शेतकीच्या तंत्रांत ज्ञानाची भर पडत गेली व याच्याच अनुषंगाने इतर उद्योगधंदे निर्माण होऊन वाढीस लागले व समाज वाढूं लागला.

आता आपण सामाजिक उन्नति होण्याकरितां स्थूल मानाने भौगोलिक परिस्थिति कशा प्रकारची असावयास पाहिजे, हें पाहूं.

१. **जमिनीचा सुपीकपणा.** विषुववृत्ताच्या आसपासची जमीन अत्यंत सुपीक आहे. पण हा सुपीकपणा येथे विचारांत घ्यावयास नको. जसजशी कृषिसाधनांची व शास्त्राची उन्नति होईल, तसतसें पिकांचें प्रमाण वाढतें राहील, अशी जमीन सुपीक असावयास पाहिजे.

२. **स्वाभाविक रक्षण.** धनधान्यादिकांनी युक्त असणाऱ्या प्रदेशाच्या आसपास भौगोलिक परिस्थिति अशा सुरक्षितपणाची असावी की त्या प्रगतिपर समाजाला चोराचिलटांचा त्रास होऊं नये. मागील प्रकरणांत ईजिप्तमधील वाळवंटांनी ईजिप्तचें

आणि त्याच्या संस्कृतीचें कसें रक्षण केलें याचें विवेचन आलेंच आहे. त्याचप्रमाणे अशा प्रकारचे समृद्ध प्रदेश दळणवळणाच्या साधनांनी वा सोयींनी परिप्लुत असावे.

या तात्त्विक विवेचनावरून आता वास्तविक परिस्थितीकडे वळूं आणि मानवसमाजाने कोणकोणत्या प्रदेशांत कोणती उन्नति केली तें पाहूं.

संस्कृतीचा श्रीगणेशा कोठे झाला ?

मानवी संस्कृतीची सुरवात चार मोठ्या नद्यांच्या काठीं झाली असें आढळतें. यांत एक अशी गंमत दिसून येते की संस्कृतीचा उगम विशेषतः दोन नद्यांमधील दोआबांत म्हणजे अंतर्वेदींत झाला. ते भूप्रदेश असेः—(१) नील नदीचा काठ; (२) युफ्रेटिस व टाइग्रीस या नद्यांमधील प्रांत; (३) सिंधु व गंगा या नद्यांमधील मैदान; व (४) होआंगहो आणि यांगत्सी नदीचें खोरें. वर वर्णिल्याप्रमाणे भौगोलिक परिस्थिति बहुतांशीं अनुकूल असल्या-मुळे या चारही विभागांमधील मानवसमाजाने प्रगतीच्या मार्गावर मोठी दौड करून आपआपली विशिष्ट संस्कृति निर्माण केली. प्रत्येक ठिकाणीं नदीच्या प्रवाहामुळे जमिनीची सुपीकता, वाळवंटें, समुद्र किंवा पर्वत यांमुळे संरक्षण, दळणवळणाकरितां नदीचा मार्ग, अशी परिस्थिति असून शिवाय प्रत्येक विभाग पूर्णतया स्वतंत्र होता, असें आढळून येतें. इतकें असूनहि प्रत्येक ठिकाणचा इतिहास भिन्न आहे, कारण प्रत्येकाच्या भौगोलिक परिस्थितीच्या तपशिलांत बराच भेद आहे. तो कसा आहे याचें विहंगमावलोकन करूं.

आपण पाहिलेंच आहे की ईजिप्तची संस्कृति समुद्र आणि वाळवंट यांमुळे सुरक्षित राहिली, परंतु परिणामीं तो देश अलग राहिला. कारण ज्या वेळीं समुद्रावरचें दळणवळण सुलभ झालें आणि



प्राचीन संस्कृतींचीं चार केंद्रें

नैलथडीची मिसरी संस्कृति, तैग्रीस थडीची खाल्डियन संस्कृति, गंगा थडीची आर्यसंस्कृति व होआंगहो थडीची चिनी संस्कृति ह्या प्राचीन काळच्या चार सरित्तटीय संस्कृति होत्या.

[पृष्ठ १०

ज्या वेळीं प्रगतीकरितां अन्य राष्ट्रांशीं दळणवळणाची आवश्यकता भासूं लागली त्या वेळीं या समुद्राची व वाळवंटाची धोंडच जणूं काय ईजिप्तच्या मार्गांत उभी राहिली !

दुसरें उदाहरण **मेसोपोटेमियाचें**. ईजिप्तप्रमाणें मेसोपोटेमियाला (सध्याच्या 'इराक'ला) पूर्ण संरक्षण नव्हतें. या देशाच्या आसपास समुद्र, वाळवंट आणि दलदलीचे भाग संरक्षक म्हणून होते; परंतु त्यांतून देशांत घुसण्याकरितां वाटाही, विशेषतः उत्तरेस व पूर्वेस, बऱ्याच होत्या. या वाटांमधून आक्रमणशील लोकांच्या झुंडीच्या झुंडी खोऱ्यांतील सुपीक प्रांतावर येऊन आदळत असत. इ. स. पूर्वी १५०० पासूनचा इतिहास म्हणजे निरनिराळ्या टोळ्यांनी हा प्रांत वेळोवेळीं काबीज कसा केला याचाच इतिहास होय. अशा प्रकारच्या भिन्न भौगोलिक परिस्थितीमुळेच या खोऱ्यांतील लोकांच्या राहणींत आणि ईजिप्तच्या लोकांच्या राहणींत विशेष फरक पडला. **असीरियन्स** व **बॅबिलोनियन्स** नेहमी युद्धाच्या तयारींत राहत असल्यामुळे त्यांचा समाज शिस्तींत वाढला व सैन्यविषयक शास्त्रांत त्याने बरीच प्रगति केली. दळणवळणाचीं साधनेंही विपुल असल्याकारणाने या लोकांनी आसमंताद्भागांत व्यापारही चांगला वाढविला. पूर्वी हे लोक कृषिप्रधान होते; परंतु कालांतराने ते वणिग् वृत्तीचे बनले. ओघाओघाने मेसोपोटेमिया असीरियन्स, मीड्स व इराणी ह्या एकामागून एक आलेल्या आक्रमणशील समाजांच्या प्रभावी अमलामुळे प्रगमनशील बनत गेला आणि याच्या उलट ईजिप्त जरी सुरक्षित राहिला तरी डबक्यांतच पडून राहिल्यासारखा झाला !

पाटबंधारे व सामाजिक परिणाम. आता दोन्ही विभागांतील अतिप्राचीन संस्कृतीकडे वळूं. नील नदीला वेळोवेळीं पूर येत असल्यामुळे प्रत्येक वेळीं गाळ खूप वाहून येतो. मनुष्याला या

गाळाचा उपयोग शेतीच्या कामांत कसा करून घ्यावा हें जोंपर्यंत अवगत नव्हतें, तोंपर्यंत या पुरांचा अति त्रास होत असे. परंतु कालांतराने या पुरापासून अपरिमित लाभ होतो असें जेव्हा निदर्शनास आलें, तेव्हापासून जमिनीचा सुपीकपणा वाढवून कृषि-शास्त्रांत उत्तरोत्तर प्रगति करण्याकडे समाजाने आपलें लक्ष वळविलें. नील नदींतून कालवे काढण्यांत आले व शेतीचें क्षेत्र पुष्कळ वाढविलें गेलें. समाजांत एकीची भावना, सहकार्य करण्याची तत्प-रता व शेतांत श्रम करण्याची आवड ईजिप्तमध्ये वाढली. संस्कृतींत ईजिप्त अग्रगण्य झाला तो तेथील असंख्य लोकांच्या मेहनतीने आणि कार्यतत्परतेमुळे झाला. तेथील राजांनी अगणित मजूर लावून रेताड मैदानांत मनोरे बांधले म्हणून नव्हे. असेंच चीन देशा-विषयीसुद्धा म्हणतां येईल. नदीच्या पाण्याचा योग्य उपयोग करून घेण्यांतच प्राचीन संस्कृतीचें विशेषत्व आहे. ईजिप्त, मेसोपोटेमिया, चीन आणि उत्तरभारतांतील प्राचीन इतिहास या गोष्टींचीच साक्ष देतो. नदी हा दळणवळणाचा एक राजमार्ग होता व तो समाजां-तील एक दुवा होता. नदी सार्वजनिक उपयोगाची, तसेंच संकटाची दात्री असल्यामुळे समाजांत एकी होई. अद्यापिही तीच परिस्थिति व तोच परिणाम आढळतो.

यापुढे जागतिक संस्कृतीने जी उन्नति केली ती जलमार्गानेच केली. एवंच संस्कृतीचा मूळ पाया जलमार्गच होय.

प्रकरण तिसरें

जगाच्या इतिहासाचे टप्पे :
(आ) भूवेष्टित समुद्र व तेथील राज्यें

भूमध्य समुद्र

या समुद्राच्या आसपासच्या प्रदेशांतील मनुष्यसमाज दीर्घ कालपर्यंत सुधारणेमध्ये अग्रेसर होते. इसवी सनापूर्वी २००० वर्षांपासून ते इ. स. १५०० पर्यंतच्या काळांत या भागांत संस्कृतीची जोपासना झाली. आता प्रश्न साहजिकच मनांत येतो की याच भागांत संस्कृतीची वाढ कां झाली ?

आतापर्यंत आपण पाहिलेंच आहे की संस्कृतीचा श्रीगणेशा शेतीपासून झाला. पुढे नद्यांच्या पुराचा भरपूर उपयोग करून घेण्यांत आला व कालवे काढून त्या उपयोगाचें क्षेत्र वाढविण्यांत आलें. नद्यांचा उपयोग व्यापारी दळणवळणांत होऊं लागला. अगदी आरंभीं लाकडाच्या ओंडक्यांच्या ओबडधोबड नावा तयार करण्यांत आल्या व नंतर मोठमोठीं झाडें पोखरून त्यांचा होड्यां-सारखा उपयोग करून घेण्यांत आला. कालांतराने नावा समुद्रांत प्रवास करण्याइतक्या मजबूत तयार झाल्या व ओघानेच या नावा समुद्रावर फिरूं लागल्या.

आशिया, युरोप व आफ्रिका यांच्या जोड नकाशांत आपण बारकाईने पाहिलें तर असें आढळेल की, भूमध्य समुद्र सर्व बाजूंनी भूभागाने परिवेष्टित आहे. संस्कृतीच्या प्रारंभ काळांतील नाविकांना हा समुद्र अमर्याद असा कधीच वाटला नाही. पण चिनी लोकांचें

तसें नव्हतें. चिनी लोकांचे सर्व व्यापाराचे आणि दळणवळणाचे राजमार्ग नद्याच होत्या; परंतु या नद्या अफाट आणि गंभीर अशा समुद्रांत मिळतात व एकदम अमर्याद, भव्य आणि गंभीर समुद्र पुढे दिसतो. हें दृश्य समोर असल्यामुळे तेथील लोकांच्या दर्यावर्दी-पणास पायबंद बसला. नद्यांवर त्यांनी पूर्ण स्वामित्व मिळविलें, परंतु खुल्या समुद्रांत शिरण्यास ते कचरले. कारण ती फार मोठी उडी होती. परंतु भूमध्यसागराची परिस्थिति याहून अगदी भिन्न आहे व होती. या समुद्रांत लहान लहान बेटें असून, मध्ये द्वीपकल्पें आणि मधून मधून बरींच भूशिरें असल्यामुळे नावाड्याला आपली दृष्टि भूभागावरच सतत ठेवून प्रवास करतां येतो व येई. तसेंच भूमध्य समुद्रांत लाटांचा उपद्रव फार कमी आणि त्यामुळे लहान लहान होड्यांना प्रवास करण्याची अडचण नाही. या सर्व कारणांमुळे हा समुद्र म्हणजे नावाड्यांचें क्रीडांगण व दळण-वळणाचा हमरस्ता बनला आणि **येथे युरोपियन संस्कृतीचा ओनामा घातला गेला !**

एजियन संस्कृति. या समुद्रांत ग्रीसच्या दक्षिणेस **क्रीट** नांवाचें द्वीप आहे, तें युद्धदृष्टया महत्त्वाचें आहे. तेथे युरोपियन संस्कृतीचा पाया घातला गेला असें म्हणणें कांही वावगें होणार नाही. या बेटाच्या संस्कृतीचें प्राचीनत्व ईजिप्तच्या बरोबरीचें आहे. या बेटांतील लोकांचे स्वामित्वसंबंध सभोंवारच्या एजियन समुद्रा-भोवतालच्या टापूवर होते. क्रीटन लोक निष्णात दर्यासारंग होते. त्यांचा व्यापार ईजिप्त व एशिया मायनरशीं अव्याहत चालत असे. एजियन समुद्र हा व्यापारी वाहतुकीचें महत्त्वाचें साधन होतें; तथापि परकीयांच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्यास प्राचीन काळीं तो तित-काच उपयोगी पडत असे. क्रीट बेटांतील लोकांचे संबंध एजियन समुद्रांत सर्वत्र पसरले असल्यामुळे क्रीटन लोकांच्या संस्कृतीस

'एजियन संस्कृति' असें नांव मिळालें. एजियन संस्कृतीच्या भरभराटीचा काळ इ. स. पूर्वी २९०० ते इ. स. पूर्वी २००० पर्यंतचा होता.

फिनीशियन संस्कृति. वरील काळाच्या अखेरीस 'सेमिटिक' जातीच्या लोकांचीं छोटीं छोटीं जहाजें भूमध्य सागरांत बेगुमानपणें फिरावयास लागलीं होतीं. या जातीचा उगम युफ्रेटिस-टायग्रीसच्या मुखाजवळील भागांत आढळतो. याच वेळीं मेसोपोटेमियाचा ईजिप्त जवळील व्यापार दिवसेंदिवस वाढत चालला होता. अशा संधानांत या जातीने सिरियाच्या (प्राचीन 'फिनीशिया'च्या) किनाऱ्यावर टायर व सैडन हीं बंदरें वसविलीं. इ. स. पूर्वी २००० पासून तों कार्थेज नष्ट होईपर्यंत (इ. स. पूर्वी २०० पर्यंत) फिनीशियन लोकांचीं व्यापारी जहाजें सबंध भूमध्य सागरांत वावरत होतीं! या काळचा भूमध्य सागरांतील सर्व व्यापार या लोकांच्या हातांत होता! पूर्वेच्या आणि पश्चिमेच्या राष्ट्रांना एकमेकांजवळ आणणारी हीच प्रथम जाति होय. इ. स. पूर्वी १०००च्या सुमारास या जातीची भरभराट कळसास जाऊन पोचल्याचें निदर्शनास येतें!

फिनीशियन लोकांनी केवळ व्यापार आपल्या हातांत घेतला. त्यांनी केव्हाही कोणताही प्रांत काबीज करण्याचा प्रयत्न केला नाही. या धोरणानेही हे लोक भूमध्य सागराचे स्वामी बनले. भूमध्य समुद्र हा त्या वेळच्या दळणवळणाचा राजमार्ग बनला. तो पूर्वीप्रमाणें संस्कृतिप्रसाराला वा राज्यविस्ताराला अडथळा म्हणून राहिला नाही.

सुरवातीला या लोकांचा जम भूमध्य सागराच्या पूर्व विभागांत बसला व हळूहळू यांनी आपले हातपाय पश्चिमेस इटाली, फ्रान्स, स्पेनपर्यंत व दक्षिणेस ट्यूनिसपर्यंत पसरले. त्यांनी आपली संस्कृति भौगोलिक परिस्थितीवर आणि आर्थिक व्यवहारावर उभारली;

पण त्यांच्या संस्कृतीचा मूळ पाया त्यांचें भूमध्यसागरावरील प्रभुत्व हाच होता.

लोखंडाचा प्रादुर्भाव

पूर्वेच्या भूमध्यसागरीय भागांतच लोखंड धातूचा शोध अंदाजें इ. स. पूर्वी १०००च्या सुमारास लागला असावा असें वाटतें.* यानंतरच्या काळांत नाना प्रकारचीं आयुधें आणि अवजारें झपाट्याने निर्माण झालीं. या धातूचा शोध कोणीं लाविला हें नक्की सांगतां येत नाही. डान्यूब विभागांतील रानटी लोकांना या धातूची माहिती होती असें दिसतें. हे रानटी लोक जेव्हा दक्षिणेकडे भूमध्यसागरीय विभागांत उतरले, तेव्हा लोखंड ही धातु त्यांनी आपल्या बरोबर आणली असावी, असा तर्क आहे.

भूमध्यसागरीय विभागाला स्वाभाविक संरक्षण असें नाही. फक्त दक्षिणेस सहाराचें वाळवंट आहे. या दुर्लंघ्य वाळवंटामुळे आफ्रिकेंतील रानटी टोळ्या भूमध्यसागरीय विभागांत येऊंच शकल्या नाहीत. याशिवाय या प्रदेशाला संरक्षण नसल्याने त्यावर वेळोवेळीं बाहेरील लोकांनी हल्ले केले व शेवटीं आक्रमणकर्ते या विभागांत स्थायिक होऊन येथील संस्कृतीच्या आहारीं गेले. एखाद्या मागासलेल्या जमातीची संख्या वाढत गेली की तिला आपला राहण्याचा भूभाग अपुरा पडतो आणि ते लोक उदरंभरणार्थ दुसऱ्या प्रांतावर आक्रमण करतात. हे रानटी लोक सुपीक प्रांतांत स्थायिक झाले की आपला पूर्वीचा रानटीपणा विसरतात. हा नियम आपणास हिंदुस्थान, चीन आणि भूमध्यसागरीय विभागांत अमलांत आलेला पाहावयास सापडतो. संस्कृतीच्या बाल्यावस्थेंत नैसर्गिक संरक्षणाची


* ऋग्वेदकालीन संस्कृतीमध्ये लोखंड व पोलाद ह्यांचीं हत्यारेंही उपयोगांत होतीं. ('वेदमें लोहेके कारखाने'—श्री. दा. सातवळेकर.)

अत्यंत आवश्यकता असते. तथापि पुढे पुढे जेव्हा ज्ञानाची आणि युद्धतंत्राची वाढ होत जाते तेव्हा असल्या रानटी टोळधाडीमुळे जरी कांही काळ अनागोंदी कारभार होतो, तरी कालांतराने संस्कृतीला निराळी चालना मिळते व ती संस्कृति पुढे पाऊल टाकते. अशा रीतीने संस्कृतीची वाढ आणि जोपासना होते.

ग्रीस. रानटी जमातींनी–पुढे यांना ग्रीक लोक संबोधण्यांत आलें–वरचेवर 'एजियन', 'फिनीशियन' आणि 'इजिप्शियन' लोकांवर आक्रमक हल्ले केले. या हल्ल्यांच्या वेळीं हे रानटी (ग्रीक) लोक लोखंडाचा उपयोग करीत असत. ग्रीक लोकांचीं शस्त्रास्त्रें लोखंडी असून एजियन लोकांपेक्षा सरस होतीं. यामुळे एजियन लोकांचा टिकाव ग्रीक लोकांपुढे लागला नाही व परिणामीं त्यांच्या संस्कृतीचा नायनाट झाला. यापुढचा इतिहास म्हणजे ग्रीक लोकांनी हळूहळू संपूर्ण भूमध्य सागरावर वर्चस्व कसें मिळविलें व त्यांच्या संस्कृतीची वाढ कशी कशी होत गेली ह्याचा इतिहास होय. ग्रीक लोकांनी प्रथम 'ट्रॉय' आणि 'क्रीट' या दोन एजियन संस्कृति-केंद्रांचा नायनाट केला. नंतर काळ्या समुद्राच्या तोंडाशीं बायझँटियम शहर स्थापिलें. कालांतराने इटली व सिसिली हे प्रांत त्यांच्या आहारीं गेले. आता ग्रीक लोक नुसते फिरस्ते असे राहिले नव्हते. त्यांना व्यापार करण्याची चटक लागली व त्यामुळे ते दर्यावर्दी झाले व ओघाने त्यांची स्पर्धा फिनिशियन लोकांशीं होऊं लागली. युरोप–आशिया या दोन मोठ्या भूविभागांना सांधणारा हमरस्ता जो भूमध्य समुद्र तो आता ग्रीक लोकांच्या ताब्यांत आला. भूमध्य समुद्रावरचें स्वामित्व म्हणजे त्या काळचें जगावरचें प्रभुत्व गणलें जात होतें. इ. स. पूर्वीच्या चवथ्या व पांचव्या शतकांत ग्रीक लोक भाग्याच्या व वैभवाच्या शिखरावर होते.

मॅसिडोनिया. इ. स. पूर्वी ३३५ ते ३२३ ह्या काळांत मॅसिडोनियाच्या अलेक्झांडरने ईजिप्त देश पादाक्रांत करून मेसो-पोटेमिया मधील पर्शियन सत्तेचा पुरा बीमोड केला. 'टायर' हें फिनीशियन लोकांचें नगर त्याने नामशेष केलें. याच वेळीं ईजिप्तमध्ये अलेक्झांड्रिया हें शहर समुद्राच्या जवळ वसविण्यांत आलें. यामुळे ग्रीसमधील सर्व साधनें आणि सत्ता भूमध्य समुद्रांत फार वाढली. आजपर्यंत थीब्स व मेंफिस हीं संस्कृतिकेंद्रें समुद्रापासून आंत दूर अंतरावर होतीं. अलेक्झांडरच्या पश्चात् ग्रीक सत्ता मोडकळीस आली, परंतु भूमध्य समुद्राच्या पूर्व विभागांत ग्रीक संस्कृतीची छाप मात्र कायमची बसली. मोठमोठीं नगरें अस्तित्वांत आलीं. अलेक्झांडरच्या हयातींत फक्त अथेन्स, सायराक्यूज व कार्थेज हीं तीनच शहरें एक लाख लोकवस्तीचीं होतीं. अलेक्झांडरच्या नंतरच्या काळांत व्यापाराची भरभराट झालेली दिसते व त्याबरोबर ग्रीक संस्कृतीचा प्रसार होत गेलेला दिसतो. या काळांत सेल्युकिआ, अँटिओक, अलेक्झांड्रिया आणि कार्थेज या नगरांची वस्ती दोन लाखांच्या वर गेली होती असें दिसून येतें. तसेंच रोम, सायराक्यूज, कॉरिंथ, ऱ्होडस व एफिसस या शहरांची लोकसंख्या एक लाखावर गेली होती. एशिया मायनर मधील जवळजवळ पांचशें शहरें व्यापारांत गुंतलेलीं होतीं आणि तऱ्हतऱ्हेचे उद्योगधंदे भरभराटीस आलेले होते. सोन्यापितळेचीं भांडीं, कपडे, गालिचे, चिनी मातीचीं कामें हीं विशेष नांवारूपास आलेलीं होतीं. एवढेंच नव्हे तर यांचा व्यापार चीन हिंदुस्थानपर्यंत चालत होता.

ग्रीक सत्ता व्यापारक्षेत्रांत येण्यापूर्वी टायरच्या फिनीशियन् लोकांचा व्यापार पश्चिमेस बऱ्यास दूरपर्यंत चालत असे. त्यांनी आफ्रिकेच्या उत्तरेस इ. स. पूर्वी ८०० या वर्षी 'कार्थेज' शहर वसविलें होतें. तसेंच त्यांची सत्ता सिसिलीच्या कांही भागावर,



ग्रीक व फिनीशिअन संस्कृति आणि तिचा विस्तार

ग्रीक व फिनीशियन संस्कृतीचा आधार भूमध्यसागरावरील अनिर्बंध सत्ता हा होता.

[पृष्ठ १८

सार्डीनिया, कॉर्सिका ह्यांवर आणि दक्षिण स्पेनवरही चालत होती व या सत्तेचें केंद्र 'कार्थेज' होतें. या काळांत पश्चिम भूमध्य समुद्रावर, तेथील बेटांवर व किनाऱ्यावर कार्थेजची अबाधित सत्ता होती, आणि पूर्व विभागांत ग्रीक सत्तेला कोणीही प्रतिस्पर्धी नव्हता !

भूमध्य समुद्रांतील विभागांचें एकीकरण

रोमचें साम्राज्य. कालांतराने संपूर्ण भूमध्य समुद्र व त्याच्या लगतचा सर्व किनारा रोमच्या आहारीं गेला. आरंभीं रोमचे लोक पश्चिमाभिमुख होते. त्यांची नजर सतत कार्थेज नगर आणि त्याच्या भरभराटीच्या व्यापारावर असे. एका शतकानंतर त्यांच्यांत युद्धें होऊन कार्थेज शहर इ. स. पूर्वी २६४ या सालीं बेचिराख करण्यांत आलें. आणि पश्चिम विभागांत रोमचें स्वामित्व कायम झालें. पुढील शतकांत फ्रान्स देशांत ऱ्होन नदीच्या खोऱ्यापर्यंत आणि पूर्व विभागांत रोमची सत्ता प्रस्थापित झाली. इ. स. १०० सालीं रोमने सबंध आफ्रिकेच्या किनाऱ्यावर वसाहती निर्माण केल्या, मेसोपोटेमिया व आर्मिनिया हे प्रांत जिंकले आणि पश्चिमेस गॉल (फ्रान्स) मधून ब्रिटनमध्येही ते उतरले. अशा रीतीने एक-सूत्री संस्कृति व तसेंच एकसूत्री सत्ता सर्व भूमध्य समुद्रविभगांत स्थापण्याचें श्रेय त्यांनी घेतलें. रोमच्या सत्तेला जोडणारा सांधा म्हणजे भूमध्य समुद्रच होता. येथेच युरोपियन संस्कृतीचा पाया घातला गेला.

आता पुढील इतिहासाचें निरीक्षण थोडा वेळ थांबवूं आणि परिस्थिति व सत्तावाढ यांचा संबंध थोडक्यांत पाहूं. प्रथमतः युरोपचे हवामानाच्या दृष्टीने पडणारे विभाग पाहूं:—

(१) दक्षिणेकडील समशीतोष्ण भूमध्य विभाग.

(२) वायव्येकडील बारमहा कमी अधिक पावसाचा भाग. या भागांत उत्तरेकडील थंड वाऱ्यांच्या योगाने उन्हाळ्याची उष्णता कमी होते व हिवाळ्यांत थंडी अधिक वाढते.

(३) उत्तरेकडील आणि ईशान्येकडील अतिथंड विभाग.

आतापर्यंत आपण पाहिलें की रोमची सत्ता पहिल्या विभागांत प्रथम स्थिर झाली आणि नंतर हळूहळू ती दुसऱ्या विभागांत आपले हातपाय पसरूं लागली. परंतु तिसरा विभाग दीर्घ कालपर्यंत तिमिरांतच राहिला. असो.

साम्राज्यांतील निरनिराळे प्रांत एकमेकांशीं संलग्न राखणें हें रोमन सत्तेने आणखी एक महत्त्वाचें कार्य केलें. त्यांना पक्के रस्ते बांधण्याची कला अवगत होती. त्यांनी ठिकठिकाणीं आपल्या सोईकरितां पक्के रस्ते बांधले. ते केवळ स्वाभाविक जलमार्गांवर विसंबून राहिले नाहीत. कांही ठिकाणच्या जलमार्गांत पाण्याचा पुरवठा असावा म्हणून त्यांनी बंधारेही बांधले. त्या वेळेपर्यंत कोणत्याही युरोपियन संस्कृतीने असली कामगिरी बजावलेली नव्हती.

परिसीमेवर फाटाफूट. सृष्टिनियमाप्रमाणें भूमध्यसागरीय विभागांतील रोमची एकसूत्री सत्ता दीर्घकाल टिकली नाही. रोमन साम्राज्याच्या उत्तरेकडील सरहद्दीवर स्वाभाविक संरक्षण असें कांहीच नव्हतें. आणि सरहद्दीची लांबी फार मोठी असल्यामुळे किल्ले बांधून संरक्षण करणें अशक्यप्रायच होतें. अशा परिस्थितींत तिकडून रानटी आणि भटक्या लोकांच्या स्वाऱ्या वरचेवर होऊं लागल्या. शेवटीं या लोकांचे (जर्मन्स, व्हॅन्डाल्स, फ्रँक्स, गॉथ्स आणि हूण यांचे) आक्रमक हल्ले थेट समुद्र किनाऱ्यापर्यंत आदळूं लागले व अखेर परिणाम असा झाला की रोमन साम्राज्याचीं भौगोलिक विभागाला अनुसरून दोन शकलें पडलीं. पश्चिमेकडील साम्राज्य रोम नगराने सांभाळलें व पूर्वेकडील प्रांत बायझँटियम



रोमन साम्राज्य

रोमन साम्राज्य कळसास पोचलें तेव्हाचा विस्तार. ह्या राज्याची उत्तर सरहद्द सुसंरक्षित नसल्याने बाणांनी दाखविलेल्या दिशांनी फ्रँक, जर्मन वगैरे त्यावेळच्या भटक्या लोकांनी या साम्राज्यावर आक्रमण केलें.

नगराने घेतला. पुढे या नगरीचें नांव कॉन्स्टंटाईन राजाने कॉन्स्टंटिनोपल (सध्या इस्तंबूल) असें ठेविलें.

तिमिरमय काळ. यानंतरचा काळ तिमिरमयच होय. या काळांत संस्कृतीचा प्रसार युरोपच्या पश्चिम विभागांत अत्यंत मंदगतीने होत होता. रानटी लोक जरी मालक झाले तरी त्यांनी आपल्या सुसंस्कृत प्रजेपासून नवीन गोष्टी उचलिल्या. या वेळीं रानटीपणाचा व संस्कृतीचा एकमिलाफ होऊं लागला होता. याच काळांत राजकीय, आर्थिक व भौगोलिक परिस्थितीला अनुसरून 'सरंजामी पद्धतीचा' उगम झाला. तसेंच पश्चिम आणि मध्य युरोपांत निरनिराळीं संस्थानें जन्मास येऊं लागलीं.

अरब. या वेळीं अरब व सॅरसन्स या लोकांनी रोमन साम्राज्यावर जबरदस्त आघात केले. महंमदाच्या मरणानंतर (इ. स. ६३२) एका शतकांतच त्यांनी सिरिया ओलांडून टॉरस-पर्वतापर्यंत आणि पश्चिमेस ईजिप्त व आफ्रिकेचा किनारा पादाक्रांत करून स्पेनपर्यंत आपली सत्ता स्थापिली. या काळांतील अरबांचें गणितशास्त्र, खगोलशास्त्र व वैद्यक यांचें ज्ञान युरोपियन लोकांच्या मानाने उच्च दर्जाचें होतें. अरबी संस्कृतीला कोणतीही कसोटी लावली तरी ती–विशेषतः आर्थिक दृष्टया–ख्रिस्ती संस्कृतीपेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ होती. **या वेळीं** भूमध्य समुद्र मुसलमानी आणि ईसाई लोकांचें रणक्षेत्र बनला होता. **याच** वेळीं पूर्वेकडील रोमन साम्राज्य अतिशय आकुंचित झालें. त्याचा विस्तार ग्रीस व क्रीटच्या पलीकडे उरला नव्हता. तसेंच पश्चिम रोमन साम्राज्याचे लहान लहान तुकडे पडून निरनिराळीं राज्यें पण उदयास आलीं. ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही की **वाढत्या मुसलमानी सत्तेचा सतत उपसर्ग चालू असतांना देखील भूमध्य समुद्राच्या विभागांत युरोपियन संस्कृतीचेंच प्राबल्य राहिलें.** उत्तर आणि पश्चिमेकडील

लहान लहान सर्व राज्यें रोमच्या पोपची सत्ता मानीत होतीं. रोम नगरस्थ पोप महाराजांची सत्ता भूमध्य विभागांत प्रबल होती. या मधल्या अंदाधुंदीच्या काळांत अखेरीस इटालींतील कांही नगरें व्यापारांत बरींच पुढे आलेलीं होतीं. व्हेनिस शहर व्यापारांत अग्रगण्य होतें. पण तांबडा समुद्र व पूर्वेकडील व्यापाराचे सर्व महत्त्वाचे मार्ग प्राचीन फिनीशियन लोकांप्रमाणें महंमदी धर्मीयांच्याच स्वाधीन होते. याशिवाय ख्रिस्त्यांचें मूळ धर्मस्थान जें जेरुसेलम नगर तें त्यांच्याच स्वामित्वाखाली गेलें होतें. याकरितां रोमच्या पोपने सर्व युरोपियन राष्ट्रांना महंमदीयांशीं धर्मयुद्ध करण्याचा आदेश दिला होता. हीं धार्मिक युद्धें सुमारें पन्नास वर्षेंपर्यंत चाललीं, तरी व्यापारविषयक मार्ग व पवित्र स्थानांची सोडवणूक ख्रिस्तधर्मीयांना करतां आली नाही! इतकें मात्र खरें की मुसलमानी सत्ता ह्या काळीं बरीच खिळखिळी झालेली होती. याच काळांत व्हेनिस आणि जिनोवा हीं शहरें वैभवसंपन्न बनलीं.

भूवेष्टित समुद्राभोवतालचा आणखी एक भूविभाग

आता आपण दुसऱ्या अंतर्गत समुद्र विभागाकडे वळूं या. ॲड्रियाटिक समुद्र किनारीं वसलेल्या 'व्हेनिस' शहराच्या उत्तरेकडील आल्प्स पर्वताच्या खिंडींतून ऱ्हाईन नदीच्या खोऱ्यांत उतरण्याच्या वाटा होत्या. ऱ्हाईन नदी वायव्य युरोपांतील दळणवळणाचा एक राजमार्ग असे व आहे. ऱ्हाईन नदीच्या मुखाशीं व्यापारी शहरें होतीं व ज्याप्रमाणें फिनीशियन लोकांनी भूमध्य सागरीय विभागाचें एकीकरण केलें तसेंच उत्तर समुद्र व बाल्टिक समुद्र यांच्या समीपवर्ती भागाचें 'हंसा लीग' नांवाच्या संस्थेने घर आंगण केलें. उत्तर समुद्राला मिळणाऱ्या, व्हेसर व एल्ब या नद्यांच्या मुखांजवळील अनुक्रमें ब्रेमेन व हॅम्बुर्ग या शहरांपासून



हंसालीग चा विस्तार व क्षेत्र

'हंसा लीग' ह्या संस्थेने जरी उत्तर व बाल्टिक ह्या अंतर्गत समुद्रांभोवत आपल्या व्यापाचें जाळें विणिलें होतें, तरी तिने ऱ्हाईन-जिनोआ-व्हेनिस ह्या द्वार मार्फत भूमध्य समुद्र व त्याचीं द्वारें ह्यांशीं संधान राखिलें होतें.

[पृष्ठ

बाल्टिक समुद्रावरील ल्यूबेक शहरावरून तों पूर्वेस फिनलंडच्या आखाताजवळील नोव्होगोरॉड नगरापर्यंत, तसेंच मध्य युरोपमध्ये व्हिस्चुला आणि एल्ब या नद्यांमधून हंसा लीगचा व्यापार चालत असे. व्यापाराबरोबर संस्कृतीचीही प्रगति होत होती. ज्याप्रमाणें भूमध्य सागरीय भागांत व्यापार व संस्कृति यांची वाढ झाली, तद्वत् याही भागांत घडलें. हंसालीगचीं लहानमोठीं व्यापारी जहाजें या भूवेष्टित समुद्रविभागाच्या कानाकोपऱ्यांत जात व प्रत्येक ठिकाणीं संस्कृतीचें लोणही पोचवीत.

व्यापार व व्यापार करण्याची तीव्र इच्छा जसजशी वाढत गेली तसतसा लोकांचा दृष्टिकोन फाकत गेला. धर्मयुद्धांच्या परंपरेमुळे अमेरिकेचा व हिंदुस्थानकडे येणाऱ्या जलमार्गाचा शोध लागला हें बहुश्रुत वाचकांस अवगतच आहे.

चार हजार वर्षांपासून भूमध्य समुद्राच्या आसपास व्यापार व संस्कृति नांदत राहिली; पण यापुढे भूमध्य समुद्र संस्कृति व व्यापार यांचें केंद्र राहिलें नाही, केवळ इकडून तिकडे जाण्याची वाट बनला. हें कसें झालें याचा ऊहापोह आपण पुढील प्रकरणांत करूं.

प्रकरण चवथें

जागतिक इतिहासाचे टप्पे : (इ) महासागरावलंबी राज्यें

जगाच्या एकीकरणाचा प्रारंभ

समुद्रयानाची उत्तम परिस्थिति आणि होकायंत्रादि साधनांमुळे नौकानयनशास्त्रांत झालेली प्रगति यांमुळे मानवी इतिहासांत क्रांतिकारक बदल झाला. अज्ञात व अफाट महासागर दुर्लंघनीय

अडथळे न राहतां दळणवळणाचें सोपें साधन बनले. ज्या अमर्याद महासागरांत घुसण्यास धाडशी दर्यासारंग व उलटया काळजाचे चांचे धजत नसत, तेच महासागर आता विलासी नरनारींनी चैनींत प्रवास करण्याजोगे हमरस्ते बनले आहेत !

व्यापार मार्गांचा निरोध. मध्ययुगांत आशियाशीं होणारा सर्व व्यापार अरब लोकांच्या स्वाधीन होता. भूमध्य समुद्राचा पूर्वभाग सर्वस्वीं त्यांच्या अमलाखाली होता. अरब लोकांचीं व्यापारी जहाजें तांबडया समुद्रांतून अरबस्थान व इराण यांच्या किनाऱ्याने हिंदुस्थानांत येत व व्यापार करीत. तसेंच खुष्कीवरून अरब कारवानांच्या तर्फे येणारा व्यापारी माल सिरियामधून अलेप्पो व बगदाद मार्गाने येत असे. ईजिप्त व पॅलेस्टाईनमधील व्यापारी बंदरें व ठाणींही अरबांच्याच ताब्यांत होतीं. अरब लोकांनी पूर्वेकडील देशांतून जल व स्थल मार्गाने आणलेला सर्व व्यापारी माल व्हेनिस व जिनोआ या दोन बंदरांत प्रथमतः उतरत असे व तेथून सर्व युरोपांत जाई. अकराव्या शतकानंतर अरब लोकांची व्यापारी उलाढाल कडव्या व आडदांड तुर्क लोकांच्या हातांत गेली. इ. स. १४५३ सालीं कॉंस्टांटिनोपल तुर्कांच्या हातीं गेलें. तुर्क लोक व्यापारी वृत्तीचे नव्हते; ते विजिगीषु आणि कडवे होते. त्यामुळे युरोपच्या व्यापारास धक्का बसला व युरोपला व्यापारी मालाची चणचण भासूं लागली. पूर्व भूमध्य समुद्रामधून पलीकडे हिंदुस्थानाशीं व्यापार करणें युरोपला शक्य नव्हतें. कारण मध्ये तुर्कांची आडदांड सत्ता होती. म्हणून व्यापाराकरितां स्वतंत्र जलमार्गाची अत्यंत आवश्यकता होती.

भारताच्या रोखाने पूर्वेकडे. तेव्हा हिंदुस्थान व त्यापलीकडील मसाल्याचीं बेटें ह्यांशीं व्यापार कोणत्या मार्गाने करावा या

चिंतेंत युरोपचे भूगोलवेत्ते गढून गेले. इ. स. ५० या वर्षी होऊन गेलेला विद्वद्रत्न पांपोनियस मेला याच्या सिद्धांताची त्यांना या वेळीं आठवण झाली. त्याच्या मताने पृथ्वी समुद्रवलयांकित आहे असें होतें. याला अनुसरून त्याने असें प्रतिपादिलें की आफ्रिका खंडाला जर वळसा घालून पुढे सरकलों तर खास हिंदुस्थानचा मार्ग सापडेल. परंतु याबरोबरच सर्वसाधारण अशी समजूत होती की फार पुढे या मार्गाने गेल्यास दैवी प्रकोप होऊन परतावें लागेल. म्हणून आफ्रिकेला वळसा घालून प्रवासकार्य होण्यास पाऊणशें वर्षे लागलीं. आफ्रिकेला वळसा घालण्याचें कार्य पोर्तुगीज दर्यासारंगांनी केलें. सुरवातीला त्यांनी जिब्राल्टर गाठून तेथून अरब (मूर) लोकांचें उच्चाटन केलें. नंतर आफ्रिकेचा गोल्ड कोस्ट घेतला. येथून गुलाम पकडून आणावे व त्यांचा व्यापार करावा, असा क्रम पोर्तुगीजांनी सुरू केला. येथे सोनें, मसाला व हस्तिदंताचाही व्यापार वाढला. ज्या सालीं तुर्कांनी कॉन्स्टांटिनोपल बळकावलें (१४५३) त्या सालीं पोर्तुगालचे दर्यावर्दी ग्यांबियास पोचले होते. तीस वर्षांनंतर त्यांनी कांगोपर्यंत मजल मारली व सन १४८६–८७ मध्ये 'डायाज' ह्याने केप ऑफ गुडहोपला दोन वेळां सफरी केल्या आणि इ. स. १४९८ सालीं व्हास्को ड गामाने आफ्रिकेला संपूर्ण वळसा घालून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदर गाठलें. अशा रीतीने हिंदुस्थानाला पोचणारा जलमार्ग खुला झाला.

भारताच्या रोखाने पश्चिमेकडे. याच काळांत पोर्तुगालचा प्रतिस्पर्धी स्पेन ह्यानेही हिंदुस्थानचा मार्ग पश्चिमेकडून शोधण्याचा उपक्रम सुरू ठेवला. जर पृथ्वी गोल आहे तर हिंदुस्थानचा मार्ग पश्चिमेकडून अवश्य सापडलाच पाहिजे असें प्रसिद्ध दर्यावर्दी कोलंबस ह्याचें ठाम मत होतें. त्याप्रमाणें त्याने स्पेनच्या राजाची समजूत करून देऊन त्याचें साहाय्य मिळविलें व त्याच्या बळावर अटलां-

टिक महासागर ओलांडून जाण्याचा प्रयत्न आरंभिला. टोस्कॅनेलीने त्या काळीं जगाचा नकाशा काढला, त्यांत फक्त अमेरिका खंडाला त्याने वगळलें होतें. टोस्कॅनेलीला काय, किंवा कोलंबसाला काय, अटलांटिकच्या पलीकडे अमेरिकेचा मोठा भूखंड असेल अशी मुळीच कल्पना नव्हती! अटलांटिक महासागरावरील कोलंबसाच्या प्रवासाचें पर्यवसान इ. सन १४९२ सालीं झालें. या वेळीं तो एका बेटावर उतरला. त्याला खास असें वाटलें की, आपण हिंदी किनाऱ्याजवळचें मसाल्याचें बेट गाठलें. याच समजुतीस अनुसरून त्या बेटाला व आसपासच्या द्वीपसमूहाला 'वेस्ट इंडीज' (पश्चिमहिंद द्वीपें) हें नांव पडलें. पुढे पंचवीस वर्षांनी मॅगेलन हा दक्षिण अमेरिकेला वळसा घालून पॅसिफिकमध्ये उतरला व नंतर त्याने (खरोखरीचीं) मसाल्याचीं बेटें गाठलीं. अशा प्रकारें साहसी दर्यासारंगांनी अटलांटिक, पॅसिफिक व हिंदी महासागर ओलांडले व त्यासंबंधाचें तत्कालीन जगाचें अज्ञान दूर केलें. अमर्याद महासागर मर्यादित झाले व त्यासंबंधाची भीति नाहीशी झाली. **अशा प्रकारें महासागर हे प्रगतींतील अडथळे न राहतां जल-प्रवासाचीं व्यापारोपयोगी साधनें बनलीं.**

सत्तेच्या केंद्राचें आंदोलन

अमेरिका खंडाचा आणि केप ऑफ गुड होप वरून हिंदुस्थानकडे येणाऱ्या मार्गाचा शोध लागल्यामुळे युरोपियन राष्ट्रांच्या सत्तेचा काटा निराळा कोन दाखवूं लागला. हिंदुस्थानकडे येणारा मार्ग सर्वस्वीं पोर्तुगीजांच्या आधीन होता. व्हेनिस बंदराकडे मसाल्याने भरून जाणारीं जहाजें रिकामीं जाऊं लागलीं. सर्व माल पोर्तुगीज जहाजांतून लिस्बन व ओपोर्टो बंदरांत उतरूं लागला. व्हेनिस व जिनोआ ह्यांच्या भराभराटीला उतरती कळा लागली व

पोर्तुगाल वैभवसंपन्न होऊं लागला. हिंदी महासागर पोर्तुगालच्या मालकीचें जणूं काय तळें बनला व भूमध्य सागर आडवाट होऊन गेला! एकोणिसाव्या शतकांत सुवेझचा कालवा बनविण्यांत आल्यामुळे भूमध्य समुद्राचें महत्त्व पुन: वाढलें आहे; कारण उघडच आहे की या समुद्रांतून हिंदुस्थानकडे येणारा मार्ग जवळचा पडतो.

यानंतरचा दुसरा महत्त्वाचा मार्ग म्हणजे अटलांटिकमधून अमेरिकेकडे जाणारा होय. अमेरिका खंडाच्या शोधामुळे युरोपच्या पश्चिमेकडील सर्व राष्ट्रांना आकस्मिक महत्त्व आलें. जीं राष्ट्रें आजपर्यंत व्यापारांत मागासलेलीं होतीं, तींच या नवीन मार्गामुळे व्यापारी हमरस्त्यावर आणिलीं गेलीं. ज्या राष्ट्रांना अटलांटिकचा किनारा होता, त्यांमध्ये व्यापार व सत्तेकरितां स्पर्धा सुरू झाली. आणि भूमध्य समुद्राचें व्यापारी महत्त्व अगदी कमी झालें. व्हेनिस व जिनोआचें व्यापारी सामर्थ्य ब्रिस्टल व लॅगॉस (आफ्रिकेंत गिनीच्या आखातावर) बंदरांकडे आलें. बाल्टिक समुद्रांतर्गत व्यापारी भरभराट व हंसा लीगच्या शहरांचें ऐतिहासिक महत्त्व ह्या गोष्टी नवीन भूखंडाच्या शोधामुळे पार लयास गेल्या. हंसालीगचा व्यापार बाराव्या शतकापासून तो सत्राव्या शतकापर्यंत अव्याहत चढत होता. परंतु आता ल्यूबेक व स्ट्रालेसुंड (हंसा लीगचीं शहरें) यांचें व्यापारी धुरीणत्व अमस्टरडाम व ब्रिस्टल या दोन शहरांकडे गेलें !

यानंतरच्या तीन शतकांत वायव्य युरोपांतील राष्ट्रांची व्यापार आणि त्याचबरोबर सामर्थ्य व सत्ता संपादन करण्यांत सतत स्पर्धा चाललेली दिसून येते. सन १२९४ सालीं इंग्लंड व पोर्तुगाल या दोन राष्ट्रांनी आपसांत अटलांटिक किनाऱ्यावरील व्यापारासंबंधीं एक समेट केलेला आढळून येतो. तर पंधराव्या शतकांत स्पेन व पोर्तुगाल हीं दोन राष्ट्रें प्रतिस्पर्धी बनलेलीं आढळतात. नवीन भूखंडाचा शोध व पूर्वेकडील जलमार्गांच्या

संशोधनाचें श्रेय यांच्याकडेच होतें. आपापसांत स्पर्धा कमी व्हावी म्हणून रोमनगरस्थ पोपने जगाची वाटणी या दोन राष्ट्रांत केली! पश्चिमेकडील व्यापार व सत्ता स्पेनला मिळाली व पूर्वेस पोर्तुगाल राष्ट्रास एकमेवाद्वितीयत्व प्राप्त झालें. उदयोन्मुख इंग्लंड व हॉलंडच्या साहसी नाविकांनी उत्तर अमेरिका किंवा सैबेरिया यांना वळसा घालून हिंदुस्थानचा नवीन एखादा मार्ग शोधण्याचे प्रयत्न केले; परंतु त्यांत त्यांना यश आलें नाही. आता एकच उपाय राहिला; तो म्हणजे पोपने केलेलें वाटप झुगारणें हा होता व तो त्यांनी अवलंबिला. सोळाव्या शतकाच्या मध्यापर्यंत पोपची सत्ता सर्वमान्य असे; परंतु याच काळीं हीं दोन्ही राष्ट्रें पोपचीं मतें झुगारून प्रॉटेस्टंट मतानुयायी (नवमतवादी) बनलीं, व यामुळे पोपच्या सत्तेला धक्का बसला. **पोप केव्हाही जनतेचीं मनें व मतें यांवर ताबा चालवूं शकत नाही.** तसेंच भौगोलिक व आर्थिक परिस्थितीवर त्याचा कांही अंमल चालूं शकत नाही. या शतकाच्या अखेरीस इंग्लंडने स्पेनच्या अजिंक्य आरमाराचा समुद्रावर पुरा मोड केला व याच सुमारास हॉलंडने स्पेनचें जूं झुगारलें. स्पेन व पोर्तुगालच्या व्यापारक्षेत्रांतील कित्येक ठिकाणीं हॉलंडने व इंग्लंडने आपल्या वखारी व व्यापारी ठाणीं वसविलीं, एवढेंच नव्हे तर वेस्ट इंडीज बेटांतून व नवीन भूखंडांतून स्पेनचें उच्चाटन होऊं लागलें.

भूमध्य समुद्राचें महत्त्व जसजसें कमी होऊं लागलें तसतसें भूमध्य समुद्रावरील रोमनगरस्थ पोपचें सामर्थ्य खिळखिळें होऊं लागलें!

ब्रिटिश वर्चस्वाचा प्रारंभ

युरोपच्या उत्तरेकडील राष्ट्रांनी अटलांटिक महासागराच्या किनाऱ्याचा भरपूर फायदा घेतला. या राष्ट्रांचीं जहाजें अफाट

समुद्र तरून जाण्यास योग्य अशीं बनूं लागलीं. भूमध्य समुद्रांतून वावरणारीं जहाजें लहान असून खुल्या समुद्रांतील वादळें वगैरे आपत्ति सहन करूं न शकणारीं असत. स्पेनचीं जहाजें वरील प्रकारचींच होतीं. पण इंग्लंडचीं जहाजें जास्त मजबूत व टिकाऊ होतीं. स्पॅनिश आरमारांत एकंदर १३२ जहाजें असून त्याविरुद्ध इंग्लंडचीं १९७ जहाजें कार्यक्षम व तोफा वाहणारीं होतीं. पण यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे यांतील नाविक आणि दर्यासारंग अटलांटिक महासागरांतील प्रवासाचा अनुभव घेऊन पूर्ण निष्णात बनले होते ही होय.

पुढील (सतराव्या) शतकांत महासागरावरील राजमार्गांचा ताबा मिळविण्यासाठी डच व इंग्रज यांची स्पर्धा सुरू झाली. दोघांच्या कलहांत फ्रान्स हें राष्ट्र कधीं डच लोकांकडून तर कधी इंग्लिशांकडून भाग घेत असे.

या कालांत डच लोकांची सत्ता माध्यान्हीस आली होती. सतराव्या शतकाच्या मध्य काळांत डच लोकांनी ईस्ट इंडीज बेटांत चांगला जम बसविला. ब्राझील व गियानामध्ये त्यांचीं ठाणीं होतीं. हिंदुस्थानच्या राजमार्गावरील केप टाऊन टापूंत त्यांच्या वखारी होत्या. मॉरिशस (त्यांच्या मॉरिस राजपुत्रावरून दिलेलें नांव) व सीलोन हीं बेटें त्यांच्या आहारीं गेलीं होतीं व तसेंच उत्तर अमेरिकेचें प्रवेशद्वार न्यू ॲमस्टरडाम (नंतरचें न्यूयॉर्क) त्यांचेंच होतें.

अठराव्या शतकाच्या आरंभीं इंग्लंडच्या ताब्यांत महासागरावरील राजमार्ग गेले व व्यापारी मालाची वाहतूक करणारें असें एकमेव राष्ट्र तें बनलें. प्रथम महायुद्धोत्तर काळांत इंग्लंडचा व्यापार द्विगुणित वाढला. फिनीशियन, ग्रीक आणि व्हेनिशियन लोकांनी भूमध्य समुद्रांत ज्याप्रमाणें व्यापार हस्तगत केला होता, तद्वत् सप्त महासागरांवरील व्यापार इंग्लंडच्या

करतलामलकवत् झाला ! इंग्लंडला अशी परिस्थिति येण्याचें कारण काय ? इंग्लंडची भौगोलिक परिस्थिति. तेथील शेती आणि उद्योग धंदे ह्या गोष्टी राष्ट्राला दर्यावर्दी बनविण्यास अत्यंत पोषक होत्या. औद्योगिक क्रांतीची लाट या राष्ट्रांत प्रथम उठली. उत्तम बंदरांच्या आसपास कोळसा आणि लोखंडाचा मुबलक पुरवठा असल्यामुळे युरोपांतील इतर राष्ट्रांना मागे सारून इंग्लंडने दर्यावर्दीपणांत अग्रेसरत्व पतकरलें. ओघाओघाने एकोणिसाव्या शतकांत या राष्ट्राने आपल्या साम्राज्याचे पाश सर्वत्र पसरले.

व्यवहाराला खुले झालेले समुद्रकिनारे

पंधराव्या शतकानंतरच्या तीन शतकांत सप्त समुद्रांवरील भूभागांचें संशोधन झालें. डच व इंग्लिश लोकांनी आशियाकडे येण्याकरितां वायव्य व ईशान्येकडून समुद्र-मार्ग शोधण्याची अतोनात खटपट केली. या प्रयत्नांत दोन्ही राष्ट्रें अयशस्वी झालीं ! परंतु या प्रयत्नाने उत्तर अमेरिकेचा किनारा मात्र पूर्ण शोधिला गेला व रशियाशीं व्यापारी नातें जोडलें गेलें. सुरवातीला पोर्तुगीज, नंतर डच आणि तदनंतर इंग्लिश, हे आशियाच्या किनाऱ्यावर व्यापार करूं लागले. सतराव्या शतकाच्या आरंभीं पोर्तुगीज दर्यासारंग आस्ट्रेलियास जाऊन पोचला. तास्मन या डच नाविकाने तास्मानिया व न्यूझीलंडचा शोध लावला. अठराव्या शतकांत इंग्लिश दर्यासारंग कुक याने पॅसिफिक महासागरांतील बेटें व हवाई बेटें वगैरेंचा शोध लावला. अशा प्रकारें पृथ्वीवरील अविदित भूभाग कमी कमी होत गेले.

आतापर्यंत प्राचीन भूमध्य समुद्रावरील राज्यांपासून सुरवात करून युरोपियन लोकांनी सबंध जगाशीं कसकसा व्यापार आणि वाहतूक वाढविली हें आपण पाहिलें. पृथ्वीवरील व्यापार आणि

वाहतूक यांत आपला अधिकाधिक वाटा असावा याकरितां युरोपियन राष्ट्रें भांडत होतीं; पण यांतूनच जागतिक संघाचें बी पेरलें गेलें. परस्परावलंबन असल्याशिवाय व्यापार व वाहतूक प्रगमनशील असणें शक्य नाही. आतापर्यंत महासागरावरील व्यापार आणि दळणवळण यांचा आपण विचार केला. एकोणिसाव्या शतकांतील भूभागावरील व्यापार व तेथील दळणवळणाचीं साधनें यांचा विचार आपण केला नव्हता तो पुढील प्रकरणांत करूं. यामुळे परस्परावलंबन कसें वाढत जातें याचीही मीमांसा ओघाओघानेच येईल. जो भूभाग आजपर्यंत एकाकी आणि दूर वाटत असे तोच भूभाग प्रामुख्याने कसा पुढे आला याचा खुलासाही होईल आणि जागतिक संघ निर्माण होण्यास कशी मदत झाली हें पण समजेल.

प्रकरण पांचवें

जागतिक इतिहासचे टप्पे :
(ई) खुष्कीवरील वाहतूक


जगाचें आर्थिक परस्परावलंबन ओघाओघाने वाढत गेलें. परंतु याची परिसीमा एकोणिसाव्या शतकांत स्थलमार्गावरील वाहतूक यंत्राच्या साहाय्याने होऊं लागली तेव्हा झाली व याचें पर्यवसान भांडवलवाले व मजूरवर्ग असे दोन गट निर्माण होण्यांत झालें.

लोहमार्ग व बाष्पशक्ति. भूमध्यसागरीय संस्कृतीच्या काळापासून तों अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत खुष्कीच्या मार्गाने होणाऱ्या वाहतुकीच्या साधनांत फारसा बदल झालेला आढळत नाही. प्राचीन काळांतील रथ व युरोपांतील एकोणिसाव्या शतकाच्या प्रारभींच्या बग्या (Stage-Coach) यांत फारसा फरक नाही.

कांही अंशीं प्रगति न होतां अवनति झालेली दृष्टोत्पत्तीस येते. रोमन लोकांनी बांधलेल्या सडका एकोणिसाव्या शतकांतील सडकांपेक्षा पुष्कळ सरस होत्या.

बाष्पशक्तीचा शोध लागल्यानंतरच भूमियानांत क्रांति होण्यास प्रारंभ झाला. हवामान व भौगोलिक परिस्थिति कशीही असली तरी बाष्पशक्तीच्या साहाय्याने असंख्य कामें करून घेतां येऊं लागल्यामुळे अखिल जगाच्या व्यवहारांत मोठी क्रांति घडून आली. खाणींतील कामें, कारखान्यांतील कामास गति देणें, बोगदे पोखरणें, इमारती बांधणें, बांध बांधणें, जहाजांतून माल उतरविणें, मालाच्या राशीच्या राशी इकडून तिकडे उचलून ठेवणें, महासागर, वाळवंटें व पर्वत उल्लंघिणें, इत्यादि कामें बाष्पशक्तीकडून घेतलीं जातात. इंग्लंडांतून बाष्पशक्तीचा प्रसार युरोपांत झाला आणि इ. स. १८१५ नंतर स्थलमार्गावरील दळणवळणाच्या साधनांत अभूतपूर्व परिवर्तन झालें ! बाष्पशक्तीचा अवतार होण्यापूर्वी मनुष्यप्राणी स्वाभाविक भौगोलिक अडचणींच्या योगाने परस्परांपासून दुरावलेला होता. विपरीत हवामानामुळे, दुर्गम पर्वतामुळे, वाळवंटामुळे व अंतराच्या अफाटपणामुळे दळणवळणास प्रतिबंध होत असे. परंतु बाष्पशक्तीच्या साहाय्याने सर्व असाधारण अडथळ्यांना दूर सारून मनुष्याने निसर्गनिर्मित परिस्थितीवर जय संपादन केला आहे ! **प्रगतीचा वा नवीन संस्कृतीचा (culture) हा खरा खरा प्रारंभ झाला म्हणावयाचा !**

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस मनुष्याने एकीकडे पडून राहिलेले मोठमोठे भूभाग दळणवळणाच्या साधनांनी जवळ केले. पूर्वी लागणाऱ्या काळाच्या एक दशांश अवधींत तेंच अंतर तोडण्याचें कार्य त्याने साध्य करून घेतलें आणि हें केवळ लोहमार्गामुळे झालें.



रेल्वेच्या प्रसारापूर्वीचें निगडित जग

वायव्य यूरोपांतील राष्ट्रांतील आर्थिक भरभराट व क्रांति ह्यांच्या परिणामपाशांत सापडलेलें एकोणसाव्या शतकाच्या प्रारंभाचें जग. जपान व चीन ह्यांनी मात्र तेव्हा हे पाश देशांत येऊं दिले नव्हते.

[पृष्ठ ३२

लोहमार्गांचा परिणाम दोन प्रकारें झाला. पहिला परिणाम असा की खंडाच्या समुद्र किनाऱ्याच्या आंतील बराचसा भूभाग समुद्राला जवळ झाला आणि दुसरें असें की ज्या देशांत औद्योगिक क्रांति इतरांच्या अगोदर व इतरांपेक्षा अधिक प्रमाणांत झाली, त्या देशांत सत्तेचें केंद्र उत्पन्न होऊं लागलें. अशा प्रकारें जागतिक संघटनेचा अंतिम दुवा जुळण्यास प्रारंभ झाला. ज्याप्रमाणें बाल्टिक व भूमध्यसमुद्रांतर्गत सत्ता अटलांटिक महासागरान्वयी झाली त्याचप्रमाणें रेल्वेमुळे कांही राष्ट्रें पुढे येऊं लागलीं. त्यामुळे महासागरावलंबी राष्ट्रें दृष्टीआड झालीं, असें अर्थातच नाही; तथापि त्यांचें महत्त्व रेल्वेमुळे कमी वाटूं लागलें, इतकें खरें.

आफ्रिका, अमेरिका आणि उत्तर आशिया हीं पहिल्या परिणामाचीं उदाहरणें होत. या अफाट भूविभागांमधील समुद्र किनाऱ्यापासून आंत दूरवर असलेले प्रदेश लोहमार्गाच्या योगाने सुलभ दळणवळणाच्या टप्प्यांत आणले गेले. रेल्वेच्या प्रसाराचा दुसरा परिणाम म्हणजे महासागरीय किनाऱ्याच्या अभावीं मागे पडलेलीं राष्ट्रें प्रगतिपथाच्या आघाडीस येणें. हा जर्मनी, रशिया व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या राष्ट्रांच्या संबंधांत घडून आलेला दिसतो.

व्यवहारकक्षेंत आलेले मोठमोठे भूभाग

१ आफ्रिका. आतापर्यंत आफ्रिका खंडास अज्ञात भूखंड असें म्हणत असत. इतिहासज्ञांना भूमध्य समुद्रकिनाऱ्याला लगत असलेल्या ईजिप्त प्रांताची माहिती होती. परंतु सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील भाग युरोपियन लोकांस तिमिरमय होता. पांच शतकांपूर्वीं पोर्तुगीज नाविकांनी हिंदुस्थानाकडे येण्याकरितां या खंडाच्या दक्षिण भागाची थोडी माहिती गोळा केली. तिकडे अमेरिका या नवीन भूखंडाचा शोध लागून तेथे वसाहती निर्माण

झाल्या आणि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस त्या युरोपप्रमाणें वैभवसंपन्न व समृद्ध बनल्या, तरी आफ्रिका खंड अज्ञातावस्थेंतच होतें.

युरोपियन लोकांना आफ्रिकेचा किनारा केवळ हिंदुस्थानच्या मार्गावरचा एक भाग असें वाटे. सुमारें १०० वर्षांपूर्वी केप कॉलनीची वसाहत इंग्रजांच्या आहारीं गेली. तेव्हा तिची महती त्यांना आशियाकरितां होती. आफ्रिकेंत त्या वसाहतीचें महत्त्व आहे असें त्या वेळीं वाटलें नाही. याशिवाय आफ्रिकेंतील स्वाभाविक परिस्थिति आंत शिरण्यास उत्साहजनक नाही. आफ्रिका खंड एक मोठें पठार आहे व समुद्रापासून आंत थोड्या अंतरावर त्या पठारास एकदम उतरण लागते. याच कारणामुळे या देशांतील नद्या मोठ्या आवेशानें समुद्रांत घुसतात. समुद्रापासून कोणत्याही देशांत शिरण्याकरितां नद्याच कामीं पडतात. परंतु ह्या खंडांतील नद्या आंत जाण्याकरितां एक साधन म्हणून उपयोगी नसून एक जबरदस्त प्रत्यवाय होत्या व आहेत. फक्त नाइल नदी या नद्यांहून भिन्न असल्यामुळे तिच्या काठचा इतिहास निराळा झाला, तो आपण मागे पहिलाच आहे. पठारावर चढून पुनः आपली नाव नदींत टाकल्याशिवाय प्रवासी जलमार्गाचा उपयोग करूं शकत नाहीत. आफ्रिकेचा किनारा सरळ असल्यामुळे नाविकांना भूभागांत शिरण्याचें कामच पडत नाही. खाड्या, आखातें वगैरे असलीं म्हणजे सहजच नाविक आंत शिरतो. परंतु ही स्थिति आफ्रिकेच्या किनाऱ्यास नाही. या कारणामुळे आफ्रिका खंड दीर्घकाल अंधारांत म्हणजे परकीयांना अज्ञात असें राहिलें.

परंतु बाष्पशक्तीच्या प्रादुर्भावाने साम्राज्यशाहीची कल्पना फोफावली आणि औद्योगिक राष्ट्रें साम्राज्यपिपासु बनलीं. आपल्या राष्ट्रास अधिकाधिक कच्चा माल मिळावा या लालसेने त्यांनी पृथ्वीवरील प्रत्येक ठिकाणीं तसले प्रयत्न जारीने सुरू केले. इ. स. १८६०–१८७० या काळांत आफ्रिकेचा नकाशा म्हणजे त्या खंडाचा

किनारा व कांही नद्या, पर्वत यांचीं नांवें असा होता; परंतु इ. स. १८८० नंतर वरील नकाशांत मोठी भर पडलेली आढळते. या काळांत युरोपियन राष्ट्रांची या खंडांतील जास्त भाग आपल्या पदरांत पडावा म्हणून आपापसांत जबरदस्त ओढाताण चाललेली होती असें आढळतें; आणि अखेरीस ह्या शतकाच्या शेवटीं म्हणजे इ. स. १८८०–९० या काळांत सुमारें अर्धे आफ्रिका खंड युरोपियन राष्ट्रांनी आपल्या घशांत टाकिलें! व त्यावर आपापले ध्वज फडकाविले! इतकें खरें की ही ओढाताण रेल्वे होण्यापूर्वीच सुरू झाली होती; परंतु रेल्वे झाल्यामुळे ठिकठिकाणीं नाकीं व नाक्याचे मार्ग बनले, आणि रेल्वेमुळेच आफ्रिका खंड जगाच्या आर्थिक व्यवहाराचा एक भाग बनून त्याशीं निगडित झालें.

२ अमेरिका रेल्वेच्या अस्तित्वापूर्वी वा प्रवेशापूर्वी उत्तर व दक्षिण अमेरिकेंतील वस्ती समुद्रकिनाऱ्यावरच होती; इतकें खरें की येथील नद्या आफ्रिकेंतील नद्यांप्रमाणें प्रगतीला प्रत्यवाय करणाऱ्या नव्हत्या. पण क्यानडामधील नद्या वर्षांतील बराच काळपर्यंत गोठलेल्या असत व संयुक्त संस्थानांतील नद्या उत्तर दक्षिण असल्याने पूर्व पश्चिम खंड पार करण्याच्या दृष्टीने निरुपयोगी आहेत. दक्षिण अमेरिकेंतील नद्या उष्ण कटिबंधांत वाहणाऱ्या असल्यामुळे तेथील हवामान थंड हवेतील गौरकायांना वस्ती करण्यास प्रोत्साहक नव्हतें.

रेल्वेमुळे क्यानडा दृष्टिपथांत आला, तसेंच अफाट संयुक्त संस्थानांचें एकीकरणही रेल्वेनेच केलें आणि रेल्वेनेच दक्षिण अमेरिकेस आर्थिक उन्नतीच्या मार्गावर आणलें!

यूरोपांतील सप्तवार्षिक युद्धानंतर इ. स. १७६३ सालीं इंग्लंडने क्यानडा ठेवावा की ग्वाडेलूप व मार्टिनिकवर (वेस्ट

इंडीजमधील दोन लहान बेटें) ताबा असू द्यावा याबद्दल देशांत बराच ऊहापोह झाला. यावरून क्यानडाची किंमत लोक त्या वेळीं काय करीत होते याची कल्पना येते. ज्या वेळीं समुद्र व नद्या गोठलेल्या नसत त्याच वेळीं हडसन सामुद्रधुनींतून हडसन खाडींत व तेथून नावांतून नदीमार्गाने मॅनितोबा, सॅस्क्याचव्हान व आल्बर्टापर्यंत व नंतर रॉकी पर्वताच्या पायथ्यापर्यंत आणि शेवटीं पॅसिफिक किनाऱ्यापर्यंत पश्चिम युरोपांतून आलेल्या वसाहतवाल्यांनी आपले हातपाय कसे पसरले, याच कथानकांनी एकोणिसाव्या शतकाचा इतिहास भरलेला आहे. एवढया मोठ्या भूभागाची राजकीय एकी आर्थिक परस्परावलंबनामुळे झाली हें खरें; परंतु हें परस्परावलंबन रेल्वेमुळे शक्य झालें व अस्तित्वांत आलें, हेंही तितकेंच खरें आहे. युनायटेड स्टेट्सच्या इतिहासाचा विचार केला तर त्यांतील वसाहतीच्या पश्चिमेकडील प्रसारांतच एकीकरणाचें बीज होतें व त्याचें दृश्यफल रेल्वेने आणलें असें दिसतें.

युरोपांतील रेलवेचा इतिहास भिन्न आहे. जीं गावें किंवा शहरें पूर्वीपासून मोठमोठया सडकांवर प्रामुख्याने अस्तित्वांत होतीं, तींच बहुधा रेलवेने सांधण्यांत आलीं. परंतु अमेरिकेंत काय घडलें ? रेलवेच्या बाजूनेच गावें व शहरें वसत गेलीं. रेलवेमुळे शहरें जन्मास आलीं. शहरें आहेत म्हणून रेलवे निर्माण झाली नाही. उदाहरणार्थ, शिकागोची वाढ रेल्वेपायीं झाली. असो. यानंतर आशियाचा विचार करूं.

३ आशिया. लोहमार्गाने घडवून आणलेल्या संयुगीकरणाचीं दृश्यें आपणास उत्तर आशियांतही दिसून येतात. ट्रान्स सैबीरियन रेल्वेने युरोपियन रशिया व पॅसिफिक किनारा हे दोन भाग नजीक आणले. ट्रान्स कॉकेशियन व ट्रान्स कास्पियन लोह-

मार्गांनी प्राचीन आशियाचें द्वार सताड उघडलें गेलें. हिंदुस्थानांत रेल्वेमुळे स्थित्यंतरें घडलीं आहेत. पाश्चिमात्य अर्थानें एकराष्ट्रीयत्वाची भावना भारतीयांमध्ये उत्पन्न होण्याला मुख्यत: लोहमार्गच कारणीभूत झाले आहेत.* बगदाद रेल्वेने आशिया मायनर व मेसोपोटेमिया या भागांतील टापूंना आर्थिक उन्नतीच्या मार्गावर आणून सोडलें. तद्वत् प्राचीन चीन देशांत लोहमार्ग निर्माण करून औद्योगिक क्रांति घडवून आणण्याचें कार्यही रेल्वे करीत आहे.

४ युरोप. यानंतर आपण राजकीय सत्ता आणि व्यापाराचीं केंद्रें रेल्वेमुळे कोणत्या राष्ट्रांत निर्माण होऊं लागलीं हें पाहूं या. रेल्वेच्या आगमनाने संयुक्त संस्थानांची बेसुमार आर्थिक प्रगति झाली, हें आपण पाहिलेंच आहे. पण युरोपमध्ये राजकीय सत्तेचा काटा निराळ्याच बाजूकडे झुकला होता. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत इंग्लंड व फ्रान्स हींच दोन राष्ट्रें औद्योगिक क्षेत्रांत पुढे आलीं होतीं. परंतु त्या शतकाच्या शेवटीं जर्मनी व रशिया यांनीही या क्षेत्रांत पदार्पण केलें. हीं दोन्ही राष्ट्रें समुद्रवलयांकित नसून त्यांना देशांतर्गत दळणवळणाचीं साधनें उपलब्ध नव्हतीं. रशियांत तर दुसरी एक अडचण होती. दगडांचा मुबलक साठा नसल्यामुळे पक्क्या सडका रशियांत बांधणें जड जाई. परंतु रेल्वेने या अडचणी झुगारून दिल्या. कोळसा आणि लोखंड यांच्या सहाय्याने हीं दोन राष्ट्रें उदयोन्मुख झालीं व मध्य युरोपांतील व्यापारी मालाची नेआण एकमेव जर्मनीच करूं लागला. ज्या वेळीं बंदरें गोठलेलीं असत त्या वेळीं लोहमार्गाने तें काम करण्यांत येई. इ. स. १८७० पर्यंत उत्तर युरोपचा सर्व माल भूमध्य समुद्राकडे वाहून नेण्याचा मक्ता इंग्लंडचाच होता; परंतु यानंतर

*'Expansion of Europe', by *Kermack*; O.U. Press. P.59

बराचसा माल जर्मनीच्या लोहमार्गानें जाऊं लागला. हॅंबुर्ग ते इराणी आखातापर्यंत अखंडपणें चालू होणाऱ्या लोहमार्गाची जर्मनीची योजना युद्धामुळे विराम पावली. यामुळे भूमध्य समुद्र व सुवेझ यांवरून जाणाऱ्या महत्त्वाच्या ब्रिटिश जलमार्गावरचें गंडांतर टळलें. असो. पण आता बर्लिन–बगदाद रेल्वे पूर्ण झाली असून तीमुळे तुर्कस्थान व इराक ह्यांची आर्थिक उन्नति होऊं पहात आहे.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें जशीं एक झालीं व हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें लोहमार्गानें निरनिराळ्या प्रांतांना निकट आणलें, त्याचप्रमाणें जर्मनींतील निरनिराळीं संस्थानें लोहमार्गानेंच निगडित झालीं. रेल्वेपायीं रशियासारखा अफाट भूप्रदेश अर्वाचीन युगांत प्रामुख्याने पुढे आला. सैबीरियाच्या आर्थिक प्रगतीलाही रेल्वेमुळेच फार मदत झाली. त्यांतील टर्क–सैबीरिया रेल्वे व बैकल–अमूरिया रेल्वे हे दोन नवीन लोहमार्ग सैबीरियाचें स्थित्यंतर घडवून आणीत आहेत. एवढेंच नव्हे तर इ. स. १९३७–४२ ह्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमुळे उरल विभागांत रेल्वेचें जें जाळें उत्पन्न झालें आहे, त्यामुळे रशियाचें औद्योगिक उत्पादनसामर्थ्य इतकें वाढलें की तो भाग म्हणजे रशियन राजसत्तेचा जणूं जीव बनला आहे.*

आतापर्यंत आपण पाहिलें की युरोपियन संस्कृतीचा उगम समशीतोष्ण भूमध्य विभागांत झाला; नंतर ती संस्कृति युरोपच्या वायव्य विभागांत फोफावली आणि तदनंतर गतमहायुद्धाचा धक्का लागला असतांही त्या संस्कृतीने रशिया व जर्मनीच्या शीत विभागांत पदार्पण केलें आहे.

आता आपण अर्वाचीन युगांत येऊन पोचलों. या युगांत पृथ्वीच्या कानाकोपऱ्यांतही वस्ती झाली आहे व संस्कृति केवळ

* U. S. S. R. beyond the Urals, pp. 37, *Maurice Edelman*, *Penguin 1942*.

पृथ्वीच्या एकाच भागापुरती राहिलेली नाही. शिवाय प्रस्तुत कालांत रानटी लोकांच्या आक्रमणाचा धोकाही नाही. आरंभाला नदीमार्ग, नंतर अंतर्गत समुद्राचा मार्ग, पुढे महासागर आणि शेवटीं खंडांतील अंतर्गत मार्ग अशा रीतीने क्रमाक्रमाने दळणवळणाच्या साधनांत वाढ आणि प्रगति कशी झाली व त्यामुळे आर्थिक परस्परावलंबन संथपणाने कसें वाढत गेलें याचा इतिहास आपण अवलोकन केला आहे. हेंच परस्परावलंबन अभूतपूर्व अशा वैमानिक दळणवळणामुळे कोणत्या थराला जाऊन पोचेल हें आपणांला भावी काळांत दिसेल.

जगामध्ये आर्थिक परस्परावलंबन यापुढे वाढत्या प्रमाणावर होणार ही गोष्ट निश्चित झाली आहे. याचा परिणाम जागतिक राजकीय परस्परावलंबनांत होतो की काय हा एक प्रश्न आहे. पण याचें उत्तर जगांतील कार्यकर्तेच देतील.

खंड दुसरा : अर्वाचीन इतिहास

प्रकरण ६ वें

आधुनिक जगाचें विहंगमावलोकन

आर्थिक परस्परावलंबनाची वाढ

आर्थिक परस्परावलंबन हें आजच्या जगाचें मुख्य गमक आहे. महासागरावरील रस्त्यांनी आणि रेल्वेने ठिकठिकाणचे भूभाग आपापसांत निगडित झाले आहेत व आता तर विमानमार्गांनी त्यांना जखडून टाकिलें आहे. प्रत्येक भाग कोणत्या ना कोणत्या तरी वस्तूसाठी दुसऱ्यावर अवलंबून आहे. एकाला खाद्य पदार्थ पाहिजेत तर इतरांस कच्चा माल हवा, असे नाना प्रकार झाले आहेत. राष्ट्रवादी व साम्राज्यवादी मुत्सद्दी भांडवलशाहीच्या प्रेमामुळे जकातीचे अडसर लावून परस्परावलंबनाच्या व परस्पर सहकार्याच्या तत्त्वाला कोलून लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. जी आर्थिक परिस्थिति आजच्या जगाला नको ती हे मुत्सद्दी प्रस्थापूं पाहतात; परंतु त्यांची प्रत्येक कृति त्यांच्याच देशाच्या आर्थिक ऱ्हासास कारणीभूत होते. स्वयंशासित मध्ययुगीन संस्थानें व अठराव्या शतकांतील स्वयंशासित इंग्लंड आज तसें राहिलें नाही. शेतांत राबणारा गुलाम शेतकरी आणि हातावर काम करणारे कारागीर लयास गेले आहेत. आजचें दृश्य असें आहे की इंग्लंडच्या मध्य विभागांतील शहराला जगाच्या दुसऱ्या टोकास असलेल्या पॅसिफिक महासागरामधील बेटांवर आपले उद्योगधंदे चालविण्याकरितां

विसंबून राहावें लागतें. आज इंग्लंडच्या मजुराच्या सकाळच्या उपहाराच्या वेळीं अमेरिकेच्या गव्हाची भाकर, त्याच खंडांतून आलेलें मांस, डेन्मार्कचें* लोणी आणि चीन किंवा हिंदुस्थानामधून आलेला चहा असतो. इंग्लंडला रोजच्या अन्नाकरितां देखील दुसऱ्या देशांच्या तोंडाकडे बघावें लागतें.

खंडांतल्या खंडांत व देशांतल्या देशांतही परस्परावलंबन आहे. कांही प्रांत कृषिप्रधान बनले तर कांहींनी उद्योगधंदे हातीं घेतले. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्ये साऊथवेल्स विभाग धंदे कारखाने करतो, तर ईस्ट अँग्लिया गहू पैदा करतो. तसाच जर्मनीचा ऱ्हूर विभाग उद्योगधंद्याकरितां प्रसिद्ध आहे, तर ईस्ट प्रशिया कृषिप्रधान आहे. सारांश, देशांतल्या देशांतही आर्थिक परस्परावलंबन असतें. हें आर्थिक परस्परावलंबन खालील दोन गोष्टींवर अवलंबून आहे:—

(१) समुद्रावरील व जमिनीवरील दळणवळणाच्या साधनांत झालेली बेसुमार प्रगति.

(२) विशेष प्रकाराने महत्त्वाच्या अशा कच्च्या मालाच्या पैदाशीसंबंधाची भौगोलिक मर्यादा.

पहिल्या मुद्द्याचा ऊहापोह आम्ही मागील प्रकरणांत केलाच आहे. आता दुसऱ्या मुद्द्याचा सांगोपांग ऊहापोह पुढील वर्णनांत करूं. आधुनिक राष्ट्रांतील कूट प्रश्नांचा विचार करीत असतां आर्थिक दृष्टया महत्त्वाच्या अशा पदार्थांची भौगोलिक विभागणी कशी आहे याचें ज्ञान अवश्य असावयास पाहिजे.

ही एक गोष्ट मनावर पक्की बिंबवली पाहिजे की ज्याप्रमाणें हवा आणि सूर्यप्रकाश बहुतेक सर्व ठिकाणीं मुबलक आहे त्या-

---

* हें युद्धापूर्वीच्या स्थितीस अनुलक्षून म्हटलें आहे.

प्रमाणें कोळसा, लोखंड आणि तांबें वगैरे खनिज पदार्थ प्रत्येक ठिकाणीं आढळत नाहीत अथवा कमी जास्त प्रमाणाने आढळतात. या वस्तु कांही ठिकाणींच विशेषत्वाने सापडतात. पृथ्वीवर पुष्कळ ठिकाणीं कांही वस्तु इतक्या मोठ्या प्रमाणांत पैदा होतात की, तेथील लोकांच्या गरजा भागून त्या परदेशीं पाठवितां येतात. जगाची आर्थिक परिस्थिति या प्रकारच्या वाटणीवरच अवलंबून आहे. आजच्या युगांत तरी एकाकी राहणाऱ्या देशाचे उद्योगधंदे नष्ट होतील आणि तेथील सरासरी राहणीचा दर्जा कमी होईलच. ज्या लोकांना वरील गोष्ट तत्त्वतःच मान्य होती व ज्या लोकांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष्य केलें होतें, त्यांना गतमहायुद्धकालांत आणि जागतिक मंदीच्या वेळीं आधुनिक कालांत, आर्थिक परस्परावलंबन हें खरें कसें ही गोष्ट चक्षुर्वैसत्यं झाली.

जगांतील राजकीय विभाग

राजकीय विभाग आर्थिक स्वावलंबनाच्या दृष्टीने स्वयंपूर्ण असे असत नाहीत. ऱ्हूर प्रांतांतून 'कोक' (पोलाद बनविण्यासाठी लागणारा एक प्रकारचा कोळसा) आल्याशिवाय लोरेन (फ्रान्स) मधील लोखंडाला तितकेंसें महत्त्व नाही. जल व स्थल मार्गाने कोळशाच्या व लोखंडाच्या खाणी एकमेकांजवळ येऊं शकतात, परंतु कृत्रिम राजकीय सरहद्द या खाणींना विभागते. प्रस्तुत उदाहरणांत राजकीय सरहद्द हा एक विरोधाभासच होय. कच्चा माल पैदा करणारे विभाग व त्यावर चालणारे कारखाने आणि उद्योग धंदे असणारे विभाग, निरनिराळ्या मालाची निपज करणारे आणि तो माल खपविणारे विभाग यांच्यांत वरील प्रकारच्या कृत्रिम राजकीय सरहद्दी युरोपमध्ये बऱ्याच आहेत (होत्या).

राज्यकारभाराचे सूत्रधार भांडवलवाले आणि कारखानदार स्वत:ला श्रीमंत बनविण्याकरितां राजकीय विभागांचा उपयोग करून घेत असतात. एखाद्या विवक्षित सरहद्दीच्या आंत निर्माण झालेल्या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला जवळ करून व सांप्रत कालांतील गरजांना पार झुगारून राजकीय सरहद्दी निर्माण होतात आणि यांचें पर्यवसान तीव्रतर आर्थिक परावलंबनांत होत जातें. गेल्या महायुद्धानंतर ऑस्ट्रिया–हंगेरीचें साम्राज्य वरील राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला बळी पडलें. राष्ट्रीयत्वाला धरून साम्राज्याचे तुकडे करण्यांत आले, ते परिणामीं परस्परांपासून लांब खेचले जाऊन कमजोर बनले. राष्ट्रीयत्वाची भावना जर मुळाशीं आहे तर हिंदुस्थान किंवा आयर्लंडकडे कां दुर्लक्ष होतें? असो. प्रस्तुत कालांत राष्ट्रीयत्वाची भावना आणि लोकजीवनाच्या गरजा यांचा समन्वय करणें हितावह आहे. आर्थिक दृष्टया आज लोक जगाचे नागरिक बनले आहेत. आता लोक राजकीय रीत्या जगाचे नागरिक बनतात की काय हा प्रश्न आहे.

आर्थिक परस्परावलंबन आणि राजकीय विभाग हे कसे विरोधी आहेत हें समजल्याशिवाय आजचे जागतिक प्रश्न ध्यानांत येणें कठीण होय. कारण राजकीय विभागांमुळे जकातीचीं भिंताडें व नाण्यांच्या देव–घेवीबद्दलचे निर्बंध ह्या गोष्टी येतात, व या निर्बंधांमुळे मालाची आयातनिर्यात अतिशय मर्यादित होते. या सर्व कारणांमुळे राजकीय गट कोणते आहेत व ते कसे पडतात हें पाहणें अवश्य ठरतें.

जगाची वाटणी : प्रबल राष्ट्रें व त्यांचे गट

आर्थिक परिस्थिति प्रगमनशील असल्यामुळे आणि त्यांतच सत्ताधारी व वैभवसंपन्न जातीला अधिकाधिक सत्ता आणि सामर्थ्य संपादण्याची हाव असल्यामुळे राष्ट्रीयत्वावर आधारलेल्या राजकीय

सरहद्दींचें महत्त्व कमी झालें आहे. आजच्या घटकेला स्वतंत्र राजकीय सत्तेचें मुख्य गमक तरी काय आहे हें पाहूं गेलों तर फारच चमत्कारिक स्थिति आढळते. जगांत सुमारें एकाहत्तर स्वतंत्र देशांना "सर्वतंत्र स्वतंत्रराज्यें" (Sovereign states) असें संबोधिलें जातें! त्यावरून तर असें दिसतें की राष्ट्राचें राजकीयत्व हें केवळ थट्टेचा विषय होऊन बसलें आहे. जसें मध्य अमेरिकेंतील निकाराग्वे हें संस्थान काय संयुक्त संस्थानांच्या बरोबरीचें आहे किंवा अबिसिनियन राज्य ब्रिटिश साम्राज्याच्या तोडीचें आहे? पण त्यांनाही स्वतंत्र अस्तित्व आहे!

प्रथम महायुद्धोत्तर कालांतील राज्यें केवळ राष्ट्रीयत्वावर आधारलेलीं नसून उलट तीं निरनिराळ्या राष्ट्रविभागांचीं कडबोळीं होतीं आणि असल्या प्रत्येक राज्यांत जगांतील एखाद्या बलाढ्य राष्ट्राचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले होते. यांपैकी कांही राज्यें नांवापुरतीं स्वतंत्र, परंतु वास्तविकपणें त्या समृद्ध राष्ट्राच्या आर्थिक हिताच्या पंखाखाली गेलेलीं अशीं होतीं. गेल्या पंचवीस वर्षांत फार मोठ्या प्रमाणावर चाललेल्या कारखान्यांनी छोटीं छोटीं राष्ट्रें आपापल्या छत्राखाली आणलीं असें दिसतें. जसें, पोर्तुगीज साम्राज्य ब्रिटिश साम्राज्यांतर्गत नाही. तें राजकीय दृष्ट्या स्वतंत्र गणलें जातें. परंतु तेंच पोर्तुगाल ब्रिटिशांच्या आहारीं गेललें आहे. आहारीं गेलेल्या राष्ट्रांची यादी जर आपण केली तर, कांही पूर्णपणें साम्राज्यांस जोडलीं गेलेलीं, कांही 'वसाहती' या सदराखाली मोडणारीं, कांही 'पंखाखालची राष्ट्रें' म्हणून म्हणविलीं जाणारीं (Spheres of Iufluence), कांही पालकत्वाखाली (Mandates) असलेलीं, तर कांही पुरातन व परम मित्र म्हणून कक्षेखाली येणारीं, अशा अनेकविध नात्यांचे प्रकार त्यांत दिसतात. आजच्या व्यवहारांत तरी केवळ राष्ट्रीयत्वावर आधारलेलें

असें एकही राज्य नसून राज्यांची उभारणी राष्ट्रीय व आर्थिक तत्त्वांच्या समुच्चयावर केलेली आढळते.*

आपण अधिकतर बलशाली आणि समृद्ध होत जावें या भावनेने प्रेरित होऊन भौगोलिक, आर्थिक आणि इतर परिस्थितीचा फायदा घेण्याचें जें धोरण एखाद्या देशाच्या राजसत्तेकडून अवलंबिलें जातें त्याचें रूपांतर साम्राज्यशाहींत होतें. युद्धपूर्व कालांतील जर्मन मुत्सद्दयांना याची जाणीव होती व त्याप्रमाणें त्यांनी 'मिटेल युरोपा'-(Mittel Europa)ची योजना आखली. आर्थिक हितसंबंधांवर अवलंबून असलेली राष्ट्रयोजना व अगदी अखेरची जागतिक राष्ट्रसंघाची कल्पना या दोहोंच्या मधली स्थिति म्हणजे वरील योजना होय. तथापि या योजनेंतही आर्थिक दोष आहे.

राष्ट्रांतरीय परिस्थितीवरील टीकाकार एच.एन. ब्रेल्सफोर्ड याने सन १९१४ च्या आगष्टच्या कांही महिने आधी भाकित केलें होतें की, "युरोपांतील राष्ट्रांच्या सरहद्दी निश्चित झाल्या आहेत, व आता युरोपांत बाल्कन राष्ट्रें आणि ऑस्ट्रिया व रशियन साम्राज्य यांच्या सरहद्दीवरील टापूमध्येच राजकीय फेरफार झाले तर होतील; कारण पादाक्रांत करण्याचें युग युरोपापुरतें संपलें आहे. चीन किंवा मध्यपूर्वेस (Near East) युद्धाग्नि भडकेल. या युद्धाची समाप्ति बाल्कन्स खेरीज बाकीच्या युरोपांतील राष्ट्रांत फेरफार न होतां होईल!"

पण वरील भविष्यवाणी खोटी ठरली! युरोपांतील भूमि देखील साम्राज्यशाहीच्या आहारीं जाऊं शकते आणि तेथील राष्ट्रें बदललेल्या आर्थिक परिस्थितीची लाट थोपविण्यास असमर्थ आहेत असें पहिल्या महायुद्धाने व त्यानंतर झालेल्या तहाने जगास सिद्ध करून दाखविलें आहे. पुन्हा ही परिस्थिति बदलल्याशिवाय राहत

* 'The Earth and the State' *D. Whittlesey*, 1939, Henry Holt.

नाही असें दिसून येऊं लागलें. युरोपांतील राष्ट्रांच्या सरहद्दी, त्यांना आजच्या आर्थिक परिस्थितीशीं जुळत्या करण्यासाठी, संतोषानें म्हणा किंवा युद्धमार्गानें म्हणा, बदलाव्या लागणार हें स्पष्ट झालें. व्हर्सेलिसच्या तहानें त्या मुद्द्याकडे व आर्थिक परिस्थितीकडे डोळेझाकच केली होती. जगावर साम्राज्य स्थापन करण्याचा मक्ता श्रेष्ठ अशा युरोपकडेच आहे अशी जी आढ्यतेखोर भूमिका होती ती तर वरील तहानें गेलीच; पण उलट कारखान्यांची वाढ अमेरिकेंत आणि जपानांत झाल्यामुळे ओघानेच साम्राज्य संपादन करण्याची कामगिरी श्वेतवर्णीयांप्रमाणेच अन्य जातींकडे जाईल असेंही स्पष्ट दिसूं लागलें. या जातींकडे उद्योगधंदे व त्यांना पोषक असा कच्चा माल ह्यांचा ताबा असावयास पाहिजे.

आज जगाची विभागणी आर्थिक देवघेवीच्या तत्त्वावर होऊं लागली आहे. प्रत्येक गट आपल्याकडे अधिकाधिक सामग्री मिळवून स्वतंत्र पण स्वयंपूर्ण होऊं पाहत आहे. एवढेंच नव्हे तर प्रत्येक गट खालील धोरणानुसार वागत आहे.

(१) **राजकीय महत्त्वाचा कच्चा माल**, उदा० कोळसा, लोखंड, तांबें, तेल, रबर, कापूस, गहूं वगैरेचा पुरवठा अव्याहत असावा.

(२) **तयार मालाचा उठाव व भांडवलाचा प्रसार.** माल तयार झाल्यावर तो खपविण्यास बाजार मिळविणें आणि मागसलेल्या प्रदेशांची छाननी करून तेथे आपलें भांडवल गुंतविणें.

(३) कच्च्या व पक्क्या मालाच्या आयात निर्यातीसाठी वाहतुकीच्या जल-स्थल-मार्गांवर ताबा.

यावरून असें दिसून येईल की, आजच्या जगाचा आर्थिक व्यवहार व राजकारण ह्या गोष्टी कच्चा माल, मागसलेले भूप्रदेश (undeveloped territories) व दळणवळणाचे मार्ग यांवर आधारलेल्या आहेत

जुन्या धर्तीचीं साम्राज्यें विलयास जात असून उलट आर्थिक तत्त्वावर उभारलेले राष्ट्रगट—ज्यांनी जगाची वाटणी करून घेतली किंवा जे ती करून घेण्याच्या बेतांत आहेत असे गट— तयार झाले आहेत व होत आहेत.

या निरनिराळ्या राष्ट्रगटांचा विचार करण्यापूर्वी दोन तीन गोष्टी ध्यानांत ठेवणें इष्ट आहे. पहिली बाब म्हणजे अद्यापि जगाची पूर्ण व व्यवस्थित विभागणी झालेली नाही. दुसरें असें की कांही लहान देश स्वतंत्र असून त्यांचा समावेश कोणत्याच समुच्चयांत झाला नाही. व तिसरें असें की गटांच्या मर्यादा आखलेल्या नसून कांही प्रांत असे आहेत की त्यांवर कोणाचाच ताबा नाही. ते प्रांत बिनवारशी (no man's land) आहेत! हे अपवाद लक्षांत ठेवून मग आधुनिक जगाची आर्थिक-राजकीय तत्त्वावर विभागणी करूं गेल्यास पुढील गट पडतात (१) अमेरिका (२) ब्रिटिश साम्राज्य (३) अति पूर्व : चीन व जपान (४) रशिया (५) फ्रान्स,* मध्य युरोप व उत्तर आफ्रिका (६) नवीन गट (जर्मनी, इटाली, जपान).

दुसऱ्याची लांडगेतोड करून आपण बलिष्ठ कसें व्हावें या कारवाया आजच्या जगांतील राजकीय वातावरणांत दृग्गोचर होत आहेत. युरोपांतील पहिल्या युद्धोत्तर कालांतील बलिष्ठ व सत्ताधारी राष्ट्रें हींच होत.

---

*सध्याच्या दुसऱ्या महायुद्धापूर्वीचें हें वर्गीकरण असल्याने मध्ययुरोप हा भाग ह्या गटांत घेतला आहे. पण इ. स. १९३० नंतर जगाच्या पुनर्वाटणीच्या विचाराचा जो प्रारंभ झाला व ज्याचें दृश्य फल म्हणजे असंतुष्ट (have-nots) राष्ट्रांचा-जर्मनी, इटाली व जपान ह्यांचा-जगाची नवीन विभागणी करूं पाहणारा एक गट (Axis) बनला, त्याची त्रोटक माहिती 'नवीन गट' ह्या सदराखाली देत आहों.

वरील राष्ट्रांचा कच्च्या मालावरील ताबा, त्यांचे उद्योगधंदे व कारखाने, त्यांच्या ताब्यांतील किंवा कक्षेंत येणारे भूभाग व त्यांचे वाहतुकीचे जलस्थल मार्ग या सर्वांचा ऊहापोह अनुक्रमाने आम्ही आता करणार आहोंत. पुढील पानें वाचीत असतां वाचकांनी हें अवश्य ध्यानांत ठेवावें की रशिया वगळून वरील सर्व राष्ट्रांचें राज्यतंत्र व यंत्र भांडवलशाहीच्या धोरणाने चालत आहे. त्यांतील राजकारणी पुरुष हे भांडवलशाहीचीं बाहुलीं होत. ज्या वेळीं आपण 'वाशिंगटन सरकार' किंवा 'वॉल स्ट्रीट सरकार' असें म्हणतों त्या वेळीं त्याचा अर्थ स्टँडर्ड ऑइल कंपनी किंवा पीर पॉइंट मॉरगन किंवा इतर भांडवलशहांचा कंपूच होय. ज्या कंपूचें हिताहित व स्वार्थ अधिक व जो कंपू अत्यंत प्रभावी, त्याच्या मताने व धोरणाने त्या राष्ट्राचें राजकारण चालतें. फ्रान्सचें परराष्ट्रीय धोरण '*Comite' des forges*' च्या तंत्राने चालतें. ब्रिटिश साम्राज्याचें राजकारण याचप्रमाणें चालतें. कधी लोखंडाचे धनाढ्य व्यापारी तर कधी 'रॉयल डच शेल'चे चालक तर कधी 'पांच महाजनी पेढया' (Five Banks) ब्रिटिश साम्राज्याचें राजकारण समयानुसार चालवीत असतात. जपानचें राजकारण म्हणजे मित्सुई मित्सुबिशी, इत्यादि बडया धेंडांचें व्यवहारकारण होय. तीच गोष्ट जर्मनीची. त्यांचें राजकारण म्हणजे बॉश, क्रप, थायसेन वगैरे धंदेवाल्यांचे व्यवहार होत किंवा अगदी अलीकडील धोरण म्हटलें तर शॅख्ट, गोबेल्स, वगैरे कंपूचें धोरण होय.

आमचा उद्देश या भांडवलशाही राजकारणाचीं आडपडद्यांतील कामें विशद करण्याचा मुळीच नाही. परंतु एवढें मात्र अवश्य लक्षांत असलें पाहिजे की राजकारणांतील निरनिराळे डाव भांडवलशाहीच्या तंत्राने चालत असतात. हें कसें खरें आहे हें आपणास पाहावयाचें आहे.

ज्या वेळीं नाण्यांच्या देवघेवीसंबंधांत राष्ट्राराष्ट्रांचा परस्पर विश्वास उडाला व जगांत हाहाकार झाला, त्या वेळीं असें सांगण्यांत आलें की, याचें कारण हलाखीची आर्थिक परिस्थिति व तदंगभूत कूट प्रश्नांची मालिका हें होय; परंतु आर्थिक जगाच्या वातावरणांतील बिकट परिस्थितीचीं कारणें याहून खोल आहेत. जोंपर्यंत जगांत ठिकठिकाणीं आपापले कंपू वा गट निर्माण करण्याचें अप्रतिहत कार्य भांडवलशाही करीत आहे तोंपर्यंत व्यापारी मंदी, अनिश्चितता, बेकारी आणि युद्धें व युद्धाची भाषा चालत राहणारच. (राष्ट्राच्या कर्जाचें निवारण केल्याने जगाची आर्थिक परिस्थिति सुधारत नाही.) जगांतील कच्च्या मालाची स्वाभाविक ठिकाणें आणि लोकांच्या गरजा व त्या भागविण्याचें त्यांचें सामर्थ्य हीं दोन आर्थिक सामर्थ्य व राजकारण ह्यांचीं मूल तत्त्वें होत. भांडवलशाही या दोन तत्त्वांना विरोधच करीत असते. या विरोधाचा परिणाम आर्थिक चणचणीच्या रूपाने लोकांना भोगावा लागतो.

प्रकरण सातवें

आधुनिक जगांतील महाजन : (१) अमेरिका (संयुक्त संस्थानें)

एक नवीन सत्ता

नवीन जगाच्या (अमेरिकेच्या) इतिहासाचा आरंभ सोळाव्या शतकाच्या अखेरीस, म्हणजे ज्या वेळीं इंग्रजी आरमाराने स्पॅनिश आरमाराचा फडशा पाडला त्या वेळीं झाला, आणि तेव्हापासून इंग्लंडच्या जगांतील सार्वभौमत्वाला सुरवात झाली व याची चढती कमान सन १९१४–१८ पर्यंत राहिली. त्यानंतर नव्या जगांतील एक

नवीन सत्ता जगाच्या राजकारणावर आपला पगडा बसवूं लागली.

ही प्रभावी सत्ता अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें ही होय. हींच संस्थानें सुमारें दीड शतकापूर्वी इंग्लंडच्या मालकीचीं होतीं. संयुक्त संस्थानांची सत्ता गेलें महायुद्ध संपल्यानंतर जगाला भासूं लागली असें मुळीच नाही; किंवा युरोपांतील राष्ट्रांनी आपापसांत कलागती करून आपल्या शक्तीचा चार वर्षांच्या युद्धांत ऱ्हास केला म्हणून संयुक्त संस्थानें बलिष्ठ झालीं असेंही नाही; त्यांच्या सामर्थ्याचीं कारणें यापेक्षा खोल रुजलेलीं आहेत. पहिलें युरोपियन महायुद्ध झालें नसतें तरी हीं संस्थानें लवकरच महाजनांच्या प्रभावळींत विशेष तेजाने चमकलीं असतीं. यांना कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा व भौगोलिक परिस्थितीची अनुकूलता असून त्याचबरोबर देश समृद्ध व अफाट असल्यामुळे येथे प्रचंड प्रमाणावर उद्योगधंदे आणि कारखाने चालत आहेत. किंबहुना जगांत यंत्रयुगाच्या दृष्टीने बऱ्हंशीं स्वयंपूर्ण अशीं जीं राष्ट्रें आहेत त्यांत अमेरिका हें पहिलें आहे; तसेंच दक्षिण अमेरिकेंतील अमर्याद कच्चा माल ज्या संस्थानांच्या हातांत आहे, अशीं हीं संयुक्त संस्थानें या नव्या खंडांतील एक समृद्ध भाग असून उद्योगधंदे व कारखाने आणि आर्थिक चळवळी यांत अतिशय पुढारलेलीं अशी यांची ख्याति आहे. क्षेत्राने तसाच विस्ताराने हा भाग खंडाच्या दोन्ही टोकांपर्यंत पसरलेला आहे. नवीन जग–दोन्ही अमेरिका खंडें–धरूनच 'अमेरिका' असा हा राष्ट्रांचा एक गट आम्ही पाडला आहे. जगांतील कोणत्याही मोठ्या गटाशीं तुलना केली असतां अमेरिका भौगोलिक दृष्टया सुसंघटित असून पूर्णपणें स्वावलंबी आहे. विमानमार्ग व आगगाडया यांमुळे हीं खंडें अगदी निगडित झालेलीं आहेत. अशी परिस्थिति जगाच्या पाठीवर अन्यत्र क्वचितच आढळेल. जुन्या इतिहासांत असें आढळून येईल की हीं संस्थानें अटलांटिकच्या पश्चिम

किनाऱ्यावर आहेत. त्यांचें तोंड युरोपकडे असल्यामुळे तीं त्या वेळीं महत्त्वास चढलीं; परंतु हीं संस्थानें पॅसिफिक किनाऱ्यावरून आशियाकडे पाहतात, म्हणून भविष्य कालांतील इतिहासांत, अतिशय समृद्ध व बलिष्ठ झालीं आहेत, असेंही म्हणावें लागेल. अटलांटिक व पॅसिफिक महासागरांचे किनारे या संस्थानांना लाभल्यामुळे यांचा भविष्य काळ अतिशय उज्ज्वल आहे. महासागरावरील ये–जा बेसुमार असलेल्या या युगांत अमेरिकेची भौगोलिक परिस्थिति अप्रतिम आहे. वायव्य युरोपांतील किनाऱ्यावर असलेल्या राष्ट्रांपेक्षा अमेरिकेची वर दर्शविलेली परिस्थिति विशेष फायदेशीर आहे. सत्तेचा ओघ पश्चिमेकडे वळत आहे. भूमध्य व बाल्टिक समुद्रापासून उद्भूत झालेली सत्ता अटलांटिक महासागराकडे वळली व आता तिचें तोंड अधिकच पश्चिमेकडे वळलें आहे असें म्हणावें लागतें. या दोन महासागरांवर कोणती सत्ता प्रभावी असावी हें ठरविण्यासाठी द्वंद्व होतें की काय असा भास होतो. इंग्रजांच्या आजच्या जगड्व्याळ व्यापारास दोन्ही महासागरांचे किनारे लाभलेल्या व पनामा कालव्याने सांधलेल्या अमेरिकेकडून धक्का बसण्याचा संभव दिसतो. अमेरिकेच्या मन्रो मताचा* दण्डक पश्चिम गोलार्धांतील

* मनरो नांवाचा एक धोरणी प्रेसिडेंट होता. अमेरिकेच्या म्हणजे युनायटेड स्टेट्सच्या राजकीय आकांक्षा व हद्दी ठरविण्याचें त्याने एक गमक ठरवून टाकलें, त्याला वरील नांव आहे. अमेरिका खंडाच्या कोणत्याही राजकीय भानगडींत युनायटेड स्टेट्सच्या संमतीशिवाय कोणत्याही युरोपियन राष्ट्राने ढवळाढवळ करितां कामा नये, हा त्या मतांचा मुख्य रोख आहे. यांत अमेरिका खंडाच्या राजकीय व आर्थिक धोरणासंबंधीं यु. स्टेट्सचा आपमतलबी कावा आहे असें दक्षिण अमेरिकेंतील देशांना वाटत असल्याने त्यांना हें मत तितकेंसें मान्य आहे असें नाही.

—Monroe Doctrine & World Peace, by *E. V. Scudder*—*Nelson*, London, 1939.

आपल्या वर्चस्वाच्या मर्यादा आज (इ.स. १९४०) ज्या धोरणाने ठरवीत आहे तें धोरणही वरील मताला पुष्टि देणारें आहे. *

संयुक्त संस्थानांची भरभराट

संयुक्त संस्थानांना अमेरिकेच्या दोन्ही खंडांचें पुढारीपण सहजासहजीं लाभलें असें नाही. आणि याच विभागांत बेसुमार कच्चा माल आहे असेंही नाही. या संस्थानांच्या उदयाचें एक महत्त्वाचें कारण भौगोलिक परिस्थिति हें आहे. हीं संस्थानें युरोप-प्रमाणें समशीतोष्ण विभागांत पडतात. अटलांटिक किनाऱ्यावर स्थित असलेल्या राष्ट्रांतील म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, हॉलंड, या देशांतील लोकांनी या विभागांतील हवापाणी आपल्या देशाप्रमाणें आहे हें जाणून येथे वसाहती वसविल्या व अशा प्रकारें भावी सत्तेचें बीजारोपण केलें.

अठराव्या शतकाच्या अखेरीस या वसाहती अटलांटिक किनाऱ्यावर सेंट लॉरेन्स नदीच्या मुखापासून तों मेक्सिकोच्या आखातापर्यंत पसरलेल्या होत्या. अटलांटिक मार्गानें या वसाहतींचें दळणवळण युरोपशीं सतत असे. वसाहती चिंचोळ्या पट्टींत होत्या. त्यांच्या एका बाजूला अटलांटिक महासागर व मागे पर्वताच्या रांगा होत्या. पर्वताच्या पलीकडे अमर्याद भूप्रदेश पडून होता. न्यू इंग्लंड व पेन्सिल्व्हानियामधील लोखंड व जलशक्ति यांच्या आधारावर त्यांच्या औद्योगिक भरभराटीचा प्रारंभ झाला. स्थल-मार्गावरील वाहतुकीचें नवीन युग अवतरण्यापूर्वी अटलांटिक किनाऱ्यावरील वसाहतींनी आपलें आर्थिक स्वातंत्र्य संपादिलें व त्याच्याच जोरावर या वसाहती युरोपशीं फटकून वागूं शकल्या व

* American Geo. Review, July 1940, "Limits of Western Hemisphere."

त्यांनी पुढे स्वातंत्र्य युद्धांत यश मिळविलें. रेल्वेच्या (लोहमार्गाच्या) युगांत संयुक्त संस्थानांचा विस्तार पॅसिफिक महासागरापर्यंत झाला. आलेघानी पर्वताची व उत्तर दक्षिण वाहिनी नद्यांची अडचण दूर सारून सबंध संयुक्त संस्थानें रेल्वेच्या साहाय्याने निगडित झालीं. या विस्तीर्ण भूप्रदेशांत लोहमार्गाचें जाळें विणलें गेलें. यामुळे लोखंडाच्या खाणी व कोळशाच्या खाणी जवळ जवळ आल्या. पर्वताच्या पश्चिमेकडील व मिसिसिपीच्या बाजूच्या प्रांतांतून ईशान्येकडील औद्योगिक विभागांत व दक्षिणेकडील कार्पास विभागांत धान्याचा मुबलक पुरवठा होऊं लागला. धनाढ्य व्यापाऱ्यांनी सरोवरांच्या प्रदेशापासून तों थेट मेक्सिकोच्या आखाता-पर्यंत आणि अटलांटिकपासून तों पॅसिफिकपर्यंतचा भाग संघटित केला. अशा प्रकारें दक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम अशा चोहों बाजूंनी हीं संस्थानें एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व्यापारी दृष्टया संघटित बनलीं. यानंतर धनाढ्य व्यापाऱ्यांची धनलोलुप दृष्टि इतर देशांकडे वळली. सन १८९८ सालीं आपल्या असोशिएशनच्या वार्षिक समारंभाच्या प्रसंगीं अमेरिकन बँकर्स असोसिएशनच्या (अमेरिकेंतील सर्व पेढयांच्या संस्थेच्या) अध्यक्षाने असें भाषण केलें होतें की "आज व्यापारांत उत्कर्ष मिळविण्याचीं साधनें—म्हणजे लोखंड, पोलाद, तेल व कोळसा—हीं आपल्याजवळ अमर्याद आहेत; तसेंच जगाला धान्य पुरविण्याची कुवत आपणांत आहे; जगांतील उद्योगधंदे व कारखाने आपल्याच देशांत संघटित होऊं शकतात व यापुढे जगाची सर्व देवघेव आपल्याच मार्फतीने झाली पाहिजे." आजच्या घटकेला आपण हें दृश्य खरोखरच पाहत आहों!

इ. स. १८९८ च्या स्पॅनिश अमेरिकन युद्धानंतर संयुक्त संस्थानें हें राष्ट्र साम्राज्यवादी व धंदेप्रधान असें राष्ट्र आहे अशी जगाची खात्री झाली. कारण लवकरच या राष्ट्राने मेक्सिकोचें

आखात व कॅरिबियन समुद्र यांच्यावर प्रभुत्व मिळविलें. युरोपमध्ये भूमध्य समुद्रास जें महत्त्व आहे तेंच महत्त्व कॅरिबियन समुद्राच्या विभागाला अमेरिकेंत आहे. या समुद्राच्या टापूंत क्यूबा बेटावर संयुक्त संस्थानांनी आपलें वर्चस्व स्थापिलें व पोर्टोरिको बेट आपल्या घशांत टाकलें ! संयुक्त संस्थानांची साम्राज्यविषयक आकांक्षा दक्षिणाभिमुख आहे असें या हालचालीवरून स्पष्ट झालें. याच-बरोबर पॅसिफिक महासागरावर दुसरें कोणतेंही राष्ट्र येऊं नये या धोरणाला अनुसरून फिलिपाइन्स, ग्वाम व हवाई बेट ह्यांवरही त्यांनी ताबा मिळविला ! पांचच वर्षांनंतर मध्य अमेरिकेंतील पनामा प्रांतांत कोलंबियाच्या सत्तेविरुद्ध बंडाळी उत्पन्न केली व तिला उत्तेजन देऊन पनामा प्रांत आपल्या पंखाखाली आणला. पनामा कालव्याच्या आसमंतात आपली कडक देखरेख असावी या उद्देशाने संयुक्त संस्थानांनी वरील उपद्व्याप केला नसेल असें नाही. याचबरोबर निकाराग्वे संस्थानास आपलें मांडलिकत्व कबूल करावयास लावून निकाराग्वे कालव्याचा भाग आपल्या देखरेखी-खाली आणला. युरोपांतील पहिल्या महायुद्धाच्या कालांत, ज्या वेळीं प्रेसिडेंट विल्सन युरोपांतील राष्ट्रांना स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय, व लोकशाही ह्यांचे धडे देत होते, त्याच वेळीं वेस्ट इंडीज मधील क्यूबाचे खालोखाल महत्त्वाच्या 'हैती' या बेटांतील नीग्रो लोक-शाहीच्या पार्लमेंटची सभा तेथील अराजकता नष्ट करण्याच्या निमित्ताने (साम्राज्यविषयक आकांक्षेने पिसाळलेलें राष्ट्र नेहमी असल्याच एखाद्या निमित्ताचा आश्रय घेऊन आपलें साम्राज्य प्रस्थापित करतें) त्याच विल्सन साहेबांच्या सरकारने सैन्याच्या जोरावर बरखास्त केली व त्या बेटावर आपलें निशाण रोविलें !

इ. स. १८९८ पर्यंत संयुक्त संस्थानांची सत्ता मध्य अमेरिकें-तील १९ लक्ष वर्ग–मैलांवर व त्यांतील नऊ लक्ष लोकसंख्येवर

प्रस्थापित झाली; आणि पॅसिफिक विभागांतील बारा लक्ष वर्ग-मैलांचा भूभाग त्यांच्या वर्चस्वाखाली आला. याच सुमारास धनाढ्य लोकांनी आपला तराजू दक्षिण अमेरिकेंतील संस्थानांत व क्यानडांत यशस्वी रीतीने तोलत ठेविला होता व आहे.

अमेरिकेची समृद्धता

उत्तर व दक्षिण अमेरिकांतील देशांशीं संयुक्त संस्थानांच्या असलेल्या हितसंबंधांचा विचार करण्यापूर्वी हीं संस्थानें कच्च्या मालाच्या देशांतर्गत अमर्याद उत्पादनामुळे कशीं समृद्ध, स्वयंपूर्ण व त्यामुळेच कशीं बलिष्ठ झालीं आहेत याचा आपण प्रथम विचार करूं.

कोळसा. जगांतील कोळशाच्या खाणींपैकी तीन चतुर्थांश खाणी उत्तर अमेरिकेंत आहेत व यांपैकी अर्ध्याहून अधिक संयुक्त संस्थानांत आहेत. इ. स. १९३० सालीं जगांतील पैदाशीपैकी शेकडा चाळीस कोळसा ह्या संस्थानांत पैदा झाला. दक्षिण अमेरिकेंत कोळशाचा बहुतेक अभाव आहे म्हणून त्या देशांना कोळशाकरितां या संस्थानांच्या तोंडाकडे पाहावें लागतें.

लोखंड. जगांतील तीन चतुर्थांशापेक्षा अधिक लोखंड या संस्थानांत सापडतें आणि जगांतील चौथ्या नंबरची मोठी लोखंडाची खाण क्यूबा बेटांत आहे, व हें बेट ह्या संस्थानांच्या ताब्यांत आहे. इ. स. १९३० सालीं शेंकडा चाळीस लोखंड व शेकडा त्रेचाळीस पोलाद या संस्थानांनी जगाला पुरविलें, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. जगांतील अतिशय मोठी लोखंडाची एकच सलंग खाण ब्राझील देशांत आहे, परंतु कोळशाच्या व वाहतुकीच्या साधनांच्या अभावीं त्या खाणीस अद्याप हात लागला नाही. अर्थात् या संस्था-

नांच्या कोळशाशिवाय व भांडवलाशिवाय ब्राझीलचें लोखंड बाहेर निघणार नाही.

पेट्रोल. इ. स. १९३० सालीं जगांतील पेट्रोलच्या पैदाशीपैकी सुमारें दोन तृतीयांश पेट्रोल या संस्थानांचें होतें. इ. स. १८५७ ते इ. स. १९१८ सालापर्यंत एकंदर जगाच्या पुरवठ्याच्या मानानें यांचा हिस्सा तीन पंचमांश होता. परंतु यांचा भूगर्भांतील साठा जगांतील शिल्लक असलेल्या सर्व साठ्याच्या अष्टमांश आहे ! या संस्थानांची लोभी दृष्टि शेजारचे प्रांत – मेक्सिको, दक्षिण अमेरिकेंतील तेलाचे भूप्रदेश व कॅरिबियन किनाऱ्यावर असलेले देश–यांवर आहे, ती याच कारणामुळे. संयुक्त संस्थानांतून या वेळीं असा एक 'अद्भुत शोध' निघाला होता की मेक्सिको, व्हेनेझुएला व मध्य अमेरिका यांतील आर्थिक व राजनैतिक दृष्टया मागसलेल्या जातींना पुढार-लेल्या लोकांनीच हातभार लावणें अवश्य आहे ! ह्या शोधाचें इंगित काय आहे बरें ? वरील प्रांतांत असलेला पेट्रोलचा अलोट पुरवठा हस्तगत करण्यासाठी वरील शोधाचें पिलूं आपल्या खिशां-तून काढलें ! फार कशाला 'पॅन अमेरिकन युनियन' 'गुड नेबर पॉलिसी' व अगदी अलीकडील म्हणजे इ. स. १९४० मध्ये मन्रो मताप्रमाणें होणाऱ्या अमेरिकन सत्तेच्या व्याप्तीचा ऊहापोह वगैरे सर्व ढोंगें हे मुत्सद्देगिरीचे डाव असून उपरिनिर्दिष्ट कारस्थानांचेच पडसाद आहेत. 'यँकी राजकारण' अथवा 'डॉलर डिप्लोमसी' म्हणतात ती हीच होय.*

गहू, मांस, कापूस. संयुक्त संस्थानें आपल्या सर्व प्रकारच्या गरजा भागवून गहू व मांस फार मोठ्या प्रमाणांत परदेशीं प्रत्यहीं पाठवीत आहेत. तसेंच लँकेशायरला दीर्घकालपर्यंत यांनीच

* 'New Directions in our Trade Policy' by *W. Diefold*, Council on Foreign Relations, New York, 1940.

कापूस पुरविला. पण आता कापसाच्या गिरण्या यांनी स्वतःच काढल्या असून कापसाच्या बाबतींत अमेरिका हा देश ब्रिटिश बेटांचा प्रतिस्पर्धी झाला आहे.

वरील वर्णनावरून संयुक्त संस्थानांची अनुपम समृद्धता वाचकांच्या लक्षांत आली असेलच. असल्या समृद्धतेवर अमेरिकेची व तिच्या गटाची सत्ता उभारलेली आहे व याच्याच बळावर आज तें राष्ट्र जगांत अग्रेसर होऊं पाहत आहे. सबंध अमेरिकेच्या कच्च्या मालाच्या साधनांची जोड या संस्थानांना लाभली तर काय स्थिति होईल याची कल्पना करणेंच बरें. हें कितपत शक्य आहे याचा अंदाज घेण्याकरितां आपण या संस्थानांचे अमेरिकेंतील इतर देशांशीं कसे संबंध आहेत तें पाहूं या.

मध्य व दक्षिण अमेरिकेंतील कारस्थानें

'पॅन अमेरिकन युनियन*' या संस्थेच्या जन्मामुळे संयुक्त संस्थानें व दक्षिण अमेरिकेंतील संस्थानें हीं परस्पर निगडित झालेलीं आहेत. वरवर पाहणारास हा एक राजकीय डाव वाटतो, परंतु वास्तविक रीत्या ही सारी आर्थिक गुंतागुंत आहे. 'वाशिंगटन'च्या प्रत्येक हालचालीवर मध्य व दक्षिण अमेरिकेंतील संस्थानें पूर्णपणें अवलंबून आहेत. 'राजा बोले आणि दळ हाले' अशांतलाच हा प्रकार होय. युरोपांतील पहिल्या महायुद्धांत संयुक्त संस्थानांनी जर्मनीविरुद्ध युद्धाचा दंड थोपटल्याबरोबर दक्षिण अमेरिकेंतील कांही देश जर्मनीवर गुरगुरूं लागल्याचें वाचकांच्या स्मरणांत असेलच. हल्ली हलके हलके कां होईना पण तोच प्रकार सुरू आहे. इति-

---

* दक्षिण अमेरिकेंतील सर्व देशांच्या सर्व प्रकारच्या हितसंबंधांचा विचार करणारी ही संस्था असून तिची मुख्य कचेरी वॉशिंग्टन येथे आहे. त्या अमेरिकन संस्थेकडे दक्षिण अमेरिकेंतील लोकमत साशंक दृष्टीने पाहतें.

हासज्ञांस हेंही अवगत असेलच की संयुक्त संस्थानांत मंदीचा काळ येतांच दक्षिण अमेरिकेंतील कांही राज्यें दिवाळखोर बनलीं, तर कांही राज्यांत गेल्या पांच सात वर्षांत राज्यक्रांत्याही झाल्या व होत आहेत.

मन्रो डॉक्ट्रिन (मन्रो मत) पासूनच पॅन-अमेरिकन युनियन निर्माण झालें आहे. नेपोलियनच्या पराजयानंतरच राजसत्ताक युरोपाला लोकसत्ताक देशांकडून ठोशास ठोसा म्हणून मन्रो डॉक्ट्रिन एक शतकापूर्वी पुकारण्यांत आलें; पण अमेरिकेंतील कोणत्याही राष्ट्राला युरोपियन राष्ट्राकडून धोका असल्यास त्या राष्ट्राच्या साहाय्यास संयुक्त संस्थानें धावून येतील असा पुढे 'मन्रो डॉक्ट्रिन'चा अर्थ होऊं लागला व या अर्थान्वयें नवभूखंडांत मात्र 'जैसे थे' (status quo) या तत्त्वाला संयुक्त संस्थानें कबूल आहेत असें मानण्यांत येऊं लागलें. प्रस्तुत कालांत तर यापुढे जाऊन संयुक्त संस्थानांनीच आपल्या शेजारच्या कमकुवत राष्ट्रांत वाटेल ती ढवळाढवळ करून आर्थिक मतलबाचें तूप आपल्याच पोळीवर ओढावें हाच मन्रो डॉक्ट्रिनचा अर्थ होऊं लागला आहे. याचा अर्थ असा की 'मन्रो डॉक्ट्रिन' हें अमेरिकेच्या अर्थशास्त्रांतील एक प्रमेय होऊन बसलें आहे! त्याला तितकेंसें राजकीय स्वरूप राहिलेलें दिसत नाही. संयुक्त संस्थानांतील कुबेरांनी आपापलें भांडवल मध्य अमेरिका व कॅरिबियन विभाग यांतील तेलांच्या खाणींत, अर्जेंटिनामध्ये गहू, मांसादि खाद्य पदार्थ उत्पन्न करण्यांत, चिलीमधील नायट्रेट काढण्यांत आणि पेरू बोलिव्हियांतील सर्व खनिजें काढण्यांत ओतलें आहे. या सर्वांचा परिणाम–विशेषत: अर्जेंटिना या देशांत–ब्रिटिश व्यापारास खो मिळण्यांत झाला! (ही गोष्ट ओटावा येथील व्यापारी परिषदेंत जास्त स्पष्ट झाली.) व पर्यायानें दोन साम्रा-

ज्यांत संघर्ष उत्पन्न होण्यांत होत होता. कारण सर्व ठिकाणीं (विशेषत: अर्जेंटिनांत) ब्रिटिश भांडवल मोठ्या प्रमाणांत गुंतलें आहे व त्यामुळे तो देश ब्रिटिशांच्या 'प्रभावक्षेत्रांत' येतो. पण आजच्या घटकेस दक्षिण अमेरिकेचा बाजार सुती कापडापासून तों यंत्रसामग्रीपर्यंत संयुक्त संस्थानांनीच तयार केलेल्या मालाने भरलेला आढळतो! याचा अर्थ खटके व कटकट ह्या दोन्ही गोष्टी अमेरिकेने आपण होऊन उत्पन्न केल्या हा होय. परंतु आज हीं दोन्ही राष्ट्रें भावी कालांत सर्व जगाला चिरशांति व सुख लाभावें म्हणून सहकार्य करीत आहेत!*

पनामा कालवा

दक्षिण अमेरिकेंतील कच्च्या मालाचा अमर्याद पुरवठा, तेथील बाजारपेठा आणि मागसलेले भूभाग संयुक्त संस्थानांच्या भांडवलाच्या हातांत येत आहेत; परंतु ते हस्तगत करण्याकरितां वाहतुकीचा मार्ग हवा होता. इ. स. १८५० पर्यंत ह्या कालव्यावर इंग्लंड व अमेरिका ह्यांचें जोड नियंत्रण होतें; पण पुढे तें पाउन्सफोट कराराअन्वयें केवळ अमेरिकेचेंच असावें असें ठरलें. यामुळे दक्षिण अमेरिकेवरची या संस्थानांची पकड मात्र दृढ होऊन बसली!

पनामा कालव्यामुळे संयुक्त संस्थानांची शक्ति आणि सामर्थ्य ह्या गोष्टी अपरिमित वाढल्या आहेत. दोन्ही महासागरांना हा कालवा जोडणारा असल्यामुळे त्यांना दोन्ही सागरांत देखरेख ठेवतां येते. पर्यायाने दोन्ही सागरांत अमेरिकेचें दर्यावर्दी सामर्थ्य सारखेंच बलाढ्य होऊन बसलें आहे. संस्थानांचे परस्परांपासून

* Britain and America : Allies for peace ?—*Barbara Ward* – Foreign Affairs. Jan. 1943.

अतिशय दूर असलेले दोन्ही किनारे या कालव्याने जवळ आणले व अतिशय खर्चाच्या व लांब पडणाऱ्या 'ट्रान्स काँटिनेंटल रेलवे'चें महत्त्व त्या मानाने कमी झालें आहे. दक्षिण अमेरिकेंतील बाजारपेठा संस्थानांच्या औद्योगिक केंद्रापासून या कालव्यामुळे निम्या अंतरावर आल्या आहेत. दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरचें चिलीचें बंदर वाल्पारैसो हें केपहॉर्न मार्गाने न्यूयार्क पासून ९००० मैल आहे, परंतु पनामा कालव्यामुळे तेंच ५००० मैलां-पेक्षा कमी अंतरावर आहे. तसेंच दक्षिण अमेरिकेंतील बाजारपेठांना युरोपपेक्षा संयुक्त संस्थानांतील औद्योगिक विभाग जवळ पडतो. पूर्वी पनामा कालव्याचा मार्ग नव्हता त्या वेळीं युरोपांतील व संयुक्त संस्थानांतील औद्योगिक केंद्रापासून या बाजारपेठा बहुतेक सारख्याच अंतरावर होत्या. या कालव्यामुळे संयुक्त संस्थानांच्या औद्योगिक विभागापासून आशियाचीं व्यापारी महत्त्वाचीं बंदरेंही जवळ आलीं आहेत! या कालव्याच्या मार्गाने योकोहामापासून न्यूयार्क ९८२५ मैल पडतें–पण लिव्हरपूल व योकोहामामधील अंतर मात्र ११६४० मैलांवर पडतें. म्हणजे पनामा कालव्याच्या मार्गाने योकोहामापासून न्यूयार्क, लिव्हरपूलपेक्षा सुमारें दोन हजार मैलांनी जवळ पडतें! व शांघायपासून दोन्ही शहरें–न्यूयार्क व लिव्हरपूल–सारख्याच अंतरावर आहेत! याच कारणामुळे अत्यंत धूर्त व साम्राज्यवादी प्रेसिडेंट थिओडोर रूझवेल्ट याने ताबडतोब कालव्याच्या टापूचा ताबा घेतला व तदनंतर तत्संबंधीची चर्चा काँग्रेसला करूं दिली! साम्राज्यवादी राजकारण तें हें! पॅन अमेरिकन युनियन मार्फत यु. स्टेट्समधून थेट दक्षिण अमेरिकेंतील सर्व देशांना जोडणारा एक पक्का रस्ता आखला असून त्याचा बराच भाग तयारही झालेला आहे! सध्या तसाच एक पक्का रस्ता अलास्काच्या टोकापर्यंत नेण्यांत आला आहे. ह्या दोहोंच्या

मागे मोठें दूरदर्शी राजकारण आहे !

क्यानडांत चंचुप्रवेश

भौगोलिक दृष्टया संयुक्त संस्थानांशीं संलग्न असलेले क्यानडा व न्यूफाऊंडलंड हे भाग किती दिवस ब्रिटिश साम्राज्यांत टिकून राहणार हा मोठा बिकट प्रश्न आहे. अथवा पॅन अमेरिक्यानिझमच्या वरवंटयाखाली न सापडतां किती प्रमाणांत स्वतंत्र राहतील हाही एक मोठा बिकट प्रश्न आहे. हें कसें तें पाहूं : पहिल्या युरोपीय महायुद्धानंतर क्यानडाची आर्थिक उन्नति फार झपाटयाने झाली. इ. स. १९२४ ते १९२८ च्या काळांत गव्हाची व विजेची पैदास दुपटीने वाढली. अमेरिकेने क्यानडांत आपलें भांडवल फार मोठ्या प्रमाणांत गुंतविलें आहे. पूर्वी तें शेंकडा १७ होतें पण तें आता शेंकडा ५७ पेक्षाही बरेंच जास्त झालें आहे ! साहजिकच ब्रिटिश भांडवल कमी झालें. पूर्वी ब्रिटिश भांडवल शेंकडा ७७ होतें; आता तें शेंकडा ३९ वर येऊन ठेपलें आहे. क्यानडाच्या एकंदर आयात मालापैकी _ हिस्सा एकटया अमेरिकेचा आहे व ब्रिटिश माल १/६ वर आला आहे ! पूर्वीच्या मानाने क्यानडाची इंग्लंडकडे जाणारी निर्यात १/३ वर येऊन ठेपली आहे, तर अमेरिकेकडे जाणाऱ्या मालाचें प्रमाण मात्र वाढत आहे.

भौगोलिक परिस्थिति हीच या घटनेलाही बव्हंशीं कारणीभूत झाली. क्यानडाच्या अमेरिकेशीं होणाऱ्या व्यापारांत रेल्वे वाहतुकीने तर अधिकच भर पडली आहे. तसेंच व्यापाराची वाढ होण्यासही प्रादेशिक सान्निध्यच कारण झालें आहे. सीमेवर असलेल्या विभागांना अमेरिकेशीं व्यापार करणें फार सुलभ जातें व तें साहजिकही आहे. जसें ब्रिटिश कोलंबियाचा व्यापार साहजिकच कॅलिफोर्नियाशीं चालेल, ओंटारियोशीं चालणें कठीण आहे; तसेंच

व्हँकूव्हर किंवा शिकागो हॅलिफॅक्सपेक्षा विनिपेगलाच जास्त जवळ आहे. तसेंच क्यानडा व संयुक्त संस्थानें यांमध्ये स्वाभाविक किंवा भाषेसंबंधीं कांही तटबंदी राहिलेली नाही. अक्षांश रेखांश हीच विभागणारी सीमा आहे. 'क्यानडा पूर्णपणें अमेरिकेंतच आहे' असें एका संपादकाचें मत आहे तें याचमुळे. सारांश, ऐतिहासिक, भौगोलिक व आर्थिक दृष्ट्या क्यानडा हा देश संयुक्त संस्थानांचें एक अंगच आहे व ही गोष्ट सध्या (इ. स. १९४०) या दोन देशांतील धंदे, कारखाने व व्यापार यांच्या घटनेवरून स्पष्ट होऊं पाहत आहे. तसेंच सेंट लॉरेन्स हा जो क्यानडाचा मुख्य व्यापारी जलमार्ग—जो वरवर पाहणाऱ्याला अमेरिका व क्यानडा ह्यांमधील सरहद्द वाटतो—तो अलीकडे सरोवरांच्या व्यापारी चौकाशीं आणून भिडविल्यामुळे सरोवरावरील व्यापारी महाकेंद्र जें शिकागो तें अटलांटिक महासागराशीं जोडलें गेलें. अटलांटिक सागराशीं जोडलेला ब्रिटिश साम्राज्यांतर्गत दळणवळणाचा कॅनेडियन पॅसिफिक रेल्वे हा एक दुवा आहे. परंतु भूमध्य समुद्र व सुवेझचा कालवा यांच्या मार्गाइतकें महत्त्व खास या पश्चिमेकडील मार्गाला नाही. आता इतकें खरें की, हडसन उपसागरांत नेल्सन हें नवीन बंदर उघडल्यामुळे मध्य क्यानडांतील प्रदेश निदान ग्रीष्म ऋतूंत, ब्रिटनच्या अगदी जवळ असल्याचें वाटतें; तरी क्यानडा पूर्णपणें संयुक्त संस्थानांनाच जवळ आहे. क्यानडांतील कोळसा, तेल व गहू आणि न्यू फाऊंडलँड मधील लोखंड ब्रिटिश साम्राज्याच्या स्वाधीन असलें तरी वॉलस्ट्रीट (वॉशिंगटन) मधील कोट्याधीश क्यानडासंबंधीं निरिच्छ आहेत असें नाही. क्यानडामधील व्यापार-श्रेष्ठींना गोड वाटणारीं जकातीचीं भिंताडें जरी ब्रिटनने उभारलीं तरी त्यामुळे कदाचित् ब्रिटिश साम्राज्याला बळकटी येईल; परंतु स्वदेशांतील उद्योगधंदे दगावतील याची जाणीवही पुष्कळांना आहे.

पण या पेचांतून सुटण्याचा मार्ग सध्या तरी मोठमोठ्या शास्त्रज्ञांना सापडलेला नाही. सध्याच्या युरोपीय महायुद्धामध्ये क्यानडा जरी इंग्लंडला मनोभावाने मदत करीत असला, व तो देश जरी ब्रिटनचें शस्त्रागार बनत असला, तरी त्या व्यवहारकारणाच्या पाठीशीं असलेले कॅनेडियन राजकारणी लोक क्यानडा–अमेरिका यांचा संबंध वर सांगितल्याप्रमाणेंच समजतात असें दिसतें.

अशा प्रकारें संयुक्त संस्थानें (अमेरिका) जगांतील सर्व राष्ट्रांपेक्षा अधिक समृद्ध आहेत, तसेंच त्यांची भौगोलिक परिस्थिति व रचना विशेष सोईची आहे. दोन्ही अमेरिकांत आपलें आर्थिक वर्चस्व प्रस्थापण्याचें आपलें कार्य संयुक्त संस्थानांनी आरंभिलें आहे व या दोन्ही भूखंडांत या संस्थानांशिवाय इतर कोणाचीही सत्ता बलशाली नाही व नसावी हा हेतूही आहे. पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावरून त्या सबंध सागरावर यांचेंच आधिपत्य चालूं शकतें. मधून मधून असलेल्या बेटांबेटांवर यांचेंच नौकादल स्थित आहे, व अशा प्रकारें यांची सत्ता थेट आशियाच्या किनाऱ्यापर्यंत येऊन भिडत आहे व पुढे मागे ही सत्ता ब्रिटिश सत्तेला धक्का पोंचविल्याशिवाय, किंवा जपानी सत्तेला शह दिल्याशिवाय राहणार नाही. तसेंच कालेंकरून अमेरिका समृद्ध चीनच्या राष्ट्रीय संपत्तीचा कांही भाग आपल्या खिशांत कोंबील की काय अशी पण धास्ती वाटत आहे. या संस्थानांतील राजकीय पुरुष कंठरवाने सांगत असतात की 'आम्हांस जगाच्या राजकारणांतील गुंतागुंतींत मुळीच पडावयाचें नाही.' परंतु या संस्थानांची भौगोलिक रचना व आर्थिक उन्नतीची झडप इतकी प्रखर आहे की, त्यामुळे वरील प्रमेय पार लय पावतें. या दोन कारणांमुळे हीं संस्थानें हें आजच्या साम्राज्यवादाच्या कालांत अतिशय बलाढ्य साम्राज्यवादी राष्ट्र बनलें आहे.

प्रकरण आठवें

आधुनिक जगांतील महाजन :
(२) ब्रिटिश साम्राज्य

साम्राज्याचा भौगोलिक विस्कळीतपणा

या गटाविषयीं विचार करतांना असें आढळून येईल की ब्रिटिश साम्राज्य हा भौगोलिक दृष्टया एक सुसंबद्ध गट नाही. इतर गट भौगोलिक दृष्टया इतके विस्कळीत नाहीत. यांचें राज्य व वसाहती सप्तसमुद्रांत इतःस्ततः विखुरलेल्या आहेत. समुद्रच यांना निगडित करीत आहे. जोंपर्यंत ब्रिटनची सत्ता समुद्रांवर एकमेवाद्वितीयम् आहे तोंपर्यंत ब्रिटिश साम्राज्य निगडित राहणार. कारण इतर गटही साम्राज्यपिपासु असून त्यांनाही समुद्रसत्तेची आवश्यकता आहेच.

नवीनच उद्भूत झालेल्या वैमानिक शक्तीमुळे वरील परिस्थितीला कांहीच बाध येत नाही असें नाही. तथापि शक्य तोंवर स्थलमार्गाच्या अनुरोधानेच आकाशमार्ग आखले जातात. नाइलाजास्तव हे मार्ग समुद्रावरून ठरविले आहेत. अंतरिक्षांतील दळणवळण हें वातावरणांतील फेरबदल व क्षणाक्षणास होणारे हवामानांतील बदल ह्यांवर अवलंबून असतें. पण तसें रेल्वे व आगबोटी यांचें नाही. तसेंच दूरवर पसरलेले प्रांत आकाशमार्गाने अजून संलग्न करतां येत नाहीत. कारण युद्धकालांत वायुयानांना युद्धमान राष्ट्रांच्या प्रांतावरून प्रवास करणें अशक्य होणार व दळणवळणाला साहजिकच प्रतिबंध होणार. महासागरांत वायुयानांना उतरण्याकरितां तरते तळ तयार करावे लागतील व त्यांचें संरक्षण केवळ

समुद्रावर ज्याची सत्ता आहे तेंच राष्ट्र करूं शकेल. आकाश-मार्गांची कशी प्रगति होते हें यापुढे दिसून यावयाचें आहे. कदाचित् रशिया व संयुक्त संस्थानें परस्परांनजीकही येतील. भविष्यकालाच्या पोटांत काय आहे हें कोणी सांगावें ? सध्या तर ब्रिटिश राष्ट्र सामुद्रिक श्रेष्ठतेप्रमाणें वैमानिक श्रेष्ठताही मिळवूं पाहत आहे, पण या कामांतही सामुद्रिक श्रेष्ठतेचाच आधार आहे.

समुद्री सत्ता व मार्ग

जगांत सर्व खंडांत ब्रिटिश साम्राज्य विखुरलेलें आहे. ब्रिटिश साम्राज्यवाढीच्या इतिहासाचें सिंहावलोकन केल्यास ब्रिटिश साम्राज्य विखुरलेलें कां आहे याचा खुलासा होतो. सोळाव्या शतकांत सागरावरील मार्ग दर्यासारंगांनी खुले केले तेव्हापासून ब्रिटिशांच्या सत्तेचा उत्कर्ष होत चालला व त्याचा आधार ब्रिटिश बेटांची भौगोलिक स्थिति—अटलांटिक महासागरांतील समुद्रवलयांकित विशिष्ट स्थान—हा होता व आहे. कांही काळानें जगांतील व्यापारी मालाची नेआण करण्याचा मक्ता आपल्याकडे ओढून घेण्यांत इंग्लंडने यश कमाविलें. ओघानेच इंग्लंडला जागोजागीं व्यापारी ठाणीं व विश्रांतिस्थानें निर्माण करणें भाग पडलें. समुद्र मार्ग आपल्या ताब्यांत ठेवून व्यापारी मालाची वाहतूक सुरक्षितपणें करितां यावी एवढयाच उद्देशाने इंग्लंडने जागोजाग बंदरें व ठाणीं स्थापिलीं. या काळांत भूप्रदेशाची आकांक्षा इंग्लंडने ठेविली नव्हती व तशा राजकीय परिस्थितींतही तें तेव्हा नव्हतें. महत्त्वाच्या मार्गावरचीं नाकीं आपल्या हस्तगत करून घेण्यासाठी मात्र इंग्लंडने हवे ते उपद्व्याप केले व तीं नाकीं मिळविलीं. मागील एका प्रकरणांत आपण पाहिलेंच की, वेस्ट इंडीजमधील दोन लहान

बेटांचें (जसें-बहामा गट) महत्त्व क्यानडापेक्षाही अधिक आहे असें अठराव्या शतकांतील ब्रिटिश व्यापाऱ्यांना वाटत असे, कारण युरोपांतून अमेरिकेंत जाणारीं शिडांचीं जहाजें वेस्ट इंडीजमधून जात असत व साहजिकच वेस्ट इंडीज बेटांचें महत्त्व फार गणलें जात असे. आग्नेय दिशेने वाहणाऱ्या व्यापारी वाऱ्यांच्या अनुरोधाने शिडांचीं जहाजें वेस्ट इंडीजपर्यंत येऊन नंतर उत्तरेस किंवा दक्षिणेस वळत असत. एवढ्याच कारणामुळे इंग्लंडने प्रारंभींच जमेका, बर्म्युडा, बार्बेडोस वगैरे बेटें हस्तगत केल्याचें दिसून येतें. तसेंच हिंदुस्थानाकडे येणाऱ्या पूर्वेकडील मार्गावर 'केप ऑफ गुड होप' हें ठाणें असल्यामुळे तें महत्त्वाचें होतें. आपला प्रतिस्पर्धी जो फ्रान्स त्याशीं युद्ध करणें भाग पडल्यामुळे क्यानडा व हिंदुस्थान या देशांत इंग्लंडला मुलूखगिरी करावी लागली! अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंतचें ब्रिटिश साम्राज्य असें एवढेंच होतें; तथापि उत्तर अमेरिकेच्या वसाहतींतून इंग्लंडला जहाजें बांधण्यास लागणाऱ्या मालाचा पुरवठा होत असल्यामुळे या वसाहती मात्र इंग्लंडला फार महत्त्वाच्या वाटत.

ठिकठिकाणीं स्थापिलेल्या व्यापारी ठाण्यांमधून व विश्रांतिस्थानांमधूनच इंग्रजी साम्राज्याचा विस्तार एकोणिसाव्या शतकांत झाला. इ. स. १८०० ते १८५० च्या कालांत साम्राज्याचा विस्तार तिप्पट झाला, तर इ. स. १९१९ मध्ये युरोपांतील पहिल्या महायुद्धानंतर जगाच्या एकचतुर्थांशापेक्षा अधिक भूप्रदेशावर* व एकचतुर्थांशापेक्षा अधिक लोकसंख्येवर* इंग्रजी निशाण फडकूं

* १३७००००० चौ. मैल एवढा भूप्रदेश व सुमारें ४७½ कोटि लोकवस्ती ब्रिटिश साम्राज्यांत मोडे. या वस्तीपैकी सुमारें ३२ कोटि वस्ती एकट्या हिंदुस्थानांतील होती हें विसरतां कामा नये.

लागलें ! साम्राज्याच्या विस्ताराबरोबर इंग्लंडची सागरावरील सत्ताही अधिकाधिक होत गेली. संयुक्त संस्थानांत व रशियांत लोहमार्गांना जें राष्ट्रीय महत्त्व आहे, तेंच महत्त्व इंग्रजी साम्राज्यांत आगबोटींना आहे. एच्. जी. वेल्सच्या मतें "इंग्रजी साम्राज्य आगबोटीवर उभारलें आहे."

औद्योगिक ब्रिटन व वसाहती

पहिल्या महायुद्धानंतरच्या या काळांतही जगांतील राष्ट्रगटांत ब्रिटिश गट हाच सर्वांत अधिक सत्ताधीश होता. औद्योगिक क्रांतीनंतर जगाचा बहुतेक सर्व व्यापार ब्रिटनच्याच ताब्यांत आला! इंग्रजांच्या जहाजांतूनच इतर देश व्यापारी मालाची नेआण करूं लागले. सर्व समुद्रांतून इंग्रजांच्या जहाजांतून कोळसा आणि इंग्रजी मालाची वाहतूक सुरू झाली. इंग्लंडमध्ये कोळशाच्या खाणी भरपूर आहेत व या खाणी समुद्रकिनाऱ्याच्या जवळच आहेत. समुद्राजवळ खाणी आहेत या कारणामुळे इंग्लंडला खाणी असलेल्या इतर देशांच्या मानाने व्यापारी क्षेत्रांत आघाडी मारितां आली. इतर देशांना कोळसा परदेशीं पाठविण्याकरितां समुद्रापर्यंत आणण्यासाठी लोहमार्गांची प्रगति होईपर्यंत अतिशय अडचण भासत होती. ही अडचण इंग्लंडला कधीच आली नाही. एकोणिसाव्या शतकांत इंग्लंडची सत्ता मध्यान्हीं पोचली होती, असें म्हणतां येईल. कारण धंदेप्रधानत्वासाठी जरूर असलेली निसर्गसमृद्धि होतीच आणि समुद्रमार्ग व त्यावरील जहाजांची वाहतूक ह्या गोष्टी पूर्णपणें इंग्लंडच्या तंत्राने चालत असत. याचा परिणाम असा झाला की औद्योगिक क्षेत्रें व खाणीचा आसमंताद्भाग यांत लोकसंख्या वाढूं लागली. लोक आपापलीं शेतकी कामें सोडून कारखाने, गिरण्या व खाणी यांत काम करावयास जाऊं लागले त्यामुळे

साहजिकच अन्नाकरितां इंग्लंडला दुसऱ्या देशांच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग आला. इंग्लंडमध्ये शेंकडा १० लोक शेतकी करतात, फ्रान्समध्ये शेंकडा ४२, जर्मनींत शेंकडा ३१, तर रशियांत शेंकडा ८७ लोक शेती करीत. इंग्लंडमधील लोकांचे हित-संबंध कोळसा, लोखंड व पोलाद आणि समुद्रावरील सत्ता यांत गुंतलेले आहेत आणि म्हणून ते अतिशय दाटीदाटीने औद्योगिक क्षेत्रांतच वस्ती करून आहेत.

बोमनने (Bowman) आपल्या 'न्यू वर्ल्ड' या पुस्तकांत ब्रिटिश साम्राज्याचे खालीलप्रमाणें भाग पाडले आहेत:--

(१) स्वयंशासित प्रांत:- क्यानडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड. न्यूफाऊंडलंड व आयर्लंड, येथील भांडवल-शाहीचे हितसंबंध इंग्लंडच्या भांडवलशाहीच्या हितसंबंधाशीं मिळते आहेत असें मुळीच नाही. धनाढ्य व्यापारी व त्यांचे मजूर दोघेही श्वेतवर्णीयच आहेत. मूळचे लोक अतिशय अल्पसंख्याक आहेत. ही परिस्थिति फक्त दक्षिण आफ्रिकेंत नाही.

(२) मालकीचे प्रांत (Possessions):—हिंदुस्थान, सुदान, पूर्व व पश्चिम आफ्रिका. या प्रांतांत इंग्रजांचें सार्वभौमत्व आहे. हिंदुस्थानांत औद्योगिक उन्नति होत असून येथे एक भांडवलशाहीचा वर्गही निर्माण झालेला आहे. याच विभागाला 'इंग्रजांचें खरें साम्राज्य' म्हणतां येतें.

(३) समुद्रावर असलेलीं नाक्याचीं ठाणीं:—मुख्यत: जिब्राल्टर, सुवेझ, एडन, सिंगापूर आणि हाँगकांग व इतर.

नं. २ च्या विभागांत ईजिप्तचा समावेश थोड्या दिवसांपूर्वी करतां आला असता. आता ईजिप्तला इंग्लंडने स्वातंत्र्य दिलें आहे; तरी पण लष्करी, न्यायविषयक व आर्थिक बाबींत तेथे

इंग्लंडचें वर्चस्व आहेच. सुदानवर म्हणजे नील नदीच्या उगमावर तर इंग्रजांचा ताबा आहे. तेथील पाण्यावर इंग्रजी सत्ता नांदते आणि नील नदीवर तर ईजिप्तचें अस्तित्व अवलंबून आहे.

राजकीय दृष्टया ब्रिटिश साम्राज्यांत नसलेले परंतु पूर्णतः ब्रिटिश गटांत येणारे कांही देश आहेत. उदाहरणार्थ, पोर्तुगाल व त्याच्या वसाहती, अर्जेंटिना, डच ईस्ट इंडीज इत्यादि. सिंगापूर व ऑस्ट्रेलिया या यौद्धिक महत्त्वाच्या स्थानांमार्फत व रॉयल डच शेल ऑईल कंपनी मार्फत 'डच ईस्ट इंडीज' या या नांवाखाली मोडणाऱ्या द्वीपसमूहावर इंग्रजी आर्थिक हुकमत चालत असते. भौगोलिक परिस्थितीने व नाविक व्यापाराच्या दृष्टीने नॉर्वे व डेन्मार्क इंग्लंडचीं बाहुलीं होतीं. भूमध्य समुद्रांत इंग्रजी सत्तेला उचलून धरल्यामुळे ग्रीस इंग्रजी साम्राज्याचें लाडकें बाळ होऊन बसलें आहे! परंतु एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे, ती ही की, सायप्रस बेट परत करण्याच्या ग्रीसच्या मागणीला मात्र इंग्लंड मुळीच जुमानीत नाही! *

हिंदी महासागर व त्याचे प्रवेशमार्ग

ब्रिटिश साम्राज्य पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र पसरलेलें असलें तरी साम्राज्याचे खरेखुरे जिव्हाळ्याचे हितसंबंध हिंदी महासागर


---

* इ. स. १९३० पर्यंत उत्तर व बाल्टिक समुद्रीय देश, म्हणजे हॉलंड, डेन्मार्क, आइसलंड, नॉर्वे व बाल्टिक राष्ट्रें–हीं इंग्लंडची तळी उचलून धरीत. ही अशी छाप व योजना इंग्लंडने तरी फ्रान्सच्या युरोपांतील त्या वेळच्या वाढत्या प्रस्थाला काटशह देण्यासाठीच केली होती. पण इ. स. १९३८ नंतर जर्मनीच्या वाढत्या प्रस्थामुळे या विभागांना गळती लागून ब्रिटिशांविषयीं त्यांना अविश्वास व द्वेष वाटू लागला व त्याचा फायदा जर्मनीने घेतला.

व आसमंतांतील भूप्रांत यांत–व विशेषत: या सागरांत युरोपांतून उतरणाऱ्या मार्गांत–आहेत. चार शतकांपूर्वी हिंदी महासागर पोर्तुगीजांचें तळें होतें; आज तें सर्वस्वी इंग्रजांचें तळें बनलें आहे. मागील युद्धानंतर इंग्रजांनी कांही प्रांत मिळवून हिंदी महासागराच्या आसपासचा भूभाग आपल्या वर्चस्वाखाली आणिला. आफ्रिकेचा पूर्व किनारा, कांही थोडा भाग वगळून, (जसें–मोझांबिक व अबिसीनिया) आता इंग्रजांच्या मालकीचा झाला आहे. तांबडया समुद्राच्या तोंडाशीं असलेल्या एडनमुळे अरबस्थान व इराणी आखातामुळे पर्यायाने मेसोपोटेमिया व इराण यांवर बारीक नजर इंग्लंडला ठेवतां येते. अमोल हिंदुस्थान आणि ब्रम्हदेश हे भाग इंग्रजांच्या स्वामित्वाखाली आहेतच. हिंदी महासागर व पॅसिफिक महासागर या दोन बाजूंवर उभारलेल्या ब्रिटिश साम्राज्यरूपी कमानीचा मेरुमणि भारतवर्ष हा आहे. किंबहुना ह्या शिरोधार्य होण्याजोग्या भारतवर्षाच्या संरक्षणासाठी ह्या दोन बाजू उभवलेल्या आहेत असें म्हटल्यास अधिक शोभेल! याशिवाय स्ट्रेटस् सेटलमेंट्स म्हणजे मलाया वगैरे व पलीकडे हाँगकाँग आणि नंतर ऑस्ट्रेलिया या सर्व भागावर इंग्रजांचा ध्वज फडकत आहे!

वर दर्शविलेला हिंदी महासागराच्या बाजूचा भूभाग अतिशय निसर्गसमृद्ध असून कोणत्याही औद्योगिक राष्ट्राला आपल्या तयार मालासाठी उत्तम बाजारपेठ म्हणून अतिशय महत्त्वाचा आहे; एवढेंच नव्हे तर हे भूभाग मिळून अतिसमृद्ध असें एक पहिल्या दर्जाचें साम्राज्यच होऊं शकतें.

यावरून ह्या हिंदी महासागरपरिवर्ति विभागाचें महत्त्व किती मोठें आहे हें जसें ध्यानांत येईल तसें इंग्रजांचे जिव्हाळ्याचे हितसंबंध ह्याच विभागांत कां व कसे आहेत हें पण ध्यानांत येईल. इंग्लंडला संयुक्त संस्थानांशीं पॅसिफिक व अटलांटिक या




हिंदीमहासागरावरील राज्यविस्तार

हिंदी महासागर म्हणजे ब्रिटनच्या अंगणांतील कोंडलेलें पाणी आहे. त्याच्या सर्व बाजूंस ब्रिटिश मुलुखाची कमान असून तिचा मेरुमणि भारतवर्ष आहे. या कमानींत कोलंबोचें मध्यवर्ती स्थान आणि केपटाऊन, फ्री मँटल, अल्बनी, एडन, इराणी आखात, सिंगापूर हे मुख्य दरवाजे ह्या यौद्धिक महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

दोन महासागरांत स्पर्धा करावी लागत आहे व पुढे मागे दक्षिण अमेरिकेंतील उदयोन्मुख राष्ट्रांशींही करावी लागेल असें दिसतें. परंतु या हिंदी महासागरांत इंग्लंड अद्वितीय आहे. त्याला प्रतिस्पर्धी नाही. पण दुसऱ्या परिस्थितीचा विचार करतां ह्यांतील वैगुण्येंही लक्षांत आल्याशिवाय राहत नाहीत. इंग्लंडचें भांडवल व औद्योगिक क्षेत्र हीं या विभागापासून सहस्रावधि मैल दूर आहेत; आणि इंग्लंड व हा विभाग–कार्यकारी हात व साहित्य–ह्यांना जोडणारा अगदी जवळचा असा एकच मार्ग असून तोही समुद्री मार्ग आहे; तो भूमध्य समुद्रांतून आहे. यामुळे या समुद्री मार्गावर आपली सत्ता अबाधित राहावी याकडे इंग्लंडला डोळ्यांत तेल घालून जपावेंच लागतें. तो ताब्यांत ठेवणें सोईचें व सहज सुलभ आहे असें नाही. त्यांत अनेक भानगडी व कटकटी आहेत. तो समुद्री मार्ग ताब्यांत ठेवावयाचा म्हणजे जिब्राल्टर, सुवेझ व इस्तंबूल ह्या त्याच्या दरवाज्यांचा विचार आलाच. तसेंच त्या समुद्रावर असणाऱ्या फ्रान्स, इटाली व मध्य युरोपांतील समुद्रासाठी तडफडणाऱ्या जर्मनीसारख्या साम्राज्यपिपासु राष्ट्रांच्या अडचणी, हालचाली व कारस्थानें इत्यादि भानगडींचाही विचार पूर्ण सावधगिरीने करणें ओघप्राप्तच येतें.

सुमारें चारशें वर्षांपूर्वी भूमध्य समुद्र तत्कालीन जागतिक राजकीय आंदोलनाचा आंदोलक कसा बनला होता हें आपण मागे पाहिलेंच आहे. त्यानंतर आता पुनः भूमध्य समुद्राचें माहात्म्य सुवेझचा कालवा तयार केल्यामुळे अतिशय वाढलें आहे. इंग्रजांचें राष्ट्रांतरीय धोरण समजण्याकरितां या राजमार्गाचें महत्त्व पूर्णपणें ओळखलें पाहिजे; किंबहुना **भूमध्य समुद्रावरील मार्ग हा ब्रिटनचा जीवनरज्जु आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.** जर्मनीने वायव्य युरोपांतून बर्लिन ते बगदाद रेल्वे बांधण्याची योजना आखली

होती. या योजनेच्या योगाने इंग्रजांच्या भूमध्य समुद्रावरच्या मार्गाला पूर्ण काटशह बसतो. गेल्या महायुद्धानंतर ऑस्ट्रियाला व तुर्कस्थानला खच्ची करण्यांत आलें व ग्रीसची मर्यादा वाढविण्यांत आली. या राजकीय घटनांचा व कारस्थानांचा दूरदर्शी हेतु बर्लिन–बगदाद मार्गाची योजना फोल व्हावी हाच होता व आहे. भूमध्य समुद्राच्या मार्गास धोका पोचूं नये, तसेंच इराण, इराक व इराणी आखातासभोवतींचीं तेलाच्या खाणींचीं क्षेत्रें (जसें ओमान, क्यूवेट, बाहरेन, इत्यादि) आपल्याच ताब्यांत राहावीं एवढयाच करितां इंग्रजांचे या विभागांतील राजकीय डावपेच चालू असतात. या मार्गाच्या आसमंतांतील भूप्रदेश एकतर इंग्रजांच्या स्वाधीन असावा किंवा त्यांच्या पंखाखाली तरी असावा आणि असें असेल तरच भूमध्य समुद्राचा मार्ग सुरक्षित राहील असें इंग्रज लोकांना वाटतें. कॉन्स्टंटिनोपलमध्ये कोणाची सत्ता असावी हें इंग्रजांनीच ठरविलें पाहिजे असेंही त्यांना वाटतें. कारण भूमध्य समुद्राचा तोही एक महत्त्वाचा दरवाजा आहे. ईजिप्त ताब्यांत असल्यामुळे सुवेझवर नियंत्रण ठेवतां येतें. ज्याप्रमाणें पनामा कालव्याच्या किनाऱ्यावर जपानी किंवा इतर सत्ता संयुक्त संस्थानें टिकूं देणार नाहीत, तद्वत् ईजिप्त देशांत इतर कोणतीही सत्ता इंग्रज नांदूं देणार नाहीत. या सर्व राजकीय विचारसरणीचा मथितार्थ इतकाच की **स्वातंत्र्यप्रिय लोकांनी कोणत्याही मोठ्या सत्तेच्या वाहतुकीच्या राजमार्गावर असूं नये, त्याचप्रमाणे वनस्पतिज किंवा खनिज वस्तूंची समृद्धि देखील स्वातंत्र्येच्छु लोकांच्या देशांत असूं नये, असा प्रस्तुत जगाचा दण्डक दिसतो.** पॅसिफिक महासागरावर सध्या जपान, अमेरिका व इंग्लंड ह्या तीन महत्त्वाच्या अशा सत्ता असून त्या तीनही सत्ता आग्नेय आशियांतील रबर व टिन या फार महत्त्वाच्या पदार्थांसाठी त्या भागावर अवलंबून आहेत.



ब्रिटन व बर्लिन-बगदाद मार्ग

ब्रिटन व जर्मनी ह्या दोन धंदेप्रधान साम्राज्यपिपासु राष्ट्रांचे आशियांतील बाजार पेठांत उतरणारे हे दोन मुख्य मार्ग होत. जर्मनीचें पश्चिमेचें समुद्रद्वार लहान, तसेंच ब्रिटिश समुद्रमार्गावरोधित असल्याने जर्मनीने बर्लिन बगदाद मार्गाच्या द्वारें पूर्वद्वार उघडलें.

[पृष्ठ ७१ व २०८

त्या पदार्थांसाठी तसेंच त्या भागांतील नाकीं व ठाणीं यांसाठी या तीन राष्ट्रांचे परस्परांशीं कसे डावपेच सुरू आहेत हें व त्याचा काय परिणाम होत आहे हें इतिहासवाचकांच्या व चालू युद्धांतील घडामोडीकडे लक्ष देणारांच्या डोळ्यांसमोर आहेच.

झगड्यांचें क्षेत्र

ब्रिटन हें वस्तुतः जागतिक सत्ताधारी राष्ट्र (World Power) आहे; कारण प्रत्येक समुद्रांत त्याचें नाकें व ठाणें आहे आणि प्रत्येक खंडांत त्याला पाय ठेवण्याची जागा आहे. त्यामुळे व ओघानेच त्याचे हितसंबंध प्रत्येक ठिकाणीं गुंतलेले असल्यामुळे प्रतिस्पर्धी गटांशीं त्याच्या जागोजाग कलागती होण्याचा संभव फार आहे. जगाच्या नकाशाकडे बारकाईने दृष्टिक्षेप केल्यास याचा खुलासा ताबडतोब होतो. भूमध्य समुद्रांतील समुद्रमार्गाचें संरक्षण करण्याकरितां इंग्रजांनी तेथील जिब्राल्टर, सायप्रस, माल्टा, सुवेझ, इत्यादि ठाणीं आपल्या ताब्यांत ठेवलीं आहेत. परंतु ही परिस्थिति फ्रान्सला रुचत नाही, कारण फ्रान्सला आफ्रिकेंतील आपल्या मुलखाशीं सतत दळणवळण ठेवण्याकरितां भूमध्य समुद्रावर अविरोध सत्ता पाहिजे. या समुद्रांत इंग्रजांचा मार्ग पश्चिम ते पूर्व असून फ्रान्सचा मार्ग उत्तर–दक्षिण आहे. या दोन मार्गांच्या चौफुलीवर जणू काय पोलीसचें कार्य करणारा निर्जीव असा राष्ट्रसंघ उभा होता. पण येथील परस्परविरोधी हितसंबंधाची कुरबुर तो कशी मर्यादित करणार ?

दक्षिण अमेरिकेच्या बाजारपेठांत ब्रिटनला प्रतिस्पर्धी संयुक्त संस्थानें आहेत. तसेंच क्यानडासंबंधीं विवरण करीत असतां संयुक्त संस्थानांनी आपले हातपाय तेथे (ब्रिटिश साम्राज्यांतील अत्यंत महत्त्वाच्या व ब्रिटनचा जणू दुसरा प्राण असणाऱ्या भागांत) किती पसरले आहेत हें वाचकांच्या लक्षांत असेलच. ब्रिटिश

साम्राज्याची आर्थिक आणि भौगोलिक परिस्थिति अशी कांही चमत्कारिक आहे की त्याचे रशिया व जपानशीं खटकेच व्हावेत. जपानची व्यापारी दृष्टि पॅसिफिक महासागराच्या पूर्वेकडील क्यानडावर व संयुक्त संस्थानांच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे, तशीच ती दक्षिणेकडे ऑस्ट्रेलियावरही आहेच. ह्या सर्व ठिकाणीं 'खास श्वेतवर्णीयांसाठी राखून ठेविलेली जागा' ही मज्जाव करणारी सूचना जपानच्या डोळ्यांत खुपत आहे. आशिया हा आशियांतील जनतेसाठीच आहे हें प्रमेय सत्यसृष्टींत आणण्याकरितां जपानला हिंदुस्थानांत असलेली इंग्रजी सत्ता ही एक मोठी अडचण वा अडवणूक भासते. पुनः चीनमध्ये मांडी ठोकून बसलेले इंग्रज आणि अमेरिकन व्यापारी जपानला आपल्या कार्यांत अडवणूक करीत आहेतच. हीं झालीं जपान व इंग्रज ह्यांच्या संभाव्य कलागतीचीं किंवा खटक्याचीं स्थानें. काळ्या समुद्रांतून भूमध्य सागरांत उतरण्याची धडपड रशिया कित्येक वर्षांपासून करीत आहे. परंतु तेथेही इंग्रजांची कोंडी फोडल्याशिवाय रशियाचे प्रयत्न निष्फळच होतात व होणार. इंग्रजी सत्तेच्या मर्मस्थानीं असलेल्या मध्यपूर्व (Middle Eastern Lands) टापूच्या उंबरठ्याशीं—हिंदुस्थानच्या डोक्याशीं—रशियन सत्ता येऊन भिडली असल्यामुळे ब्रिटिश साम्राज्याला सतत धोका आहे. रशिया व इंग्रज ह्यांच्या संभाव्य वा भावी झगडयासाठी तयार असलेलीं दारूचीं कोठारें म्हणजेच हीं स्थानें होत. सारांश, इंग्रजी साम्राज्यापायीं जगांत शांतता नांदते असें साम्राज्याचे स्तुतिपाठक कंठरवाने सांगोत, तथापि भविष्यकालीन युद्धाचीं बीजें मात्र प्रस्तुतच्या साम्राज्य-विस्तारांत व विभागणींत आहेत याबद्दल शंका नाही.

ग्रेट ब्रिटनची समृद्धता व सापेक्ष अवनति

आतापर्यंत ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वाहतुकीच्या राजमार्गांचें

व तत्संलग्न व तदुद्भूत परिस्थितीचें विवरण केलें. आता ब्रिटिश साम्राज्यांतील कच्च्या मालाच्या पुरवठ्यासंबंधीं विचार करूं. खास ग्रेट ब्रिटनमध्ये हाताशीं सापडणाऱ्या लोखंडावर व कोळशावर साम्राज्याचें औद्योगिक सामर्थ्य अवलंबून आहे. या खनिजांचा पुरवठा सापेक्षत्वाने कमी कमी होत आहे. युरोपांतील पहिल्या महायुद्धाच्या थोड्या वर्षांपूर्वीपासून कोळसा, लोखंड आणि पोलाद यांच्या पैदाशींत जगांतील राष्ट्रांत ब्रिटनचा तिसरा नंबर लागत असे. याचा अर्थ असा नाही की ब्रिटनचा पुरवठा कमी झाला. परंतु इतर राष्ट्रांत या खनिजांची पैदास अतोनात वाढली आहे. एकेल नामक ग्रंथकाराने आपल्या पुस्तकांत* या खनिजांसंबंधीं एकंदर जगाचा हिशेब करून पैदाशीसंबंधीं प्रत्येक राष्ट्राचें प्रमाण बसविलें आहे. इ. स. १९२० सालीं ब्रिटनने शेंकडा ४ कोळसा काढला. संयुक्त संस्थानांत शेंकडा ५० व मध्य युरोपांत शेंकडा १० कोळसा निघाला. मध्य युरोपांत सापडणारा कोळसा प्रत्यक्षपणें किंवा पर्यायाने फ्रान्सच्या मालकीचा होता. ब्रिटनचा याव्यतिरिक्त सापडणारा कोळसा समुद्रतटाकीं सापडत नसल्याने परदेशीं पाठविण्यास तो महाग पडतो. क्यानडा व ऑस्ट्रेलिया यांत कोळसा समुद्राजवळ सापडतो व त्यामुळे तो परदेशीं रवाना करण्यास सुलभ आणि स्वस्त पडत आहे. दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि हिंदुस्थान यांत कोळशाच्या पैदाशीचें प्रमाण वाढत आहे.

ब्रिटनचा उर्वरित कोळसा किनाऱ्याशीं सापडत नसल्याने महाग पडतो. याचा पोलादाच्या व्यापारी उलाढालीवर अनिष्ट परिणाम होण्याचा फार संभव आहे. ब्रिटनच्या अंतर्भागांत असलेल्या कोळशाची निर्यात करणें महाग पडत असल्याकारणाने साहजिकच त्याची निर्यात अतिशय मर्यादित होते. पोलादी उद्योगधंद्याकरितां

* 'Coal, Iron and War', *E. C. Eckel*, Harrap, 1932.

कोळशाची आवश्यकता असते. अर्थात् ब्रिटनच्या पोलादाच्या उद्योगाची भरभराट कोळशाच्या पुरवठ्यावर अवलंबून आहे.

वरील कारणामुळे ब्रिटनच्या औद्योगिक ऱ्हासाला सापेक्षत्वाने प्रारंभ झालेला आहे. ब्रिटनच्या व्यापाराच्या यशाची गुरुकिल्ली त्याच्या भरपूर कोळशाच्या पैदाशीवर अवलंबून आहे. पण ह्याच्या उलट हायड्रो इलेक्ट्रिक शक्तीची वाढ आणि तेलाच्या साहाय्याने यंत्रें चालविण्याची इतर देशांतील पद्धत यामुळे ब्रिटनच्या वैभवशाली व्यापाराला शह बसत आहे.

साम्राज्यांतर्गत इतर विभागांच्या मानाने ग्रेट ब्रिटनच्या औद्योगिक व आर्थिक भरभराटीस जरी ओहोटी लागलेली दिसत असली तरी प्रत्येक विभागाने आपापले हितसंबंध परस्परपोषक ठेवले तर साम्राज्याच्या राजकीय सत्तेला आणि प्रतिष्ठेला कमीपणा येणार नाही. गहू मांसादि खाद्य पदार्थ, लोकर, रबर, सोनें, निकेल, झिंक, टिन आणि तेल इत्यादि उद्योगधंद्यास जरूर असलेले पदार्थ यांच्या बाबतींत ब्रिटिश साम्राज्य अमेरिकेच्या तोडीचें आहे. आजच्या ब्रिटिश भांडवलशाहीचें आणि तिच्या ताटाखालील राजकारणी पुरुषांचें ध्येय ब्रिटिश साम्राज्याला आर्थिक दृष्टया जगाशीं फटकून वागतां यावें, तें सर्व बाबतींत स्वयंपूर्ण व्हावें हें आहे. एवढयाचकरितां साम्राज्येतर व्यापाराविरुद्ध जकातीचीं भिंताडें उभारण्यांत येऊन साम्राज्यांत उद्योगधंद्यांची प्रचंड प्राणप्रतिष्ठा करण्यांत येत असते. परंतु दुर्भाग्याने साम्राज्यांत एकजिनसीपणा नाही. ब्रिटिश बेटांप्रमाणे 'डोमीनियन्स' हीं पण भांडवलशाही राष्ट्रें बनलीं असून त्यांचे हितसंबंध ब्रिटिश भांडवलशाहीला पोषक नाहीत. अगदी उंबरठ्याशीं असलेल्या आयर्लंडला चुचकारतां चुचकारतां ब्रिटनच्या नाकीं नऊ आले आहेत. क्यानडाला आता ब्रिटनला कच्चा माल पुरविण्याची आवड राहिली नाही. त्याला

आपली उद्योगधंद्यांत आणि कारखान्यांत स्वतंत्र प्रगति करण्याची तीव्र लालसा उत्पन्न झाली आहे. याचा अर्थ तो ब्रिटनशीं व्यापार व्यवहार करणार नाही वा त्याला मदत करणार नाही असा नाही. ऑस्ट्रेलियाही क्यानडाच्या पावलावर पाऊल टाकीत आहे. दक्षिण आफ्रिकन संघाने आफ्रिका खंडांत गौरकाय लोकांच्या असलेल्या सत्तांपैकी आमचीच सत्ता बलिष्ठ आहे असें प्रतिपादण्याचें धोरण अंगीकारिलें आहे. पुढे मागे या धोरणाने तेथील ब्रिटिश मुलखांना कोलांटी मिळण्याचा संभव दिसतो. जोंपर्यंत असे परस्परविरोधक हितसंबंध ब्रिटिश साम्राज्यांत आहेत तोंपर्यंत साम्राज्याला एक-जिनसीपणा आणणें कठीण आहे.

'डोमीनियन्स' शिवाय इतर विभागांत, उदाहरणार्थ हिंदु-स्थानांत, दडपशाहीच्या बळावर एकीचें सोंग आणतां येतें. परंतु येथेही, विशेषत: हिंदुस्थानांत, स्वतंत्र औद्योगिक क्षेत्र बनलें असून भांडवलशाही पण निर्माण झाली आहे आणि शेतकरी दारिद्र्य-गर्तेंत अधिकाधिक जात आहेत. कराच्या ओझ्याने जनता वाकून गेली आहे. अशा परिस्थितींत हिंदुस्थानांत स्वातंत्र्याचें आंदोलन जोराने सुरू झालें आहे व दिवसेंदिवस तें जोराने वाढत आहे. आफ्रिका खंडांतील मूळ रहिवासी आत्मोन्नति करण्याची धडपड करीत आहेत. दक्षिण आफ्रिकन सरकारच्या तद्देशीयांसंबंधींच्या धोरणाविरुद्ध तिटकारा उत्पन्न झाला असून त्याला अर्धचंद्र कसा द्यावा या चिंतेंत तेथील तद्देशीय पडले आहेत. साहजिकच ही विचाराची ऊर्मि सबंध आफ्रिका खंडांत पसरणार आहे. ब्रिटिश साम्राज्याची आर्थिक जूट संपादण्याकरितां शासित वर्गावर जुलमी राज्य चालविणें व त्याचबरोबर ब्रिटिश मजुरांची राहणी कमी खर्चाची करणें याशिवाय दुसरा मार्ग नाही, असें कांही लोकांस वाटत आहे; तेंही सर्वथैव अहितपरिणामी आहे.

ब्रिटिश साम्राज्यांत भौगोलिक एकजिनसीपणा नाही, आर्थिक एकजिनसीपणा नाही आणि राजकीय एकी पण नाही. अशा परिस्थितींत ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना साम्राज्यांत एकीचा वृक्ष निर्माण करणें भाग आहे. हें कार्य जवळ जवळ अशक्य कोटींतील दिसत आहे. साम्राज्यांतील सर्व घटकांचा दर्जा वाढवून त्यांना समानतेचें स्वरूप आणल्यास व मग त्यांना सहकारी भावनेने व व्यवहाराने बांधून घेतल्यास वरील अडचणी नाहीशा होऊन भानगडीचे व कटकटीचे प्रश्न कमी होतील हें खरें; पण तसें केल्यास, करावें लागल्यास अथवा घडल्यास ब्रिटिश साम्राज्याचा साम्राज्यपणा शिल्लक राहिला असें होईल का ? कारण साम्राज्याची पाश्चिमात्य कल्पना निवळ सांस्कृतिक सत्ताधारित्वावर अधिष्ठित झालेली नाही. आर्थिक शोषणाचा हेतु तिच्या बुडाशीं असल्याचें दिसतें. फ्रान्स, जर्मनी व रशिया यांतील मजुरांच्या चळवळींत ब्रिटिश मजूर सामील होऊन युरोपांत मजूर संघ स्थापन करणार की काय, हाही एक प्रश्नच आहे.

प्रकरण नववें

आधुनिक जगांतील महाजन : (३) जपान

जपान—पूर्वेचें सवाई ब्रिटन

हा महाजन मागील दोन महाजनांपेक्षा अनेक बाबतींत निराळा आहे.

जपान हें एकच पौर्वात्य राष्ट्र आधुनिक पाश्चिमात्य अर्थाने ‘ सुधारलेलें ’ असून तें, पाश्चिमात्य लोक सुधारणेंत—भौतिक

संस्कृतीच्या सुधारणेंत—पुढे गेल्यानंतर 'सुधारलेलें' असल्याची ग्वाही देण्यांत येत आहे. या बाबतींत त्याचे गुरु युरोपियन राष्ट्रेंच असून तें अल्पावधींत गुरूहूनही वरचढ होऊं पाहत आहे. म्हणून या महाजनाविषयी जगाला जसें कुतूहल वाटतें, तसा सुधारलेल्या प्रौढ राष्ट्रांना या तरुण राष्ट्राचा द्वेषही वाटत आहे. पण तें एक पौर्वात्य राष्ट्र असून त्याच्या संस्कृतीचीं मुळें बौद्ध संस्कृतीपासून उत्पन्न झालेलीं असून तीं तीवरच थोडयाफार फरकाने वाढलेलीं आहेत. गेल्या पन्नास साठ वर्षांतच जपान हें राष्ट्र पुढे येऊन पश्चिमेकडील महाजनांच्या पंक्तीला बसलें. गेल्या सव्वीसशें वर्षांत आपल्याला कोणीही जिंकलेलें नाही ह्या त्याच्या म्हणण्यांत ऐतिहासिक सत्य आहे व या सत्याचा अभिनिवेश त्याच्या अंगांत संचारलेला आहे. ही झाली त्याची भूमिका. आता त्याची परिस्थिति पाहूं.

हें पॅसिफिक ऊर्फ प्रशांत महासागरांत ब्रिटनप्रमाणे एक द्वीपीय राष्ट्र असून याच्या पूर्वेस अति समृद्ध व सुधारलेलें असें अमेरिका (संयुक्त संस्थानें) हें राष्ट्र आहे; तर याच्या अगदी शेजारीं त्याच्याच वर्णाचें, संस्कृतीचें व निसर्गसमृद्ध—ज्याला आशियांतील अमेरिका असें निसर्गसमृद्धतेच्या बाबतींत म्हणतां येईल व पुढे मागे जें राजकीय अर्थाने खरोखरच आशियांतील अमेरिका होण्याचा संभव आहे—असें चीन हें एक राष्ट्र आहे. चीनच्या सरहद्दीला भिडून रशिया हें युरोपांतील ख्रिस्ती राष्ट्र आहे. ह्या रशियन अस्वलाचा विचार आम्ही पुढील प्रकरणांत करणार आहों. ज्याला आग्नेय आशिया असें म्हणतात तो विभाग चीन व जपान ह्या दोन्ही राष्ट्रांच्या शेजारींच, पण स्थूलमानाने दक्षिणेस आहे. या आग्नेय आशियांत इंडो चायना, मलाया, ईस्ट इंडीज व फिलिपाइन्स वगैरे द्वीपमय भाग असून त्यांत आधुनिक भौतिक संस्कृतीचे कांही जीवितरज्जु अडकलेले आहेत.

अर्थात् यामुळे या आग्नेय आशियांत, म्हणजे जपानच्या शेजारींच इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, हालंड व पोर्तुगाल ह्या राष्ट्रांचे जिव्हाळ्याचे हितसंबंध, जपान हें राष्ट्र आधुनिक अर्थाने राष्ट्र म्हणून पुढे येण्याच्या पूर्वीपासून, बद्धमूल झालेले आहेत.

या परिस्थितीच्या कोंडींतून यशस्वी रीतीने–आधुनिक राजकारणाच्या दृष्टीने यशस्वी रीतीने–बाहेर पडून किल्ला सर करण्याचा जपानचा प्रयत्न सुरू आहे. ह्या प्रयत्नाला पहिल्या युरोपियन महायुद्धानंतर खरें खरें तोंड लागलें. पण आता इतक्या थोडयाच अवधींत तें तोंड लहानसें द्वार राहिलें नसून त्याचें आता भगदाड झालें आहे! ह्यामुळे हें राष्ट्र–हा महाजन–जगाच्या राजकीय क्षितिजावर ठसठशीतपणें दिसूं लागला, हें कांही अंशीं खरें आहे; पण त्याचीं मूळ कारणें निराळीं आहेत. एक तर ज्या युरोपीय राष्ट्रांचे हितसंबंध ह्याच्या आसपास वेढा देऊन बसले आहेत, त्यांचे ते बंद तटातट तुटण्याच्या मार्गाला लागले आहेत; दुसरें, या कृत्याचा खरा प्रारंभ त्याने आपल्या शेजारच्या समसंस्कृतीच्या जातभाईच्या पोटांत सुरी खुपसून केला व त्या जातभाईने हें त्याचें कृत्य जगाच्या राजकीय चव्हाटयावर टांगलें! हीं दोन मुख्य तात्कालिक कारणें या वामन मूर्तीची थोर कीर्ति ध्यानांत येण्यास कारणीभूत झालीं. यास्तव त्याचा त्याच्या शेजाऱ्यांसह विचार करणें जरूर आहे. वरील सर्व विचाराचा सारांश काढला तर असें म्हणतां येईल की पूर्व आशियाच्या राजकारणाच्या विचारांत जुन्या चिनी साम्राज्याचा म्हणजे कोरिया व दाइरेन (पोर्ट आर्थर भाग), मँचुक्युओ, हाँगकाँग, तैवान (फोर्मोसा), मकौ (पोर्तुगीज), क्वांगचौवान् (फ्रेंच), व इंडोचीन, मलाया, ईस्ट इंडीज बेटें, फिलिपाइन्स, टिमॉर (पोर्तुगीज) व साघलिन द्वीप ह्यांच्या राजकारणाचा विचार करावा लागतो, म्हणून त्याकडे वळूं.

चीन व त्याची संस्कृति

सोळाव्या शतकाच्या आरंभापासून युरोपीय लोकांनी, विशेषत: वायव्य युरोपांतील लोकांनी, आपल्या श्रेष्ठ साधनबलानें सबंध जग व्यापलें आहे. कोठे त्यांच्या वसाहती आहेत, कोठे त्यांचें राज्य आहे तर कोठे त्यांच्या पंखाखालील देशभाग आहेत. निर्भेळ स्वातंत्र्याचा भूभाग विरळाच. जगाच्या राजकीय दृष्टीने महत्त्वाचा असा फक्त एकच टापू आशियांत आहे की जो आज स्वातंत्र्य भोगीत आहे. तो भाग म्हणजे चीन आणि जपानचीं बेटें. येथेही फक्त जपानी बेटेंच काय तीं स्वतंत्र आहेत. चीन हा नांवापुरता स्वतंत्र असून त्याच्या हातापायांत अनेक प्रकारच्या शृंखला पडलेल्या आहेत. सयाम हा हेतुपुरस्सर स्वतंत्र ठेविलेला देश आहे.

नील नदी व युफ्रेटिस आणि टायग्रीस नद्या यांच्या काठीं संस्कृति निर्माण झाल्यानंतर, व रोम नगराने भूमध्य समुद्रावर आपलें प्रभुत्व प्रस्थापित केलें त्यापूर्वी सुमारें दोनहजार वर्षें, चीनमधील नद्यांच्या काठीं बागायती व कृषिप्रधान संस्कृति निर्माण झाली होती, हें इतिहासज्ञांस अवगत आहे.* नद्यांचे कालवे काढून त्यावर शेती आणि बागाईत चिनी लोक करीत असत. नद्यांचा प्रवाह नेहमी साफ केला जाई व पुराचें पाणी शेतांत घेण्यांत येत असे. दरवर्षीच्या येणाऱ्या गाळाचाही यथायोग्य उपयोग करण्यांत येत असे. जसजशी लोकसंख्या वाढूं लागली तसतसें शेतीचें प्रमाणही वाढत गेलें. नदीच्या काठीं होणारी शेती दूरवर पसरत पसरत टेकड्यांच्या पायथ्यापर्यंत व नंतर थेट टेकाडावरही होऊं लागली.

पश्चिमेकडील व उत्तरेकडील पर्वतश्रेणींचें व पूर्वेकडील अफाट समुद्राचें नैसर्गिक संरक्षक वलय चीनला लाभलेलें आहे. तशांत

* चिनी संस्कृति, मिसरी उर्फ इजिप्शियन संस्कृतीच्या पूर्वीची कां नंतरची, हा ऊहापोह येथे अप्रस्तुत असल्याने तसाच सोडला आहे.

चीनची जमीन सुपीक असल्यामुळे या विवक्षित देशांत विवक्षित परिस्थित्यनुरूप एक संस्कृति आस्ते आस्ते निर्माण झाली. अशा प्रकारच्या संस्कृतीची वाढ होत असतांना जगांतील इतर कोणत्याही संस्कृतीच्या प्रदेशांचा संबंध चीनशीं आला नाही. याचा परिणाम ईजिप्तच्या संस्कृतीप्रमाणें याही संस्कृतीवर झाला. विवक्षित मर्यादेनंतर संस्कृतीची वाढ खुंटली. कारण नवीन अडचणी, निरनिराळीं संकटें व त्यांना तोंड देण्याचें धारिष्ट, अनेकविध आपत्तींना कोलांटी देण्याची कला, काटकपणा, चापल्य इत्यादि गुणांना चालना न मिळाल्यामुळे साहजिकच प्रगति विराम पावते. चिनी लोकांनी अल्प काळांत तेथील परिस्थितीवर ताबा मिळवून आपल्या संस्कृतीची वाढ केली, परंतु पुढे कोणत्याही प्रकारच्या महत्त्वाच्या आपत्ति, देशाला नैसर्गिक संरक्षण जबर असल्यामुळे, आल्या नाहीत व इतर देशांशीं दळणवळणही नसल्यामुळे भौतिक संस्कृति पुढे वाढीस लागली नाही; यामुळे तिला व तेथील लोकांना मृतप्राय शैथिल्य आलें! जरी मधून मधून रानटी टोळ्यांनी उत्तरेकडून वा मध्य आशियांतून चीन देशावर हल्ले केले व कित्येक प्रसंगीं राज्यशासन केलें, तरी या बाहेरून येणाऱ्यांची संख्या चिनी लोकांच्या मानाने अत्यल्पच राहिली व त्यामुळे येथील लोकांच्या राहणींत व विचारसरणींत यत्किंचितही फेरबदल झाला नाही. या देशाची दुसरी एक भौगोलिक परिस्थिति ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. येथील नद्या एकदम अफाट समुद्रांतच शिरतात. नील किंवा युफ्रेटिस-टायग्रीस ह्या नद्यांप्रमाणें आखातांत मिसळत नाहीत. त्यामुळे प्राचीन काळीं त्या त्या नदीकांठचे लोक नाविक व दर्यावर्दी बनले तसे चिनी लोक बेडर* नावाडी

* चिनी लोक चिनी समुद्रांत तसेंच ईस्ट इंडियन बेटांत चांचेगिरी करीत असत, पण तेच त्या काळांत समुद्र ओलांडून पलीकडील देशांत घुसल्याचा सबळ पुरावा नाही.

बनूं शकले नाहीत! त्या काळांत अफाट महासागरांत प्रवेश करणें म्हणजे निबिड अंधकारांत जाणून बुजून उडी घेणें असें समजलें जाई. म्हणूनच चिनी लोक संस्कृतीचा पुढील टप्पा जो नदीवरून समुद्रावर येणें, त्यावर आले नाहीत; उलट भूमध्य समुद्रांत नावाड्याचें शिक्षण पूर्ण केलेल्या व नौकानयनशास्त्रांत निष्णात झालेल्या पश्चिमेकडील लोकांचींच जहाजें त्या वेळीं त्यांच्यापेक्षा अधिक सुसंस्कृत अशा चीन देशाच्या किनारीं आलीं! पुढारलेले चिनी लोक समुद्रपर्यटनाच्या बाबतींत, वरील भौगोलिक परिस्थितीमुळे, मागासलेले राहिले होते.

सोळाव्या, सतराव्या आणि अठराव्या शतकांत चीनच्या इच्छेप्रमाणें मर्यादित व्यापार करण्याकरितां पोर्तुगीज, डच, ब्रिटिश व फ्रेंच या व्यापाऱ्यांनी आपापसांत चुरस चालविली होती. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत चीनचा किनारा परदेशी, विशेषत: युरोपीय, व्यापाऱ्यांना खुला होण्याला प्रारंभ झाला. या कालांत ब्रिटनच्या स्वाधीन जगाचा बराच व्यापार होता. सन १८४० मध्ये चीनमधील अफूच्या युद्धानंतर (Opium War) ब्रिटनने आपलें बस्तान हाँगकाँग बेटांत बसविलें व तेथून हिंदुस्थानांत तयार झालेल्या अफूचा व्यापार चीनशीं सुरू केला; आणि हळू हळू या व्यापाराची मालकीही मिळविली. अल्पावधींत इतर प्रकारचा व्यापारही चीन देशाशीं सुरू केला. ह्यानंतर इतर युरोपियन राष्ट्रांना व्यापार करण्याकरितां चिनी बंदरें खुलीं करण्यांत आलीं! इ. स. १८५४ सालीं जपानने आपल्या एकलकोंडेपणाचा बुरखा पार झुगारून परदेशाशीं व्यापार करण्याचा पायंडा घातला! तराजू, तरवार व तख्त या युरोपियन राजकीय संस्कृतीच्या प्रस्थानत्रयीपैकी पहिल्या प्रस्थानाचा प्रारंभ युरोपीय राष्ट्रांनी सर्व आशियांत कोठे जबरदस्तीने, कोठे मिनतवारीने, तर कोठे धूर्त कारवाईने केला होता.

निसर्गसंपन्न चीन

आरंभींच्या कालांत युरोपांतील धंदेवाईक राष्ट्रें समृद्ध चीनशीं अमूप फलदायी व्यापार संपादन करण्याकरितां धडपडत होतीं. त्यांची आपापसांतील चुरस भयंकर होती; कारण त्या वेळीं ते सर्वच असंतुष्ट असल्यामुळे त्यांच्या मनांत युरोपियन विरुद्ध एशिॲटिक हें वारें तेव्हा संचरलें नव्हतें. या पूर्व आशियाच्या व्यवहारकारणांत कालांतराने त्यांना अलोट लाभ झाला व त्यामुळे पुढे भांडवलशाही युरोप साम्राज्यवादी बनला. अशा वेळीं चीनने देशांत रेल्वे बांधून देण्याकरितां, निरनिराळे कालवे बांधण्यासाठी व इतर स्थापत्यशास्त्रीय कामें करून घेण्याकरितां, तसेंच आपल्या देशांतील खाणींचें उत्खनन करण्याकरितां युरोपियन लोकांना भरमसाट सवलती देण्याचा सपाटा लाविला. या प्रलोभनांनी साम्राज्यवादी युरोप मोहून गेला. अजाण चिनी लोकांना शेती व बागायती करणेंच माहीत होतें ! आपल्या देशांत अलोट खनिज संपत्ति आहे व ती खरी खरी राष्ट्रीय संपत्ति आहे याची त्यांना गंधवार्ताही नव्हती ! चीन हा देश खनिज संपत्तीने फार समृद्ध असा आहे. **कोळसा, लोखंड व रबर या आधुनिक यंत्रयुगाच्या आधारत्रयीपैकी कोळशाच्या साठ्यांत चीनचा जगांत तिसरा नंबर** असून त्यापैकी बराच कोळसा उत्तर भागांत पेचिलीच्या आखातासभोवार म्हणजे समुद्रालगत असल्याने व्यापाराला सोईचा आहे. इ. स. १९३५ ते १९३७ ह्या वर्षांत जपानने हा उत्तर भाग झट्कन् आपल्या ताब्यांत घेतला त्याचें मुख्य कारण वरील खनिज संपत्तीची समृद्धि व व्यापारी सुलभता हें होय. ह्याच टापूंतील सिंगटौ व क्याचौ हीं दोन क्षेत्रें व शांटुंग टापू इ. स. १९१४ पूर्वी जर्मनीने आपल्या पंजाखाली घालून ठेविला होता तो ह्याच कारणामुळे.

कोळशाप्रमाणे लोखंडही या देशांत भरपूर असून तें कोळशापासून दूर नाही. सुरमा व टंगस्टीन यांचा साठा भरपूर आहे. टिन, शिसें व तेल यांचाही पुरवठा कमी नाही. कापूस पैदा करण्यांत तर चीनचा नंबर जगांत तिसरा लागतो. याशिवाय रेशीम, सॉयबीन, गळिताचीं धान्यें, चहा इत्यादि अनेक प्रकारचा किती तरी कच्चा माल या देशांत उत्पन्न होतो. येथील मजूर अल्पसंतुष्ट व त्यांची राहणी अतिशय कमी खर्चाची आहे; इतकें असून जगांतील सुमारें एक चतुर्थांश लोकवस्ती* या देशांत नांदत आहे! जगांतील इतर साम्राज्यवादी राष्ट्रांबरोबर जपानच्याही तोंडाला चीनबद्दल पाणी सुटलें असेल तर तें सर्व ह्या परिस्थितीमुळे होय.

पण साम्राज्यवादी राष्ट्रांची चीन घशांत टाकण्याकरितां एकी होणें शक्य नव्हतें. प्रत्येक राष्ट्र चीन उपटण्याइतकें सामर्थ्यवान् पण नव्हतें! म्हणून प्रत्येकाने आपापल्या परी दाबीत व रेटीत रेटीत आसपासच्या प्रांतांत आपापली सत्ता एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व्यवस्थित रीतीने अधिष्ठित केली. दक्षिणेस फ्रेंचांनी एकेक तुकडा करून सबंध इंडोचायना घशांत टाकला. ब्रिटनने उत्तर ब्रह्मदेश गिळंकृत केला व विसाव्या शतकाच्या आरंभीं तिबेट आपल्या पंखाखाली आणला (इ. स. १९१४). रशियाने उत्तरेकडून चीनला दम देण्याचा सपाटा लावून समुद्री मार्ग मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याच्याच कारस्थानामुळे बाहेरील मंगोलिया सवता सुभा स्थापून बसला (इ. स. १९१२). थोडया अंतरावर असलेलीं फिलिपाईन बेटें संयुक्त संस्थानांनी स्पेन करवीं आपल्या मांडीखाली घातलीं. चीनची ही कुतरओढ चालली

---

* खास चीनमध्ये ४० कोटी व साम्राज्यासह ४८ कोटी लोकवस्ती आहे.

असतां त्याचा जागा झालेला शेजारी जपान हा मात्र स्वस्थ बसला नव्हता. त्यालाही चेतना येऊन दुसरे परके लुबाडतात मग आपणही लुबाडलें तर त्यांत काय वावगें, ह्या अथवा अशाच भावनेने त्यानेही जखमी झालेल्या चीनवर वार करण्यास कमी केलें नाही ! त्याचें फळ म्हणजे इ. स. १९३१–३४ ह्या काळांत मँचूरिया हा त्याचा लचका त्याने तोडून घेतला हें होय. इ. स. १९३७ सालीं उत्तर चीन व आंतील मंगोलियाचा कांही भागही जपानने आपल्या पंजाखाली आणिला. हाही त्याच विचारसरणीचा भाग असें म्हटल्यास तें कांही अंशीं खरें आहे. चिनी साम्राज्याचा आता राहता राहिलेला फार महत्वाचा भाग म्हटला म्हणजे काश्मीरच्या डोक्यावरील सिंक्यांग हा भाग होय. सभोंवारच्या, विशेषतः रशियाच्या परिस्थितीमुळे ह्या भागालाहि वाईट डोहाळे सुचत आहेत ! चीन देशांतील इ.स. १९११-१२च्या राज्यक्रांतीमुळे व तेथे एकसूत्री राज्यकारभार नसल्याने, तसेंच घरबुडव्या आततायी (Concession Hunters) लोकांच्या कारस्थानांमुळे परकी मुत्सद्द्यांना चांगलाच हात मारतां आला. प्रत्येक परकी राष्ट्र आपल्या इच्छित मतलबावर दृष्टि ठेवून कधी या प्रांताधिकाऱ्यास तर कधी त्या मोकासदारास (War-Lord) हात देऊन, प्रसंगीं त्यास जरब देऊन वा आमिष दाखवून चीनचे लचके तोडीत असे. चीन एकवटला तर त्याचे असे चावे घेतां येणार नाहींत, हें तीं राष्ट्रें पक्कें जाणून आहेत; तीं हरप्रयत्नाने चीनची एकी होऊं देत नाहीत ! काळ आला म्हणून म्हणा किंवा जागृति झाली म्हणून म्हणा, जपानने नुकताच केलेला वार हा खऱ्या खऱ्या राष्ट्रीय जागृतीला कारणीभूत झाला असें म्हटलें तर विशेष वावगें होणार नाही.* यापुढे

* 'China shall rise again'–*Madam Chiang Kai Shek 1940.*

मात्र चीन स्वतःच्या पायावर उभें राहील असें वाटत आहे. अजूनही जपानविरुद्ध रशिया, ब्रिटन व अमेरिका हीं राष्ट्रें चीनला जें साहाय्य करीत आहेत, त्या उपकाराची फेड करण्याला किंवा त्या मदतीच्या अंतर्गत ते जें जाळें विणीत असतील त्यांतून सुटण्याला चीनला बरींच वर्षें लागतील हें खास.* शिवाय चीनमध्ये असलेले साम्यवादी वा कम्युनिस्ट चिनी हे जरी चीनसाठी जपानविरुद्ध लढत आहेत तरी त्यांच्या प्रेरणेचें उगमस्थान 'मास्को' हें आहे हें विसरतां कामा नये. चीनच्या स्वतंत्रतेच्या मार्गांत तो एक मोठा अडथळा आहे हें खास.

जपानची जागृति

सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वीं जपानने आधुनिक पद्धतीप्रमाणें उन्नति करण्याकरितां हालचाल करण्यास सुरवात केली व एवढया अल्पावधींत जपान पूर्णपणें औद्योगिक व साम्राज्यवादी राष्ट्र बनलें आहे! आपलेपणा न सोडतां यथावकाश व यथाकाल आधुनिक सुधारणेचा स्वीकार व पाश्चिमात्त्य पद्धतींचें अनुकरण जपानने सर्व बाबतींत केलें व आज गौरकाय साम्राज्यवादी राष्ट्रांना त्यांच्या व्यवहारकारणांत व राजकारणांत जबरदस्त शह दिला आहे.

इ. स. १८५८ सालीं कॅप्टन पेरीच्या तोफांनी पाश्चिमात्त्य राजकारणाची व व्यवहारकारणाची चुणूक दाखविल्यामुळे जपान एकदम खडबडून जागें झालें. तींच पाश्चिमात्त्य राष्ट्रें आपल्या शेजारच्या चीनचे कसे लचके तोडीत होतीं, ही गोष्ट जपान पाहूं लागलें. त्या राष्ट्रांनी आसपासच्या भागांत म्हणजे आग्नेय आशियांत आपले हातपाय कसे पसरले ह्याचा जपानने विचार

---

* China of Chiang Kai Shek—*P. M. A. Linebarger*—World Peace Foundation—Boston, 1940

केला आणि तो आपल्या घराची पुनर्घटना व पुनर्रचना झपाट्याने करूं लागला. बाजूला आग लागली असतां अथवा दरवडा पडला असतां न घाबरतां जपान आपलें घर राखण्याच्या उद्योगाला लागला, ही गोष्ट त्याच्या आंगच्या जिवटपणाची द्योतक आहे असें म्हणणेंच सत्य आहे. दुसरी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही की त्या तेवढ्या काळांत पाश्चिमात्त्य राष्ट्रांनी जपानभोवती त्यांच्या राजकारणाच्या जाळ्याचे कांही धागे विणून त्याला गुरफटावयाचा प्रयत्न केलाही, व ते धागे तोडतां तोडतां जपानला सुमारें पंचवीस तीस वर्षें लागून एक पिढी तरी गारद करावी लागली ! त्या साम्राज्यवादी राष्ट्रांच्या तराजूचे अनेकविध बंध त्याला तोडावे लागले व स्वतःला सावरीत असतां त्यांचे चिमटेही सहन करावे लागले नाहीत असें नाही. ह्या सर्व खटाटोपांत इ. स. १९०५ साल उजेडलें. या सुमारास त्याने जें कार्य केलें तें आपण पुढे पाहणारच आहों. पण आजच्या घटकेला जपान राजकारणांत इतका तयार झाला आहे की,—राजकारणांतील हा तरबेजपणा उतावळा व पढिक वाटतो. मुरलेल्या व कसलेल्या राजकारणपटूसारखा गंभीर वाटत नाही असें म्हटल्यास तें बरोबर नाही असें म्हणतां येणार नाही—त्यांच्यासारखे धंदे कारखाने उभारून त्यांच्यापेक्षा सवाई धोरणाचा व्यापार करून त्यांच्या तोडीचे शोध लावून व यंत्रसामग्री बनवून, तसेंच त्यांना काटशह देणारीं 'जपानी मन्रोमत,' 'न्यू ऑर्डर इन् धी ईस्ट,' 'पूर्वेची नवीन घटना,' 'ग्रेटर ईस्ट एशिया को-प्रॉस्पेरिटी स्फिअर,' ह्यांसारखीं राजकारणी प्रमेयें उत्पन्न करून, मी तुमच्याच सारखा महाजन आहें अशी जाणीव त्यांना उत्पन्न करून देत आहे. ह्यामुळे आशियाच्या व परिणामीं जगाच्या भावी घडणींत बराच फेरफार होण्याचा रंग दिसत आहे.

आधुनिक अर्थाच्या मुलुखगिरीचा जपानचा प्रारंभ इ. स. १८९४ मध्ये चिनी जपानी युद्धानें झाला, असें म्हणावयास हरकत नाही. त्या वेळीं जपान 'धंदेप्रधान' बनलें नव्हतें. वास्तविक पाहतां आजच्या घटकेलाही युरोपियन राष्ट्रांप्रमाणें जपान धंदेप्रधान नाही (कारण जपानांत आजही शेंकडा सुमारें ९० लोक शेतीवरच उपजीविका करितात). आज आशियांतील व्यवहारकारण व राज-कारण मुख्यतः खिस्ती–विशेषतः युरोपियन खिस्ती–राष्ट्रांच्या हातांत आहे. चिनी जपानी युद्धाच्या वेळींही चीनचें परराष्ट्रीय राजकारण इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी व अमेरिका ह्यांच्या कारस्थानांबरोबर हेलकावे खात असे. अशा स्थितींत जपानला चीनवरील मुलुखगिरी करतां आली! येथे या चिनी–जपानी युद्धाच्या कारणांचा ऊहापोह करणें जरी अप्रस्तुत असलें, तरी त्या मुलुखगिरीच्या भावनेला प्रोत्साहन मात्र वरील राष्ट्रांच्या कारस्थाना-मुळे मिळालें, हें विधान बव्हंशीं खरें आहे. आताप्रमाणें तेव्हाही जपान खाण्याला महाग नव्हतें. तें खाद्य पदार्थांसाठी परावलंबी नव्हतें. वास्तविक पाहतां त्या वेळीं त्याला हल्लीप्रमाणें 'Lebensraum' ची (राष्ट्राला जिवंत राहण्याइतक्या जागेची) जरुरी नव्हती. मग हें असें कां घडलें? पुढे दहा वर्षांनी रशियाबरोबर जपानला दोन हात करणें कां भाग पडलें? या व इतर अशाच प्रश्नांचें उत्तर निराळेंच आहे. त्या काळीं त्या त्या युद्धाचीं तात्कालिक कारणें निराळीं घडलीं, हल्लीही तीं निरनिराळीं आहेत; त्यांचें लंगडें समर्थन जपानी मुत्सद्दी व खिस्ती मुत्सद्दी आपापल्यापरी करीतच आहेत. त्याबद्दल आपण पुढे पाहूं. पण फार दूरचें कारण म्हटलें म्हणजे व्यापार व धंदेप्रधान युरोपियन लोकांचीं मतलबी कारस्थानें जपान त्या वेळेपासून ओळखूं लागलें होतें व त्यामुळे त्याला त्या परिस्थितीला तोंड देणें भाग होतें, हें होतें; किंबहुना

तें वेळोवेळीं तसें तोंड न देतें, तर जपान आज आहे ह्या स्थितींत दिसलें असतें की काय याची शंका वाटते. याचा अर्थ जपानने जें केलें व तें सध्या जें करीत आहे तें सर्व बरोबर व समर्थनीय आहे असा नव्हे. "वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा" हेंच खरें. सर्व युरोपियन राष्ट्रें त्या त्या वेळीं आपापला फायदा प्रथम पाहत होतीं व त्यांत गैर नव्हतें; त्याबरोबर जपानसारखें पौर्वात्य राष्ट्र पुढे येत होतें ही गोष्ट त्यांना सहन होत नव्हती.* इ. स. १८९४–९५ च्या चिनी जपानी युद्धाच्या वेळीं रशियाच्या चिथावणीवरून जर्मनी व फ्रान्स ह्यांनी विशेष महत्त्वाचें कारण नसतांना चीनकडून जपानने तहाने मिळविलेला भाग जपानला परत ओकावयास लावला! याच वेळीं मिळालेल्या खंडणीचा उपयोग जपानने सैन्य व आरमार यांच्या वाढीकडे केला. हा धडा जपानने त्यावरून घेतला. रूसो जपानी युद्धानंतर यशस्वी जपानवर खंडणीच्या बाबतींत ख्रिस्ती राष्ट्रांनी वजन टाकून त्याला आपलें म्हणणें ऐकावयास लावलें! ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही की, इंग्लंड व फ्रान्स यांनी या दोन्ही युद्धांच्या काळांत आपला बराच पैसा चीनमध्ये घालून आपलें बस्तान बसविण्याचें काम सुरू ठेविलें होतें. जर्मनीने चीनच्या खाणींत पैसा गुंतवून इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका त्यांच्याप्रमाणें अनेक सवलती व सवलतीचीं ठाणीं आपल्या उपयोगी करून ठेविलीं होतीं. त्या वेळेपासून 'शांटुंग' प्रांतांतील कोळशावर जर्मनीची नजर होती व म्हणून त्या प्रांतांत जरूर त्या सवलती त्याने घेऊन ठेवल्या होत्या. (जसें क्याचौ व सिंगटौ या ठाण्यांची मालकी.)

रशियाच्या भीतीमुळे इंग्लंड ह्या दोन्ही युद्धांच्या काळांत जपानविरुद्ध गेलें नाही. त्याच्याशीं पुढे (रशियाचें जाऊन जर्मनीचें

* Development of Japan : *K. S. Latourette*, 4th edition 1937, pp. 168–170.

प्रस्थ वाढूं लागलें तेव्हा, म्हणजे युरोपांतील पहिल्या महायुद्धापर्यंतच्या काळांत) इंग्लंडने सख्यही केलें. याचा फायदा घेऊन जपानने मलाया, सयाम, ईस्ट इंडीज, यांमध्ये बरेच हातपाय पसरले. अर्थात् मनांतून जपानचेंही वाढतें महत्त्व इंग्लंडला सहन होत नव्हतें. याचें प्रत्यंतर म्हणजे युरोपांतील पहिल्या महायुद्धानंतर–म्हणजे तुर्कस्थान, रशिया व जर्मनी ह्यांना ग्रहण लागल्यानंतर–जपान-बरोबरचा मैत्रीचा तह पुनरुज्जीवित करण्याचें अमेरिकेच्या संगन-मताने इंग्लंडने टाळलें, हें होय.

युरोपांतील पहिल्या महायुद्धानंतर ज्या जपानने जर्मनीचीं पूर्व आशियांतील ठाणीं व बेटें आपल्या पंखाखाली घेतलीं, त्याच जपानबरोबर आज जर्मनीची गट्टी जमलेली आहे! जर्मनी इतर वसाहती परत मागत असतां जपानच्या ताब्यांत असलेल्या त्याच्या वसाहतींच्या ठाण्यांबद्दल तो मूग गिळून बसत आहे, हें पण ध्यानांत ठेवण्यासारखें नाही काय? पण आश्चर्याची गोष्ट ही की इ. स. १९३७-३८ सालीं जपान जर्मनीचा गट्टीचा तह (Axis Pact) झालेला होता, तेव्हाही जर्मन लष्करी तज्ज्ञ चिनी सैन्याचीं सूत्रें जपानविरुद्ध हालवीत होते! सारांश, अशा या विचित्र राजनीतिशास्त्रामुळे फिलिपाईन्स व ईस्ट इंडीज बेटांत व्यापाराच्या व खाणींच्या मिषाने अमेरिका किंवा इंग्लंड ह्यांना पुढे मागे बाधणारें बस्तान जर जपान बसवीत असला, अथवा सयामच्या मिषाने व सयामला बनवून, परभारें फ्रेंच इंडोचायनांत बस्तान बसवून तद्वारें सिंगापूरला पाचर मारून* भारतालाही शह देण्याचे डाव जपान योजीत असला, तर त्यांत वावगें तें काय? १९३२ सालच्या क्रांतीपर्यंत सयाम इंग्रजांच्या हातांतील खेळणें होता. तो आज

* *Yomiuri* : Far Eastern Survey, April 1941.

जपानच्या हातांत* खेळत आहे हें पण ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

वरील सर्व ऊहापोह करण्याचीं मुख्य कारणें पुढे दिलीं आहेत:—(१) एक तर राजकारण हें असेंच चालावयाचें; साम्राज्यवादी राष्ट्रें अथवा पुढे येणाऱ्या राष्ट्रांतरीय सहकारी तत्त्वाचा पुरस्कार करणारीं भविष्यकालीन राष्ट्रें हे असेच खेळ खेळत राहणार हें स्पष्ट व्हावें. (२) यावर तात्कालिक व कांही वर्षें उपयोगी पडणारा उपाय म्हटला म्हणजे दुबळ्या अथवा मागसलेल्या देशांनी वा समाजांनी शक्य तितक्या लवकर जागें होऊन एकवटून साम्राज्यवादी किंवा हुकूमशाही राष्ट्रांचा प्रतिकार करण्यास समर्थ बनलें पाहिजे, याची जाणीव व्हावी; आणि (३) तिसरें कारण असें की या सर्व राष्ट्रांच्या कारस्थानांचा बराच पार्श्वभाग आर्थिक स्वरूपाचा आहे हें ध्यानांत यावें. अर्थात जपानच्या कारस्थानाकडे, म्हणजेच पूर्व आशियांतील राजकारणाच्या एका बाजूकडे, आर्थिक दृष्टीनेही पाहणें जरूर आहे. म्हणून त्याचा थोडा विचार करूं.

नाकेबंदीचें धोरण

विस्कळीत चीनवर आक्रमण करून जपानने कोरिया आपल्या पंजाखाली घातला (इ. स. १९१०) व अशा रीतीने आशियामध्ये पाय ठेवण्यास सत्तेची भूमि जपानने मिळविली. ह्या घटनेचा विचार करतां असें आढळतें की, ज्याप्रमाणें भौगोलिक दृष्टया आयर्लंड व ईजिप्तवर ताबा ठेवण्याचें महत्त्व ग्रेट ब्रिटनला आहे, तद्वत् कोरिया आपल्या अंकित ठेवण्याचें महत्त्व जपानला आहे. **साम्राज्यपिपासु राष्ट्रांना हमरस्त्यावर असलेले प्रांत व बेटें, नाक्यावरचीं बेटें व भूभाग हीं सर्व भौगोलिक परिस्थितीमुळे**

---

* Power Politics in Thailand : *M. J. Gayn*, Current History, Feb. 1941. व The Fight for the Pacific—*M. J. Gayn*, Morrow, N. York 1941.

आपल्या अंकितच असावीं असें वाटतें! परकीयांच्या मालकीचा कोरिया साम्राज्यवर्धिष्णु जपानला सुखाने झोप घेऊं न देणारा होता. अगदी उंबरठ्याशीं ज्याप्रमाणें सशक्त व स्वतंत्र आयर्लंड ब्रिटनला नको आहे, त्याचप्रमाणें जपानला स्वतंत्र कोरिया ठेवणें इष्ट नाही. कोरिया ताब्यांत ठेविल्याने आशियाच्या किनाऱ्यावर व आंतील विभागावर जपानच्या प्रभुत्वाचें लोण जाऊं शकतें. याच्या पूर्वी पहिल्या चिनी जपानी युद्धांत पेस्कॅडोर्स व फोर्मोसाचीं बेटें चीनकडून जपानने उकळलीं (इ. स. १८९४-९५). हीं बेटें हस्तगत केल्याने जपानला चीनच्या किनाऱ्यावर देखरेख करतां येऊं लागली. आजही स्प्रॅटली, प्रॅटॉस व हैनान हीं बेटें घेऊन जपान तेंच काम करूं पाहत आहे. एवढेंच नव्हे तर फ्रेंच इंडोचायना व सयाम ह्यांतील मध्यस्थीची कारवाई ह्याच हेतूने जपानने केली आहे. व आता यापुढे जाऊन फ्रेंच इंडोचायनामधील यौद्धिक महत्त्वाचीं नाकीं, बंदरें, आरमारी, व विमानी तळ जपान घेत आहे. हा डाव ब्रिटन व अमेरिकेला दिलेला शह आहे. तसेंच फ्रेंच इंडो-चायना व ब्रह्मदेश ह्यांपैकी कांही भाग सयामला देण्याचें जें जपानने ठरविलें आहे, तें दोस्त राष्ट्रांना नडत आहे व त्यांतही राजकारण आहे. इ. स. १९०४-१९०५ सालीं, मँचूरिया व पूर्व मंगोलियांत आपलें वर्चस्व स्थापन करणाऱ्या प्रतिस्पर्ध्यास-रशियास-जपानने पराजित करून त्याचेकडून मँचूरियाचें समुद्रद्वार जें पोर्टआर्थर (दाइरेन) तें हस्तगत केलें आणि पर्यायाने कोरियावरचें आपलें स्वामित्व मोहोरबंद केलें!

चीनचा व्यापार व तेथील खनिजें हस्तगत करण्याच्या युरोपियन राष्ट्रें व जपान ह्यांमधील चढाओढींत जपानला युरोपियन राष्ट्रांपेक्षा भौगोलिक परिस्थितीचा आतोनात लाभ झाला. जपानी बेटें आशियाभिमुख आहेत. कोरिया व पोर्ट आर्थर जपानच्या

ताब्यांत असल्याने जपानला आशिया खंडांत तावडतोब हालचाल करतां येते. ब्रिटनला हाँगकाँगहून व अमेरिकेला फिलिपाईन्स बेटांतून आपले हातपाय तितक्या लवकर व सुलभ रीतीने आशियांत हालवितां येत नाहीत. या विभागांत जपानचें निसर्गनिर्मित अग्रेसरत्व आहे. जपानची खनिज संपत्ति जेमतेमच आहे. कोळसा तेथे अल्प प्रमाणांत सापडतो आणि लोखंडाचें प्रमाणही बेताचेंच आहे. चीनमधील कोळसा आणि लोखंड हस्तगत करण्याकरितां जपान जीवापाड धडपड करीत आहे ती याच कारणामुळे होय.

युरोपियन राष्ट्रांचें लक्ष पहिल्या महायुद्धांत दुसरीकडे गुंतलें असतां जपानने आपला चीनमधील बराचसा मतलब साध्य करून घेतला. पण इतकें खरें की जपानच्या 'एकवीस मागण्या' चीनने फेटाळून लावल्या म्हणून तें बचावलें व त्याचें सामर्थ्यही वाढलें. यांत जर यशाने जपानला हात दिला असता तर आज चीन जपानचें मांडलिक बनलें असतें! तरी जपानने कोळसा असलेला शांटुंग प्रांत आपल्या अधिकाराखाली आणलाच. तो प्रांत चीनचें व्यापारी व भावी धंद्याचें नाकच आहे. शिवाय अंतस्थ बंडाळी मोडण्याच्या साम्राज्यवाद्यांच्या नेहमीच्या कारणाचें निमित्त करून मँचूरियांत जपानने आपल्या बाहुल्याचें राज्य स्थापिलें आहे.* त्यांतही वाढत्या धंदेप्रधानत्वाला कोळसा, लोखंड इत्यादि कच्चा माल मिळावा, रशियाला शह बसावा, इतर युरोपियनांच्या कार-

---

* ह्या स्वतंत्र राज्याला ब्रिटन, अमेरिका वगैरे महाजनांनी मान्यता दिली नाही. वास्तविक पाहतां या जपानी कृतींत त्या महाजनांनी नाकें मुरडावीं असें कांही नाही. कारण असल्या दिखाऊ कृतीचा पायंडा खुद्द ब्रिटनने नामधारी स्वतंत्र अशा भारताला 'स्वतंत्र राष्ट्र' म्हणून राष्ट्संघांत दाखल करून घालून दिलेला होता. p. 67, An Atlas of Far Eastern Politics–*Hudson*–Faber, 1938.

स्थानांना पायबंद पडावा व वाढत्या जपानी तोंडांच्या उदरनिर्वाहाची सोय व्हावी, असले हेतु या राजकारणामागे आहेतच.

मँचूरियावरील जपानचा ताबा साम्राज्याच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचा आहे. शांटुंग, पोर्ट आर्थर व कोरिया यांवर आपलें प्रभुत्व टिकविण्याकरितां मँचूरिया प्रांत जपानच्या ताब्यांत असणें इष्ट आहे. ती एक जरुरीच्या साम्राज्यतृष्णेची परंपराच होय. जपानला मँचूरियाच्या खनिज संपत्तीची गरज आहे. आशियांत आपलें राजकारण अनिरुद्ध चालविण्याकरितां मँचूरिया हस्तगत करणें साम्राज्यपोषक आहे. याशिवाय त्यामुळे पॅसिफिक महासागरांत आपली सत्ताही वाढते. ह्या जपानच्या राजकारणी विचारसरणीने रशियाच्या पॅसिफिककडे वाढणाऱ्या सत्तेला व इतर आकांक्षांना थोपवून धरल्यामुळे युरोपियन राष्ट्रें जपानच्या हालचालीकडे कानाडोळा करीत होतीं. रशियाची वाढती सत्ता कोणालाच नको, तशी जपानची पण कोणाला हवी आहे? सर्व कच्च्या मालाचा अंतर्गत पुरवठा नसतांना जीं राष्ट्रें धंदेप्रधान बनतात वा बनूं लागतात त्यांची साम्राज्यपिपासा (देश जिंकणें वा वसाहती हव्या असें वाटणें, बाजारपेठा काबीज करणें, इत्यादि) कच्च्या मालाचा पुरवठा खुल्या व्यापाराच्या तत्त्वावर व्हावा, पक्क्या मालाला गिऱ्हाईक मिळावें, वाढत्या लोकसंख्येला पोट भरण्याची कांहीतरी सोय हवी, इत्यादि नानाविध सबबींवर पूर्ण करण्याचे प्रयत्न होतात. इंग्लंड-प्रमाणे जपानलाही वरील लक्षण लागू पडतें. जपानला पूर्वेचें 'इंग्लंड' असें म्हणतात, तें याचमुळे बऱ्याच अंशाने खरें आहे.

जपानची भौतिक गरिबी

खास जपान खाण्यासाठी इंग्लंडप्रमाणे परावलंबी नाही. रेशीम व गंधक ही त्याची द्रव्योत्पादनाची व व्यापारी महत्त्वाची

राष्ट्रीय संपत्ति आहे; तांबें व कोळसा (उत्तम नव्हे तसाच 'कोक' पण नाही) जेमतेम पुरेसा आहे. त्याला कापूस, लोकर, तेल, लोखंड, रबर, टिन, ॲल्युमिनम, पारा, मोलिब्डिनम, पोटॅश इत्यादि यौद्धिक व व्यापारी महत्त्वाच्या सर्व पदार्थांसाठी–धंदेप्रधान बनण्यासाठी लागणाऱ्या सर्व कच्च्या मालसाठी—परदेशांच्या तोंडाकडे पाहावें लागतें.* किंबहुना आधुनिक महा-राष्ट्रांत जपान-इतकें खनिज संपत्तींत दरिद्री असें इटालीशिवाय दुसरें कोणतेंच राष्ट्र नाही.†

जपानचा व्यापार व राजकारण

बहुतेक सर्व रेशमाचें गिऱ्हाईक जसें अमेरिका, तसें बाकीच्या सर्व कच्च्या मालाची दुकानदारही अमेरिका व ब्रिटिश साम्राज्य हे भाग आहेत. अर्थात् जपानचा बहुतेक व्यापार अमेरिका व ब्रिटिश साम्राज्याचे भाग म्हणजे मुख्यतः हिंदुस्थान (कापसासाठी), आस्ट्रेलिया (लोकरीसाठी), मलाया व ईस्ट इंडीज (रबर, टिन, तेल यासाठी) ह्या भागांशीं होतो व होणार. शिवाय फिलिपाइन्स (अमेरिकन) व जावा (डच) इत्यादि बेटांतून जपानचें भांडवल व लोक व्यापारधंद्यांत गुंतलेले आहेतच. तसेंच मासेमारी, मोती काढणें इत्यादि मिषांनी जपानी लोक दक्षिण पॅसिफिक महासागरांतील बेटांत नाना प्रकारचे उपद्व्याप करीत असतात, असा दोषारोप तीं तीं राष्ट्रें करीत आहेतच. कसेंही असलें तरी जपानचें घनिष्ट

---

* Mineral Industry in 1939 : *G. A. Roush-McGraw Hill*; व Mineral Commerce and International Relations : *E. Sumpoon*–Journal Franklin Institute, June 1936.

† Japan's Mineral Resources : *A. B. Edwards*–Austral-Asiatic Bulletin, June July 1941.

व्यवहारकारण वरील देशांशीं चालत असतें व त्याशिवाय जपानला गति नाही !

जपान कां झगडतें ?

मागे सांगितलें आहेच की, जपान इंग्लंडप्रमाणें धंदेप्रधान बनूं पाहत आहे व त्यामुळे त्याला वर सांगितलेल्या कटकटीच्या परिस्थितींत उडी घेणें भाग आहे. याचें मूळ कारण व तात्कालिक कारण ह्यांचा आणखी थोडा विचार करूं. सर्व धंदेप्रधान राष्ट्रें आपले हातपाय पसरण्यासाठी ज्या सबबी सांगतात त्या सर्वांत मुख्य व महत्त्वाची सबब म्हटली म्हणजे 'वाढती लोकसंख्या' ही आहे; तीच सबब जपानही सांगत आहे व ती त्याच्या मताप्रमाणें खरी आहे.* **वाढतीं तोंडें व अर्थशास्त्र ह्यांची तोंड-मिळवणी ज्या राष्ट्रप्रपंचांत होऊं शकत नाही त्या प्रापंचिकांना त्यासाठी दुसऱ्याच्या प्रपंचावर धाड घालावी लागते; त्यामुळे त्यांचें तें राष्ट्र-प्रपंचशास्त्र व त्याचा सांस्कृतिक पाया हीं दोषार्ह आहेत असें म्हणणें भाग येतें.** तथापि तो मुद्दा या ठिकाणीं अप्रस्तुत असल्याने त्याचा ऊहापोह न करतां तो मुद्दा व ती परिस्थिति खरी धरून तिच्यावर जी उपाययोजना केली जाते व जी जपान करीत आहे तिजकडे वळूं.

---

* चीनशीं केलेल्या युद्धापासून जपानच्या लोकसंख्यावाढीचा पाय फार मागे येत चालला आहे. (China weekly Review, Jan. 1941) व ही आपत्ति लक्षांत घेऊनच जपानी सरकारने एकीकडे ती ओरड तर सुरूच ठेविली; पण लोकसंख्येचा हा खाडा भरून निघेल व वाढ झपाट्याने होईल असे कायदे करून त्यासाठी 'Population Bureau' ही संस्था स्थापिली. Contemporary Opinions, Tokyo, Feb. 1941.

जपानची उपाययोजना व अनुभव

वाढत्या लोकसंख्येच्या पोषणावर उपाय म्हणून पुढील गोष्टी योजिल्या जातात. (१) जमिनीची उत्पादनशक्ति वाढवून पिकें जास्त काढणें, (२) धंदे, कारखाने वाढवून त्यांत वाढती लोकसंख्या गुंतविणें, (३) व्यापारवाढ, (४) परदेशगमन व बसाहती करणें. सदरहू उपाययोजना जपान करीत असतां त्याला काय अनुभव आला तें पाहूं.

(१) **शेती शास्त्रीय पद्धतीने करण्याचें काम जपानने कमालीला नेऊन पोचविलें.** तांदूळ हें मुख्य पीक जपानइतकें दर एकरीं जास्त जगांत कोठेच होत नाही.* इतर उत्पन्नाचे पदार्थ (जसें, फळफळावळ व मासे) काढण्यांतही जपान असाच जगांत पुढे आहे. या उपायामुळे वाढत्या संख्येला † 'बुडत्याला काडीचा आधार' इतकाच फायदा जपानला होतो.

(२) **धंदे कारखान्यांच्या बाबतींत वाढ** बरीच झाली. परंतु अजून बरीच व्हावयाची आहे. या उपायाच्या बाबतींत जपान कसा परावलंबी आहे हें वर पाहिलेंच आहे व त्या परावलंबनामुळे परराष्ट्रांशीं त्याला कसें झगडावें लागतें याचें दिग्दर्शन वर केलेंच आहे. हा उपाय योजीत असतांना जपानने परदेशगमन व वसाहतीकरण या उपायांवर प्रथमतः बराच जोर दिला त्यांकडे वळूं.

(३) **परदेशगमन व वसाहतीकरण.** कोटयवधि लोक सहज आपली उपजीविका शेतीसारख्या प्राथमिक स्वरूपाच्या

---

* तांदूळ–(दर एकरीं पौंड) जपान (३०७०), भारत (९८८), अमेरिका (१६८०), व गहू–जपान (१३५०), भारत (८११) व अमेरिका (९९०). Food Supply, *R. K. Mukerjee*, O. U. Press 1942.

† दरसाल सुमारें १० लक्ष लोकसंख्या वाढते (Working World).

उत्पादक धंद्यावर करूं शकतील एवढे अफाट भूप्रदेश अद्यापि जगांत पडीत आहेत; त्यांपैकी बहुतेक सर्व युरोपियन—बव्हंशीं धंदेप्रधान—सत्ताधाऱ्यांच्या ताब्यांत आहेत. त्या सर्व भागांतील परिस्थिति युरोपियन लोकांना अनुकूल आहे असें नाही. यास्तव ते भाग तसे पूर्णतः पडीतच आहेत. पण तेथे श्वेतवर्णीयांशिवाय इतरांना येऊन वसाहत करण्याला मज्जाव आहे ! त्या सर्व ठिकाणीं युरोपियन लोक हातपाय ताणून बसलेले आहेत ! हें त्यांचें असें करणें राष्ट्रांतरीय (International Jurisprudence) न्यायाप्रमाणें समर्थनीय आहे की नाही, हा स्वतंत्र प्रश्न आहे. त्याचा येथे विचार करावयाचा नाही. तथापि वरील पैकी बऱ्याच भागांत जपानी लोकांनी जाऊन राहण्याचा प्रयत्न केला. कांही, म्हणजे दर्यामें खसखस इतके, जपानी जाऊन तेथे राहिले हें खरें; परंतु प्रत्येक वेळीं प्रत्येक ठिकाणीं त्यांच्या आगमनाला पायबंद बसेल असेंच झालें.* त्या सर्व कायद्यांच्या मुळाशीं परकीय साम्राज्यवाद्यांचे व्यापारी व राजकीय डावपेच आहेत हें पण उघडकीस आलें. ब्राझीलमध्ये मात्र अद्यापि जपानी लोकांना वरील राष्ट्रांप्रमाणे त्रासदायक अटी नाहीत; ह्याचें एक कारण ब्राझीलला सध्या तरी त्या परिस्थितीला लायक अशा मनुष्यांची जरुरी आहे, हें आहे. या सर्व कारणांमुळे जपानी लोक अडले,

---

* जसें (१) इ. स. १९०१ सालचा आस्ट्रेलियाने केलेला कायदा.

(२)	,, १९०८	,,	क्यानडाने	,,
(३)	,, १९१३	,,	दक्षिण आफ्रिकेने	,,
(४)	,, १९०८	,,	युनायटेड स्टेट्सने	,,
(५)	,, १९२४	,,	,,	,,
(६)	,, १९३४	,,	,,	,,

हे सर्व कायदे जपानविरुद्ध तसेच इतर श्वेतवर्णेतरांविरुद्धही आहेत.

त्रस्त झाले व त्यांतल्या त्यांत श्वेतवर्णीय लोकांनी जो वर्णद्वेष दाखविला व कनिष्ठ राहणीचा दोष इतर मागसलेल्या समाजांप्रमाणें ह्यांच्याही माथीं मारला, त्यामुळे जपानी लोक चिडले. परंतु त्यांनी आणखी एक प्रयत्न करून पाहिला व ते तो अजून करून पाहत आहेत. तो असा—

(४) **व्यापारवाढ.** वाढत्या खाणाऱ्या तोंडांच्या सोई-साठी जपानी लोक व्यापारवाढ करूं पाहत आहेत. हें कार्य करीत असतांना देश जास्त जास्त धंदेप्रवण बनवावा लागतो व मग तयार झालेल्या मालासाठी इतर धंदेप्रधान राष्ट्रांनी व्यापून टाकिलेल्या बाजारपेठांशिवाय नवीन बाजारपेठा शोधाव्या लागतात. धंदेप्रधान बनण्याच्या बाबतींत जपान किती भिकारी राष्ट्र आहे, हें आपण वर पाहिलेंच आहे; पण तशा स्थितींतही जपानने पक्क्या मालाची निपज केली व तो ती करीतही आहे. तसेंच त्या मालाचा खप नेहमीच्या ठराविक बाजारपेठांत तर करीतच आहे; पण इस्लामी राष्ट्रें, पूर्व आफ्रिका, दक्षिण अमेरिका इत्यादि भागांतील मागसलेल्या लोकांतही करीत आहे. पण त्या त्या नवीन बाजार-पेठांतही सुधारलेल्या धंदेप्रधान अशा पाश्चिमात्य राष्ट्रांची वग आहेच. यामुळे जकात, सवलत (प्रेफरन्स), ठराविक प्रमाणांतच मालाचा उठाव (कोटा), वगैरे अडचणी जपानच्या व्यापारी चढा-ओढींत तीं तीं राष्ट्रें उभ्या करीत आहेत. तशांतूनही जपान रस्ता काढीत आहे.* या सर्व कारणसमुच्चयामुळे पाश्चिमात्य धंदेप्रधान राष्ट्रांशीं जपानचा वाढता बेबनाव होत आहे.

---

* इ. स. १९३४ सालीं जपानने पश्चिम आफ्रिकेंत आपली बायसिकल सुमारें १५ रुपयांस व मोटार सुमारें ७०० रुपयांस विकावयास नेली होती.

जपानच्या अडचणी व दोष

सारांश, वाढत्या लोकसंख्येच्या पोषणाचा प्रश्न सोडवितांना जपानने जे जे उपाय योजिले, व तें जे उपाय योजीत आहे, त्या त्या प्रत्येक बाबतींत आपल्याला धंदेप्रधान अशा पाश्चिमात्य राष्ट्रांकडून जबरदस्त अडथळा होत आहे असें जपानला साहजिकच वाटूं लागलें. व त्यांत सत्यांशही बराच आहे. तथापि जपानकडे दोष नाही असें नाही. विशेषतः वसाहतीकरणाच्या बाबतींत जपानी लोक पाश्चिमात्यांच्या मानानें पाहतां अयशस्वी व अप्रागतिक दिसतात असें म्हणावें लागतें.*

---

* इ. स. १९३० सालापर्यंत जपानी लोक परदेशांत खालील-प्रमाणें होतेः—

(१) कोरियांत सर्व लोकवस्तीच्या सुमारें २·५%=५०१८६७.
(२) फोर्मोसांत- „ ५· %=२३२२९९
(३) मँचूरियांत- „ ०·६६%=२२८५५१
(१९३२-३५ पर्यंत केवळ ६३९५ लोक मँचूरियांत आले.)
(४) ब्राझीलमध्यें केवळ ११३५५८.
(५) ऑस्ट्रेलियांत, तो देश राखीव कुरण बनण्यापूर्वी, म्हणजे इ. स. १९०१ पर्यंत ५०००.

इ. स. १९३७-१९५७ पर्यंत मँचूरियांत ५० लक्ष जपानी वसाहतीसाठी न्यावयाचे असें जपानने ठरविलें आहे.

हवाई बेटें तसेंच जपानच्या ताब्यांतील 'मँडेट्स' ह्यांमध्ये मात्र जपानी लोकांचें वसाहतीकरण थोडें प्रागतिक स्वरूपाचें आहे. फिलिपाइन्स व ईस्ट इंडीज यांतील कांही बेटांत जपानने व्यापार, कांही धंदे, मळे व खाणी हस्तगत केल्या आहेत. Limits of land settlement, pp. 172–175, *Issiah Boman*, Council on Foreign Relations, N. York 1937.

शेतीच्या बाबतींत यापुढे देशांतल्या देशांत विचार करण्याचें कांहीच कारण राहिलें नाही. राहतां राहिला धंदेवाढीचा प्रश्न. सध्या जपान त्यावरच भर देत आहे आणि धंदेवाढ व व्यापारवाढ म्हणजे तराजू, तरवार आणि तख्त ह्यांचें राजकारण. घरीं जेवावयाला मिळत नाही, बाहेर परदेशीं लोक भीक मागूं देत नाहीत—मग घालण्याची गोष्ट कशाला ? अशा तळमळणाऱ्या अंत:करणामुळे व चिडून पेचाटलेल्या मनोभूमिकेमुळे, दुसऱ्यांनी स्वसंस्कृति-बांधवांवर दरोडा घालण्यास भाग पाडलें असा बोल जपानी मन:फलकावर उठतो. धंदेप्रधान व म्हणून साम्राज्यपिपासु जर्मनी देखील आपल्या शेजारच्या डॅन्युब नदीच्या खोऱ्यांतील लहान लहान राष्ट्रें मिळून बनलेल्या राष्ट्रगटाला गिळंकृत करीत आहे, तोही वरील विचारसरणीमुळेच होय. पण तें पुढे पाहूं. येथे प्रश्न असा आहे की, या सगळ्या भानगडींत दुबळ्या अथवा मागासलेल्या बांधवाचा—चीनचा—काय दोष ? दुबळेपणा हा चीनचा दोष, '**जीवनार्थ धडपड**' हा **जपानचा गुण आणि** '**समर्थतमप्राण्यवशेष**' **ही उत्क्रांतिवादी जपानची भूमिका, हेंच खरें !** नवीन जपानने कोरिया घेतलाच होता; पण त्यामुळे जपानचा विशेषसा आर्थिक फायदा झाला नाही. जपानला आधुनिक धंदेप्रधानत्वाचें रूप वास्तविक पाहतां युरोपांतील पहिल्या महायुद्धापासूनच प्राप्त झालें. युद्धकाळांत जपानने आपला भरपूर फायदा करून घेतला; आणि त्यामुळे त्याच्या धंदेप्रधानत्वाला विशेष स्वरूप व महत्त्व येऊन राष्ट्रीय राजकारणाला त्याच्यामागे उभे राहावेंच लागलें.

जपानचीं कारस्थानें

मोठ्या कावेबाजपणाने जपानने मँचूरियावर इ. स. १९३१ सालीं झडप घातली. या वेळीं रशिया नुकताच राज्यक्रांतींतून बाहेर

पडून आपली स्थिरस्थावर करीत होता. जर्मनी हिटलरच्या तालमेंत तयार होत होता, तर इटाली मुसोलिनीच्या तालमेंत तयार होत होता. पण इटालीचा चीनच्या राजकारणाशीं कांहीं संबंध नव्हता. अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स हीं राष्ट्रें अर्धवट सुस्त होतीं. त्यांनी कुजबुज, गुरगुराट व गडगडाट केला, पण जोर न बांधल्यामुळे जपानचा तो डाव साधला. मँचूरियाला नामधारी स्वतंत्र राष्ट्र बनविण्याचें एक नवीनच राजकारणतंत्र जपानने अमलांत आणलें व तेव्हाच चीनला गिळंकृत करण्याचा, निदान त्याचीं शकलें करण्याचा डाव टाकला.

मँचूरियांतून जपानला थोडा कोळसा, लोखंड, तेल व पुष्कळ सॉयबीन, हे पदार्थ मिळाले. मँचूरियांत लोकर उत्पन्न करण्याजोगी परिस्थिति आहे. तसें झाल्यास लोकरीसाठी ऑस्ट्रेलियावरील परावलंबन बरेंच कमी होईल व बरींच जपानी कुटुंबें तेथे स्थायिक होतील असें वाटत होतें; परंतु वास्तविक स्थिति मात्र या बाबतींत निराळी आहे. एक तर जपानी लोकांना मँचूरियाच्या उत्तर भागांतील कडक हवामान मानवत नाही, व दुसरें खरें महत्त्वाचें कारण म्हटलें म्हणजे बहुसंख्य चिनी लोकांशीं कामधंद्यांत व मजुरींत जपान्यांचा टिकाव लागत नाही हें होय. चिनी लोकांची राहणी जपानी लोकांपेक्षाही कमी खर्चाची आहे. सबब ह्या त्यांच्या कनिष्ठ राहणीकडे पाहून श्रेष्ठ (?) राहणीचे जपानी लोक नाकें मुरडतात! मँचूरिया आपल्या पंखाखाली घेऊन रशियाला जसा राजकीय शह दिला तसें मँचूरियाचें चलन जपानी चलनाशीं निगडित करून अमेरिका इंग्लंड वगैरे व्यापारी राष्ट्रांच्या व्यापारालाही तेथून खो दिला; म्हणजे एक व्यापारी पेठ काबीज केली! एवढेंच नव्हे तर त्यांत धंदे कारखाने स्थापून आपलें बरेंच भांडवल गुंतविलें. अशा रीतीने जपानने आपलें साम्राज्य वाढविलें; पण तेथील धंदे

कारखान्यांत स्वस्त मजूर चिनीच असल्याने फारच थोडया जपानी लोकांची सोय तेथे लागली! व वाढत्या लोकांच्या पोषणाची सबब तशीच शिल्लक राहिली ! उलट आपली लोकसंख्या शक्य तितकी लवकर व पुष्कळ वाढावी ह्यासाठी इटाली-जर्मनीप्रमाणें जपानही प्रोत्साहन देत आहे. आपली लोकसंख्या इ. स. १९६० सालीं दहा कोटी तरी व्हावी अशी आग्रहाची उमेद जपान बाळगतें ! याचा अर्थ साम्राज्यपिपासेशिवाय दुसरा काय असणार ?

चीन व जपानः—राजकीय दृष्टया विचार केला तर मँचूरिया हा चीनचा महत्त्वाचा दरवाजा आहे. तो ज्याच्या हातांत, तो चीनला शह देऊं शकतो. जपानने दिलाच ! उत्तर चीनमध्ये (मँचूरियाला लागून असलेल्या चहर, होपी, सुइयुआन वगैरे प्रांतांत) भरपूर कोळसा, लोखंड व कापूस हे जपानला जरूर असलेले पदार्थ असून इतर बरेच खनिज पदार्थ आहेत. या व इतर भागांत जपानने खाणीचे हक्क तर संपादिलेलेच आहेत; पण हा सबंध उत्तर चीनच गिळतां आला तर पाहावा ह्या हेतूने कारस्थान रचून इ. स. १९३५ सालीं जपानने तेवढा लचका तोडण्याचा प्रयत्न केलाच; पण तो पूर्णपणें साधला नाही ! आणि ह्याच धुमसणाऱ्या अग्नीने इ. स. १९३७ सालच्या युद्धघटनेला तोंड फोडलें !

चीनचें भवितव्य व जपानचे डाव-चीन अद्यापि कृषिप्रधान राष्ट्र आहे. त्यांत उद्भिज्ज व खनिज कच्चा माल अतिशय आहे. लोकवस्ती अतिशय असल्याने जशी मजुरी स्वस्त आहे, तसें देशांतल्या देशांत गिऱ्हाईकही भरपूर आहे. भावी उन्नतीची सोय भरपूर आहे. लढाऊ सामर्थ्य तर अतीव होण्याजोगें आहे; पण राजकीय स्थायिकता नाही. परराज्य नाही, स्वराज्य आहे; पण सुराज्य नाही. या इ. स. १९३७ सालच्या चिनी-जपानी युद्धामुळे जी एक राष्ट्रीयतेची ज्योत चिनी लोकांत पेटली आहे, तीमधून

एक चिरस्थायी अशी केंद्रवर्ती सत्ता स्थापन होण्याचीं चिन्हें दिसत आहेत.* पण ती टिकाऊ होण्याला बराच काळ लोटावा लागेल. कारण, (१) इंग्लंड, अमेरिका, जपान, रशिया व फ्रान्स ह्यांचें बरेंच भांडवल चीनमध्ये गुंतलें आहे. (२) जपानी, ब्रिटिश, फ्रेंच व इटालियन या राष्ट्रांचीं सवलतीचीं ठाणीं (Concessions) म्हणून सोळा महत्त्वाचीं नाकीं आहेत; ह्यांपैकी सहा केवळ जपानचीं असून चार राष्ट्रांतरीय (International) सवलतीचीं ठाणीं आहेत.† ह्या राष्ट्रांतरीय ठाण्यांत अमेरिकेचीं आहेतच. (३) बाहेरील मंगोलिया तर राज्यपद्धतीनें रशियन पद्धतीचा बनला. (४) आंतील मंगोलिया उर्फ मेंगचिअँग अर्धवट जपानी बाहुलें बनत आहे. (५) हाँगकाँग (इ. स. १९४२ सालीं तें जपानने तात्पुरतें घेतलें), मकौ, क्वांगचौवान हीं महत्त्वाचीं दक्षिण किनाऱ्यावरील नाकीं व भाग अनुक्रमें ब्रिटिश, पोर्तुगीज व फ्रेंच ह्यांच्या ताब्यांत होतीं; आणि (६) निरनिराळ्या नऊ प्रांतांत रशियाच्या तर्फेचा वरपगडा असलेला शासक वर्ग आहे. अशा या परराष्ट्रीय जाळ्यांतून चीनला सुटावयाचें आहे आणि कर्जही द्यावयाचें आहे; आणि (७) देशांतर्गत सुधारणांचा डोंगर पुढे उभाच आहे !

भावी नवीन घडण–ब्रिटनने आपलें साम्राज्य कसें कमावलें तो इतिहास, चीन अशा स्थितींत असतांना जपानच्या डोळ्यासमोर असल्याने त्या मार्गानें तो चालूं पाहत आहे. पूर्व आशियाच्या 'भावी नवीन घडणींत' (New Order in the East) जपान आपला वरचष्मा राखूं पाहत आहे. त्यासाठी 'जपानी

---

* 'China shall rise again,' *Madam Chiang Kai Shek*, 1941.

† अमेरिका व ब्रिटन ह्यांनी हे सवलतीचे हक्क सोडून दिल्याचें नुकतेंच जाहीर केलें आहे.

मन्रो मत*' त्याने उत्पन्न केलें आणि वरील डावपेच संधिसाधूपणाने तो खेळूं लागला. चीन आणि आग्नेय आशिया (इंडोचायना, ईस्ट इंडीज व पॅसिफिक महासागरांतील इतर सर्व बेटें) आणि ओशियानिया ह्या मागासलेल्या, कनिष्ठ राहणीच्या, भरपूर मनुष्य-बलाच्या आणि कच्च्या मालाचें जगाचें जणू कोठार, अशा भागावर श्वेतवर्णीय पाश्चिमात्त्य धंदेप्रधान राष्ट्रांचा (विशेषत: ब्रिटिशांचा) जसा डोळा आहे, तसा या सर्वांपेक्षा राहणीने श्रेष्ठ पण पाश्चिमात्यांपेक्षा कनिष्ठ राहणीच्या जपानचाही डोळा आहे. ते जसे स्वस्त मजुरांना ताब्यांत घेऊन त्यांच्या करवीं कच्च्या मालाचें उत्पादन करवून आपले धंदे-कारखाने चालवूं पाहत आहेत तसेंच आपण करावें व आपल्या देशांतील धंदे कारखाने चालवावे हा

---

* इ. स. १९३४–३५ सालीं चीनला आर्थिक मदत दिलीच पाहिजे असें सर्व साम्राज्यवादी राष्ट्रांना वाटून त्या मदतींत जपानला ओढण्याचा ब्रिटनने प्रयत्न केला. पण त्या वेळीं आपलें 'मन्रो मत' निश्चित करून जपानने त्यांच्याशीं सहकार्य करण्याऐवजी स्वतंत्रपणें भांडवल गुंतवून राजकीय डाव खेळण्याचें ठरविलें. यावेळीं सर व्हिक्टर सासून ह्यांनी ब्रिटिश व अमेरिकन भांडवलवाल्यांना जो उपदेश केला त्याचा परिणाम म्हणजे ब्रिटन व अमेरिका ह्यांचें एकमत होऊन चीनला मदत करण्याचें ठरलें हें होय. व त्याप्रमाणे 'लीथ रॉस मिशन' पण आलें. जपानने ब्रिटिशांशीं सहकार्य केलें तर त्याला उत्तर चीन, मंगोलिया इत्यादि भागांत आपले हातपाय पसरूं द्यावे व त्याने ब्रिटिशांना दक्षिण व मध्य चीनमध्ये हात मारूं द्यावा असेही राजकीय वारे तेव्हा उठत होते. पण त्यामुळे रशिया दुबळा राहून जपानचें प्रस्थ वाढेल अशी भीति वाटून तें रहित झालें. लागलीच जपानने दक्षिणेंतील फ्यूकिन प्रांतामधून स्वायत्ततेची चळवळ उभी करून ब्रिटिशांना चिमटे घेण्यास सुरवात केली. Eastern Menace, pp. 87–90. Story of Japanese Imperialism, London, 1936.

जपानचाही हेतु आहे. चीनमधील आपल्यापेक्षा कनिष्ठ राहणीचे चिनी मजूर व चीनमधील कच्चा माल ताब्यांत घ्यावा, (चिनी-जपानी युद्ध सुरू झाल्यानंतर व त्यापूर्वी जपानी धंदेवाइकांनी जी 'नान्यो'ची–स्वस्त मजुरांच्या पुरवठ्याची–ओरड चालविली होती ती याच हेतूने होय) तशीच दक्षिण पॅसिफिक महासागरांतील बेटेंही ताब्यांत घ्यावीं आणि हे सर्व मागसलेले भाग उच्च राहणीच्या श्वेतवर्णी युरोपियनांकडून सुधारले (?) जाण्यापूर्वी आपण वरील उपायांनी सुधारून दाखवावे, ह्या महत्त्वाकांक्षेने जपानच्या हातून (इ. स. १९३७) 'चिनी घटना' घडली! पण वाढत्या तोंडांच्या पोषणाचा प्रश्न त्यामुळे सुटेल असें वाटत नाही. किंबहुना जपानी भांडवलशाहीला तो प्रश्न तसा सुटावयाला हवा आहे असेंही वाटत नाही. कारण हा मुलुखगिरीचा–साम्राज्यपिपासेचा–उपद्व्याप, आरमार व लष्कर यांतील लोक करतात असें राजकारणांतील डावपेचावरून दिसतें. ह्या लोकांचा बहुसंख्य भाग म्हणजे अतिदरिद्री व म्हणून असंतुष्ट अशा शेतकरी वर्गामधून घेतलेला असतो. भांडवलशाही आपले हातपाय ताणून बसण्याचें काम करीत राहते आणि त्या असंतुष्ट देशबांधवांचें दुःख निवारण्याचा कसून प्रयत्न करीत नाही असें म्हणावें लागतें! कारण आज सर्व जपानच्या पैशांपैकी म्हणजे राष्ट्रीय संपत्तीपैकी सुमारें अर्धी राष्ट्रीय संपत्ति–धंदे, कारखाने व्यापार व खाणी–जपानमधील मित्सुई, मित्सुबिशी, यासुदा आणि सुमितोमो ह्या केवळ चार घराण्यांच्या ताब्यांत आहे! एका बाजूला चार राव, तर दुसरीकडे असंख्य दरिद्री, अशी जपानच्या राष्ट्रीय संपत्तीची विभागणी आहे!

उपाय—या सर्व पारिस्थित्यिक अडचणींवर पुढील उपाय इतिहासाभ्यासकाला दिसतात. पौर्वात्यांतील सर्व मागसलेल्या

लोकांनी प्रथम एक बनून समर्थ बनावें. मग ओघानेच धंदेप्रधान बनावें लागेल आणि तेव्हा राष्ट्रीय मनाला योग्य वळण मिळालें असल्यास समान संस्कृतीच्या लोकांनी आर्थिक बाबतींत पूर्ण सहकार्य करावें, म्हणजे तो एक स्वतंत्र, स्वसमर्थ व स्वयंपूर्ण असा गट बनेल. डॉ. सन्यत्सेन ह्यांचें जें 'बृहत्तर आशिया' (Greater Asia Doctrine) उत्पन्न करण्याचें ध्येय होतें तें वरीलप्रमाणेंच होतें. त्या कक्षेंत भारत, चीन व जपान हे तीन घटक होते. पण सध्या तरी ती व्यापक दृष्टीच्या व्यवहाराची वेळ आलेली दिसत नाही. वास्तविक पाहतां जपानने चीनशीं सहकार्य करण्यांतच त्याचा लोकसंख्येचा प्रश्न लवकर सुटण्याचा संभव आहे. परंतु आज तर तो प्रश्न श्वेतवर्णीयांच्या धूर्त व आपमतलबी राजकारणामुळे अडून पडत आहे असें जपानी राष्ट्रीय मनाला वाटत आहे; तर ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, अथवा अमेरिकन संस्कृतींत वाढलेले स्वातंत्र्योन्मुख फिलिपिनो ह्यांना पिवळ्या बागुलबोवाचें भूत भेडसावीत आहे. यांत आमचा भारत कोठे ?

प्रकरण दहावें

जुन्या जगांतील पोखरलेला महाजन : फ्रान्स व त्याचें साम्राज्य

फ्रेंच साम्राज्य

ब्रिटिशांनंतर दुसरें मोठें साम्राज्य म्हटलें म्हणजे फ्रेंच साम्राज्य होय. (रशियन राष्ट्रसंघ हा भाग जरी विस्ताराने मोठा आहे तरी त्याला 'साम्राज्य' ही संज्ञा लावतां येत नाही, म्हणून येथे फ्रान्सचा क्रम दुसरा लाविला आहे.) त्याचे हातपाय पांच


खंडांत पसरलेले आहेत. या सर्व फ्रेंच साम्राज्यापैकी केवळ शेंकडा ४ क्षेत्र फ्रान्स ह्या मूळ देशाचें असून त्यांत लोकवस्ती मात्र साम्राज्याच्या लोकवस्तीच्या मानानें शेंकडा ४० आहे. फ्रेंच साम्राज्याच्या क्षेत्राचा बराचसा भाग (शेंकडा ८१ क्षेत्रफळ व शें. ३३ लोकवस्ती) उत्तर व मध्य आफ्रिकेंत आहे. फ्रान्स देश व आफ्रिकेंतील प्रदेश ह्या दोहोंच्यामध्ये भूमध्यसमुद्र आहे व त्याशीं संबंध ठेवणारे भूमध्यसमुद्री मार्ग उत्तर दक्षिण असून ते त्याच समुद्रांतील ब्रिटिशांच्या समुद्री जीवितरज्जूंना काटून जातात. भूमध्यसमुद्रासभोवारचें राजकारण व व्यवहारकारण ह्यांच्या दृष्टीने त्याचप्रमाणें यौद्धिक महत्त्वाच्या दृष्टीने ही परिस्थिति इंग्रज व फ्रेंच ह्यांना कशी नडणारी आहे ह्याचें दिग्दर्शन मागे ब्रिटिश साम्राज्याच्या वर्णनांत आलेंच आहे. ह्या परिस्थितीचा, भावी कालांतील सामर्थ्यवान इटाली किंवा मध्ययुरोपांतील जर्मनीसारखें राष्ट्र कसा उपयोग करील ह्याचाही अंदाज बांधतां येतो. ह्या आफ्रिकेंतील फ्रेंच साम्राज्यांतील लोकांत अद्यापि राष्ट्रीयत्वाचें वारें शिरलें नसल्यामुळे त्या लोकांकडून जरी फ्रान्सला त्रास झाला नाही, तरी त्यांच्या मागसलेपणाचा फायदा वरील राष्ट्रें वेळप्रसंगीं घेतल्याशिवाय राहणार नाहीत.

फ्रेंच साम्राज्याचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हटला म्हणजे आशियांतील इंडोचीन हा भाग होय. ह्यांत साम्राज्यापैकी एकपंचमांश लोकवस्ती असून त्यापैकी शेंकडा ९० आनामी लोक आहेत व ते बऱ्याच वर्षांपासून राष्ट्राभिमानाच्या वाऱ्याने प्रेरित झालेले आहेत. एक मालक जाऊन दुसरा आला तरी चालेल, पण आहेत हे फ्रेंच मालक नकोत, ह्या विचारसरणीचे ते आनामी लोक नाहीत हें जरी आजपर्यंतच्या अनुभवावरून दिसतें, तरी तशीच वेळ आल्यास दुसऱ्याची मदत ते घेणारच नाहीत, असेंही म्हणतां येत नाही. शेजारचा सयाम किंवा त्याचा सध्याचा मित्र

जपान हे देश या गोष्टीचा फायदा घेऊन ह्या भागांतील फ्रेंच सत्तेला शह दिल्याशिवाय राहणार नाहीत हें खास. त्याचीं कारणेंही ऐतिहासिक व यौद्धिक महत्त्वाचीं आहेत. फ्रान्सचा पाडाव झाल्यानंतर, इ. स. १९४१ च्या प्रारंभाला सयाम उर्फ थाईलँड आणि जपान ह्या दोघांनीही त्या गोष्टीचा फायदा घेतलाच.* ही घटना इंग्रजांना कशी त्रासदायक होईल ह्याचें दिग्दर्शन मागे ब्रिटन व जपान यांच्याविषयी लिहितांना केलेंच आहे.

---

* सयाम व फ्रेंच इंडोचीन आपला आहे असें चीन पुष्कळ वर्षांपासून म्हणत आहे. कांबोज, लाओस व ल्वांगप्रगंग हे सयामलगतचे भाग चीनचे नसून आपलेच आहेत असें सयाम चीनप्रमाणेच ऐतिहासिक आधारावर म्हणत आहे. इ. स. १८८०–९० च्या दरम्यान फ्रान्स व इंग्लंड ह्यांनी 'इंडो-चीन' ची लचकालचकी केली, त्यांत दोघांच्या मतभेदामुळे सयाम स्वतंत्र राहिला ! इ. स. १९०९ मध्ये ब्रिटिशांनी सयामपासून जबरदस्तीने मलाया, केड्डा, केलंतन वगैरे भाग लाटला. त्या जखमेची जाणीव सयाम विसरलेला नाही. या दोन्ही कारणांगुळे सयाम हा मनांतून फ्रान्स व इंग्लंड ह्यांचें वाईट चिंतणारा होता व आहे. गेल्या महायुद्धांत जरी तो इंग्रजांकडून होता तरी तो मनापासून तसा नव्हता ही गोष्ट इंग्रज व फ्रान्स हे दोघेही समजले नाहीत असें म्हणावें लागतें. पुढे जपानच्या वाढत्या प्रस्थाबरोबर सयामचा ओढा जपानकडे झुकूं लागला व जपानला तें हवेंच होतें. व जेव्हा फ्रान्सने इंडोचीनच्या पूर्व किनाऱ्यावर 'कामरान उपसागरांत' 'फ्रेंच सिंगापूर' करण्याचा घाट घातला, तेव्हापासून सयाम संधीची वाटच पहात होता. जपानची नजर होतीच. जपानचा चीनशीं लढा व फ्रान्सचा जर्मनीकडून झालेला पराभव ही संधि साधून जपानच्या मदतीने वरील भाग इ. स. १९४१ सालीं सयामने तात्पुरते तरी आपल्या ताब्यांत घेतले व जपान तो यौद्धिक महत्त्वाचा उपसागर व त्या समोरची पॅरासेल बेटें ताब्यांत घेऊन चीन व इंग्रज ह्या दोघांनाही शह देत आहे.



जर्मनीभोंवतीं फ्रान्सचें जाळें

व्हर्सेलिसच्या तहाचे परिणामः—(१) टिंबांनी दाखविलेले भाग आर्थिक वा राजकीय कारणानें फ्रान्सच्या पंखाखाली आलेले होते. (२) यूरोपांतील बहुतेक कोळसा व तेल–त्यामुळे मुख्य धंदेप्रधान भाग—फ्रान्सच्या ताब्यांत आले. फ्रान्सचा मध्ययूरोपांत वरचष्मा झाला व (४) जर्मनी कोंडला गेला.

[पृष्ट १११ व १६७

फ्रान्सच्या ताब्यांत हिंदी, पॅसिफिक व अटलांटिक ह्या महासागरांत इंग्लंडप्रमाणे अनेक बेटें आहेत. त्यांतून फ्रान्सला बराच कच्चा माल मिळतो. पण फ्रान्स हा बराचसा कृषिप्रधान देश असून ब्रिटनप्रमाणे खाण्यापिण्यासाठी परावलंबी नाही. तो बराचसा स्वयंपूर्ण आहे. पण धंदेप्रधानत्वाच्या* दृष्टीने कच्च्या मालासाठी वसाहतींवर अवलंबून आहे. ह्या गोष्टीचा पुढे विचार करणारच आहोंत. पण यौद्धिक महत्त्वाच्या दृष्टीने पाहिलें तर कॅरिबिअन समुद्रांतील बेटें दोन्ही अमेरिकांना शह देणारीं वा महत्त्वाचीं आहेत, तशीं पॅसिफिक महासागरांतील ऑस्ट्रेलियाच्या पूर्वेचीं बेटें ब्रिटिशांना त्रासदायक आहेत. फ्रान्सच्या पडत्या काळांत त्याचे शत्रु वा जेते ह्या परिस्थितीचा फायदा घेतल्याशिवाय राहणार नाहीत, असें दिसतें.

भांडवलाच्या बाबतींत, फ्रान्सचें भांडवल अमेरिका व इंग्लंड ह्याप्रमाणें विस्तृत प्रमाणाने देशोदेशीं पसरलेलें नाही. तथापि उत्तर आफ्रिका, अर्जेंटिना, स्पेन, इंडोचीन, पोलंड, ईजिप्त, चीन ह्यांमध्ये त्याचें थोडें थोडें भांडवल गुंतलेलें आहेच.

ही आर्थिक जाळ्याची उणीव फ्रान्सने बऱ्याच प्रमाणाने राजकीय संधींनी भरून काढली होती. जर्मनी हा फ्रान्सचा शत्रु असल्यामुळे हीं राजकीय जाळीं बव्हंशीं त्याने युरोपांतच आणि त्यांतल्या त्यांत जर्मनीच्या सभोवार विणलीं. ते देश असे – झेकोस्लोव्हाकिया, रुमानिया, जुगोस्लॉव्हिया, पोलंड व रशिया. याशिवाय बेल्जम व ब्रिटन हे त्याचे युद्धकाळांतील दोस्त होतेच.

* फ्रान्समध्ये शेंकडा ४० शेतकरी, शेंकडा ४० धंदेवाईक, शेंकडा १० केवळ व्यापारी व इतर अर्धवट बेकार. धंदेवाईक म्हणजे इंग्लंड जर्मनीप्रमाणें मोठे धंदेवाईक नव्हत, हें नमूद करण्यासारखें आहे. Modern Europe Explained, *McAucliff* 1938. p. 114.

व्यापार, आक्रमण, वसाहतीकरण, सवलती, अनेकप्रकारचे संधि, तसेंच अनेक स्वरूपांनी केला जाणारा स्वसंस्कृतिप्रसार, ह्या सर्व गोष्टी आपलें प्रस्थ वाढविण्याचीं उपादानकारणें आहेत. व त्यांचा उपयोग आधुनिक काळांत सर्व राष्ट्रें करितात. फ्रान्स त्याला अपवाद नाही.

पहिल्या विल्यमपासून सातव्या एडवर्डपर्यंत सुमारें ८०० वर्षें इंग्लंड व फ्रान्स हे एकमेकांचे शत्रु. पण ते इ. स. १९१४ सालीं दोघांचा सामान्य शत्रु जो जर्मनी त्याच्या विरुद्ध एक झाले! इ. स. १६४८ पासून–त्रिदश वार्षिक युद्धापासून–फ्रान्स हा जर्मनीचा वैरी आहे. इ. स. १९१८ सालच्या तहानें फ्रान्सचें जर्मनीबरोबरचें वैर संपलें नव्हतें. उलट जर्मनीची त्याला धास्ती वाटे. त्या युद्धानंतर फ्रान्सने रशिया, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया वगैरे देशांशीं जे राजकीय संधि केले ते त्याच भीतीने.

फ्रेंच साम्राज्यांतील शासनपद्धतीचा विचार करतां ह्यांची शासनपद्धति ब्रिटिशांप्रमाणे ‘ फेडरल ’ प्रवृत्तीची नसून केंद्रवर्ती प्रवृत्तीच्या स्वरूपाची आहे असें दिसतें. साम्राज्याच्या सर्व भागांत पॅरिसमधून सूत्रें हालतात, तेथील लोकच अधिकारी म्हणून जातात व साम्राज्यांतील त्या त्या भागांतून कांही प्रतिनिधि पॅरिस येथील केंद्रांत सामील होतात.* ब्रिटिश साम्राज्यशासनपद्धति चांगली कां फ्रेंच साम्राज्यशासनपद्धति चांगली हा विषय जरी अप्रस्तुत असला, तरी एक गोष्ट येथें नमूद करणें इष्ट वाटतें, ती ही की, केवळ मातृभूमीच्या फायद्यासाठी साम्राज्य कसें चालवावें, किंवा साम्राज्याच्या इतर भागांतून जास्तींत जास्त फायदा कसा काढावा ह्या बाबतींत ब्रिटन, फ्रान्स व हॉलंड ह्या तीन मुख्य

* French Colonial Technique. Foreign Affairs, 1939.

साम्राज्यशाली राष्ट्रांचा हॉलंड, इंग्लंड व फ्रान्स असा क्रम लागतो. *

पहिलें महायुद्ध व फ्रान्स

युरोपांतील आपल्या एका दांडग्या प्रतिस्पर्ध्याचा म्हणजे जर्मनीचा नि:पात करण्याच्या हेतूनेच ब्रिटनने गेल्या महायुद्धांत पाऊल टाकलें. जर्मनी जरी तात्पुरता मारला गेला तरी परिणामीं जर्मनीचा तर बीमोड झाला नाहीच, उलटपक्षीं जर्मनीपेक्षा अधिक सामर्थ्यवान असा फ्रान्स हा प्रतिस्पर्धी निर्माण झाला. ही गोष्ट इंग्लंडने राजकीय डावपेच म्हणून होऊं दिली, हें कसें तें पाहूं.

कोळसा व लोखंड यांचा भरपूर पुरवठा हा जर्मनीच्या सामर्थ्याचा भरभक्कम पाया होता. जर्मनीच्या बऱ्याचशा लोखंडाच्या खाणी तहाअन्वयें फ्रान्सच्या स्वाधीन करण्यांत आल्या. तहानंतर फ्रान्सचें निश्चित धोरण शक्य तितका अधिक कोळसा मिळवावा असेंच होतें, कारण कोळशाशिवाय लोखंड औद्योगिक क्षेत्रांत निरुपयोगी ठरतें. लोरेन टापूंत लोखंडाच्या खाणी भरपूर आहेत. जर्मनीच्या ताब्यांतील लोरेनच्या खाणींतून शेंकडा ७५ लोखंड निघत असे व फ्रान्सच्या वाटयास केवळ शेंकडा २५ च येत असे. पण १९१८ च्या तहाने लोरेनच्या सर्वच खाणी फ्रान्सच्या स्वाधीन केल्या गेल्या. दुसऱ्या महायुद्धापूर्वीपर्यंत युरोपांतील अतिशय स्वस्त लोखंड फ्रान्सच्या ताब्यांत होतें. † कोळसा व लोखंड हे दोन पदार्थ राष्ट्रीय सामर्थ्याच्या मोठया धंद्यांचे उपादानघटक आहेत. त्यामुळे पूर्वीच्या जर्मनीपेक्षा फ्रान्स हाच ब्रिटनचा

* 'Balance Sheet of Imperialism' – *G. Clerk* 1936.

† Coal, Iron and War: *E.C. Eckel*, Harrap, page 33.

मोठा प्रतिस्पर्धी बनला होता. परंतु दोघांचाही शत्रु एकच, म्हणून ब्रिटन व फ्रान्स हे मित्रत्वाने निगडित झाले.

प्रथमयुद्धपूर्वकालांत फ्रान्समध्ये लोखंड व तज्जन्य मोठ्या उद्योगधंद्यांत गुंतलेल्या भांडवलदारांचें बळ अधिक होतें. त्या वेळीं फ्रान्समध्ये शेतकरी वर्गाचें प्रमाण अधिक असे. कोळसा सोडल्यास फ्रान्स बऱ्हंशीं स्वावलंबी राष्ट्र आहे असें वर सांगितलेंच आहे.

फ्रान्सच्या प्रजेने पूर्वी रशियांतील झारला व इतर राष्ट्रांना कर्ज दिलें होतें. परंतु युद्धोत्तर फ्रान्समध्ये तशी स्थिति नव्हती. जर्मनीप्रमाणे फ्रान्सचें सामर्थ्य कोळसा व लोखंडावर उभारलें गेलें. फ्रान्स, रशिया, ब्रि. बेटें व स्वीडन हे देश युरोपांत लोखंडाचे उत्पादक आहेत. फ्रान्स आपलें निम्में लोखंड निर्गत करूं शके व जर्मनी तें घेई; कारण फ्रान्सपाशीं पुरेसा कोळसा नव्हता. ब्रिटिश बेटें, जर्मनी व रशिया हे काय ते युरोपांतील कोळशाचे व्यापारी. म्हणून **कोळसा व लोखंड यांसाठी जर्मनी व फ्रान्स हे परस्परावलंबी होते.** अर्थात् त्या त्या पदार्थांच्या प्रदेशावर परस्परांचा डोळा होता. म्हणजे हे पदार्थ एकमेकांच्या शत्रुत्वाचें कारण होतें. मोठ्या धंद्यांत अति महत्त्वाचा असा 'कोक' हा पदार्थ. पण तो फान्सपाशीं नाही. जर्मनी, ब्रि. बेटें, बेल्जम, हॉलंड, पोलंड हे जगांतील शेंकडा ९० कोक आपल्या स्वाधीन ठेवतात. कोळसा आणि लोखंडाचे धनाढ्य व्यापारी 'कोमेट डी फोर्जे' (Comite des Forges) व याच्या पाठीशीं असलेली भांडवलशाही नवीन फ्रान्सचें धोरण चालवूं लागली. लोरेनच्या खाणी ताब्यांत आल्याने फ्रान्सची औद्योगिक पुनर्घटना बलशाली करण्यास पुरेपूर वाव मिळाला. त्या भांडवलवाल्या गटाने फ्रान्समधील युद्धोत्तर अनिश्चितीचा फायदा घेऊन तेथील सत्ता बळकाविली. त्यांनी सैन्य आपलें बाहुलें बनविलें व सैन्याशिवाय आपण सुरक्षित नाही असें भासवून जनतेचा पाठिंबा

मिळवून तो ते कायम ठेवूं लागले. पण ह्या सर्वांचा मूळ उद्देश मात्र जर्मनीला कायमचा निर्बल करून ठेवावयाचा होता.

फ्रान्सची एक उणीव

आधुनिक पद्धतीवर फ्रान्सची औद्योगिक उन्नति नुकतीच सुरू झालेली होती. कोळसा गरजेपेक्षा फार कमी प्रमाणांत सापडत असल्याकारणाने फ्रान्स औद्योगिक क्षेत्रांत मागसलेला राहिला. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकालांत फ्रान्समध्ये रेल्वे बांधण्याला प्रारंभ झाला. आणि याच सुमारास जर्मनी व फ्रान्स यांनी औद्योगिक प्रगतिपथावर पाऊल टाकलें. जर्मनींत भरपूर कोळसा तर फ्रान्समध्ये कोळशाचा तुटवडा; व जो थोडा कोळसा निघे तोही एकाच ठिकाणीं नसून थोड्याथोड्या प्रमाणांत विखुर-लेला; कांही बेल्जमच्या बाजूला तर कांही ईशान्य भागांत.

कोळशाचा खप ज्यांत विशेष असे उद्योगधंदे व कारखाने, अशा परिस्थितींत, एका ठिकाणीं केन्द्रित होऊं शकत नाहीत. उलट ते विखुरलेले आढळतात. असल्या अनेक पण लहान विखुरलेल्या कारखान्यांतून मालाची एकंदर निपजही बरीच होते. कारण त्यांना लागणारें जळण एकदम मोठ्या प्रमाणावर लागत नाही. फ्रान्समध्ये असेंच झालें. इंग्लंड, जर्मनी व अमेरिका यांप्रमाणें एकाच ठिकाणीं कोळसा लोखंडाच्या आसपास नसल्याकारणाने तेथे प्रचंड कारखाने केन्द्रित झालेले आढळत नाहीत.

धंदेकारखान्यांचें केंद्रीभवन राष्ट्रीय संपत्तीच्या वाढीच्या दृष्टीने आज जरी मुख्य धंदेप्रधान राष्ट्रांना चांगलें व फायदेशीर वाटत असलें तरी परिणामीं समाजाच्या सुखाच्या वाढीला तें केंद्रीभवन चांगलेंच आहे, असें त्या त्या राष्ट्रांतील समाजशास्त्र-वेत्त्यांना ठासून सांगतां येत नाही. उद्योगधंद्यांची प्रादेशिक

रचना (Regional Planning) हें जें एक नवीन तत्त्व सध्या उत्पन्न झालें आहे, तें वरील म्हणण्यालाच पुष्टि देतें.

इ. स. १८७१ नंतर लोरेनचा जो भाग फ्रान्सच्या ताब्यांत राहिला, त्यांत लोखंड कमी होतें असें नाही. तें फ्रान्स काढी, परंतु त्याच्या वस्तु बनविण्यासाठी लागणारा 'कोक' हा पदार्थ फ्रान्सपाशीं नसल्यामुळे त्याला लोखंड निर्गत करावें लागे. कच्चें लोखंड परदेशांत पाठवण्यामध्ये इ. स. १९१३ त फ्रान्सचा नंबर जगांत बराच वर लागे. इंग्लंड, जर्मनी व अमेरिका ह्यांशीं ह्या बाबतींत फ्रान्सची तुलना केली तर तेव्हा फ्रान्स हा लोखंडरूपी कच्चा माल पुरवणारी एक वसाहतच होता, असें म्हणतां येईल.

पण इ. स. १९१९ च्या तहाअन्वयें तो लोखंडाचा सर्व मुलूखच (सर्व लोरेन) फ्रान्सच्या ताब्यांत आला. तेव्हा फ्रान्सची दृष्टि फिरली. पोलादी सामानाचे कारखाने काढून नफा मिळवणें हें फायदेशीर की पूर्वीप्रमाणेच कच्च्या लोखंडाची निर्गत चालू ठेवणें फायदेशीर, हा प्रश्न फ्रान्सपुढे उभा राहिला. पोलादाचे कारखाने काढण्याकरितां कोळसा पुष्कळच पाहिजे, व तो मिळवला पाहिजे. युरोपमध्ये तरी साम्राज्यशाहीचें मूळ कारण हेंच आहे. युरोपांतील प्रांत आपल्या घशांत उतरविण्याची क्रिया जी दिसून येते ती ह्या वरील कारणामुळेच होय. मग त्या गोष्टीला त्या प्रांतांतील लोकांची संमति असो वा नसो ! सार हा प्रांत १९१९ च्या तहाने फ्रान्सला मिळाला. सार प्रांतांत कोळसा आहे पण कोक फारच अपुरा आहे. लोरेनच्या लोखंडासाठी लागणारा शेंकडा ८९ कोक जर्मनीच्या ऱ्हूर प्रांतांत आहे. त्यामुळे ऱ्हूर प्रांतांतील खाणी आपल्या ताब्यांत वा अधिकारकक्षेंत असाव्या असे डोहाळे फ्रान्सला होऊं लागले ! धंदेप्रधानत्वाची जाणीव

होऊन परिस्थिति प्राप्त होतांच फ्रान्सच्या विचारांत केवढी लहर उठली पहा! **धंदेप्रधानत्व म्हणजे भांडवलशाही, व भांडवलशाही म्हणजे साम्राज्यवादित्व व साम्राज्यवादित्व म्हणजे युद्ध, ही परंपरा कशी आहे** तें या उदाहरणावरून ध्यानांत येईल.*

एक टन लोखंड वितळविण्यास पुष्कळ टन कोळसा लागतो आणि म्हणून कोळशाजवळ लोखंड नेणें स्वस्त पडतें. एवढ्या-करितां ऱ्हूर प्रांतांतील कोळसा लोरेनमध्ये आणून कारखाने चालविणें अव्यवहार्य होतें. अर्थात् लोरेनचें लोखंड ऱ्हूरमध्ये पोचवल्याशिवाय गत्यन्तर नाही. म्हणजेच फ्रान्सला ऱ्हूर प्रान्ताची अत्यन्त आवश्य-कता भासूं लागली, हें निर्विवाद झालें! सार व ऱ्हूर या दोन्ही प्रांतांत दळणवळणाचीं साधनें भरपूर व उत्कृष्ट आहेत. नदीमार्गानें व रेल्वेने वाहतूक फार मोठ्या प्रमाणांत चालते. अशा परिस्थितींत सार प्रांत एकाकडे व ऱ्हूर एकाकडे ही राजकीय विभागणी विरोधात्मकच आहे, असें म्हणावें लागतें. ही घटना म्हणजे जाणून बुजून युद्धाला आव्हानच होतें. ऱ्हूर प्रांत मिळविल्याशिवाय आपल्याला गत्यंतर नाही ही विचारसरणी सुरू होतांच तो मिळ-विण्याची उपाययोजना फ्रान्सच्या डोक्यांत येऊं लागली. जर्मनी-पासून जी नुकसानभरपाई (Reparations) भरून घ्यावयाची होती, सकृद्दर्शनीं तिच्यासाठी म्हणून, फ्रान्सने ऱ्हूर प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. कायमचा ताबा आपला असावा अशी त्याची इच्छा होती व ह्या ध्येयानेच 'ऱ्हाइन रिपब्लिक'ची योजना आखलेली होती. हें नवीन संस्थान, वरवर पाहणारास 'स्वतंत्र'

---

* The Geography of Capitalism—*W. G. Moore*—Gollancz, 1938.

Why Capitalism means War—*H. N. Brailsford*—Gollancz, 1938.

असें दिसावें अशी ही घटना होती; परंतु तें पूर्णपणें फ्रान्सच्या ताटाखालचें मांजर असावें अशी योजना व डाव होता. ज्याप्रमाणे पनामा संस्थान 'स्वतंत्र' असून संयुक्तसंस्थानांच्या पंखाखाली आहे तशीच -हाइनलँड रिपब्लिकची व्यवस्था व्हावयाची होती! परंतु ही योजना इंग्लंड व अमेरिका यांना रुचली नाही! कारण यामुळे पर्यायाने फ्रान्स बलवान होणार होता व हें दोघांही साम्राज्यपिपासु राष्ट्रांस खपणारें नव्हतें. आणि तसें होऊं दिलें तर विजयश्रीचा सर्वांत मोठा वाटा फ्रान्सच्या पदरांत पडला असता. हें घडूं नये म्हणून मित्र-राष्ट्रें म्हणजे इंग्लंड व अमेरिका यांनी 'डॉवेस योजना' (Dawes Plan) 'यंग योजना' (Young Plan) ह्यांसारख्या नुकसानभरपाईच्या योजना आखल्या व त्या जर्मनीवर लादल्या! त्यामुळे जर्मनीवर आर्थिक जूं बसविण्यांत आलें खरें, पण जर्मनीला आपली आर्थिक व औद्योगिक भरभराट करण्याची संधि मिळाली. ती संधि जरी तात्पुरती दोस्त राष्ट्रांच्या हितासाठी अंमलांत यावयाची होती, तरी पुढे घडलेल्या घटनेवरून असें म्हणावें लागतें की तीच गोष्ट पुढे जर्मनीला वर आणण्यास कारणीभूत झाली. अशा रीतीने नुकसानभरपाई करण्यांत आली. फ्रान्सचा हिरमोड झाल्याने फ्रान्सने आपलें पै नि पै घेणें वसूल केलें! त्याने यत्किंचितही सूट देण्याचें औदार्य दाखविलें नाही! कारण फ्रान्सच्या आर्थिक आकांक्षा फलदायी होण्याचें चिन्ह नव्हतें.

प्रथमयुद्धोत्तर यूरोप उर्फ युरोपांतील फ्रेंच साम्राज्य

प्रथमयुद्धानंतरचा हा नवा फ्रान्स म्हणजे आफ्रिका व आशिया ह्यांत साम्राज्यरूपाने असणारा फ्रान्स आणि त्यापेक्षा जास्त महत्त्वाच्या स्वरूपाचा, फ्रान्सने आपल्या पंखांखाली आणलेला पण बाह्यतः स्वतंत्र अशा मध्ययुरोपांतील देशांचा गट! हा

गट म्हणजे राजकीय दृष्टया स्फोटक असा भाग आहे. अशा ह्या सर्वांमिळून बनलेला हा युद्धोत्तरकालीन मोठा फ्रान्स आहे. त्याचा आता विचार करूं.

वर सांगितलेंच आहे की फ्रान्सच्या भांडवलवाल्यांनी मोठ्या युक्तीने जर्मनीपासून संरक्षण व्हावें म्हणून त्याच्यासभोवार एक कडें उत्पन्न केलें. तें कडें म्हटलें म्हणजे आर्थिक किंवा राजकीय दृष्टया फ्रान्सशीं संलग्न असलेल्या प्रांतांचें होतें. हेतु हा की जर्मनी कायमचाच दुबळा व निर्माल्यवत् राहावा. राष्ट्रीय मानसशास्त्राप्रमाणे ही फ्रेंचांची कल्पना चुकीचीच होती. जर्मनीच्या पूर्वेस त्याच्याच तुकडयांतून पोलंड देश जन्मास घालण्यांत आला व त्यांतच वरच्या सायलेशियामधील जर्मनीच्या मालकीच्या कोळशाच्या खाणींचा समावेश करण्यांत आला. थोडक्याच दिवसांत पोलंड फ्रेंचावलंबी झाला. इ. स. १९२४ सालीं झेकोस्लोव्हाकियाशीं व इ. स. १९२७ सालीं रुमानिया व जुगोस्लाव्हिया यांशीं फ्रान्सने तह केले. तहनाम्या मागून कर्जरोख्यांच्या **रूपाने राजकीय डावांचा चंचुप्रवेश होत असतो.** फ्रान्सने तो केला. जसें-(१) इ. स. १९१८ सालीं सर्वांत जास्त व इ. स. १९३१ सालीं फार मोठें कर्ज जुगोस्लाव्हियाला दिलें. तसेंच (२) सर्व्हियाला देखील इ. स. १९१८ व १९२४ सालीं फार मोठें कर्ज दिलें.* एवढेंच नव्हे तर ऑस्ट्रिया व जर्मनी यांच्या एकीकरणाला फ्रान्सने विरोध केला, व ऑस्ट्रियाला पूर्णपणें फ्रेंचानुवर्ती राष्ट्र बनविलें. अशा प्रकारें मध्ययुरोपांत बाल्टिक ते एड्रियाटिक समुद्रापर्यंत फ्रान्सने आपलें अग्रेसरत्व स्थापलें. वर सांगितलेल्या त्या कडयांतील हे सर्व प्रांत व त्यांचा इतिहास पाहिला म्हणजे निर-

---

* Hitler's Route to Bagdad : *Barbara Ward*, Fabian Society, 1939.

निराळ्या स्फोटक द्रव्यांचा साठा आपल्या सभोवार व शेजारी जमवून आपण आता पक्कें सुरक्षित झालों असें मानून झोपा काढण्याइतकें हें हास्यास्पद आहे असें वाटतें.

बेल्जमही फ्रान्सच्या विरुद्ध जाऊं शकत नव्हता. कारण तेथील कोळसा भांडवलशाही मार्फत फ्रान्सच्याच कक्षेंत होता. अशा प्रकारें स्वतःचा, बेल्जमचा, व पोलंडमधील सायलेशियाचा असा बराच कोळसा ताब्यांत येऊन शिवाय रुमानियाचा गहू व तेल यावरही त्याचीच अप्रत्यक्ष मालकी होती. सारांश फ्रान्सने युरोपांत 'फ्रेंचसाम्राज्य' उत्पन्न केलें! फ्रान्सने ही अशी कडेकोट तयारी आपल्यापरी केली खरी. पण जर्मनींतील ६ कोटि लोक किती दिवस अशा प्रकारच्या राजकीय व आर्थिक शृंखलेंत बद्ध राहणार हा एक प्रश्नच होता. जर्मनीच्या बलिष्ठतेचा मूळ पाया जो खनिज संपत्ति तो त्याच्या मालकीचा ठेवला नाही; परंतु जर्मनीचें औद्योगिक नैपुण्य उच्च प्रतीचें असून युरोपला त्याची अत्यन्त आवश्यकता होती व आहेही. तसेंच एवढ्या मोठ्या देशाला कायमचें शृंखलाबद्ध ठेवणेंही कठीण दिसतें. आधुनिक युरोपीय भांडवलशाहीला जर्मन राष्ट्र धक्का दिल्याशिवाय राहणार नाही असें त्या वेळेपासून दूरदर्शी मुत्सद्द्यांना वाटत होतेंच. डोकें हें हातपायांच्या वर असतें. तें त्यांच्या स्वाधीन न राहतां त्यांनाच आपल्या स्वाधीन ठेवतें!

तत्कालीन युरोपच्या परिस्थितींत म्हणजे जेथे बरींच राष्ट्रें एकमेकांशीं प्रतिस्पर्धा करीत होतीं अशा स्थितींत बेल्जमसारखें राष्ट्र एक प्रकारच्या तटस्थपणाने जिवंत राहूं शकणार नाही असें नाही. परन्तु शेजारींच एखादें राष्ट्र अति बलिष्ठ झाल्यास बेल्जमला त्याच्या ताटाखालीच राहणें अपरिहार्य होईल. जर बेल्जमच्या

सभोवती बरींच राष्ट्रें कोळशासाठी स्पर्धा करणारीं असतीं तर बेल्जमचा कोळसा फ्रान्सच्या आहारीं जाता ना !

फ्रान्स-जर्मनीची सरहद्द

जर्मनीच्या पश्चिम सरहद्दीचा प्रश्न म्हणजे भौगोलिक व आर्थिक दृष्टया एकजिनसी असलेल्या परंतु कृत्रिम राजकीय सरहद्दींनी तुटक बनलेल्या गटाचा अथवा विभागाचा प्रश्न आहे. हा विभाग म्हणजे कोळसा व लोखंड ह्यांचा धंदेप्रधान भाग आहे. ऱ्हाइन व तिच्या उपनद्या, म्हणजे मोसेल, म्यूझ व शेल्ट हे ह्या विभागांतील दळणवळणाचे स्वाभाविक मार्ग आहेत. तीन्ही नद्यांच्या खोऱ्यांचा हा एक गट आहे. त्यांत वास्तविक पाहतां स्वाभाविक अशी कोणतीही एक सरहद्द नाही व असण्याचें कारण नाही; त्यांत कोळसा व लोखंड असलेले, उत्तर फ्रान्स, ऱ्हूर, बेल्जम, सार व लोरेन हे महत्त्वाचे भाग येतात. ह्यांतील मुख्य नदी जी ऱ्हाइन तिचा कांही भाग फ्रान्सची युद्धपूर्व सरहद्द बनवीत असून त्याला जोडून तिचा पुढचा भाग जर्मनीची सरहद्द बनवितो व पुढे मुखाशीं ती हॉलंडची नदी झालेली आहे; असा हा त्या एकजिनसी गटांत राजकीय सरहद्दींचा विचित्र गोंधळ दिसतो व हें असेंच बऱ्याच शतकांपासून सुरू आहे. या कृत्रिम सरहद्दींमुळे अनेक शतकांपासून झगडे सुरू आहेत. त्या सर्वांचा विचार करतां असें वाटतें की हा आर्थिक व भौगोलिक दृष्टया एकजिनसी असा एक स्वतंत्रच सुभा किंवा प्रांत बनवावा. म्हणजे बऱ्याचशा राजकीय कटकटी नाहीशा होतील.

आफ्रिकेंतील फ्रेंच राष्ट्र

जगांत फ्रेंच साम्राज्याचा विस्तार फार मोठा असून त्याचा नंबर दुसरा लागतो असें वर सांगितलेंच आहे. मागे सांगितलेल्या

कारणांमुळे देशांतील औद्योगिक प्रगतीच्या बाबतींत फ्रान्स जर्मनीच्या मागे राहिला हें खरें; परंतु आफ्रिकेंत व इतर ठिकाणीं त्याने मुलूख मात्र पुष्कळ काबीज केला. पहिल्या महायुद्धानंतर फ्रेंच साम्राज्य आणखी वाढलें. ब्रिटिश साम्राज्यांत स्वायत्त वसाहती व त्यांचे हितसंबंध खुद्द ब्रिटनशीं सलोख्याचे आहेत असें नाही. पण फ्रेंच साम्राज्यांत या भानगडी क्वचित्च आहेत. साम्राज्यांतील सर्व राज्यतंत्र पूर्णपणें फ्रेंच लोकांच्या हातीं आहे. आफ्रिकेंतील फ्रेंच साम्राज्यांत एकसंधपणा आहे. याचा विस्तार भूमध्यसमुद्रापासून तों थेट कांगो नदीच्या मुखापर्यंत आहे. अर्थात् यांत बेल्जम कांगोचा समावेश करणें एका अर्थानें बरोबर आहे. सहाराच्या पूर्वपश्चिम वाळवंटामुळे या अफाट साम्राज्याचे दोन तुकडे पडतात, हें भौगोलिक दृष्टया खरें आहे. यांना जोडणारी ट्रान्स-सहारा रेल्वेची अतिशय निकड आहे. व त्या दिशेने निरनिराळे प्रयत्न आणि योजना करून तो लोहमार्ग जवळजवळ पूर्ण करण्यांत आला आहे. मोटारी व विमानें यांची वाहतूक चालूच आहे. जर्मनीपासून आलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेंतून रेल्वेची योजना करावयाची असें ठरलें होतें. परंतु भरपाईच्या अभावीं ती साध्य झाली नाही. फ्रान्समधील खनिजसंपत्तीच्या धनाढय कारखानदारांना ही लोह-मार्गाची योजना मान्य आहे. या लोहमार्गाचें महत्त्व व्यापारी दृष्टया फारसें नसलें तरी यौद्धिक उपयोगाच्या दृष्टीने फार आहे. तसेंच ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही की गिनीच्या आखातावरील फ्रेंच आफ्रिकेंतील 'डाकार' हा एकच जिल्हा फ्रेंच सत्तेखालीच पण स्वतंत्र आहे. लंडन ते केपटाउन ह्या समुद्रमार्गावर, तसेंच युरोप, आफ्रिका ते दक्षिण अमेरिका ह्या विमानमार्गावर 'डाकार' हें अति महत्त्वाचें नाकें आहे. आफ्रिका ते दक्षिण अमेरिका ह्या वैमानिक दळणवळणांत ब्रिटिश, फ्रेंच व जर्मन ह्या तिघांचें दळणवळण सुरू आहे. या सर्वांचें

केंद्र डाकार हें असून तें ब्राझीलमधील अगदी पूर्वेच्या नाताळ ह्या शहरापासून विमानमार्गाने एक हजार मैलांच्या आंत आहे.*

भूमध्यसमुद्राचा दुवा

आफ्रिकेंतील मुलुखांत जाण्याकरतां भूमध्यसमुद्रांतून उत्तर दक्षिण म्हणजे मार्सेलीस ते अलजीर्स किंवा ट्यूनिस असा समुद्री मार्ग आहे. मादागास्कर, फ्रेंच इंडोचायना हे व अमेरिकेंतील लहानसहान भाग वगळल्यास, फ्रेंच साम्राज्य भौगोलिक दृष्टया एकसंधी आहे असें म्हणतां येईल. भूमध्य समुद्रांतील उत्तर दक्षिण मार्गाचें संरक्षण करणें हें फ्रान्सचें आद्यकर्तव्य होय. मागे सांगितलेंच आहे की ब्रिटनचा हिंदीमहासागराकडे जाण्याचा मार्ग भूमध्य समुद्रांतूनच आहे: दोघांही राष्ट्रांना आपापल्या मार्गाचें संरक्षण करणें भाग आहे व तेवढयाकरितां आपापल्या परी दोन्ही राष्ट्रें ते मार्ग आपल्या ताब्यांत किंबहुना आपल्या पंखाखाली आणण्याची धडपड करीत असतात. फ्रान्सचा दक्षिण किनारा भूमध्य समुद्राला लागून आहे. व आफ्रिकेंत मोरोक्को, अलजीर्स, ट्यूनिस हे फ्रेंचांचे मुलूख आहेत; अशा प्रकारें भूमध्य समुद्राचा बहुतांश पश्चिमभाग फ्रेंचांच्या स्वाधीन आहे, असें म्हटल्यास चालेल. तहानें सीरियावर फ्रेंचांनी पालकत्व मिळविल्यामुळे पूर्वेकडील भूमध्य समुद्रांतही फ्रान्सने आपला पाय रोविला आहे. जिब्राल्टर ब्रिटनच्या मालकीचें असल्यामुळे भूमध्य समुद्राच्या अटलांटिक प्रवेशद्वारावर ब्रिटनचा खडा पहारा आहे. तसेंच मध्यभागांत माल्टा असून पूर्वेस सायप्रस बेट ब्रिटनचेंच आहे. तांबडया समुद्रांत ब्रिटन सत्ताधारी असल्यामुळे सुएझवर देखरेख त्याचीच आहे.

---

*An Atlas of World Strategy : *Mowrer & Rajchman*, Faber, 1942 December.

पॅलेस्टाइनचें पालकत्वही ब्रिटनने मिळवल्यामुळे ब्रिटनची सत्ता पूर्व भूमध्य समुद्रांत तर श्रेष्ठ झाली आहे. शिवाय त्याने शेजारच्या इस्लामी राष्ट्रांशीं संगनमत करून आपल्या सत्तेचा मजबूतपणा, ‘अधिकस्याधिकं फलम्’ असा करून ठेवला आहे!

इंग्लंड व फ्रान्स यांची ओढाताण

भूमध्य समुद्रावरील सत्ता अबाधित राखण्यांत निरनिराळे राष्ट्रांतरीय प्रश्न निर्माण होतात. जिब्राल्टरच्या अगदी समोर ‘टँजियर’ हें बंदर आहे. ह्याचा कारभार स्पेन, ब्रिटन, फ्रान्स व इटाली ह्या चार राष्ट्रांच्या ताब्यांत आहे. टँजिअर आपल्या हुकुमतीखाली असावें अशी फ्रेंचांची मनीषा आहे. ब्रिटन व त्याच्या म्हणण्यास नाइलाजाने मान तुकविणारें स्पेन हीं दोन्ही राष्ट्रें फ्रेंचांच्या धोरणास प्रतिकार करतात. टँजिअर बंदराच्या लगतचा दोनशें मैलांचा टापू ‘स्पॅनिश मोरोक्को’ स्पेनच्या आधीन आहे. व त्यामुळे फ्रेंच सत्ता येथे बरीच निकामी ठरते.

अशा प्रकारें दोन साम्राज्यांचे राजकीय व औद्योगिक हितसंबंध परस्परविरोधी आहेत. कोणत्याही एका साम्राज्यामुळे या विभागांत असंख्य राष्ट्रांतरीय भानगडी व तज्जन्य युद्धाग्नि भडकण्याचा संभव आहे. हें कसें, ह्याचा जास्त खुलासा मागे आलाच आहे.

फ्रान्सचें अंतर्गत राजकारण

फ्रान्सला लोकसत्ताक राज्यपद्धतीचा जनक म्हणतात व तें खरें आहे; परंतु त्या काळांतील प्रजासत्ताकत्वाची कल्पना व आधुनिक कल्पना यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. जगांत अनेक प्रकारच्या शासनपद्धतींचे नमुने असून त्यांपैकी प्रत्येकांत

कांही दोष आहेत व ते तसे असावयाचेच. त्याचप्रमाणे उत्पन्न होणाऱ्या नवीन नवीन शासनविषयक विचारप्रणालिकांचे जुन्या शासनपद्धतींवर आघात वा परिणाम हे पण व्हावयाचेच. जेव्हा राष्ट्रीय तत्त्वनिष्ठ राजकारणपटूंचा देशांत तुटवडा पडतो, तेव्हा तें राष्ट्र व तो समाज, बाहेरून येणाऱ्या किंवा देशांत कोणत्याही कारणाने उत्पन्न होणाऱ्या भिन्न राजकीय प्रवाहांच्या दार्ढ्याप्रमाणे हेलकावे खात असतो. त्यांना आत्मसात करून जो टिकला तो समाज किंवा तें राष्ट्र टिकाऊ किंवा चिवट अथवा जिवट म्हटलें जातें. गेल्या पंचवीस वर्षांच्या कालावधींत फ्रान्समध्ये तो चिवटपणा राहिला असल्याचें वाटत नाही. त्यांचें राष्ट्रीय मन स्थिर नाही. इ. स. १९१८ ते १९३७ या १८ वर्षांच्या काळांत २३ शासक प्रधानमंडळें झालीं.* इंग्लंडमध्ये तेवढयाच काळांत ७ प्रधानमंडळें झालीं. 'नऊ पुरभय्ये–दहा चुली' असा राजकारणांत प्रकार झाला. ह्या अळवावरच्या पाण्यासारख्या शासनपद्धतीला लोक कंटाळले व हुकुमशाहीसारखी (Dictatorship) मजूरवर्गीय सत्ता असावी असा लोकमताचा वारा वाहूं लागला. एक प्रकारचें 'फॅसिझम'चें स्वरूप; पण भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्या कारखानदारांना हें कबूल नव्हतें. सारांश अनेक पक्ष झाले – सोशालिस्ट, कम्यूनिस्ट, फॅसिस्ट, रॅडिकल्स, पेपिस्ट, निओ सोशालिस्ट वगैरे अनेक पक्ष झाले. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नाही. प्रत्येक पक्षाचा पुढारी देशहिताच्या नांवाखाली पक्षहित साधूं लागला. व मग इ. स. १९३४ सालीं 'पॉप्युलर फ्रंट' (फॅसिझमशीं विरोध करणारा कम्यूनिस्ट, सोशालिस्ट वगैरे सर्व

---

* इ. स. १८७१ च्या 'तिसऱ्या रिपब्लिक' पासून आतापर्यंत १०६ प्रधानमंडळें झालीं. म्हणजे प्रत्येक प्रधानमंडळाचें आयुष्य सरासरीने ८ महिने पडलें.

लोकांचा मिश्र पक्ष) हा पक्ष तयार होऊन वाढीस लागला. पण इ. स. १९३८ सालीं सरकारविरोधी सशस्त्र बंडाचा कट (Cagoulards) उघडकीस आल्यावर हुकूमशाही धोरणाच्या प्रधानमंडळासाठी लोकांची ओरड झाली. या धामधुमीचा फायदा जर्मनीच्या प्रचारतंत्राने बरोबर घेतला. * दिखाऊ देशभक्त वा देशद्रोही यांच्या सुकाळाचीं व अखेरीस फ्रान्सच्या पराभवाचीं बीजें वरील परिस्थितींत सापडतात.

या राजकीय अनागोंदीमध्ये आणखी दोन महत्त्वाच्या गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. त्या अशा : स्पेनमधील राजकीय झगडयांच्या प्रयोगशाळेंत, रशिया, जर्मनी, इटली व फ्रान्स ह्या देशांतील राजकीय विचारसरणींची कसोटी लागली. किंबहुना स्पेनमधील युद्ध हें प्रस्तुतच्या महायुद्धाची नांदी होतें. दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे इ. स. १९३६ सालपर्यंतची फ्रान्समधील भांडवलशाही म्हणजे मध्यम वर्गांतून उत्पन्न झालेल्या भांडवलवाल्यांची चढाई होती. यामुळे व भौगोलिक परिस्थितीमुळे फ्रान्समधील धंदे कारखाने जर्मनी इंग्लंडप्रमाणे मोठे नसून ते पूर्व व ईशान्य बाजूला स्थाईक झालेले होते व आहेत.† कच्चा माल, रेल्वे, कालवे, नदी जलमार्ग, विमानमार्ग इत्यादि सर्व दृष्टींनी महत्त्वाचें व म्हणून त्या सर्वांचें केंद्र हें पॅरिस शहर होतें व असतें. अर्थात पॅरिस हें

* Commercial Travellers in Diplomacy : *Alfred Geir*, World Review, Sept. 1941.

† फ्रान्समधील धंदे कारखान्यांचीं शहरें — पॅरिस, मार्सेलिस, लॉयाँ, बोर्डो, नाइस व लिले हीं होत. हींच काय तीं मोठीं धंदेप्रधान शहरें व त्यांत सुमारें साठ लक्ष लोक राहतात. अर्थात् वाईट स्थितींत असणारा व क्रांतिप्रवण असा बराच मजूरवर्ग ह्याच भागांत असणार. तो सुमारें सहा लक्ष होता (१९३८).

फ्रान्सचें हृदय आहे. तेथे शिजेल तें देशांत शिजेल. तें पडलें की देश पडला. तेथे क्रांति झाली की देशांतही झालीच. याचा अर्थ, पॅरिसमधील घडामोड म्हणजे फ्रान्सचा इतिहास होय. या सर्व परिस्थितीचें पर्यवसान काय झालें? फ्रान्सचा जर्मनीकडून पाडाव!*

---

* The Blum Experiment and the Fall of France : *H. W. Ehrmann*, Foreign Affairs, Oct. 1941.

खंड तिसरा : नवीं राष्ट्रें व नवे प्रश्न

प्रकरण अकरावें

रशिया—युरोपांतील लाल बावटा

मजुरांचा गट

युरोप व आशियाच्या उत्तरेस असलेल्या लांबच लांब मैदानांतील विभागासंबंधीं आता आपणास विचार करावयाचा आहे. इतर गटांचा आपण आतापर्यंत विचार केला. प्रस्तुत गट इतर गटांहून भिन्न आहे. भौगोलिक दृष्टया हा गट एक आहे. रशियांतील प्रचलित राज्यघटना भांडवलशाहीवर उभारलेली नाही. राज्यव्यवस्थेंत मजूर आणि शेतकरी वर्गाचा संपूर्ण हात आहे. हें तिचें स्वरूप टिकाऊ आहे की नाही, तसेंच लेनिनने पुरस्कारिलेलीं तत्त्वें तशींच कां टिकवितां आलीं नाहीत किंवा अजूनही या मजूर गटांच्या विचारसरणींत कोणता उणेपणा आहे, वगैरे गोष्टींचा ऊहापोह या ठिकाणीं अप्रस्तुत असल्याने तो टाळला आहे.

लोहमार्गाच्या आविष्कारामुळेच रशियाची औद्योगिक प्रगति द्रुतगतीने झाली आहे. रशिया या देशाला व्यापारोपयोगी समुद्र नाही; जो कांही समुद्रकिनारा आहे तो दीर्घकाल हिमाच्छादित असतो. देशांतील नद्या या गोठणाऱ्या समुद्रांना किंवा भूभाग-वेष्टित सरोवरांना मिळतात. अतिविस्तार, मानवी व्यवहाराला

अडथळा करणारें हवामान, हजारों मैलपर्यंत पसरलेलें जंगल व दक्षिण सरहद्दीवर असलेली पर्वतराजि ह्या सर्व कारणांमुळे दळण-वळण होणें दुर्घट होतें. रशिया आधुनिक जगाच्या मागे होता ह्याचें हें एक कारण आहे. परंतु लोहमार्गामुळे रशिया औद्योगिक प्रगतिपथावर तीव्र गतीने मार्ग आक्रमूं लागला. प्रदेशाचा सपाटपणा हा लोहमार्गाच्या झपाटयाच्या वाढीला कारणीभूत झाल्याशिवाय राहिला नाही. इ. स. १९१४च्या पूर्वीचें रशियाचें क्षेत्रफळ युरोपच्या निम्में होतें व युरोपियन रशिया रशियन साम्राज्याचा $\frac{1}{4}$ हिस्सा होत होता; आणि रशियन साम्राज्य जगाच्या $\frac{1}{7}$ होतें. एवढया विस्तीर्ण प्रदेशाला जर संयुक्त संस्थानांप्रमाणें दोहीकडे व्यापारो-पयोगी समुद्रकिनारा असता तर या राष्ट्राचा इतिहास अगदी निराळाच झाला असता. अशा **समुद्रकिनाऱ्याचा अभाव हें रशियाच्या परराष्ट्रीय राजकारणाची दिशा ठरविणारें एक अचूक गमक आहे.** उत्तरेचा आर्कटिक महासागर हिमाच्छादित असल्याने व कांही काळ न गोठणारे काळा व बाल्टिक हे समुद्र भूभागवेष्टित असल्याने रशियाला परदेशाशीं वाहतूक स्वैरपणें करतां येत नाही. त्यामुळे देशाची आर्थिक उन्नति लांबणीवर पडली.

रशियाच्या इतिहासावर भूगोलाचा परिणाम

कोणत्याही देशाचा इतिहास तेथील भौगोलिक परिस्थितीवर बऱ्याच अंशाने अवलंबून असतो, या नियमाला अनुसरून येथील इतिहास बनत गेला. आरंभकालापासून दक्षिणेंत कीव्ह व उत्तरेस नोव्होगोराड (सध्याचें गोर्की) हे भाग संस्कृतीचीं केंद्रें होतीं. परकीय केंद्रांशीं यांचें दळणवळण नेहमी चाले; परंतु परकीय समृद्धीचीं केंद्रें जसजशीं अवनतीस लागलीं तसतसा याही प्रांतांचा

ऱ्हास होत गेला. अकरा व बारा या दोन शतकांत कीव्ह वैभवसंपन्न संस्थान होतें. या काळांत बायझँटियम येथील साम्राज्याशीं नीपर नदीमार्गें व काळ्या समुद्राच्या मार्गानें व्यापार चालत असे. बायझँटियम साम्राज्याशीं सतत वाहतूक असल्यामुळे तेथील धर्म, कला व राहणी ह्यांचें प्रतिबिंब कीव्ह संस्थानांत स्पष्टपणें दिसून येत असे. पुढे तुर्कांच्या आक्रमणामुळे बायझँटियम साम्राज्य नष्ट झालें व त्याचबरोबर त्याच्याशीं संलग्न असलेलें कीव्ह संस्थानही नष्टप्राय झालें.

उत्तरेकडील नोव्होगोराड संस्थानाचा मध्ययुगीन कालांत 'हंसा लीग' च्या बंदरांशीं फार मोठ्या प्रमाणांत व्यापार चालत असे व त्यामुळें हें राष्ट्र वैभवसंपन्न व समृद्धिशाली बनलें होतें. परंतु कालांतराने युरोपच्या व्यापाराचा ओघ बाल्टिक समुद्रांतून निघून पश्चिमेस अटलांटिक सागराकडे वळला, हंसा लीगचा व्यापार पूर्णपणें बसला व पर्यायाने नोव्होगोराड संस्थानही नष्ट झालें!

तेराव्या शतकांत रशिया–सैबेरियाच्या अफाट मैदानावर चेंगिझखानाने एकसूत्री राज्य स्थापिलें होतें. या काळांत दळणवळणाचें साधन एकमात्र होतें व तें घोडा हेंच होतें. घोड्यांच्या साहाय्याने मोगलांनी सर्वत्र वाहतूक कायम ठेवली व आपला राज्यशकट व्यवस्थितपणें चालविला होता. यानंतर एवढ्या अफाट प्रांतावर लोहमार्गाची वाहतूक चालू झाली.

कालगतीनें मोगल साम्राज्य नष्ट झालें, तरी उत्तर व मध्य आशियांत आणि युरोपांतील रशियावर मोगल सरदारांचें स्वामित्व राहिलें. पुढे मास्कोच्या आसपासच्या संरक्षित टापूंतील लोकांनी रानटी मोगलांना मागे रेटण्याला प्रारंभ केला. अशा प्रकारें 'मस्कोव्ही' संस्थान निर्माण झालें व याच संस्थानांतून रशियन साम्राज्य फोफावलें! आर्क्टिक–समुद्रस्थ आर्केंजेल बंदरांतून

मस्कोव्ही राज्याचा व्यापार इंग्रजांशीं चालू झाला. हा व्यापार सोळाव्या शतकांत भरभराटीस आला. पन्नास वर्षांपूर्वीच्या जपान देशाप्रमाणें पीटर दी ग्रेट याने आपल्या देशाच्या पुनरुत्थानाला प्रारंभ केला. आपल्या देशाचा तोंडवळा युरोपप्रमाणें असावा याकरितां त्याने आटोकाट प्रयत्न केले. समाजरचना आणि राज्यशासन युरोपियन पद्धतीवर बसविलें. अर्थात् युरोपशीं सतत संबंध ठेवण्याकरितां त्याला बाल्टिक समुद्र आपल्या मालकीचा असावा असें अपरिहार्यतेने वाटूं लागलें. त्याने स्वीडनचा पराभव करून बाल्टिक समुद्र आपलें घरआंगण केलें व आपली राजधानी नीव्हा नदीचे काठीं पीटर्सबर्ग (सध्याचें लेनिनग्रॅड) येथे वसविली. नीपर नदीमुळे रशियाने बायझांटियमच्या पावलावर पाऊल टाकलें, तर व्होल्गा नदीमुळे आशियाचें प्रतिबिंब रशियावर पडलें. व नंतर नीव्हा नदीमुळे रशियाचा तोंडवळा युरोपप्रमाणें झाला. अशा प्रकारचे फेरफार व उत्क्रांति रशियन राष्ट्रपुरुषांत झाली व होऊं लागली. पीटरच्या काळापासून तों झारशाहीच्या काळापर्यंतच्या इतिहासांत असें दिसून येतें की **रशियाची सारी धडपड आपल्याला खुला समुद्र असावा एवढ्याकरितां होती, व अजूनही त्याचें तेंच ध्येय आहे.** अठराव्या शतकांत रशियाने बाल्टिक किनारा आपल्या राज्यास जोडला आणि दक्षिणेस तुर्क लोकांची उचलबांगडी काळ्या समुद्राच्या उत्तर किनाऱ्यावरून केली

दरम्यानच्या काळांत रशियांतील कोसॅक लोकांनी व फरच्या (मऊ पिसें) व्यापाऱ्यांनी पूर्वेकडील रानटी लोकांस पिटाळलें. सोळाव्या शतकाच्या आरंभीं यूरालची पर्वतश्रेणी ओलांडून पलीकडे त्यांचीच वस्ती झाली. सतराव्या शतकांत कोसॅक लोकांच्या वसाहती बैकल सरोवरापर्यंत पोचल्या आणि अखेरीस त्यांनी पॅसिफिक महासागराचा किनाराही गाठला! एवढा मोठा प्रांत काबीज

करण्याकरितां लढाया कराव्या लागल्या व तेथील रानटीपणाचें जीवन मोडून तेथें शेतीभाती करून पीक काढावयाची स्थितीही निर्माण करावी लागली. अशा प्रकारें रानटी लोकांस आलताई पर्वताच्या जंगलांत हाकून यूराल ते पॅसिफिक महासागरापर्यंत स्लाव्ह लोकांनी वसाहती वसविल्या.

रेल्वेमुळे अर्वाचीन युगाचा प्रारंभ

रशियावर जरी श्वेतवर्णीय युरोपियन लोकांचें साम्राज्य होतें तरी तें राज्य मध्ययुगीन काळांतील राज्याप्रमाणेंच होतें. देश पूर्णपणें शेतीवर निर्भर असून शेतीचीं साधनें अतिशय जुनाट पद्धतीचीं होतीं. देशाच्या विस्तीर्णपणामुळे कोणतीही सुधारणा करणें कठीणच होतें. एकोणिसाव्या शतकांत कांही लोहमार्ग बांधण्यांत आले तरी निसर्गसंपन्न देशांत मालाची पैदास व औद्योगिक वाढ जशी व्हावी तशी येथे झाली नाही. गत महायुद्धाच्या आरंभीं देखील हा निसर्गसंपन्न देश युरोपच्या मानाने अतिशय मागसलेला होता ! यानंतर रेल्वे बांधण्याचें कार्य जसें वाढूं लागलें तसतशी या देशांत औद्योगिक प्रगति होऊं लागली.

देशांत स्वतंत्र शेतकरी व मजूर वर्ग निर्माण झाला. रेल्वेमुळे नवीन औद्योगिक क्षेत्रें तयार होऊं लागलीं. वर्षांतील बाराही महिने वाहतूक अविरोध होऊं लागली. दक्षिणेच्या युक्रेनमधील धान्य उत्तरेकडील हिममय प्रदेशांत सुलभ रीतीने पोचवितां येऊं लागलें. उत्तरेकडील इमारती लाकूड व जंगली पदार्थांची पोच दक्षिणेकडे झपाट्याने होऊं लागली. त्याचप्रमाणें मध्य व पूर्व भागांतील कोळसा आणि लोखंड नेमक्या ठिकाणीं पोचविणें सुकर झालें. तुर्कस्थानांतील किंवा अमेरिकेंतील कापूस आणून गिरण्यांचे कारखाने निर्माण होऊं लागले. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे रशिया समष्टिरूपाने कार्यप्रवण झाला. विस्ताराच्या मानाने

रशियांत लोहमार्ग फारच कमी आहेत व तेही एकाच रुंदीचे नाहीत. पक्क्या मोटारच्या सडकाही कमी आहेत. अलीकडे युक्रेन व बाल्टिक संस्थानें ह्या महत्त्वाच्या भागांत पुष्कळ रेल्वे व मोटार रस्ते झाले आहेत; तसेंच रशियन तुर्कस्थानांत बरेच लोहमार्ग झाले असून ट्रान्स सैबेरियन रेल्वे हा मार्गही दुहेरी करून मँचूरियन रेल्वेला शह देण्यांत आला आहे. लढाईच्या जरुरीच्या दृष्टीने दळणवळणाच्या साधनांत रशिया अजूनही अडचणींत आहे.

रशियाप्रमाणे सैबेरियाचीही औद्योगिक प्रगति फार झपाट्याने होऊं लागली. मास्को ते व्हलॅडिव्होस्टॉक हें सहा ते सात हजार मैलांचें अंतर रेल्वेमुळे कमी झालें आहे असें भासूं लागलें व त्याबरोबर रशियाला खुल्या समुद्रांत व्हलॅडिव्होस्टॉक हें सुंदर बंदर लाभलें. हें शहर म्हणजे रशियाचा फार पूर्वेचा अत्यंत महत्त्वाचा व मजबूत दरवाजा आहे. जशी रेल्वेमुळे तशी विमानमार्गांमुळे सैबेरियाची अतिशय प्रगति झाली आहे. उत्तरेच्या गोठणाऱ्या समुद्रांतून आगबोटमार्ग व भूभागावरून विमानमार्ग ह्यांचीं पुष्कळ नाकीं झालीं आहेत व त्यामुळे गोठणाऱ्या समुद्राशेजारीं महत्त्वाचे धंदे सुरू झाले आहेत.

चिरस्मरणीय राज्यक्रांति

इ. स. १९१७ सालीं रशियांत एक महत्त्वपूर्ण राज्यक्रांति झाली. त्यामुळे झारशाहीला मूठमाती देण्यांत आली व मजूर वर्गाने आपलें सरकार स्थापन केलें. सैबेरिया व इतर भाग हे एक प्रकारें झारशाहीच्या काळांतील वसाहती होत्या. अर्थात् त्यांतील लोक मागसलेले, अनिष्ट वा कनिष्ठ असे समजले जात. परंतु ह्या राज्यक्रांतीने रशियांतील श्रीमंत वा उच्च आणि सैबेरियांतील गरीब वा कनिष्ठ या दोघांनाही सारखे लेखून त्यांचा राजकीय दर्जा सारखा

केला. ही ह्या राज्यक्रांतींतील एक महत्त्वाची घटना झाली आहे. ही शासनपद्धति भांडवलशाहीवाल्या राष्ट्रांना पसंत नव्हती. किंबहुना ती त्यांच्या विचारप्रणालीविरुद्ध असल्याने त्या राष्ट्रांनी तिला मान्यता देण्याचें लांबणीवर टाकलें. जपान व पश्चिम युरोपांतील मुख्य मोठीं राष्ट्रें यांनी इ. स. १९२४ मध्ये व अमेरिकेने तर इ. स. १९३३ मध्ये या शासनपद्धतीला राजकीय दृष्टया मान्यता दिली!

मजुरावलंबी सरकार युरोपांतील भांडवलशाही राष्ट्रांना मुळीच नको आहे, म्हणून रशियाच्या नवीन सरकारचा वेळींच बीमोड केला गेला नाही तर सर्व युरोपभर ती साथ फैलावेल या हेतूने तिला गाडण्याचे अनेक प्रयत्न प्रथम करण्यांत आले. परंतु रशियाच्या भौगोलिक परिस्थितीने मजूर सरकारचें पूर्ण संरक्षण केलें. रशियाला बाहेरून पुरवठा होण्याची नाकेबंदी करण्यांत आली व सामर्थ्याचाही उपयोग करण्यांत आला. मजूरवर्गाने आपली राजधानी मास्को ह्या समुद्रकिनाऱ्यापासून आंत दूरवर असलेल्या शहरीं नेली. येथपर्यंत शत्रुसैन्यास येतां येतां त्याची सर्व शक्ति व उत्साह क्षीण होतो. मास्कोच्या महदंतरामुळे नेपोलियनचा पराभव झाला हें इतिहासज्ञांस अवगतच आहे. त्याचीच पुनरावृत्ति आता होण्याचा संभव अधिक असल्यामुळे कोणाही राष्ट्राने तसा प्रयत्न केला नाही. कोणत्याही दिशेने येणाऱ्या शत्रूला मास्को घेणें यामुळे कठीण आहे.

रशियाची नाकेबंदी यशस्वी होणेंही कठीण आहे. एवढें खरें की रशियाची समुद्री नाकेबंदी करणें मात्र थोडें सोपें आहे; कारण रशियाला समुद्र फार मर्यादित आहे. जीवनाच्या आत्यंतिक आवश्यक जिनसांचा पुरवठा रशियांत आहे. शांतताकालीन जीवनाला लागणाऱ्या वस्तूंकरितां रशिया केव्हाही दुसऱ्याच्या तोंडाकडे न पाहणारा असल्यामुळे नाकेबंदीचा तादृश उपयोग कांहीच झाला नाही व होणार नाही.

सोव्हिएट सरकारवरचें हें गंडांतर टळल्यानंतर सरकारपुढे महत्त्वाचे प्रश्न दत्त म्हणून उभे होते. रशियांतील कोटयवधि लोकांना भरपूर अन्नवस्त्र मिळून त्यांची राहणी श्रेष्ठ व्हावी हें एक महत्त्वाचें कार्य सरकारपुढे होतें. देशांतील तज्ज्ञ लोकांनी कोठेकोठे कोणत्या कच्च्या मालाची निपज किती प्रमाणांत होऊं शकते याचें आविष्करण सुरू केलें. यानंतर मुद्देसूद योजना आखण्यांत आल्या. त्या पंचवार्षिक योजना म्हणून प्रसिद्ध आहेत. पहिल्या इ. स. १९२८ च्या पंचवार्षिक योजनेंत रशियाला लोखंडी, पोलादी सामानासारख्या मुख्य धंद्यांच्या बाबतींत धंदेप्रधान बनवावयाचें होतें. त्या योजनेप्रमाणे जरी रशियाचें बरेंच काम झालें तरी तो इंग्लंड, जर्मनी, अमेरिका ह्यांच्या दर्जाचा धंदेप्रधान बनला नाही. इ. स. १९३२ च्या दुसऱ्या पंचवार्षिक योजना शेती व इतर धंदे ह्यांच्या बाबतींत रशिया स्वसमर्थ बनावा यासाठी होत्या; परंतु उद्दिष्ट पूर्ण झालें नाही. सामुदायिक शेती सर्रास सुरू करतां आली नाही.

पहिल्या महायुद्धापूर्वीच्या रशियांत रेल्वे अपुऱ्या होत्या. तीन-चतुर्थांश रशियाला रेल्वे स्टेशन सरासरी पंचवीस मैल लांब पडेल असें सरासरी मान होतें. युरोपांत मोडणाऱ्या देशाला रेल्वे इतक्या अल्प प्रमाणांत असाव्या हें एक लांछनच होय. पक्क्या रस्त्यांची हीच परिस्थिति. याकरितां सरकारने रेल्वे व सडका बांधण्याचें कार्य हातीं घेतलें. महत्त्वाचीं ठिकाणें रेल्वेने जोडण्यांत आलीं. लांब-लांबचीं औद्योगिक क्षेत्रें रेल्वेने जवळ जवळ आणण्यांत आलीं. सैबेरियांत उरालच्या पूर्वेस धंदेप्रधान भागांत रेल्वेचें जाळें वाढलें. टर्क–सिब रेल्वे (रशियन तुर्कस्थानांतील रेल्वे) ट्रान्स सैबेरियन रेल्वेला जोडल्यामुळे जसे रशियन तुर्कस्थानांत धंदे कारखाने उत्पन्न होऊन वाढले, त्यांतील बहुसंख्य मुसलमान रशियांतील साम्यवादी गटाशीं निगडित झाले व अफगाणिस्थान आणि भारतवर्ष ह्यांच्या

डोक्याशीं रशियाचें भांडवलशाहीविरोधी जळजळीत राजकार खेळूं लागलें आणि त्याचा परिणाम कांही दिवस अफगाण रा कारणावर दिसलाही; तशीच स्थिति, किंबहुना त्यापेक्षाही महत्त्वाच परिणाम, 'बाम' (बैकल-अमूरिया) रेल्वे तयार करून झाला. ह लोहमार्ग बैकल सरोवराच्या पश्चिमेच्या प्रांतांतील धंदेप्रधान भाग तील मुख्य ट्रान्स सैबेरियन रेल्वेपासून निघून लेना, येनिसी ह्यांच्य खोऱ्यांतून थेट पॅसिफिक महासागरावरील अमूर नदीच्या मुखाश मिळतो. त्यामुळे या फार दूरच्या भागांतील लोखंड, कोळसा, ते व इतर अनेक पदार्थ रशियन राष्ट्रप्रपंचांत उपयोगांत ये आहेत. त्या भागांत धंदे निघून वस्ती वाढत आहे. पण राजकी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे मँचूरिया व मँचूरियन रेल्वे—ज पूर्वी 'चायनीज ईस्टर्न रेल्वे' या नांवाने रशियाच्या मालकीच होती—ह्यांच्या व्यापारी, राजकीय व यौद्धिक महत्त्वाला या नवी रेल्वेमुळे मोठा शह बसला. शिवाय ट्रान्स सैबेरियन रेल्वे दुहे केली आहे ती निराळीच. या दोन्ही गोष्टींमुळे रशियाचा पॅसिफि तट पूर्वीप्रमाणें ढिला व मागसलेला राहिला नाही.

उद्योगधंद्यांची व कारखान्यांची वाढ द्रुत गतीने करण्याकरित विद्युच्छक्तीची आवश्यकता तीव्रतेने भासूं लागली व तिचा भरपू उपयोग सुरू झाला. जुनाट पद्धतीची वैयक्तिक शेती करण्याचे सोडून यंत्राच्या साहाय्याने सामुदायिक शेती सुरू झाली. पूर्वीच अफाटपणामुळे अगम्य असलेली देशाची भौगोलिक परिस्थिति आजच्या घटकेस यांत्रिक साधनांमुळे अतिशय लाभप्रद झाली आहे

पण वाहतुकीच्या साधनांची उणीव अजूनही सैबेरियांत फा भासत आहे. सैबेरियाचें क्षेत्रफळ संयुक्त संस्थानांच्या दुप्पट आहे एवढया मोठया विस्तीर्ण प्रदेशांत मुख्य ट्रान्स सैबेरियन रेल्वे असून तिच्या बाजूबाजूने काळ्या जमिनीच्या पट्टयांत अफा

शेती वाढत आहे. अलीकडे वैमानिक दळणवळण सर्व सैबेरियाभर झालें आहे. तसेंच आर्कटिक महासागरांतून पॅसिफिक महासागरांत कांही महिने तरी आगबोटीचें दळणवळण सुरू झालें आहे व पॅसिफिक किनाऱ्यावर अमेरिकेच्या दरवाजासमोर महत्त्वाचे विमानतळही झाले आहेत!

रशियाची निसर्गसंपन्नता

आता जगांतील मोठ्या औद्योगिक गटांत रशियाचें कोणतें स्थान आहे व भविष्यकाळीं होण्याचा रंग दिसतो याबद्दल थोडासा ऊहापोह करूं. अमेरिकेच्या खालोखाल किंवा त्याच्या तोडीच्या दर्जाचें स्थान रशियाला पुढे मागे मिळण्याचा फार संभव आहे. कोळशाचा आणि लोखंडाचा पुरवठा भरपूर आहे. मास्कोपासून अडीचशें मैलांवर असलेल्या कुर्स्क प्रांतांत लोरेनच्या सहापट लोखंड सापडतें. युरोपमध्ये लोरेनच्या खाणी अव्वल दर्जाच्या समजण्यांत येतात. संयुक्त संस्थानांच्या बरोबरीने या देशांत पेट्रोल सापडतें. इमारती लाकूड तर या देशांत फार मोठ्या प्रमाणांत आहे. किंबहुना मऊ लाकडांचें जगांतील सर्वांत मोठें जंगल ह्याच देशांत आहे. युक्रेनच्या मैदानांत गहू अप्रतिम व भरमसाट निपजतो. या काळीच्या विभागांत वर्षांतून दोनदा मुबलक पिकें अनायासें काढतां येतात, एवढेंच नव्हे तर आज युक्रेन हा रशियाचा सर्वांत जास्त असा धंदेप्रधान म्हणून महत्त्वाचा असा भाग आहे. या भागांत रशियन साम्राज्यापैकी शेंकडा ६९ पेक्षा ज्यास्त लोखंड, ९०% पेक्षा ज्यास्त पोलाद, ७३% पेक्षा ज्यास्त ॲल्युमिनम, ६०% पेक्षा ज्यास्त कोळसा निघतो. तसेंच रशियांतील महत्त्वाचे शस्त्रास्त्रांचे कारखाने, ट्रॅक्टर्स व रासायनिक धंदे ह्याच भागांत आहेत.

इतकें करून हवापाणी, सुपीक जमीन, जंगल व खनिज संपत्ति म्हणजे कांही साम्राज्य नव्हे; परंतु यांवर साम्राज्याचा मजबूत पाया बसवितां येतो. व्यवस्थित योजना आखून साम्राज्य निर्माण करणें हें रशियाचें आद्यकर्तव्य होय. सध्या तरी रशिया याच कार्यांत गुंतला आहे. गंमत अशी आहे की नफ्याचा मलिदा लुबाडणारी स्वार्थसाधू धनाढ्य भांडवलशाही यांत नाही. सर्व योजना, उद्योगधंदे, कारखाने, जनतेच्या स्वाधीन असून त्यांच्याच लाभाकरितां ह्या गोष्टी होत आहेत. रशियाच्या पंचवार्षिक योजनांचा मूळ हेतु राष्ट्र स्वयंपूर्ण बनावें हा होय. खालील माहितीवरून स्वयंपूर्ण राष्ट्र म्हणून आणि भावी धंदेप्रधान राष्ट्र म्हणून रशियाचें जगांतील स्थान लक्षांत येईल.

उत्पादक जगांत रशियाचा क्रम*

गहू	१	लोखंड	१ अमेरिकेबरोबरीनें
बार्ली	१	पोलाद	२ अमेरिका १ ला जर्मनी ३ रा
कापूस	३	सोनें	३
वाख (flax)	१	सिमिट	१
बीट	१	मोटारी	३
घोडे	१	„ लॉरी	१
गुरेंढोरें	२ (भारतवर्ष १ला)	„ ट्रॅक्टर	१
विद्युच्छक्ति	१	मॅंगनीज	१
कोळसा	३	फॉस्फेट्स	२
पेट्रोल	२		

* रशियाची पैदाशीच्या बाबतींत इ. स. १९३९–४० सालची तुलना इतर भांडवलशाही राष्ट्रांशीं त्यांच्या १९३७–३८ सालाशीं केली आहे. क्वचित प्रसंगीं ती १९४१ पर्यंतचीही आहे. Russia, the Industrial Mammoth, The Basic Strength–Serial Map Service–Aug. 1941 and U. S. S. R. Speaks for Itself, Vol. I and II, Lawrence Wishart, 1941.

या आकड्यांवरून बहुतेक सर्व बाबतींत रशिया पहिला दिसतो खरा. ही त्याची स्थिति दुसरी पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्यानंतरची आहे हें खरें. परंतु ही त्याची स्थिति अशीच कायम टिकाऊ आहे किंवा इतर भांडवलशाही राष्ट्रें रशियाच्या मागेच आहेत किंवा राहतील असा अर्थ वरील तुलनेचा नसून रशिया आपली प्रगति किती झपाट्याने करीत आहे व स्वयंपूर्ण होण्यासाठी तो कशी, केवढी व कोणत्या बाबतींत धडपड करीत आहे, एवढेंच दिग्दर्शित करण्याचा या तुलनेचा हेतु आहे. तसेंच वरील आकड्यां-वरून रशिया पहिला दिसत असला तरी लोकसंख्येच्या जरुरीच्या मानाने अथवा वाढत्या यंत्रोपयोगाच्या मानाने तो पहिलाच आहे किंवा स्वयंपूर्ण आहे असेंही नाही. जगांतील महा-राष्ट्रांची वरील सर्व बाबतींत त्यांच्या गरजेच्या दृष्टीने जी तुलना पुढे (परिशिष्टांत) दिली आहे त्यावरून त्या त्या राष्ट्रांची वास्तविक स्थिति वा कुवत ध्यानांत येईल. खाद्य पदार्थ व विणकामाचे पदार्थ ह्या बाबतींत रशिया स्वयंपूर्ण आहे. टंगस्टिन व सुरमा ह्या बाबतींत तो चीनवर अवलंबून आहे. शिवाय निकेल व गंधक ह्या बाबतींतही तो पराव-लंबी आहे. पेत्सामोची (फिन्लंडच्या उत्तर टोकाशीं) लढाई निकेल-साठी होती. रशिया चीनला मदत करतो त्याचें हें एक कारण आहे. लाकूड व मंगल हे पदार्थ तो निर्गत करूं शकेल इतके पुष्कळ आहेत.

रशियाची मुख्य व बरीच संपत्ति मध्यभागीं उरल पहाडांत आहे व तो समुद्रापासून दूर युद्धकालांत सुरक्षित असा एक धंदे-विभाग बनत आहे. तसाच आणखी एक धंदेप्रधान टापू (कुझ्ने-टस्क टापू) फार दूर सैबेरियांतील मुख्य रेल्वे पाशीं आहे. अलीकडे ह्या जोडभागाला जास्त महत्त्व येत आहे. ह्यांत लोखंड बरेंच आहे. शें. ८७% शिसें, रशियांतील बहुतेक सर्व जस्त व निकेल आणि ९६% तांबें ह्या भागांत आहे! शिवाय तेलही बरेंच आहे. पण

सध्या जास्त महत्त्वाचे व पुढारलेले असे रशियांतील धंदेप्रधान विभाग मुख्यतः त्याच्या पश्चिम व दक्षिण भागांतच आहेत. लेनिनग्रॅड, मास्को, टूला, (युक्रेनसह) डॉनेट्झ व बाकू हे ते विभाग आहेत. हे सर्व विभाग पश्चिम व दक्षिण बाजूच्या समुद्रांना जवळ असल्याने व्यापारी महत्त्वाचे आहेत. तसेंच ते दाट लोकवस्तीच्या भागांतही आहेत, पण युद्धकालांत, दक्षिणेकडून (जसें इराण, तुर्कस्थान, वा इराक यांमधून) व पश्चिमेकडून होणाऱ्या वैमानिक हल्ल्यांच्या सहज आटोक्यांत ते आहेत. या दोन्ही कारणांमुळे त्या बाजूंच्या राष्ट्रांच्या हालचालींवर व त्यांतील परराष्ट्रीय राजकीय कारस्थानांवर, डोळ्यांत तेल घालून रशिया लक्ष ठेवीत असतो. अर्थात्‌च त्याचें राष्ट्रांतरीय राजकीय धोरण कांही अंशाने वरील परिस्थितीवर अवलंबून असतें.

रशियाचा घुमेपणा व परराष्ट्रीय राजकारण

गेल्या पंचवीस वर्षांतील, म्हणजे राज्यक्रांतीनंतरच्या काळांतील परराष्ट्रीय राजकारणाचें मूलभूत उद्दिष्ट 'सुरक्षितता'—शेजारी राष्ट्रांपासून सुरक्षित कसें राहतां येईल ही विवंचना—हें आहे; तसेंच पश्चिम व मध्य युरोपांतील सर्व राष्ट्रांशीं व्यापारी संबंधाची जरूरी हें पण एक त्याच राजकारणाचें उद्दिष्ट आहे. व्यापारी संबंध कायम ठेवण्याच्या उद्दिष्टाबरोबर व्यापारी हमरस्त्यावरील ताबा किंवा ते वापरण्याची पूर्ण मुभा ही गोष्टही आलीच. याचा अर्थ बाल्टिक समुद्रावरील सत्ता, काळ्या समुद्रांतील वर्चस्व, दार्दानेलिसच्या सामुद्रधुनींतील अनिर्बंध प्रवेश, इत्यादि राजकीय कारस्थानाच्या गोष्टी ओघानेच रशियाच्या परराष्ट्रीय राजकारणांत येतात.

जर्मनीसारख्या आधिभौतिक संस्कृतीने श्रेष्ठ असणाऱ्या व कच्च्या मालासाठी बुभुक्षित असणाऱ्या राष्ट्राचा डोळा रशियाच्या

भौतिक समृद्धीवर असल्याने रशियाला त्याचें व त्याच्या सारख्या राष्ट्रांचें भय वाटतें व त्यांच्या राजकीय डावपेचांपासून सुरक्षित असावें ही रशियाची साहजिक इच्छा असते व आहे. इ. स. १९२९ च्या लिट्व्हिनॉव्ह करारापासून तो इ. स. १९३७ साल-पर्यंतचे बाल्टिक राष्ट्रें, बल्गेरिया, रुमानिया, हंगेरी, तुर्कस्थान, इराण, चीन, मंगोलिया वगैरे सरहद्दीवरील देशांशीं वेळोवेळीं केलेले अनाक्रमणाचे करार (Non-agression pacts) हे सर्व वरील विधानाला पुष्टिदायक पुरावे आहेत. इ. स. १९४१ सालीं जपान-बरोबर केलेल्या तटस्थतेच्या करारांत (Neutrality pact) देखील सुरक्षिततेच्या भावनेची छाया आहेच.

रशियाचें दुटप्पी धोरण व दुसरें महायुद्ध

याच राजकीय घटनांच्या विरुद्ध रशियाने पोलंड, रुमानिया, बाल्टिक राष्ट्रें (लिथुॲनिया, एस्टोनिया, व लॅटविया) आणि फिनलंड यांच्याशीं केलेले अनाक्रमणाचे करार मोडल्याचेंही दिसतें. या गोष्टींवरून बाह्यतः रशियाचा जरी बेविश्वासूपणा किंवा भांडवलशाही राष्ट्रांप्रमाणे साम्राज्यतृष्णा दिसत असली, तरी त्या कृतींचें वास्तविक स्वरूप तसें नसून त्यांत अंतःस्थतः पश्चिमे-कडील राष्ट्रांच्या, विशेषतः जर्मनीच्या, अंतःस्थ हेतूबद्दलचा अवि-श्वास व म्हणून भीति आणि स्वसंरक्षणाची दक्षता व काळजी ह्या गोष्टी दिसतात व हें विधान त्या त्या राष्ट्रांबरोबरच्या तहांच्या कलमांतील यौद्धिक महत्त्वाच्या गोष्टीवर दिलेल्या जोरावरून स्पष्ट होतें.

रशिया स्वसंरक्षणाची काळजी फक्त वरील प्रकारच्या गोष्टी करून वहातो असें नसून तो आणखीही उपाय योजतो. ते असे. पश्चिमेकडील भांडवलशाही राष्ट्रांत तसेंच जर्मनी इटालींतही

'कम्युनिझम'चा प्रचार फार धूर्तपणाने सुरू ठेवतो; तसाच दुबळ्या व मागसलेल्या देशांत वा राष्ट्रांतही तो तसाच प्रचार करवितो. त्याचप्रमाणे राजकीय महत्त्वाच्या कांही 'स्टंट्स्' करूनही (जसें:–जिनीव्हाच्या राष्ट्रसंघांत सामील होऊन शस्त्रसंन्यास परिषदेंत पुढाकार घेणें, स्पेनमध्ये जनता पक्षाला मदत करणें, आयत्या वेळीं ब्रिटनविरुद्ध जर्मनीशीं इ. स. १९३९ सालीं तह करणें, जपानशीं तह करून चीनला मदत तशीच चालू ठेवणें वगैरे) तो वरील हेतु साध्य करूं पाहतो. परंतु या सर्व उपायांनी त्याचा स्वसंरक्षणाचा प्रश्न कायम सुटलासा व सुटेलसा दिसत नाही; किंबहुना इंग्लंड विरुद्ध जर्मनी, व जपान विरुद्ध चीन ह्यांना लढत ठेवून त्यांना हतबल करण्याचें जें पाताळयंत्र रशियाने आतापर्यंत साधलें आहे, तें आंगलट न आलें म्हणजे रशियाने कमाविलें म्हणावयाचें! कांही झालें तरी जर्मनी–रशिया ह्यांचें बिनसलेंच पाहिजे व तसें घडलेंही* (२२ जून इ. स. १९४१).

रशियाला वर सांगितलेल्या राष्ट्रांपासून स्वतःचें संरक्षण करण्याची काळजी वाटते तशी त्या व इतर राष्ट्रांशीं व्यापार चालू ठेवण्याचीही काळजी घ्यावी लागते. कारण तसें केल्याने जसा थोडासा आर्थिक फायदा होतो तसा धंदेप्रधान राष्ट्रांच्या व्यापारी-राजकीय जाळ्यांत आपलाही धागा अडकविण्यास सापडतो. इतकें

---

* "युरोपची बिघडलेली व बिघडणारी घडी कायमची दुरुस्त करण्यासाठी एकच उपाय असून तो म्हणजे रशियांतून 'साम्यवादा'चें कायमचें उच्चाटन करणें हा होय." पहिल्या महायुद्धापासून आतापर्यंत बहुतेक राजकारणी मनांत, विशेषत: युद्धाधिकाऱ्यांत, हे विचार खेळत आले आहेत. जनरल कार्ल हाकूमन हा या विचारांचा ज्वलज्जहाल पुरस्कर्ता होता. Russia and Germany · *by X. Foreign Affairs* Jan. 1942.

करूनही रशिया सैन्य व आरमार हीं ज्यास्त सुसज्ज ठेवण्याचा चंग बांधून तशी धडपडही करीत आहे.*

रशिया व महा-राष्ट्रें

(१) **रशिया व जर्मनी.** या दोन्ही राष्ट्रांचा गत इतिहास पाहतां, त्यांच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करतां, आणि त्यांच्या सध्याच्या राष्ट्रीय मनोविकासाचें निरीक्षण करतां हीं दोन्ही राष्ट्रें शेजारीं शेजारीं गुण्यागोविंदाने नांदतील असें दिसत नाही. कारण (१) जर्मनीला स्वीडन नॉर्वेमधील उत्कृष्ट लोखंडासाठी बाल्टिक समुद्री मार्ग अनिर्बंध हवा आहे; पण रशियाने त्या समुद्रांतील महत्त्वाचीं बेटें व नाकीं (जसें आलंड, डागो, ओसेल, इत्यादि बेटें, व लिबौ, विंडो इत्यादि नाकीं) स्वतःकडे घेऊन त्या मार्गाला शह देऊन ठेवला होता. (२) तसेंच आग्नेय यूरोप म्हणजे डॅन्यूबचें खोरें व बाल्कन टापू हा भाग जर्मनी जरी आपल्या राजकीय अथवा व्यापारी पंखाखाली घालूं शकला तरी, अथवा बर्लिन–बगदाद मार्गाचीं सुखस्वप्नें (म्हणजे इराण–इराकी तेल व हिंदुस्थानचा व्यापार काबीज करण्याचीं सुखस्वप्नें) फलद्रूप झालीं, अथवा आणखी कांही तशींच स्वप्नें पडत राहिलीं तरी, या दोन्ही परिस्थितींत जर्मनीला काळ्या समुद्रावर वर्चस्व हवेंसें वाटतें व तें रशियाला खपणार नाही. (३) रशियाची वाढती धंदेप्रधानता, जर्मनींतील कारखान्यांची यंत्रसामग्री उत्पादन करण्याची चढती कमान, तसेंच ब्रिटन व अमेरिका ह्या दोघांची रशियाच्या बाजारांतील जर्मनीविरुद्ध वाढती चढाओढ, या सर्व कारणांमुळे जर्मनीचा रशियामधील पडता व्यापार. (४) रशिया व जर्मनी ह्यांचा परस्पराविषयींचा पूर्ण अविश्वास व परस्परांच्या ध्येयाविषयींची चीड, व

* *Stalin's* Speech, March 10, 1939.

चुरस. (५) रशियाच्या अंतर्गत राजकारणांतील न बसलेली घडी आणि (६) बाल्टिक राष्ट्रें व इतर कांही भाग ह्यांतील जाति व वंशभेद ह्यांमुळे त्यांची रशियाशीं उत्पन्न होणारी नाराजी, ह्या सर्व कारणांमुळे रशिया जर्मनीचा बेबनाव होण्यास वेळ लागणार नाही व ही गोष्ट सध्याच्या रशिया जर्मनीच्या जपून जपून पडणाऱ्या राजकीय डावांवरून स्पष्ट होत आहे. शिवाय वर सांगितलें आहेच की ब्रिटन-जर्मनीला लढत ठेवण्याचा डाव रशियाने घडवून आणला ही गोष्ट जर्मनीच्या ध्यानांत आलेली नाही असें नाही.* इ. स. १९४१ च्या जूनमध्ये रशियावर हल्ला चढवितांना आपल्याला रशिया वेढीत आहे व करार मोडीत आहे हे आरोप जर्मनीने पुढे आणलेच. पण आपला डोळा पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत होता त्याप्रमाणें रशियाच्या युक्रेन ह्या भागावर आहे व त्या धोरणाने आपण डाव टाकीत आहों असें मात्र जर्मनी कबूल करण्यास तयार नाही !

(२) **रशिया व जपान.** (१) जपान-रशियाच्या सुताबद्दलही गोष्ट वरीलप्रमाणेच आहे. चीनला मदत चालू ठेवून मँच्यूक्युओ-सैबेरिया ह्या सरहद्दीवर, तसेंच मंगोलियाच्या सरहद्दीवर जपानी सैन्य अडकून राहील अशी परिस्थिति निर्माण करून ठेवून रशिया चिनी-जपानी युद्ध घडवून आणण्याचा बनाव बनवूं शकला, ही गोष्टही जपानच्या लक्षांत आलेली नाही असें नाही. (२) शिवाय इ. स. १९२२-१९२५, व १९३१-३२ ह्यावर्षीं पूर्व सैबेरिया घेण्याचे जपानने प्रयत्न केले होते व ते युरोपांतील व चीनमधील परिस्थितीमुळे साधूं शकले नाहीत ही गोष्टही वरील निष्कर्षाला पुष्टि देणारी आहे. (३) तसेंच, साघलिन व त्याच्या

---

* Russian Foreign Policy, *Barbara Ward*, Oxford University Press, 1940, Page 26.

शेजारचा समुद्र ह्यांतील समुद्री उत्पन्नाचे पदार्थ रशियापेक्षा जपानी जीवनक्रमांत फार महत्त्वाचे आहेत व त्यामुळेच रशिया-जपानचे मासेमारीच्या हक्कासंबंधीं वारंवार खटके उडतात ही गोष्ट आणि (४) 'कम्युनिझम' विरुद्ध असणारी जपानी राष्ट्रीय मनोभूमिका, ह्या सर्व गोष्टी, उभय राष्ट्रांच्या संबंधांत वर जी विचारसरणी व्यक्त केली तिला पोषकच आहेत. आर्थिक दृष्टया विशेषसा फायदेशीर नसला तरी यौद्धिक महत्त्वाच्या दृष्टीने पूर्व सैबेरिया जपानला उपयोगी आहे.

(३) रशिया व ब्रिटन. रशिया व ब्रिटन ह्यांचा बेबनाव व्हावयाचीं मुख्य कारणें व्यापारी अथवा आर्थिक संबंधाचीं नसून राजकीय संबंधाचीं आहेत. रशिया हिंदुस्थानच्या डोक्याशीं आहे. सिंक्यांग हा काश्मीरच्या उत्तर हद्दीवरील चीनचा प्रांत आहे. तो बळकावण्यासाठी रशियाचे प्रयत्न सुरू आहेत व त्यांत त्याला कांही यश आलें आहे. त्या प्रांतांतील लोक धर्माने इस्लामी आहेत. त्यांच्या शेजारीं पश्चिमेस रशियन तुर्कस्थानांत त्याच धर्माचे तुर्क, उझबेग वगैरे रशियन राष्ट्रसंघांत सामील असलेले लोक असून ते रशियन घटनेप्रमाणे स्वतंत्र आहेत. इ. स. १९३४ सालच्या त्या (सिंक्यांग) भागांतील मुसलमानी बंडांत चीनला पाठिंबा देऊन जरी रशियाने त्या मुसलमानांना ताळ्यावर आणिलें, आणि तसें करण्यांत, चीनची जपानविरोधी सत्ता आपल्या पगड्याखाली ठेवणें, तसेंच रशियन तुर्कस्थानांतील मुसलमानांचें एक स्वतंत्र राष्ट्र बनूं न देणें हे जरी रशियाचे हेतु होते, तरी ब्रिटिशांच्या तिबेट मार्फत होणाऱ्या चीनमधील आक्रमणाला एक काटशह म्हणून आपला प्रवेश करून ठेवणें, हाही हेतु त्या वेळच्या रशियन राजकारणांत होता. या धोरणाला प्रति काटशह म्हणून ब्रिटिशांनी अफगाणिस्थानांत

आपलें बस्तान बसविलें होतें व तें थोडें बहुत आहेही. ब्रिटिशांशीं बिनसण्याचीं आणखी दोन संभवनीय स्थळें आहेत; पण तींही दूरान्वयाचींच आहेत. तीं अशीं:—(१) इराणी आखातावरील इराण व अरबस्तान यांतील तेलाचीं क्षेत्रें ह्यांत ब्रिटिशांचे व्यापारी संबंध गुंतलेले आहेत व दक्षिण इराणमध्ये आणखी कांही ब्रिटिश भांडवल गुंतलेलें आहे. या दोन्ही कारणांमुळे इराणांत, विशेषत: दक्षिण भागांत, ब्रिटिशांचें थोडें वर्चस्व आहे. 'इराक' हा देश 'मँडेट' म्हणून इंग्रजांच्या ताब्यांत होता, खेरीज मोसल, किर्कुक ह्या ठिकाणच्या तेलाच्या खाणी इंग्रजांच्या ताब्यांत आहेत; म्हणून इराक इंग्रजांच्या प्रभावक्षेत्रांत होता. गेल्या चार पांच वर्षांपासून हें पारडें फिरत चाललें होतें. अलीकडे तेथे जर्मनानुकूल सूर वाहूं लागला होता. रशियाच्या कॉकेशस व कॅस्पियन ह्यांच्या आसपासच्या तेलाच्या भागाशेजारींच वरील दोन्ही देशांतील तेलाच्या क्षेत्राचा पट्टा आहे व या देशांशीं रशियाचा व्यापारी संबंध आहे. या भागांतील ब्रिटिशांचे हितसंबंध रशियन हितसंबंधांशीं तितके विरोधी नाहीत; तरी हे देश पूर्व भूमध्यसमुद्रावरील ब्रिटिशांच्या हितसंबंधाच्या प्रदेशांच्या दृष्टीने यौद्धिक महत्त्वाचे आहेत आणि म्हणून रशियाशीं खटका उडण्यास कारणीभूत होणारे आहेत. तुर्कस्थानामधील ब्रिटिशांचें जड पारडें, दार्दानेलिस ह्या द्वाराच्या दृष्टीने रशियाशीं संघर्ष घडवून आणणारें कारण आहे. जर्मनीची आग्नेय युरोपावरील वक्र किंवा लोभी दृष्टि ब्रिटन व रशिया ह्यांना भीतिदायक वाटत असल्याने हीं दोन्ही राष्ट्रें (रशिया व ब्रिटन) आपापल्यापरी परस्परविरोधी डाव खेळत असतात. याचा अर्थ असा की, काळ्या समुद्रावरील रशियाचें वर्चस्व ही गोष्ट, तसेंच आग्नेय युरोपांतील राजकारणांत यश मिळवून काळ्या समुद्रावरील राजकारणांत होऊं शकणारा जर्मनीचा वर-

पगडा* ही गोष्ट, ह्यांपैकी एकही गोष्ट ब्रिटनला नको आहे.† गेल्या शंभर वर्षांतील युरोपांतील ब्रिटिश राजकारणाचा इतिहास पाहिला तर असें दिसतें की, जेव्हा जेव्हा मध्य युरोपांतील राजकारण विशेष भरास येऊं लागलें, आणि त्यामुळे दार्दानेलिस वा सुवेझ ह्यांना धोका आहे असें ब्रिटनला वाटलें, तेव्हा तेव्हा ब्रिटनने रशियाला किंवा काळ्या समुद्रावरील दुसऱ्या राष्ट्राला मदत देऊन तें राजकारण हाणून पाडिलें आहे.

(४) **रशिया व इस्लामी राष्ट्रगट.** काळ्या समुद्रापासून तों हिंदुस्थानापर्यंत रशियाच्या दक्षिण हद्दीला इस्लामी राष्ट्रें चिकटून आहेत. ट्रान्स कॉकेशियांत, तसेंच कॅस्पियन सरोवराच्या पूर्वेकडील भागांत इस्लामी गट (कझाक, तुर्क, उझ्बेग, ताज़िक वगैरे) रशियन राष्ट्रसंघाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून स्वतंत्रपणें नांदत आहे व ह्या भागाची औद्योगिक भरभराट होत आहे. **रशियन राष्ट्रसंघाच्या अकरा विभागांपैकी सहा विभाग इस्लामी संस्कृतीचे आहेत.** हे भाग खनिज संपत्तीच्या दृष्टीने रशियाला महत्त्वाचे आहेत. त्याशिवाय लोकर, कापूस, मका इत्यादि कच्च्या मालाच्या पैदाशीच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहेत. असें असल्याने ते सर्व रशियन राष्ट्रसंघाबाहेर फुटून निघून स्वतंत्र राष्ट्र बनूं न शकतील अशा परिस्थितींत सोविएट संघाचे चालक त्यांना ठेवतात. अशा ह्या विभागांना लागूनच काळ्या वा पूर्व भूमध्य समुद्रापासून तों तहत मँचूरियाच्या जवळपासपर्यंत इस्लामी संस्कृतीचेच लोक आहेत.

---

* Mediterranean Problems—*W. Eastword*—Nelson, 1940.

Britain and the Mediterranean-*K. Williams*, Newness, *1940*.

† Living Space—the Story of South Eastern Europe *Stoyn Pribi Chevich*–Heinemann, 1940.

म्हणजे रशियाची जवळ जवळ बहुतेक दक्षिण सरहद्द इस्लामी लोकांशीं निगडित झालेली आहे, असें म्हटल्यास चालेल.

जगांत एकंदरीने ३० कोटि मुसलमान आहेत. त्यांपैकी सुमारें सोळा कोटि रशियाशीं शेजारसंबंधाने राहत आहेत.* म्हणजे जगांतील सुमारें अर्ध्या मुसलमानांचा शेजारसंबंध रशियाशीं असून रशियाच्या राष्ट्रांतरीय व्यापारापैकी सुमारें $\frac{1}{5}$ व्यापार ह्या देशांशीं चालतो.† आर्थिक दृष्टीने विचार करतां पश्चिम किंवा वायव्य आशियांतील स्वतंत्र इस्लामी राष्ट्रांचा गट महत्त्वाचा आहे व त्यांत रशियापेक्षा इंग्लंडचाच जास्त हात आहे. जर्मनीचा डोळाही बऱ्याच वर्षांपासून या प्रदेशावर आहे. सारांश, हा रशियाचा शेजारी भाग वरील युरोपियन राष्ट्रांच्या राजकीय कारस्थानांच्या दारूचें जणूं कांही कोठारच अशा तऱ्हेचा आहे.

(५) रशिया व जगांतील इतर राष्ट्रें. रशियन राष्ट्रसंघ जन्मास येऊन सुमारें तीस वर्षें झालीं. तथापि जगांतील मोठ्या राष्ट्रांशिवाय इतर राष्ट्रांनी अद्यापिही राजकीय संबंध रशियाशीं जोडले नाहीत. मोठ्या राष्ट्रांनीही राजकीय संबंध जोडले ते देखील गेल्या पंधरा वर्षांतच. अमेरिकेने तर इ. स. १९३३ सालीं राजकीय संबंध सुरू केला! यावरून रशियन राष्ट्रसंघाबद्दल जगांतील राष्ट्रांची राजकीय दृष्टि काय असावी याचा अंदाज बांधतां येतो. साम्यवादाचा (Communism) प्रसार हें रशियन राजकारणाचें

* पश्चिम व मध्य आशियांत सुमारें पांच कोटि, चीनच्या साम्राज्यांत रशियाशेजारीं सुमारें तीन कोटि, आणि हिंदुस्थानांत सुमारें साडे सात कोटि मुसलमान आहेत.

† Soviet Union Year Book, 1937.

एक अंग आहे. दुबळीं मागसलेलीं राष्ट्रें अथवा भांडवलशाहीमुळे त्रस्त झालेला मजूरवर्ग हे गट त्याच्या जाळ्यांत सापडतात; तथापि सामान्यत: जगांतील बहुजनसमाज साम्यवादी विचारसरणीच्या आहारीं जाण्याला अद्यापि तरी तयार नाही. या सर्व कारणांमुळे इतर सर्व समाज त्याकडे साशंक दृष्टीनेच पाहतात.

प्रकरण बारावें

इटली–भूमध्य समुद्रांतील कैदी

इटली व त्याचें साम्राज्य

सर्व खंडांत युरोप हें लहान खंड, पण स्वतंत्र देशांची संख्या मात्र त्यांत सर्वांहून जास्त. रशिया वगळल्यास बाकीचें युरोपखंड आमच्या देशाच्या पोटांत मावेल एवढें आहे. आणि एवढ्या लहानशा भागांत सुमारें सत्तावीस स्वतंत्र राष्ट्रें आहेत! ह्या दृश्याचा विचार केला म्हणजे आश्चर्यच वाटतें. कारण क्षेत्राचा विचार केला तर कांही राष्ट्रें भातुकलीच्या खेळांतील वाटतात. पण त्यांची परदेशांतील कर्तबगारी पाहिली तर मन आश्चर्यानें थक्क होतें. पण त्या सर्वांची आपापसांत तुलना केली तर निराळेंच दृश्य दिसतें. तें असें—स्थूलमानानें असें म्हणतां येईल की ह्या सत्तावीस राष्ट्रांपैकी ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी व इटली (इटलीची या गटांत गणना करण्याचीं कारणें पुढे येतीलच) एवढींच स्वयंप्रभ राष्ट्रें असून बाकीचीं सर्व राष्ट्रें आर्थिक वा राजकीय दृष्टया या चार राष्ट्रांच्या तालावर नाचणारीं बाहुलीं आहेत असें आढळतें. या राष्ट्रांच्या राजकीय सरहद्दी भिन्न काळीं भिन्न होत्या, व पुढेही भिन्न होतील; पण तीं वरील चार ओजस्वी समाजगोलकांच्या कक्षेबाहेर राहूं शकलीं नाहीत, असें इतिहास सांगतो.

पण प्रस्तुत, इटलीचा विचार करावयाचा असल्याने, त्याकडे वळूं.

रोमन साम्राज्यरूपाने चमकणारा इटली येथे विचारांत न घेतल्यास आजच्या भौगोलिक मर्यादांनी दृश्यमान होणारें इटली हें राष्ट्र जरी बाकीच्या राष्ट्रांप्रमाणे ओजस्वी रूपाने चमकलेलें व चमकणारें दिसलें नाही, तरी तें आतापर्यंत वर उल्लेखिलेल्या कर्तबगार राष्ट्रांच्या व समाजांच्या आर्थिक अथवा राजकीय वर्चस्वाच्या आहारीं गेलेलें असल्याचें आढळत नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे भूमध्यसमुद्रसंबंधी युरोपिअन राजकारणाच्या दृष्टीने इटलीचें भूमध्यसमुद्रांतील स्थान महत्त्वाचें आहे. फ्रान्स व इंग्लंड ह्यांच्या समुद्री दळणवळणाचे मुख्य मार्ग भूमध्यसमुद्रांतून आहेत. पण इटलीचें मध्यवर्ती स्थान त्या दोघांनाही शह देणारें आहे. शेजारच्या एड्रियाटिक समुद्रांत इटलीचें पूर्ण वर्चस्व आहे. पूर्व भूमध्यसमुद्रांतील ब्रिटिश वर्चस्वाला शह देणारीं **डोडेकॅनिस** बेटें इटलीच्या ताब्यांत असून माल्टा ह्या भूमध्यसमुद्रांतील मध्यवर्ती व अति मजबूत ठिकाणाला शह देणारीं ट्यूनिसच्या शेजारचीं **पॅंटेलेरिया** बेटें इटलीच्याच ताब्यांत आहेत. त्यामुळे सिसिली-ट्यूनिस हा समुद्री मार्गही इटलीच्या ताब्यांत येतो. शिवाय स्पेनच्या बॅलिॲरिक बेटांत इटलीचें यौद्धिक ठाणें व तळ आहेच. ह्या दोहोंमुळे फ्रेंचांच्या फ्रान्स-आफ्रिका ह्या उत्तर दक्षिण मार्गाला उत्तम शह इटली देऊं शकतें.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे इटलीने गेल्या पंधरा वीस वर्षांत मध्ययुरोपांत राजकीय व आर्थिक तह करून आपलें वजन वाढविलें आहे, ही होय !

पहिलें महायुद्ध व इटलीचें वाढतें प्रस्थ

युरोपांतील पहिल्या महायुद्धानंतर इंग्रज व फ्रेंच ह्यांच्या

मानाने इटलीला तहापासून विशेष फायदा झाला नाही. त्याला उत्तर हद्दीजवळचा ट्रेंटिनो व टायरोल, ट्रीस्ट बंदर असलेलें पूर्वेचें इस्ट्रिया द्वीपकल्प व जुगोस्लाव्हियाच्या किनाऱ्यावरील झारा, लागोस्टा, हीं यौद्धिक महत्त्वाचीं बेटें मिळालीं. या थोडया लाभामुळे इटली असंतुष्टच राहिला. पुढे जबरदस्तीने इटालीने फ्यूम हें बंदर घेतलें.

जसा जर्मनीला व्हर्साइलचा तह डाचत होता, तसा इटलीला हा कमीपणा डाचत होता. हा कमीपणा भरून काढण्यासाठी इटलीने प्रथमतः जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया ह्या जित राष्ट्रांशीं राजकीय व आर्थिक महत्त्वाचे तह केले. इ. स. १९२२ सालीं डोडेक्यानिस बेटें—वस्ती ग्रीक लोकांची असूनही—व ऱ्होडस् बेट हीं (एकदा परत दिलेलीं) पुनः आपल्या राज्याला जोडलीं. इ. स. १९२८ सालीं टँजियर ह्या जिब्राल्टरच्या विरुद्ध बाजूस असणाऱ्या नाक्याच्या कारभारांत हात शिरकावून घेतला. इ. स. १९३६ सालीं अबिसीनियावर चढाई करून तो देश घशांत टाकला. ह्या नवीन प्रदेशांची भर पडल्याने इरिथ्रिया, अबिसीनिया व सोमालिलँड एवढा इटालियन साम्राज्याचा एक गट तांबडया समुद्रावर एडनच्या सभोवारच्या ब्रिटिश राजकारणाला शह देणारा असा एक भाग बनला. त्यांत आणखी अरबस्थानांतील तांबडया समुद्रावरील येमेन ह्या प्रांताच्या राजाला हाताशीं धरून इस्लामी गटाला आपल्या तर्फेचा करण्याची खटपटही त्याने केली. इ. स. १९३७ सालीं लायबियांतून फिरत असतांना मुसोलिनीने 'इस्लामचा संरक्षक' असल्याची घोषणा केली ती वरील हेतूनेच होय. यांत इंग्रजांविरुद्ध उत्तर आफ्रिकेंतील मुसलमानांचें पाठबळ मिळावें ही इच्छा होती. त्याप्रमाणे ट्रिपोली येथे राजपुत्र इस्माइल करमनली ह्याने इस्लामची तरवार मुसोलिनीला नजर केली. शिवाय इ. स. १९३७ सालीं युगोस्ला-

व्हियाशीं आर्थिक तह करून एड्रियाटिक समुद्राची दुसरी बाजू इटलीने आपल्या तर्फेने पक्की केली! तसेंच इ. स. १९३६–३७ सालच्या स्पॅनिश युद्धांत जर्मनीप्रमाणें इटलीनेही आपली राजकीय असंतुष्टता, साम्राज्यपिपासा व रशियाविषयीचा द्वेषपूर्वक तिटकारा दाखविला होताच. त्याला अनुसरून इ. स. १९३६ सालींच इटाली–जर्मनीचा—'ॲक्सिस पॅक्ट' गट्टीचा तह—झाला व लगेच पुढे आक्रमणाला सुरुवात झाली. जर्मनीने ऱ्हाइनलँड घेतलें व इटलीने अल्बेनिया (इ. स. १९३९) घशाखाली घातला. याशिवाय इटलीचे आर्थिक हितसंबंध ग्रीस, तुर्कस्थान व ईजिप्त ह्यांमध्ये गुंतलेले आहेतच. सुवेझ कालव्याचा व्यवहार पाहणारी एक फ्रेंच कंपनी असून तिच्या ३२ सदस्यांपैकी १० इंग्रज व बाकीचे फ्रेंच आणि इजिप्शिअन आहेत. त्या कालव्यांतून इटलीचा व्यापार इंग्रजांच्या खालोखाल चालतो. पण त्या कंपनींत इटलीचा प्रतिनिधि नाही नि हिस्सा नाही. तो असावा असा इटलीचा हट्ट चालू आहे. ॲबिसीनिया घेतल्यावर कांही इटलीचीं माणसें घेण्याचें ठरलें. पण युद्ध सुरू होतांच तें सर्व थांबलें. सारांश, अशा रीतीने इटलीने मोठ्या युक्तीने आपला राजकीय दर्जा वाढविला व तें अलीकडे पहिल्या दर्जाचें राष्ट्र गणलें जाऊं लागलें होतें. खऱ्या अर्थाने व योग्यतेने तें तसें आहे का नाही हें निश्चितपणे ठरण्याचा काल पुढे आहे.

इटलीची भौगोलिक परिस्थिति व इतिहास

(१) भौगोलिक दृष्टया भूमध्यसमुद्राच्या राजकारणांत इटलीचें स्थान किती महत्त्वाचें आहे हें वर पाहिलेंच आहे; पण याच्या उलट त्यांत दोषही आहेत. एक तर इटलींतील महत्त्वाचीं बहुतेक सर्व शहरें समुद्री हल्ल्याच्या कक्षेंत आहेत. यामुळे ब्रिटिशां-

सारख्या मोठ्या व उत्कृष्ट आरमारी सत्तेशीं शत्रुत्व उत्पन्न झालें तर टिकाव लागणें कठीण. (२) इटलीचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे उत्तरेकडे असलेलें पो नदीचें खोरें हा होय. त्यांत इटलींतील सुमारें निम्मी वस्ती आहे. धंदे कारखान्यांचीं जीं काय थोडीशीं शहरें आहेत तीं याच भागांत आहेत. व तीं शेजारच्या सामर्थ्यवान शत्रुराष्ट्रांच्या विमानी हल्ल्याच्या सहज कक्षेंत आहेत. (३) धंदे-प्रधान बनण्यासाठी लागणारे जे कोळसा, लोखंड, तेल हे मूल घटक आहेत, त्या बाबतींत इटली अगदीच दरिद्री आहे. जरी त्याला पुष्कळ विद्युच्छक्ति उत्पन्न करतां येईल व त्यावर कांही कारखाने चालूं शकतील अशी परिस्थिति उत्तरभागीं आहे, तरी तेवढ्यामुळे कोळसा व तेल ह्यांचें आधुनिक यंत्रयुगीन काळांतील काम भागूं शकत नाही. अर्थात् जो कोणी कोळसा पुरवील त्याच्या संगनमतानेच इटलीला राहणें फायद्याचें होईल. यामुळे इटलीचें धंदेप्रधानत्व वा स्वातंत्र्य लंगडें आहे. इटली आतापर्यंत फ्रान्सशीं व इंग्लंडशीं फटकून वागण्यास कचरत असे यांतील इंगित हेंच होतें. (४) इटलीने अल्बेनिया त्यांतील तेलासाठी घेतला,* तर अबिसीनियांतील अनुमानित खनिज संपत्तीसाठी तोही प्रांत घशांत टाकला होता. (इ. स. १९४१ सालीं इंग्रजांच्या मदतीने तो पुनः मूळच्या राजाला मिळाला.) तो प्रांत घेण्याचीं दुसरीं कांही कारणें वर सांगितलींच आहेत. तरी वाढत्या लोकसंख्येला पोसण्यासाठी कांही अंशाने वाळवंटी लायबियापेक्षा तो जास्त उपयोगी होईल ही आशाही होतीच. दुसरें कारण असें की इ. स. १९३१ सालीं सर्व जगाला जो आर्थिक हलाखीचा धक्का बसला तो इटलीलाही बसला. इटली मूळचा

---

* इटलीला लागणारें शें. ७८ तेल परदेशांतून येतें. अल्बे-नियांतून शें. १ देखील तेल मिळत नाही.

गरीब. तो स्वयंपूर्ण नाही. यामुळे त्या काळांत देशांत अनेक प्रकारें जी अस्वस्थता माजली होती तिला समाधानकारक रीतीनें कह्यांत ठेवण्याचें मुसोलिनीला जमलें नाही. म्हणून अशा अस्वस्थ सामाजिक मनाला कलाटणी देऊन गुंतवण्यासाठी म्हणून अबिसीनियावरील चढाई करण्यांत आली.* तथापि त्याशिवाय जास्त महत्त्वाचें कारण मुसोलिनीची साम्राज्यतृष्णा हें होतें. हें कसें तें पुढे पाहूं.
(९) अटलांटिक पॅसिफिक ह्यांसारख्या व्यापाराला मोकळ्या अशा जलभागाकाठी इटली हा नसून भूपरिवेष्टित अशा भूमध्य समुद्राच्या मध्यभागीं इटली आहे व त्याच्या दक्षिण बाजूला तर बराच वाळवंटी प्रदेश आहे. इतर बाजूंला व्यापार व्यवहार या बाबतींत हातपाय पसरविण्याजोगी परिस्थिति नाही. या सर्व प्रकारच्या पारिस्थित्यिक अडचणींमुळे इटली हें पहिल्या प्रतीचें बलशाली राष्ट्र होणें व झालें तरी टिकून राहणें कठीण. पुरातन काळचा भूमध्यसमुद्र आज सर्व विश्व नाही. त्यामुळे प्राचीन काळच्या ज्ञात जगाचें रोम हें जरी केंद्र होतें तरी आजच्या जगाचें तें केंद्र होणें शक्य नाही! सारांश, इटलीची भौगोलिक परिस्थिति ही त्याचा इतिहास बनविण्यास बऱ्याच अंशीं कारणीभूत आहे.

इटली व वसाहतवाद

लोकसंख्येची न पोसली जाण्याइतकी वाढ,† खाण्याच्या वा इतर कच्च्या मालाचा देशांतल्या देशांत अपुरेपणा ह्या दोन

* Modern Europe Explained, 1938, p. 65.

† इटलीमध्ये दरसाल सुमारें ३॥ ते ४ लक्ष लोकांची वाढ होते व तिची सोय देशांत लागत नाही, असें इटलीचें म्हणणें आहे. जपानच्या मानाने ही वाढ मंद आहे. वास्तविक पाहतां लोकसंख्येची

(पुढे चालू)

मुख्य सबबी इतर साम्राज्यपिपासु समाजांप्रमाणे इटलीही पुढे करतो व त्याप्रमाणे त्यांसाठी तो साम्राज्य वाढवीत आहे. वर सांगितल्याप्रमाणे इटलीने इ. स. १९११–१९३६ ह्या पंचवीस

(मागील पानावरून पुढे चालूं)

फाजील वाढ होते किंवा काय, तसेंच आर्थिक पायावर उभारलेला आधुनिक समाज, विशेषतः पाश्चिमात्य समाज, सदरहू प्रश्न सध्या योजीत असलेल्या आर्थिक, राजकीय व सामाजिक उपायांनी समाधानकारक रीतीने सोडवील किंवा नाही, हा विषय स्वतंत्र आहे. त्याचा विचार या ठिकाणीं नको आहे. ती वाढ देशाच्या क्षेत्रफळाशीं तुलना करून व उठित (लागवडी खालील) भूप्रदेशांशीं तुलना करून, अशी दोन पद्धतींनी दाखवतात व त्यावरून प्रश्नाची गंभीरता ठरविण्याचा प्रयत्न करतात. पण त्या पद्धति कशा सदोष असतात ही गोष्ट पुढील आकड्यांवरून स्पष्ट होते.

देश	दर चौरस मैलीं लोक	उठित जमिनीच्या दर चौ. मैलास वस्तीचें प्रमाण
बेल्जम	७०२	१७९३
नेदर्लँड्स	६२७	२२३३
ग्रेट ब्रिटन	४६८ (खुद्द इंग्लंड ७४२)	५९६
खास जपान	४३७	२४१८
जर्मनी	३६६	५७८
इटाली	३५८	४७७
फ्रान्स	१८२	२९४
अमेरिका	३६	१००

वरील आकड्यांवरून लोकसंख्यावाढीच्या बागुलबोवाची हातचलाखी कशी करतां येते हें दिसेल. साम्राज्यपिपासु समाज ह्याच्या पुढे जाऊन 'जर जगाच्या इतर भागांतून लागणारा कच्चा माल मिळवतां येत असेल तर खुशाल लोकवाढ होऊं द्यावी!' असें म्हणतात. (Peace and Colonial Problems, National Peace Council,

(पुढे चालूं)

वर्षांत साधलें तेथे आफ्रिकेंत आपले हातपाय पसरले. पण खाण्याचा प्रश्न मात्र सुटला नाही. कारण तेवढ्या अवकाशांत केवळ तीस हजार इटालियन आफ्रिकेंत येऊन राहिले ! असें असून इटली उघडपणे एडनच्या समोरील फ्रेंच सोमालीलँड मधील जिबूटी व टयूनिस ह्यांची आणि प्रच्छन्न रीतीने कॉर्सिका बेट व पश्चिम सरहद्दीजवळचा * नाइस हा फ्रेंच भाग ह्यांची मागणी करतो. ह्या

(मागील पानावरून पुढे चालू)

London, 1935 p. 8.) पण जर्मनीने आपली बेसुमार लोकवाढीची तक्रार आपल्या राष्ट्रापुढे ठेवितांना इतर महत्त्वाच्या देशांतील लोकसंख्यादार्ढ्य आपल्यापेक्षा किती तरी कमी आहे हें दाखविण्यासाठी त्यांचें वसाहतीचें क्षेत्रही जमेस धरून जर्मनीइतकी दाट लोकसंख्या इतर कोठेच नाही असें सिद्ध केलें व त्या योगें वसाहती पण कां हव्यात हेंही पुढे मांडिलें! हें सिद्ध करतांनाही क्षेत्राच्या आकड्यांची बरीच हातचलाखी केल्याचें दिसतें. Nazi Primer : *Childs*, Harper, London, 1938, pp. 200–204.

तसेंच धंदेप्रधान साम्राज्यपिपासु राष्ट्रांना खरोखरच लोकसंख्येची वाढ अतिशय नडत आहे असें वाटत असतें तर त्यांनी लोकसंख्येच्या वाढीला प्रोत्साहन दिलें नसतें. हिटलर, मुसोलिनी किंवा जपान हे तर उघड उघड वाढीला प्रोत्साहन देतात; तसेंच गेल्या तीस चाळीस वर्षांपासून इंग्लंड, फ्रान्स, बेल्जम वगैरे देशांची लोकसंख्या कमी न होतां उलट वाढतच आहे असें आढळतें. अर्थात् या सर्व धोरणाचा अर्थ काय? व संगति कशी लावावयाची ?

* इ. स. १९३८ मध्ये फ्रान्समध्ये मोठा संप होणार असल्याचें जाहीर होतांच ती फ्रान्समधील क्रांतीची वेळ समजून त्याच दिवशींच्या इटालींतील राजकीय बैठकींत 'टयुनिशिया, कॉर्सिका, नाइस व सॅव्हॉय' अशी ओरड करण्यांत ते भाग ताबडतोब घेण्याची गर्भित सूचना देण्यांत आली. त्याचा प्रतिध्वनि राष्ट्रांत जागोजाग उठला. पण फ्रान्सने तो संप लवकरच मोडला व वरील क्रियेला प्रत्युत्तर म्हणून 'सार्डिनिया, सिसिली व ट्रिपोली' अशी ओरड फ्रान्समध्ये उठली !

त्याच्या साम्राज्यपिपासूपणाचा आणखी जास्त विचार करूं.

(१) वर सांगितलेंच आहे की इटलीला वाढत्या लोकसंख्येची अडचण भासत असती तर मुसोलिनीनें अनेक प्रकारचीं आमिषें दाखवून लोकसंख्यावाढीला उत्तेजन दिलें नसतें. (२) दुसरें असें की सर्व इटालियन वसाहतींत इ. स. १९३१ सालपर्यंत सुमारें एक हजार इटालियन शेतकरी स्थायिक झालेले असून इरिथ्रिया-मध्ये फक्त ८४ होते. खास अबिसीनियांत इटालियन लोकांना वसाहत करून राहतां येईल का नाही ह्याचे प्रयोग सुरू होते. सुमारें २०० शेतकरी तेथे गेले आहेत. पण ते प्रयत्न यशस्वी होत नाहीत असें ठरलें.* (३) शेजारच्या व स्वतःच्या ताब्यांतील **सार्डिनिया** बेटाचा फक्त शें. ३० भाग उठित आहे. बाकीच्या भागाकडे इटली लक्षही देत नाही. (४) लायबियाच्या वाळवंटांत —इटालियन लोकांना न मानवणाऱ्या हवामानाच्या भागांत— जे पैसे खर्च करण्यांत येत आहेत, ते वसाहती करण्यापेक्षा यौद्धिक उपयुक्ततेच्या दृष्टीनेच जास्त खर्च करण्यांत येत आहेत. सारांश, इटलीचा वसाहतवाद—इटलीची लोकसंख्येच्या पोषणासाठी वसाहती हव्यात ही ओरड—मुख्यतः आर्थिक फायद्याच्या पायावर उभारलेला आहे असें म्हणवत नाही. त्याचीं मुख्य कारणें राजकीय महत्त्वाकांक्षेचींच आहेत असें पुढील लक्षणांवरूनही म्हणतां येईल.

(१) वर सांगितलेंच आहे की, इटली हा व्हर्साइल-च्या तहापासून असंतुष्टच आहे. तेव्हापर्यंत परदेशी वसाहत

---

* इ. स. १९४१ मे मध्ये अबिसीनिया इटालीच्या हातचा गेला ! लायबियांतही हे प्रयत्न असेच आर्थिक दृष्ट्या निरुपयोगी ठरले. (World's open spaces, p. 144)

करण्यासाठी म्हणून सुमारें २ लक्ष लोक बाहेर जात. पण तह होतांच अमेरिका व क्यानडा ह्या देशांनी इटलीचे ठराविकच लोक वसाहतीसाठी घ्यावयाचे असें ठरविलें. त्याच वेळीं दक्षिण युरोपांतील लोकांपेक्षा पश्चिम व उत्तर युरोपांतील लोकांना म्हणजे अँग्लोसॅक्सन लोकांना जास्त सवलती देण्याला त्यांनी सुरवात केली. दक्षिण युरोपांतील, विशेषतः इटलींतील, लोक मध्यम राहणीचे, काटकसरी पण उद्योगी असतात. अर्थात् अँग्लोसॅक्सन लोक, उच्च राहणीचे, जास्त स्वच्छ व वर्णानें श्रेष्ठ असतात, त्यांमध्ये त्यांना मिसळूं देणें इष्टपरिणामी नाही, अशा सबबीवर इटालियन लोकांवर वरील नियंत्रण घातलें गेलें. ऑस्ट्रेलियांतही इटालियन लोक गेले असतां त्यांना अशाच प्रकारचा अहेर मिळाला! पूर्व आशियांतील लोकांबद्दल जशी 'पिवळ्या बागुलबोवा'ची युरोपियन लोक ओरड करीत व करतात, तशी ह्या दक्षिण युरोपांतील किंवा इटालियन लोकांबद्दल 'ऑलिव्ह पेरिल' (Olive Peril) म्हणून पश्चिमेचे लोक ओरड करीत व करितात. यामुळे इटालियन लोकांच्या पायाची आग मस्तकांत गेली. अँग्लोसॅक्सन लोक आम्हांविषयीं वर्णद्वेष दाखवितात व कनिष्ठ राहणी म्हणून नाकें मुरडतात ही गोष्ट इटालियनांच्या ध्यानांत आली. ते चिडले व जळफळूं लागले. ह्या मनोवृत्तीला ताब्यांत घेऊन वाढीस लावणारा मुसोलिनी हा पुढारी लाभला. जपानी लोकांची जी संभावना तीच ह्यांची! हिटलरने जें 'आर्यत्वाचें' पिलूं ह्या अँग्लोसॅक्सन लोकांविरुद्ध उभें केलें, त्याच्याही मुळाशीं वरील गोष्टी आहेत असें आढळेल. सारांश, इटालियन वसाहतीकरणाच्या बाबतींत अंशतः राजकीय, अंशतः वर्णविषयक व अंशतः आर्थिक कारणें आहेत, असें ध्यानांत आल्यावाचून राहणार नाही. दक्षिण ब्राझिल व अर्जेंटिना ह्या

देशांत मात्र इटालियनांना तितकासा त्रास झाला नाही. यामुळे इटलीनें आपलीं 'फॅसिझम' चीं कारस्थानें दक्षिण अमेरिकेंत पसरविलीं. सारांश, या दुसऱ्या महायुद्धापूर्वीपासून इटली हा ब्रिटन व फ्रान्स ह्यांना चांगलें कां पाहत नव्हता व तो या दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं त्यांच्या विरुद्ध कां झाला याचा सुगावा अशा रीतीनें लागूं शकतो.

प्रकरण तेरावें

जर्मनी—मध्ययुरोपांतील राजकीय कैदी

पहिलें महायुध्द व जर्मनी

युरोपांतील पहिल्या महायुद्धांत दोस्त राष्ट्रांनी तरवारीच्या जोरावर जर्मनीचा पराभव केला असें दोस्त राष्ट्रें मानतात; पण जर्मनी मात्र तसें मनाने समजत नव्हता. या वेळीं जर्मनीच्या विरुद्ध सुमारें लहान मोठीं चोवीस राष्ट्रें शत्रुत्वाच्या नात्याने उभीं असून ऑस्ट्रिया, बल्गेरिया व तुर्कस्थान हीं राष्ट्रें जर्मनीचीं दोस्त म्हणून होतीं आणि सुमारें १० राष्ट्रें (जसें – हॉलंड, स्पेन, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, स्वित्झर्लंड, अर्जेंटिना, व्हेनेजुएला, कोलंबिया व मेक्सिको) म्हणजे जगांतील सुमारें $\frac{१}{१४}$ लोक तटस्थ होते! ब्रिटन, फ्रान्स व इटली हीं हल्लीच्या भाषेप्रमाणे बोलावयाचें झाल्यास 'लोकशाही राष्ट्रें' (डिमाक्रसीज) होतीं व जर्मनी, ऑस्ट्रिया–हंगेरी आणि रशिया हीं केवळ राजसत्ताक—हल्लीप्रमाणे जवळ जवळ हुकूमशाहीचीं–राष्ट्रें होतीं. इ. स. १९१० ते १९१४ ह्या दरम्यानच्या

फाजील राष्ट्रीयत्वाच्या काळांत ब्रिटन, फ्रान्स व रशिया ह्या त्रिकुटाचें मेतकूट जमल्यामुळे जर्मनी, इटली व ऑस्ट्रिया-हंगेरी ह्यांचा त्यांच्याविरुद्ध 'त्रिकुटी-संघ' बनला. इटली जरी प्रथमतः जर्मनीकडे झुकणारा होता तरी त्याला ऑस्ट्रिया, आफ्रिका व आशिया मायनर ह्यांतील तुकड्यांच्या लाचलुचपतीची आशा दाखवून लंडन येथे गुप्त तह करून फोडण्यांत आला! आणि तुर्कस्थानच्या भीतीने ईजिप्त हा देश ब्रिटिशांच्या 'संरक्षणाखाली' आहे असें जाहीर करण्यांत आलें. त्याचा परिणाम म्हणजे इ. स. १९३६ सालचा ईजिप्तच्या स्वातंत्र्याचा तहनामा ब्रिटन व ईजिप्त यांमध्ये झाला, हा होय. अशा रीतीने ईजिप्तचें नशीब उदयास आलें!

इ. स. १९१४ सालचा बाहु स्फुरण पावणारा जर्मनी हा बिस्मार्कच्या धोरणाचें फळ होतें. फ्रान्स, डेन्मार्क व ऑस्ट्रिया ह्यांच्याशीं लहान मोठीं युद्धें करून व त्यांच्यावर आक्रामक चढाई करून इ. स. १८७० नंतर प्रशियाच्या नेतृत्वाखाली जर्मनीला नवजीवन देण्यांत आलें होतें. उद्योगधंदे व कारखाने वाढवून क्षात्रवृत्तीच्या प्रशियाने शस्त्रास्त्रांच्या वाढीकडे फार लक्ष पुरविलें. व्यापार वाढला, आरमार वाढलें व यंत्रयुगीन वाढत्या राक्षसाला खाण्यासाठी आणखी कांही तरी हवें असें वाटूं लागलें व पहिलें महायुद्ध घडलें. या वेळीं जर्मन लोकांमध्ये जातीय भावना (जर्मनांसाठी जर्मनी, व जर्मन तितुका मेळवावा ह्या स्वरूपाची भावना) तीव्रतेने जागृत झालेली नव्हती. त्या वेळीं इतर राष्ट्रांची त्याला भीति वाटत नसल्याने व साम्राज्यवाढीची तीव्र लालसा असल्याने ती भावना दडून होती. पण जर्मन माणूस हा इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे, विजिगीषा हा त्याचा धर्म आहे, ह्या भावनांचें वारें त्या वेळच्या राष्ट्रीय मनांत खेळत होतें. हीं विजिगीषु वृत्ति समुद्रापली-

कडील साम्राज्यवाढ व मध्ययुरोपांतील आणि पूर्वदिशेकडील साम्राज्यवाढ* ह्या दोन विचारसरणींच्या द्वारें व्यक्त होत होती. कैसरच्या मनाचें पारडें दुसऱ्या बाजूला झुकलें व बाल्कन प्रदेशांत पहिल्या महायुद्धाचा वणवा पेटला. सारांश, आज हिटलरशाहीच्या जर्मनींत जें व्यापक आक्रामक स्वरूप दिसतें, युरोपची व इतर जगाची वाटणी करण्याची उद्दाम घोषणा दिसते, ती कांही नवीन

---

* पहिल्या महायुद्धाच्या काळांत जर्मनीच्या आर्थिक वाढीच्या विचारांना आक्रामक वळण लावणारे हर फ्रेडरिक नॉमन नांवाचे गृहस्थ एक बडें धेंड होतें. डॅन्युबचें खोरें व बाल्कन प्रदेश हे भाग जर्मनीच्या आर्थिक सत्तेचा एक मुख्य विभाग असावा ही त्यांची जर्मनीच्या गळीं उतरविलेली विचारसरणी होती. ती Mittel Europa–मध्ययुरोप–ह्या त्यांच्या ग्रंथांत स्पष्टपणे प्रतिपादिलेली आहे. तसेंच Drang Nach Osten– पूर्वेकडील अनिर्वाह्य आक्रमण–ही कल्पनाही जुनीच आहे. इंग्रजांच्या मध्यस्थीने बास्पोरस–बगदाद रेल्वे बांधण्याची सवलत तुर्कस्थानपासून मिळाल्याने या भावनेला जास्त जोर आला. ह्या संबंधांतील खरी खरी शास्त्रीय अधिकारी व्यक्ति डॉ. कार्ल हॉशोफर हा ७० वर्षांचा वृद्ध लष्करी तज्ज्ञ असून हिटलरच्या 'Mein Kampf' ह्या पुस्तकांतील 'परराष्ट्रीय धोरण' हें प्रकरण याच्याच स्फूर्तिदायक प्रचोदनेचें फळ आहे. किंबहुना नॉर्वे, हॉलंड–बेल्जम, फ्रान्स यांतील युद्धें, रशिया–जपानशीं तह, द. अमेरिकेंतील नाझी कारस्थानें हे व इतर सर्व भावी डाव डॉ. हॉशोफर ह्यांच्या म्युनिक येथील Geo-political Institute मधून आयते तयार होऊन येत. ह्याने सुमारें २ हजार पुस्तकें लिहिलीं असून त्याचें अलीकडील पुस्तक 'World seas and world power' हें असून त्यांत सर्व पाश्चिमात्य जगांतील आक्रमणाचे डाव आहेत.–World Education May, 1941 व Current History, June 1941. ह्याने नुकतीच आत्महत्या केल्याचें (जुलै ३०।१।१९४१) वर्तमान आहे.

गोष्ट आहे असें नसून वर वर्णन केलेल्या पहिल्या महायुद्धापूर्वीपासून चालत आलेल्या जर्मन राष्ट्रीय वृत्तीचें स्पष्ट स्वरूप आहे एवढेंच.*

खच्ची झालेला जर्मनी : दुसऱ्या महायुद्धाचा पाया

अमेरिकेची आयत्या वेळीं मिळालेली मदत, जर्मनीचा आर्थिक कोंडमारा, जर्मनीच्या साथीदार दोस्तांची क्रमाक्रमाने घसरगुंडी, दोस्त राष्ट्रांचें प्रचारतंत्र इत्यादि कोणत्याही कारणाने वा कारण-समुच्चयाने जर्मनीचा पराभव झालेला असो, त्याचा ऊहापोह करणें हें आमचें प्रस्तुतचें उद्दिष्ट नाही. विजयी राष्ट्रांनी भांडणाचें निर्मूलन करण्याच्या दृष्टीने अमोल कामगिरी केली असें म्हणतां येत नाही. युद्धाच्या मूळ कारणांचा दोस्त राष्ट्रांनी तात्पुरता विचार करून त्यावरील उपाययोजनाही तात्पुरतीच केली असें म्हणावें लागतें. पहिलें महायुद्ध संपून उणींपुरीं वीस वर्षें होण्याच्या आंतच जित जर्मनी पुनः युद्ध पुकारूं शकला ही गोष्ट ती उपाययोजना तात्पुरती होती ह्याचा भरभक्कम पुरावा आहे. ज्या आर्थिक कारणामुळे जर्मनी इतका वरचढ झाला होता, त्याचें समाधानकारक निराकरण करण्याचा दोस्त राष्ट्रांनी प्रयत्न केला नाही हें त्याच्या तात्पुरतेपणाचें मुख्य कारण आहे. हें असें कां व कसें घडलें याचा ऊहापोह पुढे ओघानेच येणार आहे. उपाययोजना तात्पुरती व अपुरी केली गेली याच्या कारणांची आणखी एक परंपरा पण आहे. ती अशी †—(१) तहानंतर अमेरिकेने आपलें अंग युरोपियन राज-कारणांतून लवकरच काढून घेतलें. (२) राष्ट्रसंघरूपी यंत्राचा

* "Germany's Great Urge" – *R. Strausz-Hupe*, Current History, May 1941.

† Hitler's war before and after, *Hugh Dalton M. P.* 1940 Penguin Special.

कारभार यशस्वी करण्याची पद्धत चुकली, एवढेंच नव्हे तर संघाचा अधिकार गाजविण्याची मिळालेली संधि दोन्ही वेळां फुकट दवडली गेली! (३) जर्मनी फ्रान्सवर पुनः हल्ला करील तर त्याला मदत करण्याची अमेरिका व इंग्लंड ह्यांनी हमी घेतली होती असा जो 'गॅरंटी ट्रीटी' [Guarantee Treaty] होता, त्यांतून त्यांनी आपापलें अंग काढून घेतल्यामुळे तो रद्द झाल्यासारखा केला* गेला व त्याऐवजी दुसरी कांही योजना आखली गेली नाही. शिवाय इटलीलाही नाखूष ठेवण्यांत आलें. यामुळे फ्रान्स व इटली हे दोन्ही दोस्त तेव्हापासून इंग्लंडविषयी साशंक वृत्तीचे बनत चालले होते. शिवाय इंग्लंड मध्ययुरोपांतील राजकारणाच्या जबाबदारींत मनापासून भाग घेण्याची टाळाटाळी करीत आहे असेंही दिसूं लागलें. (ही टाळाटाळी महायुद्धामुळे प्राप्त झालेल्या कमकुवतपणामुळे होती हें विसरतां कामा नये.)

वर सांगितलेल्या युद्धोत्तर परिस्थितीच्या महत्त्वाच्या वैगुण्याबरोबर त्यांतील कांही घटनांबद्दल थोडें तरी समाधान मानणें जरूर आहे.

(१) पोल, झेक, स्लोव्हॅक, हे लोक दीर्घकालीन दास्यांतून मुक्त झाले; क्रोट्स् व स्लोव्हीन हे पुनः एक झाले; तसेंच बरेच रुमानियन, इटालियन व फ्रेंच हे पुनः मायदेशीं येऊं शकले.

(२) राष्ट्रांतरीय मजूरसंघासारखी संस्था अस्तित्वांत आली.

---

* ही आपल्या राष्ट्राची चूक झाली असें अमेरिकेला कळलें व तशी चूक ह्या दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं आपण करणार नाही असें प्रे. रूझवेल्ट ह्यांनी आपल्या भाषणांत बजावून सांगितलें. (Times of India, 8th July 1941.) पण ह्या भाषणाचा रोख प्रत्यक्ष मदतीवर नव्हता.

(३) तात्त्विक दृष्टया वसाहती राज्यपद्धतीपेक्षा अधिक व्यापक स्वरूपाची 'मँडेट' नांवाची योजना अस्तित्वांत आली.

(४) राष्ट्रांतरीय सहकार्यावर आधारलेली राष्ट्रसंघासारखी तत्त्वतः पुढारलेली अशी कल्पना पुढे आली.

(५) स्वयंनिर्णयवाद पुढे आला.

(६) पहिल्या महायुद्धापूर्वीच्या युरोपांत सुमारें ४॥ कोटि अल्पसंख्याक लोक विषम परिस्थितींत दिवस कंठीत होते. ह्या तहाने सुमारें २॥ कोटि अल्पसंख्याकांचा प्रश्न धसास लागला. याचा अर्थ असा की इ. स. १९१८ सालचा युरोपचा नकाशा इ. स १९१४ च्या पूर्वीच्या किंवा इ. स. १९४० सालच्या हिटलरने बनविलेल्या नकाशापेक्षा अल्पसंख्याकांच्या हितसंबंधाच्या दृष्टीने जास्त न्यायाचा होता.

दोस्त व शत्रु राष्ट्रांमध्ये झालेल्या तहांचा आणखी बारकाईने व तो ज्या मूलाधारावर झाला त्यांच्या दृष्टीने विचार केला म्हणजे मध्ययुरोपांतील राजकारणांत जीं विषाचीं बीजें शिल्लक होतीं तीं दृष्टोत्पत्तीस येतील, म्हणून त्यांजकडे वळूं.

दोस्त राष्ट्रांनी जित राष्ट्रांशीं एक सामान्य तह केलेला नसून प्रत्येकाशीं निरनिराळा तह केला होता—(१) व्हर्साइलचा तह जर्मनीबरोबर. हा मुख्य तह असें समजलें जातें. (२) सेंट जर्मेनचा तह ऑस्ट्रियाबरोबर; (३) न्यूवेलीचा तह बल्गेरिया बरोबर; (४) ट्रिआनॉनचा तह हंगेरीबरोबर आणि (५) सेव्हर्सचा तह तुर्कस्थानबरोबर. असे निरनिराळे तह करण्यांत अनेक हेतु होते व अंशतः परिस्थितीही तशीच होती हें खरें. तथापि ज्या आधारावर जर्मन सत्ता इतकी प्रभावशाली बनली तो आधारच शक्य तर समूळ नष्ट करावा, तसेंच जेणेंकरून जर्मनसमाजाचें पुनः प्रभावशाली एकीकरण होणार नाही असें करावें, हा

जेत्यांचा आद्य हेतु होता. यांत जरी जातीय वा वांशिक वैमनस्याचा वा वैषम्याचा वास येतो, तरी स्थूल मानाने वस्तुस्थिति तशी नव्हती. कारण इ. स. १९१४ च्या प्रारंभीं मध्य युरोपांत जर्मनी व ऑस्ट्रिया-हंगेरी ह्या दोनच प्रभावी सत्ता होत्या व त्या राजकीय व वांशिक संबंधाने परस्पर निगडित होत्या. पूर्वेस रशिया ही एक सत्ता होती. व ह्या तीनही सत्ता आपापाल्या परीने इ. स. १९१८ सालीं पराभूत झाल्या होत्या. ह्या सत्तांच्या दास्यांत अनेक अल्पसंख्याक लोक खितपत पडले होते. विल्सन साहेबांचें स्वयंनिर्णयाचें तत्त्व फक्त मध्य युरोपांतील राष्ट्रांच्या वा अल्पसंख्य लोकांच्या बाबतींतही सर्रास न लावतां जर्मनीला खच्ची करण्याचें आपलें ध्येय जसें जेथे साधलें तसें तेथे लाविलें. झेक, पोल, दक्षिण स्लॅव्ह, फिन्स वगैरे अल्पसंख्य लोकांना मुक्त करण्याचा कळवळा दाखवून जर्मनी व ऑस्ट्रिया ह्यांच्या जोखडाखालून निसटण्यासाठी प्रोत्साहन देऊन त्या राष्ट्रांना दुर्बल बनविण्याचें आपलें कार्य धूर्तपणाने साधण्याचा प्रयत्न केला ! हेंच स्वयंनिर्णयाचें तत्त्व टायरोलमधील जर्मनांच्या बाबतींत, ट्रान्सिल्व्हानियांतील माग्यारांच्या बाबतींत, बाल्कनमधील स्लॅव्ह लोकांच्या बाबतींत, पोलंडमधील युक्रेनियन लोकांच्या बाबतींत, त्या लोकांनी ओरड केली असतांना देखील लावण्यांत आलें नाही ! मग आफ्रिका, पॉलिनीशिया ह्यांतील जर्मन वसाहती दुसऱ्याच्या स्वाधीन करितांना स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाची गोष्ट त्यांच्या कानावर देखील घातलेली नव्हती ह्यांत कांही नवल नाही !!

वर सांगितलेल्या अल्पसंख्य लोकांचीं नवीन राष्ट्रें बनवितांना भौगोलिक परिस्थिति व वांशिक ऐक्य (एक जाति, धर्म, भाषा वगैरे गमकें हीं त्याबरोबर आलींच) हें मिश्र तत्त्व लागू केलें. ही पण एक घोडचूक झाली असें म्हटल्यास धाष्टर्याचें होणार नाही. कारण

आजच्या यंत्रयुगाच्या वा भौतिक सुधारणांच्या काळांत, एक जात, एक भाषा, एक धर्म, एक रीतिरिवाज ह्यांवर आधारलेली वांशिक ऐक्याचीं तत्त्वें स्वतंत्र राष्ट्रीयत्वासाठी लावणें हें हास्यास्पदच ठरतें ! जीं राष्ट्रें अथवा जे समाजविभाग, मुख्यतः धंदेप्रधान आहेत त्यांच्या राष्ट्रीयत्वाच्या मर्यादा ठरवितांना वरील गमकें लावण्यापेक्षा आर्थिक व्यवहार व परिस्थिति ह्यांचींच गमकें प्राधान्यें-करून लावणें हीच गोष्ट जास्त टिकाऊ, फायद्याची व कमी कटकटीची होते. भौतिक सुधारणेच्या तंत्राशीं आर्थिक व्यवहारां-चींच तत्त्वें जास्त जुळतात. वर सांगितलेलीं वांशिक व जातीय तत्त्वें खटके उडविण्यास कारणीभूत होतात. अलीकडे जगभर एकसारखी वाढत चाललेली युद्धांची संख्या ही वरील गोष्टीचा पुरावा आहे.*

वरील तत्त्वांचा जित राष्ट्रांनी त्या वेळीं अवलंब न केल्यामुळे व जुन्या तत्त्वांवर तह केल्यामुळे जागोजाग कशी विसंगति व विषमता उत्पन्न झाली आणि त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाचा पाया कसा घातला गेला हें पाहणें इष्ट होईल. म्हणून त्याकडे वळूं.

जर्मनीच्या प्रभावशालीपणाचा खराखरा भौतिक आधार कोळसा व लोखंड ह्यांची समृद्धि हा होता व आहे. त्याचप्रमाणे ऑस्ट्रिया-हंगेरीच्या हॅप्सबर्ग घराण्याने 'फोडा व झोडा' ह्या तत्त्वाचा अवलंब करून चालू ठेवलेल्या अदूरदर्शी कारस्थानामुळे उत्पन्न झालेल्या 'पॅन स्लॅव्ह, ऑल स्लॅव्ह, पॅन जर्मन' वगैरे जातीय चळवळी ह्या गोष्टी पण जर्मनीच्या प्रभावशा-लित्वाला थोडया फार प्रमाणाने आधारभूत होत्या. ह्या दोन्ही गोष्टी जेणेंकरून विस्कळीत होतील अशी योजना जेत्या

---

* *Prof. D. Whittesey* quoted in "The Basic Map of Europe" by *J. F. Horabin.*



जर्मनीभोंवतीं फ्रान्सचें जाळें

व्हर्सेलिसच्या तहाचे परिणामः—(१) टिंबांनी दाखविलेले भाग आर्थिक वा राजकीय कारणाने फ्रान्सच्या पंखाखाली आलेले होते. (२) यूरोपांतील बहुतेक कोळसा व तेल–त्यामुळे मुख्य धंदेप्रधान भाग—फ्रान्सच्या ताब्यांत आले. फ्रान्सचा मध्ययूरोपांत वरचष्मा झाला व (४) जर्मनी कोंडला गेला.

[पृष्ठ १११ व १६७

दोस्त राष्ट्रांनी आखून तह केले. त्यामुळे जर्मनीला खालील प्रांत सोडावे लागले:—

(१) अल्सास-लोरेन फ्रान्सला दिला. (यामुळे जर्मनीला मिळणारें सुमारें तीनचतुर्थांश लोखंड, म्हणजे जर्मनीचे कारखाने व युद्धसाहित्य ह्यांचा प्राण, फ्रान्सला मिळाला.)

(२) सार विभाग राज्यशासनापुरता राष्ट्रसंघाकडे देण्यांत आला. (यांतील कोळशाच्या खाणी मात्र फ्रान्सला देण्यांत आल्या! ह्यांत जर्मनांची संख्या जास्त होती.)

(३) ऱ्हाइन विभागाचें* निःशस्त्रीकरण झालें व दोस्त राष्ट्रांच्या सैन्याला ऱ्हाईन नदीपर्यंतच्या अर्ध्या पश्चिम भागांत राहण्याला मुभा मिळाली. त्यामुळे जर्मनीच्या गळ्यावर फ्रान्सची सुरी सतत ठेवल्यासारखें झालें. तसेंच मागे सांगितल्याप्रमाणें या सर्व घटनांमुळे युरोपांत फ्रान्सला फार महत्त्व आलें व या जोरावर फ्रान्सने पुढे झेकोस्लोव्हाकिया व जुगोस्लॅव्हिया, पोलंड व रुमानिया ह्यांना हाताशीं धरून जर्मनीला वेढण्याचा प्रयत्न केला. म्हणजे जणूं काय फ्रान्सने आपलें एक साम्राज्यच मध्य युरोपांत उत्पन्न केलें! पण ह्यांत मूर्खपणा एवढाच झाला की, या योजनेने फ्रान्सने आपण होऊन हें साम्राज्य व आपण ह्यांमध्ये आपल्या शत्रूला ठेविलें. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं इंग्लंड वा फ्रान्स ह्यांपैकी कोणालाही त्या संरक्षित राष्ट्रांना अभिवचन देऊनही मदत पोचवितां आली नाही! पहिल्या महायुद्धापूर्वी मध्य युरोपांत जसा जर्मनी वरचढ होता, तसा इ. स. १९१९ ते १९३२ या

---

* फ्रान्सचा असा आग्रह होता की एक तर ऱ्हाइन ही नदीच आपल्या राज्याची सरहद्द बनवावी अथवा ऱ्हाईन विभाग हें एक फ्रान्सच्या देखरेखीखालचें स्वतंत्र राज्य स्थापावें म्हणजे तें फ्रान्स व जर्मनी यांमधील बफर (buffer) बनेल.

काळांत फ्रान्स होता; पण पुन्हा इ. स. १९४० मध्ये जर्मनीने ह्या सर्वांना जिंकलें व इ. स. १९१४ सालाप्रमाणे पुन्हा आपला वरचष्मा केला !

(४) माल्मेडी-यूपेन हा ४०० चौरस मैलांचा टापू बेल्जमला मिळाला.

(५) उत्तर श्लेस्विग हा भाग डेन्मार्कला मिळाला. (हा प्रांत इ. स. १८६६ मध्ये डेन्मार्कला परत करण्याचें अभिवचन बिस्मार्कने दिलें होतें. पण तो या वेळेपर्यंत डेन्मार्कला मिळाला नव्हता !)

(६) मेमेल शहर स्वतंत्र करण्यांत आलें, व पुढे तें लिथुॲनियाने घेतलें. (जर्मनीपेक्षा त्याला याचें महत्त्व जास्त होतें; यांत लोक मात्र मुख्यत: जर्मन होते.)

(७) डँझिग धरून १७,८०० चौ. मैलांचा पूर्वेचा भाग पोलंडला देण्यांत आला ! (डँझिग हें मात्र महत्त्वाचें मोठें बंदर स्वतंत्र करून तें राष्ट्रसंघाच्या देखरेखीखाली देण्यांत आलें; तसेंच जर्मनी व पूर्व प्रशिया ह्यांमधील भाग-पश्चिम प्रशिया व पोझेन—यालाच 'पोलिश कॉरिडर' म्हणतात—पोलंडला मिळाला. यांत बरेच जर्मन लोक होते. डँझिग हें एक अति महत्त्वाचें जर्मनीचें नाकें होतें. तें पोलंडचा समुद्रापर्यंतचा मुख्य पाणरस्ता जी व्हिस्चुला नदी, तिच्या मुखाशीं आहे.) याशिवाय जर्मनींतील व्यापारी महत्त्वाच्या नद्या दोस्त राष्ट्रांच्या देखरेखीखाली ठेवण्यांत आल्या.

(८) वरचा सायलेशिया * हा जर्मनीचा अल्सास-लोरेन

---

* अल्सास-लोरेन, ऱ्हाइन-ऱ्हूर, सायलेशिया, बोहिमिया हे भाग म्हणजे जर्मनीचा प्राण. कारण कोळसा व लोखंड त्यांत; हे भाग गेल्याने नाझीपक्षाच्या सत्तेचे पंखच तुटल्यासारखें झालें. यामुळे जवळ

(पुढील पानावर चालू)

प्रमाणे दुसरा महत्त्वाचा भाग पोलंडला देण्यांत आला ! यामुळे जर्मनीची युद्धशक्ति अधिकच नष्ट झाली !

(९) सर्व वसाहती ब्रिटन, फ्रान्स व जपान ह्यांमध्ये वाटण्यांत आल्या. त्यांतल्यात्यांत ब्रिटनला त्या जास्त मिळाल्या !

(१०) चीन, सयाम, लायबेरिया, इजिप्त व मोरोक्को ह्यांतील जर्मनीचे सर्व व्यापारी हक्क रद्द करण्यांत आले !

(११) याशिवाय जर्मनीवर जबरदस्त खंडणी नुकसान भरपाई म्हणून बसविण्यांत आली. जर्मनीचें लष्करी सामर्थ्य खच्ची करण्यांत आलें म्हणजे त्याने एक लक्षापेक्षा जास्त सैन्य ठेवतांच कामा नये. सर्व व्यापारी जहाजें ब्रिटनच्या स्वाधीन करावीं; अगदी थोडें ज़ुजबी आरमार ठेवावें, लष्करी विमानें मुळीच नसावीं, इ. इ. असें ठरलें.

(मागील पानावरून पुढे चालू)


जवळ तीनचतुर्थांश लोखंड नाझींना बाहेरून आणावें लागतें. पण खास
जर्मनींतील हलक्या लोखंडावर प्रयोग करून उत्तम पोलाद बनवून कांही
उणीव भरून काढण्यासाठी "हर्मन गोअरिंग स्टील वर्क्स" नांवाची
५० लक्षांची संस्था उभारली. इ. स. १९३८ सालीं ह्या कारखान्याचें
भांडवल एकदम ८० पट वाढविण्यांत आलें. (५० लक्षांचें ४० कोटी
करण्यांत आलें.) यावरून जर्मनीला भासणाऱ्या लोखंडाच्या तुट-
वड्याची जाणीव होते. ह्या 'हर्मन गोअरिंग' संस्थेचा व्याप, पसारा व
ताबा इतका मोठा झाला आहे की ती युद्धानंतर–अर्थात् टिकल्यास–क्रेप
थायसेनसारखें त्यांना शह देणारें धेंड बनेल. पोलंड, झेकोस्लोव्हाकिया,
फ्रान्स ह्यांतील लोखंडी, पोलादी सामानाच्या सर्व मुख्य संस्था, रंग
संस्था, सिनेमा व नाटकगृहें हीं सर्व ह्या संस्थेच्या कक्षेंत आलीं आहेत.

G. S. Bishop–Geographical Magazine – April 1940.

सारांश, जर्मनीला २६ हजार चौ. मैलांचा प्रदेश व ६० लक्ष लोक गमवावे लागले! एवंच जर्मन गरुडाचे पंख तोडून नखें काढण्यांत आलीं! या अटींशिवाय जर्मनीच्या अंतःकरणाला झोंबतील अशाही अटी घालण्यांत आल्या होत्या. त्या अशा–(१) जर्मनी हा युद्धांतील पहिल्या नंबरचा गुन्हेगार आहे. (२) कैसर व त्याच्या बरोबरचे हिंडेन्बुर्ग सारखे शेलके शंभर सेनापती गुन्हेगार म्हणून त्यांची पण चौकशी व्हावी. सुदैवाने कैसर हॉलंडमध्ये गेल्यामुळे ती चौकशी टळली व पुढे क्रांति झाल्यामुळे त्याच हिंडेन्बुर्गशीं याच दोस्तांनी जर्मनीचा प्रेसिडेंट म्हणून हस्तांदोलन केलें! दोस्त राष्ट्रांनी वसाहती जरी प्रत्यक्ष लढून काबीज केल्या होत्या, तरी त्या वेळीं जर्मनी हा वसाहतींच्या कारभारांतही गुन्हेगार आहे, असाही दोषारोप त्याच्यावर करण्यांत* आला. मानी जर्मनीला वरील प्रकारचे दोषारोप शल्यासारखे बोचत राहिले असल्यास व त्यामुळे त्याच्या मनांत सूडाची भावना उत्पन्न झाली असल्यास त्यांत नवल नाही.

वरील वर्णनावरून युद्ध केल्याशिवाय धंदेप्रधान जर्मनीला जगणें कसें अशक्य होतें व त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाचा पाया जर्मनीपुरता तरी कसा घातला गेला ह्याची थोडी कल्पना येईल. परंतु मध्ययुरोपांत युद्धाचा वणवा पेटविण्याला उपयोगांत येणारीं दारूचीं कोठारें दोस्त राष्ट्रांनी केलेल्या तहांनी कशीं उत्पन्न करून ठेविलीं होतीं, त्याचा जर्मनीने फायदा कसा घेतला आणि ह्या सर्वांचा सामुदायिक परिणाम दुसऱ्या महायुद्धांत कसा झाला हेंही थोडक्यांत पाहणें जरूर आहे, म्हणून त्याकडे वळूं.

* Report on the Natives of S. W. Africa and their treatment by Germany – A blue Book ह्याचा विचार पुढे जर्मनी व वसाहतवाद यामध्ये येणार आहेच.



मध्य यूरोपांतील राष्ट्रें १९१९

व्हर्सेलिसच्या तहानें उत्पन्न केलेल्या राजकीय सरहद्दी आर्थिक व वांशिक घोटाळ्याला कारणीभूत झाल्या.

[पृष्ठ १७०

मध्य युरोपचे तुकडे व दुसऱ्या महायुद्धाचा पाया

पहिल्या महायुद्धापूर्वी ऑस्ट्रिया-हंगेरी हें जोडराज्य वंश, भाषा, धर्मपंथ, रीतभात, इत्यादि बाबतींत जरी अठरा धान्यांचें कडबोळें होतें तरी त्यांत बरेंचसें आर्थिक-भौगोलिक ऐक्य होतें. डॅन्युब नदीचें सुपीक खोरें हा त्यांचा आत्मा होता. व्हिएन्ना व बुडापेस्ट हीं दळणवळणाचीं दोन अति महत्त्वाचीं केंद्रें असून त्याचा एड्रियाटिक समुद्र व डॅन्युब नदी ह्या व्यापारी जलमार्गांशीं घनिष्ठ संबंध होता व आहे; पण युद्धोत्तर तहाने जातीय वा वांशिक तत्त्वाच्या योजनेवर ह्या राज्याचे तुकडे तुकडे करण्यांत आले. त्यांतून आर्थिक व व्यापारी दृष्टया अपूर्ण व त्यामुळे परस्पराशीं आर्थिक-राजकीय खटके उडविण्यास भाग पाडणारीं ऑस्ट्रिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, जुगोस्लॅव्हिया, रोमानिया व थोडा पोलंड हीं राष्ट्रें निर्माण करण्यांत आलीं. डॅन्यूबच्या शेतीचे तुकडे पडले, डॅन्यूबमधील अनिर्बंध व्यापारी जलमार्गांत जागोजाग जकात व राजकीय हद्दी ह्यांचीं भिंताडें आडवीं येऊं लागलीं आणि प्रत्येक लहान राष्ट्र आर्थिक स्वयंपूर्णतेसाठी धडपडूं लागलें. सारांश, ह्यांत बारभाई उत्पन्न झाली. *

बरें, इतकें करूनही जातीय वा वांशिक प्रश्न समाधानकारक रीतीने सुटला होता असेंही नाही. उलट त्या बाबतींतही जागोजाग अग्नि धुमसत होता; जसें हंगेरींतील माग्यार शेतकरी, झेकोस्लोव्हॅकिया, रुमानिया व हंगेरी अशा तीन ठिकाणीं विभागले गेले. हंगेरी हा प्रारंभापासून त्या तहाविरुद्ध कां ओरड करीत होता व हिटलरच्या आक्रमण मोहिमेंत त्याला असंतुष्ट होऊं न देण्याची तजवीज कां करण्यांत आली होती ह्याचा उलगडा

* Hitler's route to Bagdad : *Barbara Ward*, Fabin Society, 1939.

ह्यावरून होतो. प्रारंभीं ऑस्ट्रिया इतका आर्थिक खंक बनला की दोस्त राष्ट्रांनाच त्याला प्रथम पैसा द्यावा लागला ! *

जात, वंश, व्यापार धंदे व दळणवळण या बाबतींतील त्रिस्थळी झेकोस्लोव्हॅकियासारखी दुसऱ्या कोणत्याच राष्ट्राची झाली नाही. हें पूर्णपणें कृत्रिम असें राष्ट्र बनविलेलें होतें. येनकेन-प्रकारेण जर्मनीला खच्ची करावयाचा ही गोष्ट या राष्ट्राच्या कृत्रिम घडणीवरून ध्यानांत येते. ह्या देशाला व्यापारी जलमार्ग व लोहमार्ग या बाबतींत शेजारी राष्ट्रांच्या तोंडाकडे व मर्जीकडे पाहावें लागे ! आणि याचा मुख्य भाग बोहीमिया हा तर मुख्यतः धंदेप्रधान. (स्कोडाचा युद्ध साहित्याचा युरोपांतील सर्वांत मोठा कारखाना ह्याच भागांत आहे). एल्ब व ओडर ह्या जर्मनीच्या मुख्य पाणरस्त्यावर ह्या देशाला विशेष हक्क दिलेले होते ते ह्याच कारणामुळे होय. सारांश, आर्थिक परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्याने झेकोस्लोव्हॅकियाची आर्थिक प्रगति जशी स्थगित झाली, तसा तो भावी झगड्याचें मुख्य कारणही बनला !

जुगोस्लॅव्हिया बनवितांना त्याचा समुद्र किनाऱ्याचा डाल्मेशिया हा भाग गुप्त तहाने इटलीला द्यावयाचा असें ठरूनही अखेरीस इटलीच्या तोंडाला पानें पुसलीं गेलीं ! फ्यूम बंदर व अल्बेनिया पुढे इटलीने घेतलें, तें याच रागामुळे. पोलंडही असाच, रशिया ऑस्ट्रिया व प्रशिया यांतून बनविण्यांत आला. रुमानियाही अशाच रीतीने हंगेरी, रशिया व ऑस्ट्रिया ह्यांतून उत्पन्न करण्यांत आला. ट्रान्ससिल्व्हानिया (पांच भाषा, पांच वंश व पांच धर्म पंथ ह्यांचा भाग–माग्यार, ज्यू, युक्रेनियन्स, जर्मन्स व रुमानियन्स) व बनात हे त्याचे भाग जळते निखारेच आहेत; शिवाय कार्पेथियन

* Property and peace. *H. N. Brailsford.*

पर्वत हा या नवीन तहानें रुमानियाच्या मध्यभागीं घेण्यांत आला. ह्यामुळे रुमानियाच्या आर्थिक प्रगतीला एक अडथळाच झाला.*

बल्गेरियाची तीच स्थिती करण्यांत आली. त्याच्या मॅसिडोनियापैकी बराच भाग जुगोस्लॅव्हियाला देण्यांत आला; त्यामुळे सालोनिका मार्फतचें एजियन समुद्राचें त्याचें द्वार गेलें. ईशान्येचा दक्षिण डोब्रुजा प्रांत रुमानियाला दिला आणि तुर्कस्थानच्या हद्दीजवळचा एजियन समुद्रालगतचा सालोनिका ते गॅलीपोलीपर्यंतचा तुकडा ग्रीसला मिळाला. यामुळे काळ्या व एजियन समुद्रावरची त्याची सरहद्द बरीच कमी झाली. अर्थात् व्यापारव्यवहाराच्या दृष्टीने बल्गेरिया फारच दुबळा बनला. तसेंच मध्य युरोपांतील राष्ट्रांची भूमध्य समुद्रवर्ती वृत्ति व व्यवहार बंद झाले. पण तीच गोष्ट त्या राष्ट्रांना शल्यासारखी बोचत राहिली.

रशियन राजकारणाचा जर्मनीशीं बराच संबंध येतो. यासाठी त्याचाही थोडा अप्रस्तुतपणा पत्करून, विचार करणें जरूर आहे.

क्रांतीमुळे रशिया हें त्या वेळचें दोस्त राष्ट्र विस्कळित झालें होतें. त्याच्या बऱ्याच भागांत जर्मन सैन्य होतें. या सर्व परिस्थितीचा विचार करून बाल्टिक राष्ट्रें (एस्टोनिया, लॅटविया, लिथुॲनिया हीं जिल्हेवजा राष्ट्रें जर्मनी आपल्या ताब्यांत ठेवूं पहात होता.) स्वतंत्र केलीं. कारण जर्मनीला तीं मिळूं न देणें व कम्युनिस्ट रशियांतील 'घातुक' व 'घाणेरडया' विचारांची झळ बाकीच्या युरोपला लागूं न देणें हे दोन हेतु त्या वेळीं साधावयाचे होते. फिनलंड तर स्वतंत्र झालाच होता. पण ट्रॉटस्कीच्या सैन्याने युक्रेन जर्मनीच्या दाढेंतून ओढून काढला म्हणून तो रशियाचा एक भाग राहिला.

---

* यांपैकी कांही प्रांतांची वाटणी करून हंगेरी व रुमानिया याचा वाढता बेबनाव कमी करण्याची खटपट हिटलर करीत आहे.

सारांश, दोस्त राष्ट्रांनी मध्य युरोपांत जी वर सांगितलेली राजकीय चीरफाड उर्फ फाळणी केली, तीमुळे कांही लहान व अदूरदृष्टि व कांही केवळ आपमतलबी समाजगटांना तात्पुरतें हायसें वाटलें, तसेंच दोस्तांनाही आपला मूळ हेतु बऱ्याच अंशाने साधलासें वाटलें. पण यामुळे त्या दोघांच्याही कल्पनासृष्टींत त्या वेळीं उत्पन्न न झालेला एक भस्मासूर मात्र जन्मास घालण्यांत आला होता. तो म्हणजे पूर्वीच्या तीन सत्तांऐवजी अनेक सत्तांचा व सत्ताधाऱ्यांचा बुजबुजाट उत्पन्न झाला व पुढे तेच आर्थिक अडचणींत व अडवणुकींत सापडलेले सत्ताधारी, मर्यादित शक्तीचे हुकुमशहा बनले * हा होय! यामुळे मध्य युरोपियन राजकारणांत फार खळबळाट सुरू झाला.

आतापर्यंतच्या वर्णनावरून दोन गोष्टी ध्यानांत येतील. एक, दुसरें महायुद्ध होण्याला पहिल्या महायुद्धानंतरचे तह कांही अंशीं कारणीभूत झाले. त्या तहाने बऱ्याच चांगल्या गोष्टीही घडवून आणल्या. यामुळे दुसऱ्या युद्धाला कारणीभूत म्हणून ते तहच होते हें सर्वस्वीं खोटें. कारण जर्मनी व रशिया यांमधील राज्यक्रांत्यांनी वरील तहांतील चांगल्या गोष्टींचा फायदा तर घेतलाच नाही; पण उलटपक्षीं त्यांतील उणीवांचा वा दोषांचा फायदा घेऊन आणखी कटकटी उत्पन्न करण्याचा व होत्या त्या वाढीस लावण्याचा उपक्रम केला. हें कसें तें पुढे पाहूं.

हिटलरच्या उदयापर्यंतचा जर्मनी

इ. स. १९१८ नोव्हेंबर मध्ये युद्ध तहकूब होऊन इ. स. १९१९ मध्ये तह झाला. तेव्हापासून जर्मनींत खालील प्रकारचीं दृश्यें दिसत होतीं.

---

* जसें बोरिस, झोगू, क्यारोल, मसारिक, हॉर्थी, डोल्फस.

(१) **राजकीय दृश्य**—कैसर व त्याचा मुलगा हे हॉलंड मध्ये पळाले होते व सर्व राज्यसूत्रें एबर्ट नांवाच्या साम्यवादी (Socialist) माणसाच्या हातांत होतीं. तीं १९२५ पर्यंत त्याच्याच हातांत होतीं. इ. स. १९१९ मध्ये ज्या निवडणुकी झाल्या त्या वेळेपासून जनतेचीं मनें कैसरच्या बादशाही हुकमतीखालून निसटून एकदम विरुद्ध बाजूस म्हणजे साम्यवादी (या वेळीं सोशियालिस्ट व कम्युनिस्ट हे परस्पर विरोधी पक्ष जर्मनींत बनले नव्हते) विचारसरणीकडे झुकूं लागलीं होतीं व म्हणूनच राज्य-सूत्रें साम्यवादी एबर्ट याच्या हातीं आलीं. इ. स. १८७१ पासून हिटलरच्या सत्ताधारित्वापर्यंतचा जर्मनी शासनपद्धतीच्या दृष्टीने बाह्यत: केवळ राजसत्ताक होता; तथापि वस्तुत: तो अमेरिका किंवा ऑस्ट्रेलिया ह्यांप्रमाणें 'फेडरल' पद्धतीच्या शासन पद्धतीखाली नांदत होता; कारण प्रशियाचा राजा जरी मुख्य समजला जाई तरी बव्हेरिया, सॅक्सनी, वुर्टेन्बुर्ग, बेडन वगैरे प्रांतांचे राजे त्याच्याच प्रमाणे स्वतंत्र होते. ते फक्त युद्ध, कर व शिक्षण एवढया बाबतींत एकमेकांच्या सल्ल्याने राष्ट्रीय धोरण आखीत व इतर बाबतींत पूर्ण स्वतंत्र असत व ह्या सर्व राजांच्या राज्याला 'जर्मनी' किंवा 'वीमर रिपब्लिक' म्हणत. आजही वीमरची शासनपद्धति जरी अमलांत नाही तरी ती नष्ट झाल्याचें किंवा केल्याचें हिटलरने जाहीर केलेलें नाही!

इ. स. १९२५ सालीं एबर्टच्या मृत्यूनंतर हिंडेन्बुर्ग हा प्रेसिडेंट झाला. या वेळेपासून हिटलरची राजकीय सद्दी झपाटयाने वाढूं लागली व अखेरीस इ. स. १९३५ सालीं हिटलर हा सर्व जर्मनीचा—आता 'वीमर रिपब्लिक' अंध:कारांत जाऊं लागलें —हुकुमशहा बनला.

(२) **आर्थिक दृश्य**—ह्या काळांत सर्व धंदे कारखाने

मोडलेले होते, व्यापार बसला होता, शेतीची दुर्दशा होती, देशांत खावयाला पुरेसें अन्नही नव्हतें व तह झाल्यानंतर कांही दिवस पर्यंत दोस्त राष्ट्रें अन्न येऊं देत नसत. सैनिक मोकाट सुटले होते, राष्ट्रीय नाणें जें मार्क तें बंद होऊन भरमसाट कागदी चलन* प्रसृत झालें होतें. यामुळे त्याला किंमतहि नव्हती. या सर्वांचा परिणाम म्हणजे सर्व प्रकारची बेबंदशाही उद्भवणें हाच होता. फक्त पुष्कळ जमिनीचे मोठे मालक (Junkers) हे थोडयाशा बऱ्या स्थितींत होते. यामुळे राज्यक्रांतीचे स्फोटक प्रयत्न होणें अपरिहार्य होतें. असे प्रयत्न झालेही. (जसें इ. स. १९२० मध्ये ऱ्हूरमधील हिटलरच्या नेतृत्वाखालचा ब्राऊन शर्टवाल्या नॅशनल सोशालिस्टांचा प्रयत्न.)

व्हर्सेलिसच्या तहाप्रमाणे जर्मनीला जेत्या राष्ट्रांची नुकसान-भरपाई करणें भागच होतें. व त्यासाठी धंदे कारखाने हात काळे करण्यासाठी तरी चालवावेच लागत व तोंपर्यंत मानहानिकारक अटींची तरवार मानेवर लटकत होतीच. ब्रिटन, फ्रान्स व बेल्जम ह्यांचीं सैन्यें जर्मनीच्या राज्यांत होतींच. ऱ्हाइनचा टापू त्यांच्या ताब्यांत होता; तसेंच इ. स. १९२३ सालीं फ्रान्स व बेल्जम ह्यांनी ऱ्हूर टापू जबरदस्तीने ताब्यांत घेतलाच होता. याचा अर्थ जर्मनीचे मुख्य धंदेप्रधान भाग जेत्यांच्याच ताब्यांत होते. देशांतील धंदे कारखाने जेत्यांसाठीच चालत होते, तरीही नुकसानभरपाईची पोच कमीच पडे. फ्रान्स तर ते प्रांत घशांत टाकण्याच्या हात-घाईवर येऊं लागला होता व त्यामुळे त्याचें प्रस्थ कसें माजलें असतें याचें वर्णन मागे फ्रान्सच्या प्रकरणांत केलेंच आहे. हें

* अडीच महापद्म मार्कना सुमारें ५ शिलिंग किंवा ३॥। रुपये इतकी किंमत इ. स. १९२३ सालीं होती!

फ्रान्सचें वाढतें महत्त्व टाळावें, व जर्मनीची आर्थिक परिस्थिति सुधारून त्या योगें त्याला नुकसानभरपाई व्यवस्थित रीतीने करतां यावी, ह्या हेतूने इ. स. १९२४ सालीं जेत्या राष्ट्रांनी, विशेषत: अमेरिका व ब्रिटन ह्यांच्या पुढाकारामुळे—हा पुढाकार मुख्यतः जर्मनीला सुस्थिति प्राप्त व्हावी म्हणून नसून आपमतलबासाठी कसा होता हें मागे आलेंच आहे—अमेरिकन सेनापति डॉवेस ह्याच्या नेतृत्वाखाली एक योजना तयार केली. तिला 'डॉवेस प्लान' (डॉवेस योजना) म्हणतात. त्या योजनेप्रमाणे जर्मनीला मोठें कर्ज देण्यांत आलें. त्यामुळे जर्मन नाण्याची (मार्कची) घसरगुंडी थांबली. भाव व किंमती युद्धपूर्वकाळाप्रमाणे झाल्या, कारखाने नफ्याने चालूं लागले, जनतेची स्थिति थोडी सुधारूं लागली, फ्रान्सने आपलें सैन्य व्हूर टापूंतून काढून घेतलें व या सर्व कारणांमुळे राष्ट्रीय अस्वस्थतेची उकळी थोडी कमी झाली. पण राष्ट्रीय मनाचा वारा केवळ राजसत्तेच्या विरुद्धच वाहत होता तो कांहीं कमी झाला नव्हता. किंबहुना राष्ट्रीय साम्यवाद्यांची चढती कमान होत होती व कम्युनिझमशीं खटके उडत होते. अशा स्थितींत एवर्ट हा इ. स. १९२५ सालीं वारला व हिंडेन्बुर्ग हा 'वायमार रिपब्लिक' चा प्रेसिडेंट झाला! त्याच्या उज्ज्वल आयुष्यक्रमामुळे राष्ट्रीय मनावर त्याची एकदम छाप पडली.

हिंडेन्बुर्ग व हिटलर

ज्या वर्षीं हिंडेन्बुर्ग प्रेसिडेंट झाला त्याच वर्षापासून, म्हणजे इ. स. १९२५ सालापासून, हिटलरचें महत्त्व झपाट्याने वाढूं लागलें, असें वर म्हटलेंच आहे. हिंडेन्बुर्ग अधिकारारूढ झाल्या-पासून उद्योगधंदे झपाट्याने वाढूं लागले. क्रुप, थायसेन, किर्डार्फ

वगैरे भांडवलवाले कारखानदार व जमीनजुमलेवाले मालगुजार ह्यांचा पाठिंबा हिंडेन्बुर्गला होताच. या वेळीं पहिल्या युद्धाबद्दलची नुकसानभरपाई झालेली नव्हती. इ. स. १९३२ सालीं राष्ट्राध्यक्षाची जी निवडणूक झाली तींत हिंडेन्बुर्गला हिटलर हा प्रतिस्पर्धी होता.* पण या वेळीं त्याला जरी अपयश आलें तरी त्याला शेंकडा ३७ मतें मिळालीं होतीं व त्याच्या पक्षाला राइकस्टॅग मध्ये २३० जागा मिळाल्या! यावरून हिटलरच्या चळवळीमुळे राष्ट्रीय मनाचा वारा कसा वाहूं लागला होता हें ध्यानांत येतें.

नेहमीच्या रिवाजाप्रमाणे इतकीं मतें मिळालेल्या व एवढया मोठ्या पक्षाचा पुढारी जो हिटलर त्याला या वेळीं मुख्य प्रधानकी तरी मिळाली पाहिजे होती; पण एका काळच्या शिपायाला आपला

---

* इ. स. १९१९ सालीं राज्यक्रांतीचा खल करण्यासाठी म्युनिच येथे जे छोटे कटवाले जमले होते, त्यांत हिटलर चमकूं लागला होता. इ. स. १९२० त तो राज्यक्रांतिकारकांचा पुढारी बनला. इ. स. १९२१ सालीं हिटलरच्या मदतीसाठी म्हणून 'स्टॉर्मट्रुप्स' हा स्वयंसैनिक संघ बनविण्यांत आला. पुढे इ. स. १९२३ सालीं त्याने बंड केलें, पण तें फसून तो कैदेंत पडला! या वेळीं त्याने 'माझी धडपड' (My Struggle) हें पुस्तक लिहून आपले खळबळ उडविणारे राष्ट्रीय विचार प्रसिद्ध केले. ह्या पुस्तकाच्या तीस लक्ष प्रती आठ भाषांत विकल्या जाऊन हिटलरला सुमारें ८३ लक्ष रुपये मिळाले! पुढील सालीं हिटलरने आपला पक्ष 'जर्मन लोकांसाठीच जर्मनी' ह्या ध्येयावर पुन: उभारला. त्या जोरावर त्याच्या पक्षाने राइकस्टॅग (पार्लमेंट) मध्ये ३२ जागा पटकाविल्या. इ. स. १९२८ सालपर्यंत ह्या त्याच्या पक्षाला दिवस वाईट गेले; त्यासालीं त्याच्या पक्षाला केवळ १२ जागा राइकस्टॅगमध्ये मिळाल्या! पण लगेच दोन वर्षांनी म्हणजे इ. स. १९३० सालीं नाझी पक्षाने १०७ जागा मिळविल्या! यावरून हिटलरच्या उदयाची कल्पना येऊन त्याची तडफ कशी होती ह्याचाही अंदाज बांधतां येतो.

मुख्य प्रधान बनविणें हिंडेन्बुर्गला न पटून त्याने खानदानी घराण्यांतील व्हॉन पेपेन ह्याला—पहिल्या महायुद्धांत कुशल फंद-फितुऱ्या किंवा भेदनीतिज्ञ म्हणून नांवाजलेल्या पेपेनला—मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं. पण ह्या वेळीं हिटलरचा पक्ष इतका वजनदार बनला होता की, राजसत्तेमागे असलेले जमीनदार व भांडवलवाले कारखानदार ह्यांना त्याला वगळून चालणार नाही असें इ. स. १९३३ सालीं वाटूं व भासूं लागलें. त्याच वर्षीं जानेवारींत तो मुख्य प्रधान बनला! पुढील महिन्यांत म्हणजे फेब्रुवारींत राइकस्टॅग (पार्लमेंट) जळाल्यामुळे (हें कृत्य कम्यु-निस्टांचें होतें असा प्रवाद आहे! पण तें कृत्य नाझी पार्टीचेंच होतें. त्याशीं हिटलर, गोअरिंग वगैरे मुख्यांचा प्रत्यक्ष संबंध होता असें जगाला स्पष्टपणें माहीत झालें आहे.)* बराच गोंधळ उडाला व त्याच्या पक्षाच्या धोरणाबद्दलही भीति वाटूं लागली! लागलीच हिटलरने पुढील महिन्यांत पार्लमेंट भरविलें. त्यांत आपल्या बाजूचे २८८ लोक त्याला लाभले!

एवढा आधार मिळतांच व सत्ता हातीं येतांच त्या आधाराचा व सत्तेचा उपयोग हिटलरने इतर सर्व विरोधी पक्षांचा नायनाट करण्यासाठी केला!

याच वेळीं खुद्द नाझी † पक्षांत मतभेद होऊन थोडा बखेडा माजला व त्याचा परिणाम स्वपक्षाचें ऐक्य नष्ट होण्यांत होणार असें वाटतांच त्यांतील कंटक नाहीसे करण्याचें ठरवून तें काम

---

* One man against Europe : *K. Heiden*, 1940 p. 136 व 214-18.

† नाझी शब्द National Socialist ह्या दोन शब्दांतील पहिल्या N. S. ह्या अक्षरांवरून बनला आहे. संक्षेप किंवा संक्षिप्त नांवें ह्यांची आवड जर्मनीइतकी कोणालाच नाही.

इ. स. १९३४ सालीं स्वत: हिटलरने पार पाडिलें. मतभेद असणाऱ्या लोकांना त्यांच्या स्वत:च्या घरीं नेऊन विनाचौकशी ठार मारण्यांत आलें! या अघोर कृत्यांत र्‍होम (स्टार्म ट्रूप्सचा मुख्य), स्लायशर (हिटलरच्या नंतर होणारा मुख्य प्रधान), ग्रेगर स्ट्रॉसर (नाझी पक्षांतील फारच मोठा माणूस), ह्यांसारखे लोक प्राणास मुकले! ह्यापुढेही आपला पक्ष निष्कंटक करण्याचे (purge) प्रसंग गेल्या पांच वर्षांतही आले !* सारांश, हिटलरच्या हुकूमशाहीची चुणूक वरील गोष्टींवरून ध्यानांत आल्याशिवाय राहत नाही.

हिटलर 'फ्यूरर'† बनतो

पुढे एक वर्षाने म्हणजे इ. स. १९३५ सालीं (२ आगष्ट) हिंडेन्बुर्ग मरण पावला ! आणि हिटलरने राष्ट्राध्यक्षपद आपल्याकडे घेतलें ! यापूर्वी तो मुख्य प्रधान (प्राइम मिनिस्टर किंवा चॅन्सेलर) होताच. रिवाजाप्रमाणे हें राष्ट्राध्यक्षत्व स्वीकारतांना हिटलरने मुख्य प्रधानकीचा अधिकारन्यास करावयास हवा होता, पण तो त्याने केला नाही ! या गोष्टीवरून हिटलरला अधिकारलालसा बेसुमार आहे असें म्हणण्यापेक्षा हे दोन्ही अधिकार एकाच माणसाच्या (व तेही हिटलरच्याच) हातांत असण्याची निकडीची आवश्यकता हिटलरला वाटते असें म्हणणें बरें. तसेंच राष्ट्रोदयाच्या वा राष्ट्रोत्कर्षाच्या काळांत अशी एकहाती सत्ता असणें हिटलरला अधिक पसंत असावें, किंवा आपला पक्ष व त्याचें धोरण राष्ट्रीय

---

*इ. स. १९४१ सालच्या रशियावरील स्वारीच्या वेळीं गोअरिंग सारखा मनुष्य आपली नापसंती दाखवितो असें समजतांच त्याला देखील तसाच धाक दाखविण्यांत आला !

† 'फ्यूरर' (Fuhrer) या जर्मन शब्दाचा अर्थ 'मुख्य पुढारी' असा आहे. ही संज्ञा हिटलरनेच प्रथम घेतली.

मनाला निरपवाद पसंत पडलें आहे की नाही ह्याबद्दल त्याला शंका वाटत असावी, म्हणून त्याला सर्वाधिकार आपल्याचकडे ठेवणें इष्ट वाटलें असावें, असें म्हणणें जास्त सयुक्तिक दिसतें. या दोन्ही अधिकारांमुळे हिटलर हा कैसरपेक्षाही ज्यास्त सत्ताधारी बनला ! म्हणूनच तो हुकूमशहा आहे असें म्हणतात.

हिटलरच्या यशाचीं कांही कारणें

सुमारें २५।३० वर्षांपूर्वी जो अन्नाला देखील महाग होता तसेंच जो तेव्हा सुविद्य तर नव्हताच पण सुशिक्षितही नव्हता, अशा हिटलरला एवढया अल्प काळामध्ये जगांतील अत्यंत संस्कृत अशा राष्ट्राचा अधिपति होण्याचें सौभाग्य लाभलें व त्याचमुळे त्याने जगाला हादरून सोडलें ही एक महदाश्चर्याचीच गोष्ट आहे, ह्यांत शंका नाही. पण त्यांत हिटलरची कर्तबगारीच दिसते. तो खरा कार्यक्षम पुरुष असावा यांत शंका नाही. हा जो त्याचा अभ्युदय झाला त्याचीं कांही महत्त्वाचीं कारणें लक्षांत घेण्यासारखीं आहेत.

(१) हिटलर हा एक विशिष्ट तमोराजसिक* ओजाचा पुरुष आहे. तो साध्या राहणीचा असून उच्च ध्येयवादी आहे. त्याचें अंतःकरण राष्ट्रोद्धारासाठी तळमळत असतें. तो निर्भय अंतःकरणाचा वीर आहे. त्याचा आत्मविश्वास दांडगा आहे. या मुख्य वैयक्तिक गुणांच्या व लायकीच्या जोरावर हतबल-पण हतप्रभ नव्हे–आणि तात्पुरता हतबुद्ध व निराश झालेल्या पण स्वाभिमानी जर्मन राष्ट्राला पुनः आत्मविश्वासू बनवून जगांतील राष्ट्रांत निधडया छातीने वर डोकें कसें काढावें ह्याचा मार्ग त्याने दाखविला

---

* Hitler's Paradise : *Rom Landau* Faber, London 1940 Hitler's Girls, Guns and Gangsters, *Felix Gross*, Hurst, 1941.

(२) तो स्वतः भयंकर आशावादी व महत्त्वाकांक्षी असल्याने त्याने स्वाभिमानी तरुण जर्मनीला त्वरित आपलेंसें करून घेतलें.

(३) त्याने जर्मन राष्ट्र अथवा समाज पायापासून सुधारण्याची व संघटित करण्याची योजना केली. राष्ट्राची खरी खरी संपत्ति जीं मुलें तीं शीलवान, बिनशर्त श्रद्धावान, निःसीम आज्ञाधारक आणि जर्मन राष्ट्रासाठी आत्मार्पण हें अचल ध्येय पुढे ठेवून त्याप्रमाणे वर्तन करणारीं अशीं बनतील अशी योजना आखून ती अमलांत आणिली. प्राथमिक शाळा हा राष्ट्राचा पाया केला. किंबहुना त्याच्याही अलीकडे येऊन जर्मन वंशश्रेष्ठत्वाची–आर्यवंशत्वाची*–कल्पना फाजील अभिमानी जर्मन मनापुढे उभी

* प्रस्तुत ठिकाणीं आपल्याला नाझी प्रचारकांनी उचललेल्या आर्यवंशत्वाच्या कल्पनेचा अल्प विचार करावयाचा आहे. त्या नाझी कल्पनेचा भारतीय आर्यत्वाशीं कांही संबंध नाही. ह्या कल्पनेप्रमाणे युरोपांतील नॉर्डिक वंशाचे लोक (स्कॅंडिनेव्हियांतील लोक) हे खरे आर्य म्हणजे श्रेष्ठ व सद्गुणी होत. बाकीचे अनार्य होत. जर्मन लोक नॉर्डिक वंशांतील आहेत. याच वंशांतील जर्मन लोक हेच काय ते सर्वांवर राज्य करण्यास योग्य व लायक आहेत. त्यांचे सद्गुण कायम राखण्यासाठी आहारशुद्धि व रक्तशुद्धि हीं मुख्यतः सांभाळिलीं पाहिजेत. याचा अर्थ शुद्ध अन्नव्यवहार व खास नॉर्डिक जर्मन लोकांशींच बेटीव्यवहार करावे असा आहे. अशा ह्या कल्पनेचा आधारस्तंभ व आचार्य ऑल्फ्रेड रोझेनबर्ग असून त्याचा 'Myth of the 20th Century' हा या कल्पनेचा वेदग्रंथ आहे. तो 'Volkischer Beobachter' या पत्राचा मुख्य संपादक आहे. त्याला नाझी पक्षांत सर्वोच्च मानपद आहे. तो Reichsleiter आहे. हा हिटलरला इ. स. १९२० च्या सुमारास येऊन मिळाला. हिटलर हा लहान असतांना ऑस्ट्रियांत त्याच्या सभोवार पॅन जरमॅनिझमचें वातावरण होतेंच. रोझेनबर्गच्या कल्पना हिटलरला तेव्हाच पटल्या. नाझीपक्ष जसजसा

(पुढील पानावर चालू)

केली. या योजनेमुळे त्याला सैनिकांचा तुटवडा भासत नाही.

(४) हिटलर हा मूळचा अगदी गरीब व पीडित परिस्थितींत वाढलेला होता. त्यामुळे त्याला गरीब व वाईट आर्थिक परिस्थितीमुळे नाडलेल्या बहुजन समाजाची सामुदायिक मनोवृत्ति काय होती ह्याची चांगली कल्पना होती. तो संधिसाधु व व्यवहारकुशल आहे. यामुळे त्याने प्रथमतः सामान्य जनतेच्या मनांतील गतानुगतिकत्वाच्या भावनेला हाताशीं धरिलें. दोन्ही टोकांकडे जाणाऱ्या एकांतिक भावनांकडे धावणाऱ्या इतर अल्पसंख्याकांकडे विशेष लक्ष दिलें नाही. तद्नंतर बरेच सैनिक व लष्करी अंमलदार आर्थिक अडचणींत होते. यांना जर्मनीच्या पराभवाचीं खरीं कारणें (जसें, ऑस्ट्रिया, बल्गेरिया, तुर्कस्थान, हे हतबल झाले; दोस्त राष्ट्रांनी केलेला आर्थिक कोंडमारा चांगलाच जाणवला, वगैरे.) समजलेलीं नव्हतीं; यामुळे त्यांच्या मनाला आपला कोणी तरी विश्वासघात केला व त्यामुळे पराभव झाला असें वाटे. याचा फायदा घेऊन हिटलरने कम्युनिस्ट, सोशिॲलिस्ट व ज्यू यांनी देशांत दुही माजविली व देशाचा तेजोभंग केला असें सैनिक व गतानु-

---

(मागील पानावरून पुढे चालू)

बळावत चालला तसतसा या कल्पनेच्या प्रसाराला जोर चढला. 'आर्यनायझेशन,' 'ॲंटि सेमिटिझम' वगैरे वर्णद्वेष व वर्णश्रेष्ठता दर्शविणाऱ्या कल्पनांना ऊत आला. 'हिटलर यूथ' ही चळवळ यांतूनच निघाली. ह्या प्रचाराचा मुख्य रोख जर्मनींतील 'ज्यू' ह्या अनार्य लोकांविरुद्ध होता व आहे. तसा तो ॲंग्लो-सॅक्सन, स्लाव्ह ह्याहि "अनार्य" लोकांविरुद्ध आहे. नाझींनी ज्यू लोकांचा इतका छळ आरंभिला ह्याची कारणपरंपरा शोधणें जरी अप्रस्तुत आहे, तरी एवढें खरें की ते जर्मनींत मुख्यतः व्यापार, सावकारी, शिक्षण, राजकारण इत्यादि बाबतींत हातपाय पसरून बसले होते. ते व्यापारी वृत्तीचे असल्याने त्यांनी देशद्रोह केला असा त्यांच्यावर आळ होता.

गतिक वृत्तीचा बहुजनसमाज ह्यांना भासवून दिलें. यामुळे इष्ट तें घडूं लागलें. सार्वजनिक त्वेषाग्नीची आच त्या प्रतिपक्षीयांना लागूं लागली व हिटलरच्या पक्षाला जोर चढूं लागला.

(५) जर्मन माणूस सामान्यतः क्षात्रवृत्तीचा असल्याने त्याला गणवेष अंगावर चढविणें, शिस्तींत कवाईत करीत मिरविणें, इत्यादि गोष्टी करण्याला संधि मिळाल्यास त्यांत तो सहज सामील होतो. यामुळे हिटलरने काढलेल्या हुडेलहप्पीच्या संस्थांत बहुजन-समाज तेव्हाच सामील झाला. त्याचबरोबर त्याने त्यांना सहज पटणाऱ्या अशा, आर्थिक परिस्थिति सुधारणें, ज्यू सारख्या देश-द्रोह्यांस घालविणें, अपमानकारक तह रद्द करणें व जर्मनीला पूर्ववत् मानाचें स्थान मिळवून देणें, ह्यांसारख्या गोष्टी आपलें ध्येय आहे असें समजावून दिलें. त्यामुळे तरुण पिढीप्रमाणे या गरीब बहुजन समाजामधूनही सैनिकांचा भरपूर पुरवठा मिळण्याची सोय झाली.

(६) एवढेंच करून न थांबतां आपल्या वृत्तीच्या निस्सीम साथीदारांची एक प्रभावळ तयार करून तिची प्रतिपक्षाशीं लढण्या-जोगी, आपल्यांत फूट न पडण्याजोगी, फूट पडल्यास त्यावर ताबडतोब उपाय करतां येणारी, अशी एक घटना व योजना केली व तीप्रमाणे काम सुरू केलें; त्यांत मुख्यतः बरेच मजूर होते.

(७) गरीब सामान्य बहुजनसमाज आणि तरुण व भावी पिढी ह्यांना आपल्या हातांत घेण्याची योजना केल्यावर अगदी वरचा व धनिक कारखानदार वर्ग ह्याला आपलासा करून घेणें इष्ट होतें. याला अनेक कारणें आहेत. एक तर या वर्गांचा वायमार सरकारला पैशाचा पाठिंबा होता; दुसरें, या वर्गांतील क्रुप, थायसेन, सीमेन, किर्डॉफ, फार्बेन, श्रीडर, स्टिन्नेस वगैरे अब्जाधीश मोठ्या संस्था व त्यांचे मालक हे जर्मनीच्या लढाऊ सामर्थ्याचे मुख्य आधारस्तंभ होते. ते कोळसा, लोखंड, पोलाद व रासायनिक

द्रव्यें वगैरें धंद्यांचे मालक होते. ह्यांची उत्पादक लढाऊ शक्ति हिटलरला जशी आपल्या ध्येयपूर्तीसाठी हवी होती तशी व्हर्साईलच्या तहानें उत्पन्न केलेल्या अनेक लहान लहान राष्ट्रांना या संस्थांचा माल विकून स्वदेशाला लागणारा इतर कच्चा माल घेण्यासाठी पण हवी होती. चौथें कारण असें की विराट राष्ट्रशक्ति एकत्रित करण्यासाठी लहान व मध्यम वर्गाला व त्यांच्या उद्योगधंद्याला गिळून टाकण्याला हे मोठे मासे त्याला हवे होते. उलट ह्या अब्जाधीशांना प्रारंभीं प्रारंभीं, युद्धांत झालेलें नुकसान भरून काढण्यासाठी व नंतर आपल्या जर्मनींत व इतर देशांत पसरण्यासाठी वाढता कामकरी वर्ग हवा होता व मध्यम वर्ग नष्ट व्हावयास हवा होता.* या परस्पर मतलबी हेतूने या दोघांचें सूत जमलें. या कारखानदार वर्गाने जरी हिटलरला सत्ताधीश बनविण्यास मदत केली† व हा वर्ग अजूनही मदत करीत‡ आहे, तथापि ह्या दोघांच्याही तोंडाला पानें पुसून सर्वच सूत्रें आपल्या हातांत ठेवण्याच्या योजना हिटलरने केल्या होत्या. त्या अशा—वरील कारखानदार पैशाच्या जोरावर वरचढ होऊं नयेत म्हणून सर्व गरीब व मजूर वर्ग आपल्या हातांत ठेवून त्यांच्या मधूनच लष्करी वर्ग निर्माण केला होता. व त्यामार्फत हिटलरने धनिक वर्गाला आपल्यापुढे नमण्यास तसेंच त्यांच्याकडे धनिक वर्गाने योग्य लक्ष न दिल्यास तोच कामकरी वर्ग तावडतोब 'कम्युनिस्ट' बनेल असा धाक दाखवूनही

---

* 'Real Rulers of Germany.' *Hans Behrend*, Lawrence and Wishart, London, 1939.

† I Paid Hitler : *Fritz Thyssen*, Cooperation Pnblishing Co. N. York, 1941.

‡ Thinkers vs. Junkers : *Will Schaber*, Ungar, N. York 1941.

ताब्यांत ठेवण्याचे प्रसंग त्याने घडवून आणले.* शिवाय ज्यू सावकारांना लुटून त्या सरकारजमा पैशाच्या जोरावर व इतर युक्त्यांनी कांही फार मोठे कारखाने केवळ सरकारी मालकीचे करून ते आपल्या प्रभावळींतील माणसांच्याच–अर्थात् अलीकडे –स्वाधीन करून ठेविले आहेत; जसें हर्मन गोअरिंग स्टील ट्रस्ट. तसेंच सर्व ट्रस्टवर पक्कें सरकारी नियंत्रण आहेच. याच्या उलट गरीब कामकरी वर्गाला, मध्यम दर्जाच्या व्यापारी संस्था, कारखाने, दुकानें, त्याचप्रमाणें मोठमोठी शेती ह्यांची पुनः वाटणी करावयाची असून त्यांत तुम्हांला हिस्सा मिळेलच, पण या गोष्टीला वेळ लागेल, तथापि तोंपर्यंत तुमच्या पोटाची मात्र उत्तम सोय लावली जाईल, असें आमिष दाखविलें. लढाऊ साहित्योत्पादनाचे कारखाने चालू ठेवून त्यांत त्यांच्या पोटाची सोय मात्र हिटलरने लाविली व दुसरी गोष्ट मात्र मुळीच केली नाही. उलट वर सांगितल्याप्रमाणे ते दोन्ही वर्ग मात्र मोडून टाकले आणि अप्रत्यक्ष रीतीने फार मोठ्या धनिक वर्गाला मदत केली. याचा परिणाम तात्पुरता फायदेशीर वाटतो आहे, तथापि हिटलरच्या या परस्परविरोधी, दुटप्पी धोरणांतच† जर्मनीच्या भावी नाशाचीं कांही बीजें आहेत.‡

(८) मतप्रसार करून आपलें कार्य साधण्यासाठी प्रचार हें एक उत्कृष्ट साधन असतें. त्याचा हिटलरनेही उपयोग केला. पण त्याने उत्पन्न केलेलें प्रचारतंत्र अगदी विलक्षण असून त्याला, इतर राष्ट्रें ज्याला नीति अनीति मानतात, तसल्या विचारांची जरूर नाही. उलट त्या प्रचारतंत्राचा मुख्य आधार सामुदायिक जनमनां-

---

* 'One Man against Europe' : *K. Heiden*, Penguin, 1940, Pp. 44–60.

† 'Real Rulers of Germany' : *Ibid.*

‡ Revolution of Distruction, : *Heinemann* 1939 and Redemption of Democracy, : *Ransch Mine* 1941.

तील दुबळ्या, दोषी व आळशी वृत्ति हा आहे. यामुळे त्या प्रचार-तंत्राचा बेसुमार उपयोग करण्यांत येतांच सामान्य जनसमूह भिऊन धाबरून जातो व विमूढ होऊन गर्भगळित होतो. हें खालच्या दर्जाचें प्रचारतंत्रच अखेरीस जर्मनीच्या नाशाला हातभार लावल्यावाचून रहाणार नाही असें विचारी वर्गाला वाटत आहे.* तसेंच या तंत्रामुळे जगाच्या व्यवहारावर अनिष्ट असे परिणाम होणार आहेत.

जर्मनीची भौगोलिक परिस्थिति व समृध्दि

ह्या ठिकाणीं विचारांत घ्यावयाचा जर्मनी म्हटला म्हणजे दुसरें महायुद्ध सुरू होण्याच्या पूर्वीचा जर्मनी होय. जर्मनी हा धंदे-प्रधान देश आहे. कारण त्यांतील शेंकडा ३८ लोक धंदे कारखान्यांत गुंतलेले आहेत. तो इंग्लंड, फ्रान्स किंवा रशियापेक्षा जास्त प्रमाणांत मोठ्या धंद्यांचा देश आहे. ज्याला Mass-production (राक्षसी उत्पादन) म्हणतात तशा प्रकारचे कारखाने जर्मनींत †

---

* The German Mentality : *Verina*, Allen & Unwin, London, 1941.

Metapolitics : *Peter Viereck*, Knopf, N. York, 1941.

† मोटमोठया कारखान्यांत पुष्कळ माणसें लागतात. ह्याची कल्पना मोठमोठीं शहरें व त्यांची लोकवस्ती ह्यांवरून येऊं शकते.

शहरें	(जर्मनी) १९३९	(ब्रि. बेटें) १९४०	(रशिया) १९४०	(यु. स्टेट्स्) १९४०
१० लक्षांवरील	२	४	२	६
५ ते १० लक्षांचीं	१०	२	४	८
२॥ ते ५ लक्षांचीं	१६	१४	१३	२०
१ लक्षावरील	५७	५७	३०	९०

पण लोकसंख्येच्या वर्गीकरणावरून कारखान्यांत व धंद्यांत गुंतलेल्या लोकांचें प्रमाण थोडेंसें निराळें पडतें. जसें:—जर्मनी (शें. ३८), ब्रि. बेटें (शें. ४०), संयुक्त संस्थानें (शें. २९) व रशिया (शें. ६). पण त्यामुळे वरील निर्णयाला बाध येत नाही.

इंग्लंडपेक्षाही जास्त आहेत. पण त्यांत शेतकरी लोकांचें प्रमाणही ब्रिटिश बेटांपेक्षा बरेंच जास्त आहे. (ब्रिटिश बेटांत शेतकरी शें. ७, पण जर्मनींत शें. ३१ आहेत.) जगांतील सर्व धंदेप्रधान देशांसंबंधाने ध्यानांत ठेवावयांची मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे ते सर्व देश आपल्या धंदेकारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या मालासाठी कमी जास्त प्रमाणाने परावलंबी आहेत. त्यांतल्या त्यांत अमेरिका व रशिया हे देश कमी परावलंबी आहेत. या दृष्टीने जर्मनीचा विचार करूं लागलों तर खालील परिस्थिति ध्यानांत येते.

देशांतील कशीबशी निम्मी जमीन शेतीला योग्य अशी आहे. पण ती हलकी आहे. यामुळे जर्मनीने तिची उत्तम मशागत करून, खतें फार मोठ्या प्रमाणांत घालून तिची उत्पादनशक्ति वाढविलेली आहे. कोणत्याही राष्ट्राच्या जीवनाला खाद्यपेय पदार्थ, वस्त्रप्रावरणाचे पदार्थ, व संरक्षणाच्या वस्तु इतक्या गोष्टी लागतात. या बाबतीसंबंधाने जर्मनीचा विचार केला असतां खालील दृश्य दिसतें.

यौद्धिक परिस्थितीचा विचार न करतां, ठोकळमानाने असें म्हणतां येतें की मुख्य खाद्यपदार्थांच्या बाबतींत तो देश ८३ टक्के स्वावलंबी आहे. (सुमारें १० टक्के गहू बाहेरून आणावा लागतो. मका बहुतेक म्हणजे ७५ टक्के आणावा लागतो--मुख्यतः अर्जेंटिना मधून). स्निग्ध पदार्थांच्या बाबतींत (लोणी, चरबी, तेल, मांस इत्यादि) तो ४० टक्के परावलंबी आहे ! * युद्धकाळांत हा परावलंबीपणा अर्थातच जास्त मोठा असतो आणि युद्ध जितकें लांबणीवर पडेल तितकी ती अडचण तीव्रतर होत जाणार. पश्चिमेकडील हॉलंड-डेन्मार्कवरील स्वारी, पोलंड व पूर्वयुरोपवरील (डॅन्यूबचें खोरें व बाल्कन राष्ट्रें)स्वारी यावरील उणिवा बऱ्याच अंशाने भरून काढण्यासाठी केलेल्या आहेत. पण जिंकलेल्या मुलखांच्या सर्व

* Guns for Butter हें धोरण या उणिवेसाठीच होतें.

प्रकारच्या उणिवांची जबाबदारीही त्याचबरोबर आली. अर्थात् खुद्द जर्मनीच्या आर्थिक अडचणी थोड्या प्रमाणाने हलक्या झाल्या, पण राजकीय जबाबदारी व अडचणी वाढल्या. पेय (चहा, कोको, कॉफी इत्यादि) पदार्थांसाठी तर इतर युरोपियन राष्ट्रांप्रमाणे जर्मनीही पूर्णतः परावलंबी आहे. कांही पेय पदार्थ जर्मनीला त्याच्या वसाहतींमधून मिळत.

वस्त्रप्रावरणांच्या बाबतींत (कापूस, ताग, रेशीम, लोकर, रबर*) जर्मनी पूर्ण परावलंबी आहे. कांही कृत्रिम पदार्थ व देशांत होणारा थोडा वाख व थोडी लोकर हीं जमेस धरलीं तरीही विणकामाच्या पदार्थांच्या बाबतींत जर्मनी २२–२५ टक्के पेक्षा जास्त स्वावलंबी नाही.

कोळशाशिवाय (स्वतःची गरज भागवून जर्मनी २५ टक्के कोळसा निर्गत करूं शकतो) बाकी सर्व खनिज पदार्थांच्या बाबतींत जर्मनी असाच परावलंबी आहे. विशेषतः यौद्धिक महत्त्वा-

---

* जर्मनीला स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनविण्यासाठी व नैसर्गिक पदार्थांची उणीव भरून निघावी म्हणून जर्मन शास्त्रज्ञ अनेक कृत्रिम पदार्थ बऱ्याच वर्षांपासून बनवूं पाहत आहेत. त्यांना त्यांत थोडें यशही आलें आहे. जसे बूना (रबर), झेलबोल किंवा विस्त्रा (लोकर) हे पदार्थ व तेल (कोळशापासून) (Miracles of German chemistry). असे प्रयत्न रशियांतही सुरू आहेत. त्यानेही कृत्रिम रबर बनविला आहे. कृत्रिम जरी नव्हे तरी दहा दहा वर्षें टिकणारीं कापसाचीं झाडें तयार केलीं आहेत. 'लेनिटल' नांवाचा दुधापासून बनविलेला कापसासारखा पदार्थ इटालीने बनविला. खऱ्या व कृत्रिम रेशमाला मागे टाकणारें 'नायलॉन' नांवाचें रेशीम अमेरिकेने बनविलें असून जपान तर सर्वांत स्वस्त पण सकस असें राष्ट्रीय अन्न तयार करीत असून त्यांत त्याला यश येत आहे! स्वावलंबी बनण्यासाठी केले जाणारे हे प्रयत्नही राष्ट्रांतरीय संघर्षांचीं पूर्वचिन्हें आहेत.

च्या खनिज पदार्थांची उणीव हें जर्मनीचा घात करणारें व्यंग आहे. शस्त्रास्त्रांच्या कारखान्याला जरूर असणाऱ्या लोखंड, तांबें, ॲल्युमिनम, टिन, निकल, क्रोमियम, मोलिबडिनम्, टंगस्टिन, इ. इ. धातूंची मोठी उणीव हें जर्मनीच्या लढाऊ किल्ल्याचें न बुजलेलें व असंरक्षित असें भगदाड आहे. लोखंडासाठी जर्मनी मुख्यतः अल्सास लोरेन, स्वीडन व स्पेन ह्यांवर अवलंबून असे. खास जर्मनीमधील लोखंड त्याची जास्तींत जास्त ३० टक्के गरज भागवूं शकतें. नॉर्वेमधील नार्विकची लढाई स्वीडिश लोखंडासाठी, व स्पेनमधील बिल्बॅओची लढाई पण लोखंडासाठी होती. बाल्कन राष्ट्रावरील स्वारीनें बरेंच बॉक्साईट (Bauxite - ॲल्युमिनमचा मूल घटक), क्रोमिअम व थोडें तांबें हे धातू मिळाले. रशियाबरोबर दोस्तीचा तह करून वरील धातूंपैकी महत्त्वाचे, उत्तम पोलाद बनविण्याला उपयोगी असे कांही धातू थोडया फार प्रमाणाने मिळण्याची सोय झाली, पण जिंकलेले सर्व देश त्याच्या ताब्यांत राहिले असें मानलें, तरीही तो लोखंड व पोलाद या बाबतींत अगदी परिपूर्ण नाही.*

लोखंड व तेल हे लष्करी गाडयाचे दोन पाय आहेत. त्यांपैकी तेलाच्या बाबतींत जर्मनी फार लंगडा आहे. कोळशापासून काढलेलें तेल गरजेच्या मानाने कमी व महाग आहे (सामान्यतः देशाची ३० टक्के गरज भागते). रुमानियाची लढाई, इराक-इराणमधील कारस्थानें, व कॉकेशसवरील जर्मनीचा डोळा ह्या

---

* परंतु आजच्या घटकेला (जून १९४३) युद्धसाहित्य तयार करण्याच्या सोईच्या बाबतींत तरी (बॉंबमुळे होणारें नुकसान जमेस न धरल्यास) जर्मनी पहिला आहे. (Industrial Power of the Nazis : *Louis Domeratzky*, Foreign Affairs, Apr. 1941

सर्व गोष्टी केवळ एका तेलासाठी* (खनिज तेल) आहेत.

सारांश, मोठ्या धंद्यांचें राष्ट्र ह्या दृष्टीने जर्मनी बव्हंशीं परावलंबी आहे. तो स्वयंपूर्ण नाही. ब्रिटन जरी असेंच परावलंबी आहे, तरी त्याचें व्यापारी साम्राज्य जमेस धरलें तर ब्रिटन हें बव्हंशीं स्वयंपूर्ण आहे. शिवाय अमेरिकेसारखा समृद्ध व स्वयंपूर्ण दोस्त कायमचा ब्रिटनने हाताशीं ठेवला आहे! जर्मनीपाशीं ह्यांपैकी कोणतीच योजना नाही !! यासाठी जर्मनीला-धंदेप्रधान जर्मनीला—आपल्या उणिवा भरून काढण्याकरितां शेजारी राष्ट्रांवर झडप घालणें भाग झालें. भौगोलिक परिस्थितीमुळे ही राष्ट्रीय मनोवृत्ति कशी बनली ह्याचा ऊहापोह पुढे ओघाने येणारच आहे.

हिटलरचें उद्दिष्ट व उपाय

धंदेप्रधानत्वाच्या बाबतींत जर्मनी कसा व किती प्रमाणांत परावलंबी आहे हें आपण वर पाहिलेंच आहे. पहिल्या महायुद्धा-नंतर जर्मनीचे धंदेकारखाने जरी मंदावले व लंगडे झाले होते, तरी त्यांचे मालक वा चालक म्हणजे 'भांडवलशाही कंपू' हा नष्ट झालेला नव्हता; एवढेंच नव्हे तर मनाने तो जास्त महत्त्वाकांक्षी बनत चाललेला होता. शास्त्रीय प्रगतींत सर्वांत पुढे असलेल्या जर्मन शास्त्रज्ञांच्या ज्ञानाचा उपयोग हे धूर्त भांडवलवाले धंदेप्रधा-

*जगांतील सुमारें ७० टक्के तेल युनायटेड स्टेटस्‌मध्ये (अमेरिकेंत) सांपडतें. याशिवाय इतर ठिकाणच्या तेलाच्या व्यापारांत अमेरिकेचा हात आहे तो निराळाच; ब्रिटन व अमेरिका हे दोघे मिळून जगांतील बहुतेक तेलाचे मालक आहेत. खास ब्रिटिश साम्राज्यांत केवळ जगांतील २ टक्के तेल आहे; पण इराण, इराक, अरबस्थान, बाल्कन राष्ट्रें, इजिप्त, ईस्ट इंडीज इत्यादि देशांतील तेलांत ब्रिटनचा व्यापारी हात आहे. जर्मनी-पाशीं मात्र कृत्रिम तेलाशिवाय तेल नाही. या युद्धाने रुमानियांतील थोडें तेल जर्मनीला मिळालें होतें. पण नुकताच भूकंप झाल्याने तें फुकट गेलें.

नत्वाची खाई सतत वाढत्या जोराने पेटत कशी राहील व त्यांत निरनिराळ्या राष्ट्रांतील भौतिक संपत्तीची आहुति कशी पडत राहील या योजना करीत बसले होते. इ.स. १९३० नंतर जगाच्या पुनर्वाटणीचा जो खल प्रथमत: जर्मनींत होऊं लागला, त्याचें उपादानकारणही जर्मनींतील भांडवलवाला कंपू हेंच होतें. हिंडेन्बुर्गच्या राजवटींत हा भांडवलवाला कंपू बराच सावरला होता आणि हिटलरसारखा साहसी पुढारी लाभतांच ह्या कंपूला जास्तच जोर चढला. ह्या कंपूमध्ये बॉश, थायसेन, क्रूप, सीमेन, किर्डाफ, स्टिन्नेस वगैरे अब्जाधीश कारखानदार मुख्य आहेत. हे व हिटलर या दोघांनाही एकमेकांची जरूर होती हें जरी खरें तरी ह्या कंपूने हिटलरला हाताशीं धरला आहे असें म्हणणें जास्त योग्य असें वाटतें. कारण आपले शस्त्रास्त्रांचे व इतर कारखाने चालावे व भरपूर नफा मिळवावा हाच त्यांचा मुख्य हेतु होता व आहे. या शिवाय त्यांचा दुसरा मुख्य हेतु पहिल्या युद्धाच्या वेळींही नव्हता*

---

* पहिल्या महायुद्धाच्या काळांत क्रूप कारखानदारांनी फ्रेंचांना म्हणजे त्यांच्या शत्रूला (१) जर्मन तोफखान्यांचीं मर्में विकलीं, (२) आर्मस्ट्रॉंग–व्हिकर्स ह्या ब्रिटिश शस्त्रास्त्रांच्या कंपनीला आपले युद्धोपयोगी 'पेटंटस' विकले, (३) लढाऊ जहाजांतले उत्कृष्ट पत्रे जर्मनीपेक्षा स्वस्त दराने अमेरिकेला विकले, (४) थायसेनने युद्धकाळांतच हॉलंडमार्फत दोस्त राष्ट्रांना उत्कृष्ट पोलादी चिलखतें विकलीं. अर्धें युद्ध झाल्यानंतरही स्वित्सर्लेंडमध्ये देखील कारखाने स्थापून युद्धसाहित्य गुप्त रीतीने फ्रान्सला विकलें! बॉशने आपल्या रासायनिक धंद्यांचे उत्कृष्ट 'पेटंटस' व कांही गुह्यें फ्रान्सला, त्याने र्‍हूरप्रांत ताब्यांत घेतल्यावरही, विकलीं! जर्मन 'मार्क' घसरत असतांना (इ. स. १९२३) तो स्थिर न व्हावा म्हणून स्टिन्नेस याने योजना केली. जर्मन चलन परदेशांत विकलें पण तो प्रयत्न फसविला! तीच गोष्ट ओटोवुल्फ याने हॉलंडमार्फत केली!

(पुढील पानावर चालू)

व आताही आहे असें दिसत नाही. किंबहुना युरोपांतील व जमल्यास जगांतील लोखंड, कोळसा, तेल व स्फोटक द्रव्यें ह्यांशीं संबंध असलेले सर्व धंदे व प्रदेश आपल्या ताब्यांत असावे वा आपलें जाळें* तरी त्यांवर असावें असें त्यांना वाटतें व त्या दृष्टीने ते आपले डाव टाकीत असतात व साधीत आहेत. हिटलरच्या राजवटींत पैशाच्या तुटवडयाची ओरड मोठी असे व आहे. पण त्या स्थितींतही वर लिहिलेल्या प्रकारचे डाव साधण्यासारखे दिसल्यास हवें तेवढें कर्ज झटकन पुढे करण्यांत येतें. जसें तुर्कस्थान, ग्रीस,

---

(मागील पानावरून पुढे चालू)

आज हिटलरच्या हुकुमशाहींत देखील थोडया निराळ्या ढोंगाखाली हे भांडवलवाले कारखानदार हिटलरच्या हाताने आपला माल–लढाऊ व इतर–आग्नेय युरोपांतील व वायव्य आशियांतील लहान अथवा असमर्थ वा मागासलेल्या राष्ट्रांना खुषीने वा सक्तीच्या खुषीने विकत घ्यावयास लावीत आहेत. आणि हे सर्व भांडवलवाले हिटलरच्या राइशस्टॅगचे "मुख्य मोठे कर्तबगार" सभासद आहेत. वरील सर्व घटना त्यांचे हेतु कशा प्रकारचे आहेत हें सिद्ध करतात. Real Rulers of Germany, 1939 व German Industry on the war path : *Bernhard Menne*, Hutchinson & Co., 1942.

* मागे सांगितलेल्या अब्जाधीशांनी पुढे दिलेल्या देशांत व्यापार, खाणकाम, शस्त्रास्त्रांचे कारखाने, रासायनिक कारखाने, इन्शुअरन्स कंपनी, वर्तमानपत्री कंपनी इत्यादि एक ना अनेक संस्थांच्या रूपाने आपले हातपाय पसरले आहेत. ते असे:—

(१) क्रूपच्या मालकीच्या व भांडवल असलेल्या बऱ्याच संस्था स्पेनच्या उत्तर व मध्यभागांत, स्वीडन, फिनलंड, स्पॅनिश मोरोक्को, जुगोस्लॅव्हिया, बल्गेरिया, ग्रीस, ऑस्ट्रिया, हॉलंड, इजिप्त यांत आहेत. इराणांतील त्यांचीं कारस्थानें (इ. स. १९४१ ऑगस्ट) चव्हाट्यावर आलींच.

 (पुढील पानावर चालू)

जुगोस्लाव्हिया ह्यांना इ. स. १९३७-३८ ह्या वर्षी व चीनला इ. स. १९३६-३७ सालीं कर्ज देण्यासाठी जर्मनी पुढे आला.

सारांश, ह्या भांडवलवाल्या वर्गाच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेचें लोण हिटलरला पुढे नेणें भाग आहे व त्याच्या महत्त्वाकांक्षेला व

(मागील पानावरून पुढे चालू)

(२) **फार्बेनचें जाळें**:—रुमानिया, ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हेकिया, द. अमेरिका ह्यांत अनुक्रमें रासायनिक द्रव्यें, तेल, वर्तमान पत्रें, इत्यादि प्रकारांनी फार्बेनने आपलें जाळें इ. स. १९२९-३१ ह्या दरम्यान खुद्द अमेरिकेंतील स्टँडर्ड ऑईल कं. ड्यू पॉंट, कोडॅक, मोन्सँटो व व्हिक केमिकल्स इत्यादि फार मोठ्या अमेरिकन कंपन्यांत मोठ्या प्रमाणांत पसरविलें, (World Review, Sept. 1941). तसेंच १९४१ नोव्हें. मध्ये फ्रान्समधील सर्व रंग कंपन्यांचा मिळून "फ्रँक् कलर" ह्या नांवाखाली एक गट करण्यांत आला. व तो फार्बेनचा एक मुख्य भाग आहे. Vichy at Cross Roads, Current History, Jan. 1942.

(३) **स्टिन्नेस घराण्याचें जाळें**:—ऑस्ट्रिया (तेल व खाण काम, इंजिनियरिंग कामें) द. अमेरिका ह्यांत आहे.

(४) **थायसेनचें जाळें**:—झेकोस्लोव्हेकिया (कोळसा), स्पेन (लोखंड, तांबें, पारा), स्वीडन (लोखंड) द. अमेरिका ह्यांत फार मोठें आहे.

(५) **सीमेन्स कंपूचें जाळें**:—रुमानिया (तेल), स्पेन (कोळसा, तांबें), स्वीडन (लोखंड).

(६) **ड्रेस्नर बँक व ड्यूश बँक**:—रुमानिया (तेल), ऑस्ट्रिया, (कोळसा, लोखंड), तुर्कस्थान (बँक), जुगोस्लाव्हिया (बॉक्साइट), हंगेरी (बॉक्साईट).

(७) **बॉश**:—जपान (पोलाद), ब्राझिल (लोखंड) इ. देशांत आहे. Germany's rulers would rule the world, Pp. 178-200. Real rulers of Germany–*Hans Bernhand*, 1939.

साहसी वृत्तीला तें पोषकच झालें. अर्थात् या आकांक्षा राष्ट्रीय मनाच्या आहेत असें म्हणण्यास जोरदार पुरावा नाही. उलट राष्ट्रांतील मध्यम व लहान वर्ग हा त्या वृत्तीला विरोधी आहे. कारण या मोठ्या माशांनी गेल्या पांचसहा वर्षांत ते सर्व प्रकारचे लहान मासे गिळून टाकले आहेत. किंबहुना आजच्या जर्मनींत जपानप्रमाणे फारच थोड्या घराण्यांच्या व संस्थांच्या ताब्यांत जर्मनीची बहुतेक संपत्ति व मर्में आहेत असें दिसतें.

हिटलर हा वरील भांडवलवाल्या लोकांच्या मदतीने सावरत* आलेला आहे ही गोष्ट येथे पुनः ध्यानांत आणणें जरूर आहे. कारण नाझी पक्षाने जर्मनीच्या उद्धाराची जी कल्पना आंखली तिचा पाया आर्थिक स्वरूपाचा असून तो या भांडवल-वाल्या कंपूने तयार केलेला आहे आणि त्याला पुष्टि म्हणून, अथवा त्या ध्येयाचें साध्य म्हणून बाकीचे उपाय आहेत. हें कसें तें थोडक्यांत पाहूं.

उद्धाराची प्रस्थानत्रयी

राष्ट्रोद्धाराचें आपलें ध्येय गाठण्याच्या नाझी पक्षाच्या योजनेचे तीन भाग आहेत. ते असे:- [१] **थायसेन योजना** (आर्थिक); [२] **रोझेनबर्ग योजना** (जातीय) आणि [३] **श्लीफेन योजना** (लष्करी). थायसेनची आर्थिक उद्धाराची योजना, हा नाझी योजनेचा प्राण असून तो जगविण्याचे, बाकीच्या दोन योजना, हे दोन मुख्य उपाय आहेत. हें कसें व त्या प्रत्येकीचें स्वरूप काय, ह्याचा अल्प परिचय करून घेऊं.

---

* Ibid–I paid Hitler–*Thyssen*. The Corporation Publishing Co. 1941.

थायसेन* योजना :– ही योजना म्हणजे आर्थिक साम्राज्य-शाहीची कमाल आहे. इ. स. १९३० नंतर जर्मनीमध्ये जगाच्या नवीन वाटणीचे जे वारे वाहत होते त्याचें परिणत स्वरूप म्हणजे ही योजना आहे.

अखिल जर्मनीची आर्थिक घटना ह्या योजनेवर उभारलेली आहे. ही योजना करणारापाशीं लोखंड व कोळसा हीच काय ती मुख्य राष्ट्रीय संपत्ति आहे. आणि यांचा पक्का माल खपविणाऱ्या बाजारपेठा जशा यांना पाहिजेत, तसे ते धंदे चालू ठेवणारा विविध प्रकारचा कच्चा मालही यांना हवा आहे. अर्थात् या योजनेप्रमाणें बाल्कन विभाग, वायव्य आशिया आणि ईजिप्त व भारत या देशांत तरी जर्मनीने आपली यशस्वी दुकानदारी थाटली पाहिजे आणि म्हणून या ध्येयप्राप्तीसाठी डॉ. स्चॅटमार्फत हंगेरी, बल्गेरिया, रुमानिया, जुगोस्लाव्हिया, तुर्कस्थान, इराक, इराण या देशांचा व्यापार ऱ्हूर प्रांतीय अब्जाधीशांनी काबीज करण्याचा शिस्तवार प्रयत्न करून तो हस्तगत केला. शिवाय

---

* थायसेन हा इ. स. १९३९ सालीं रशियाबरोबर तह होतांच जर्मनींतून पसार झाला, व स्वित्सर्लंडमध्ये गेला असें म्हणतात. त्याची सर्व मालमत्ता सरकारजमा झाली. थायसेन हें एक जर्मनीच्या आर्थिक जगतांतील नंबर एकचें प्रस्थ आहे. सर्व जर्मनींतील लोखंडी पोलादी कारखाने याच्या मुठींत आहेत. फ्रान्समधील इतकेच मोठे लोखंडी सामानाचे कारखानदार कॉमेट डेज् फोर्जेस ह्यांचा थायसेन हा कट्टा प्रतिस्पर्धी. जर्मनी व फ्रान्स ह्यांच्या वैराचें मुख्य कारण ह्यांची स्पर्धा हें होतें. ही स्पर्धा म्हणजे युरोपच्या भवितव्यतेची किल्ली आहे. कारण या स्पर्धेत जो जिंकील त्याच्या हातांत, सर्व युरोपचे लोखंडी पोलादी सामानाचे कारखाने येतील. व ते ज्याच्या ताब्यांत, त्याच्या ताब्यांत सर्व युरोपचें लष्करी सामर्थ्य व तोच सर्व युरोपचा धंदेपुढारी ठरेल!

या -हूरमधील थायसेन गटाने जर्मनींतील लूना ह्या ठिकाणच्या 'सेंट्रल जनरल केमिकल्स' या नवप्रस्थापित पण आर्थिक जीवनाचा जणूं प्राण अशा गटाशीं सहकार्य केलें! लूना येथील कारखान्यांत बहुतेक सर्व 'कृत्रिम पदार्थ' बनविले जातात* व तेही मुख्यतः कोळशापासून. जगांतील सर्व बाजारपेठा काबीज कराव्या अशी या दोन्ही गटांची महत्त्वाकांक्षा आहे; शिवाय हे दोन्ही गट धंद्याच्या दृष्टीने व लष्करी महत्त्वाच्या दृष्टीने परस्पर पूरक आहेत. त्यामुळे हे दोन्ही गट म्हणजे जर्मनीचा जणूं आर्थिक व राजकीय पायाच आहे. हें ध्येय साध्य करण्यासाठी बेल्जम, हॉलंड व पोलंड ह्यांतील सर्व कोळसा, फ्रान्समधील लोखंड, बाल्कन मधील तांबें व बॉक्साईट, त्या त्या देशाच्या युरोपांतील सर्व बाजारपेठा आणि त्यांचे आर्थिक आधार हे सर्व जर्मनीने शक्य त्या उपायांनी—युद्धानेच असें मात्र नव्हे—शक्य तितक्या लवकर आपल्या ताब्यांत आणिले पाहिजेत अशी या गटाची थायसेन योजनेच्या रूपाने जर्मन राष्ट्रापुढे मागणी आहे.

रोझेनबर्गची योजना:—थायसेन योजना जरी तर्कशुद्ध व योग्य होती तरी सामान्य जर्मन जनसमूहाला तिचें आकलन पूर्णतः होणें कठीण होतें. कारण सामान्य जनसमूह व हे अब्जाधीश ह्यांचें तितकें सूत नव्हतें; व तेवढी मोठी उडी सामान्य जनांच्या मनोभूमिकेला सुगम नव्हती. यामुळे यापेक्षा सहज पटणारी अशी एखादी योजना आज्ञाधारक, शिस्तप्रिय व विजिगीषु अशा क्षात्र वृत्तीच्या सामान्य मनाला हवी होती. ती रोझेनबर्गने पुढे आणिली. सर्व जर्मन राष्ट्राच्या आक्रामक जीवनधोरणाला उत्तेजन देणारी

---

* Miracles of German Chemistry by *Werkstoffe*-German Information Library, N. York, 1941.

"Lebensraum"* ची कल्पना देण्यांत आली होती. स्वयंपूर्णते-विरुद्ध एकच हाकाटी उठेल अशी सामान्य जनमनाची भूमिका तयार झाली होती; पण त्यापेक्षा जास्त उदात्त ध्येयप्रणालिकेची निकडीची आवश्यकता होती. ती या योजनेने भरून काढली. जर्मन तेवढा एक व्हावा (जर्मन तितुका मेळवावा), सर्व जर्मनांनी

---

* हा शब्द जर्मन असून त्याचा अर्थ "जीवंत राहण्यास पुरेशी जागा" असा आहे. जर्मन समाजाला खाण्यालाहि पुरेंसें नसून राहण्यालाही पुरेशी जागा नाही हा या शब्दाचा अभिप्रेत अर्थ जर्मनी करतो. ह्याच अर्थाचा दुसरा जर्मन शब्द Autarkie आहे. फ्रेंच शब्द Autarcie व इटालियन Autarchia असा शब्द आहे. शब्दश: अर्थ केल्यास Autarky ह्या इंग्रजी शब्दाचा आर्थिक स्थितीचा अर्थ "स्वयंपूर्णता" राष्ट्राच्या सर्व गरजा राष्ट्रांतच भागविल्या जाणें–असा आहे. ह्या अर्थाला योग्य असें एकही राष्ट्र आज पृथ्वीवर नाही. परंतु "आर्थिक स्वयंपूर्णतेचें ध्येय गाठण्याची धमक असणें" अशा राजकीय अर्थाचा शब्द Autarchy हा आहे. ह्यांत आर्थिक अर्थाच्या जोडीला राजकीय व लष्करी सामर्थ्य असल्याचा अर्थ अभिप्रेत आहे. व ह्याच अर्थाने जर्मनीने "Lebensraum" ची ओरड करण्याची सुरुवात केली. व तद्द्वारें जरूर ते सर्व खाद्य व खनिज पदार्थ शेजारच्या विशेषतः पूर्व व आग्नेय युरोपांतील देशांतून मिळविण्याचा आपला हक्क आहे असा आपल्या साम्राज्य पिपासेचा अर्थ ध्वनित केला. "Sphere of Influence" "राजकीय प्रभावक्षेत्र" या अर्थाची वरील शब्दाने नवीन आवृत्ति निघाली एवढेंच ! ह्या सर्व आरडाओरडीचें ध्येय त्या वेळीं तरी पहिल्या महायुद्धाप्रमाणे जर्मनीचा आर्थिक कोंडमारा –Blocked– होऊं नये असें आहे.

Economic Self-sufficiency : *A. G. P. Fisher* and Living Space and Population Problem : *R. R. Knekczynsk* Oxford Press, 1939.

नाझी पक्षाची Lebensraum ची ओरड व त्यापूर्वीच्या राजवटींतील "Drang Natch Osten" ही ओरड हीं दोन्हीं एकच आहेत.

मध्ययुरोपांत एकत्रित होऊन अभेद्य अशा संघटित स्वरूपांत राहावें, आणि सर्व जर्मन प्रांत एकछत्री अमलाखाली असावे. अशा रीतीने तयार होणाऱ्या जर्मन राष्ट्रसंघाला त्याचें जीवित स्वयंपूर्ण व सुखावह होण्यासाठी वसाहती हव्यातच. असें हें ह्या योजनेचें थोडक्यांत स्वरूप आहे.

या योजनेचें हें ध्येय गाठण्यासाठी जर्मन ही एक सर्वश्रेष्ठ जात आहे, खरें 'आर्यत्व' तिच्यांत आहे, विशेषत: स्लॅव्ह, पोल, व अँग्लो सॅक्सन (इंग्लिश, फ्रेंच वगैरे) हे अनार्य आहेत, ही जातीय श्रेष्ठतेची व द्वेषाची कल्पना या रोझेन्बर्ग* योजनेने दिखाऊ शास्त्रशुद्धतेच्या पायावर उभारली आणि तद्द्वारा विजिगीषुत्वाचें नवचैतन्य राष्ट्रीय मनांत अनिर्बंध संचरूं दिलें.

राष्ट्रीय मनाची एवढी तयारी करण्यासाठी राष्ट्राचा आधार जो भावी पिढी त्याकडे प्रथम लक्ष देण्यांत आलें. याचा अर्थ सर्व शिक्षण खातें वरील कल्पनांनी भरून टाकण्यांत आलें. जागोजाग 'हिटलर यूथ' नांवाच्या शाळा उघडण्यांत आल्या. लष्करी पेशा बाणविणारे अनेक संघ व संस्था (जसें स्टॉर्मट्रूप्स, ब्लॅकशर्टस् इ.) स्थापण्यांत आले. शिवाय उत्कृष्ट प्रतीचें प्रचारतंत्र योजून त्याचें असामान्य काम सुरू करण्यांत आलें. याशिवाय इतर अनेक उपाय योजण्यांत आले. हें काम इंग्रज फ्रेंच वगैरे लोकांच्या डोळ्यांत एकदम भरू नये अशा धोरणाने व सावधगिरीने चालविलेलें होतें.

जरूर ती तयारी होतांच हिटलर व त्याचे लोक कामास लागले. व्हर्साइलच्या तहामुळे झालेला अन्याय भरून काढणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे असें लोकांपुढे प्रथम मांडण्यांत येऊं लागलें. उत्साहपूर्ण महत्त्वाकांक्षी जर्मन समाजाला तें लवकर पटलें.

---

* रोझेन्बर्ग व त्याचें कार्य ह्याची ओळख "हिटलरची प्रभावळ" या आगामी ग्रंथांत पहावी.

तसेंच ऱ्हाइन प्रदेशाचा ताबा जर्मनीने घेण्याच्या बाबतींत, ऑस्ट्रिया जर्मनीला जोडण्याच्या बाबतींत आणि डँझिग व पोलंड मधील 'कॉरिडर' या लहान पट्टीवजा प्रदेशाविषयीं खुद्द ब्रिटिशांतही दुमत उत्पन्न करण्याच्या बाबतींत तें प्रचारतंत्र यशस्वी ठरलें.* ऑस्ट्रियावर केलेलें आक्रमण पचतांच जर्मन हद्द इटलीला भिडून गेली!– ब्रेन्नर खिंडरूपी इटालियन दरवाजाशीं जर्मनी येऊन थडकला; दक्षिणेकडून झेकोस्लोव्हॅकियाला शह देऊं शकून आग्नेय युरोपचें द्वार जी डॅन्युब नदी तेथे तो येऊन बसला!

यानंतर 'जर्मन तितुका मेळवावा' हा ध्वनि राष्ट्रीय मनांत उठवून दिला आणि सुडेटनलँड व झेकोस्लोव्हॅकिया यांना गिळून पोलंड व बाल्कन राष्ट्रें ह्यांना शह दिला. त्यानंतर मेमेल व डँझिग् हीं दोन महत्त्वाचीं बंदरें घेऊन पोलंडची मृत्युघटिका घातली. फ्रान्स व ब्रिटन हे तहाप्रमाणें पोलंडला कोणतीच मदत करूं शकले नाहीत. झेकोस्लोव्हॅकियाप्रमाणें परंतु बराच रक्तपात झाल्यानंतर पोलंड जर्मनीच्या हातीं लागला. रशियाने अर्धा पूर्व व आग्नेय पोलंड घेऊन बाल्टिक राष्ट्रापासून नाक्याचीं ठाणीं घेऊन प्रच्छन्नपणें जर्मनीच्या पूर्वेकडील आक्रमणाला प्रतिशह दिला—जरी ह्या वेळीं बाह्यतः रशिया-जर्मनीचा सलोख्याचा तह झाला होता, तरी तो अस्तनींतील निखारा होता. इकडे इंग्लंड व फ्रान्स ह्यांना जर्मनीशीं युद्ध पुकारण्याशिवाय गत्यंतर उरलें नाही. व त्याप्रमाणें घडलें.

सारांश, जर्मनीने तिसऱ्या राइशच्या † मर्यादा स्पष्टपणें

---

* The Hitler's New Order in Europe by *Paul Einzig* Mc Millan & Co. 1940.

† तिसरें राइश—हें जर्मन नांव नाझी राजवटीला लावितात. मध्यकालांतील जर्मन राज्य हें १लें जर्मन साम्राज्य, हो हेन्झोलार्न घराण्याचें इ. स. १८७१–१९१८ हें दुसरें जर्मन साम्राज्य, व सध्याचें हें तिसरें.

वाढविल्या, सर्व जर्मनांना एकत्र करून दांडगी संघशक्ति उत्पन्न केली, आणि अशा रीतीने रोझेन्बर्ग योजनेचा पहिला प्रवेश पार पाडण्यांत आला !

सर्व जर्मन एकत्र होतांच जर्मनेतरांचें काय झालें असेल याचा या ठिकाणीं विचार नकोच. अशा रीतीने व्हर्साइलच्या तहांतील एकेक गोष्ट खोडून काढून ती दुरुस्त करण्याची जर्मनीने सुरवात केली. आता त्याला पूर्वीच्या वैभवाची-साम्राज्याची-गरज भासूं लागली. तें साम्राज्य म्हणजे एक तर समुद्रापलीकडील वसाहतींचें साम्राज्य; पण त्याची तर विल्हेवाट लागलीच होती. राष्ट्रीय शक्तीचा एका बाजूला कोंडमारा झाल्याबरोबर तिने शेजारींच दुसऱ्या बाजूस–आग्नेय युरोपांत–तोंड फोडलें. जपानला चीनवर आक्रमण करण्यास ज्या कारणांनी भाग पाडिलें, जवळ जवळ तशाच कारणांमुळे जर्मनीला शेजारच्या निर्बल राष्ट्रांवर झडप घालणें भाग पडलें, असें म्हटल्यास त्यांत सत्यांश नाही असें नाही.

वाढती लोकवस्ती व स्वयंपूर्णतेचा अभाव ह्यांबद्दल ओरड सुरू होतीच. तिला वाव देण्यासाठी Lebensraum ची मागणी जोराने सुरू ठेवली व वसाहतवादावरील जोर थोडा कमी करून आग्नेय युरोपच्या (Drang Nach Osten) राजकारणावर विशेष भर देणें सुरू केलें.

तें साध्य होण्यासाठी उघड शत्रुत्व सुरू झालेल्या ब्रिटन व फ्रान्स ह्यांना डांबून ठेवण्यासाठी यौद्धिक अपरिहार्यतेच्या मिषाने नॉर्वे, डेन्मार्क व हॉलंड ह्यांवर झडप घालून ब्रिटन व फ्रान्स ह्यांना चांगलाच दम भरला व लागलीच बेल्जम व फ्रान्स ह्यांवर हल्ला करून युरोपचा सर्व पश्चिम किनारा आपल्या ताब्यांत घेतला.

ह्यांत हिटलरने भूमिविजय तर मिळविलाच, शिवाय खाद्यपेय पदार्थांचा तात्पुरता फायदा घेतला आणि युद्धसाहित्य व कारखाने ह्यांचाही फायदा घेतला; पण उलट बाजूने पाहतां यांतील लहान मोठीं बऱ्याच वर्षांपासून स्वातंत्र्य उपभोगिलेलीं राष्ट्रें तात्पुरती तरी लष्करी अमलाखालीं ठेवण्याचा बोजा व खटाटोप पतकरावा लागला.

ह्या सर्व बाजूंनी दिग्विजय मिळवीपर्यंत हिटलरच्या, म्हणजेच नाझी पक्षाच्या, राजकारणांत किंवा योजनांत ' New order in Europe ' ह्याचा ध्वनि अस्पष्टपणें ध्वनित होता.* या प्रकारची विचारसरणी जपानने मात्र पूर्व आशिया पुरती यापूर्वीं स्पष्टपणें घोषित केली होती. ही युरोपांतील योजना म्हणजे थायसेन गटाच्या जगड्व्याळ व जगद्व्यापी आकांक्षेचा पूर्वरंग आहे. या योजनेचा 'सूत उवाच' हिटलरने आपल्या ' Mein Kampf ' मध्ये केला आहे.* आणि इ. स. १९३७ सालीं जर्मनी, इटली व जपान ह्या त्रिवर्गांमध्ये—या तीन जूट राष्ट्रांमध्ये—जो एक गुप्त तह झाला त्यामध्ये, तसेंच त्याच वर्षी प्रसिद्ध केलेल्या—केवळ त्रिवर्गाच्या धोरणासाठी प्रसिद्ध केलेल्या-प्रचारपत्रकामध्ये जगाच्या वाटणीचा थायसेन योजनेला अनुरूप असा खुलासा आढळतो. ह्या योजनेचा विचार पुढे जगाची वाटणी व राष्ट्रांचे गट ह्यांत करणार आहों. यानंतर आपण ' श्लीफेन योजने'कडे वळूं.

---

* 'Hitler's New order in Europe"–*Paul Einzig*, 1940. ह्यांत जरी सदरहु मत नाझी पक्षाने जपानपासून उसनें घेतलें असें प्रतिपादिलें आहे, तरी Mein Kampf मधील खालील उताऱ्यांत ती जगद्व्यापी आकांक्षा ध्वनित केलेली आढळते. " A state which in an Epoch of racial Adulteration devotes itself to the duty of preserving the best elements of racial stock *must one day become ruler of the Earth.*"

नवीन श्लीफेन योजना:—काऊंट श्लीफेन* हा एक जर्मन लष्करी तज्ज्ञ होता. त्याने इ. स. १९१४ सालचें युद्ध जिंकण्यासाठी 'क्यानीप्लान' (योजना) तयार केली होती. तो स्वत: इ. स. १९१३ सालींच कालवश झाला, पण त्याने आपली लढण्याची योजना पूर्णतेला नेऊन ठेविली होती. असें असून इ. स. १९१४ सालच्या युद्धांतही जर्मनीच्या पदरांत अपयशच पडलें. याचें मुख्य कारण लहान मोल्टके याने श्लीफेनची योजना उपयोगांत आणिली नाही हें होतें. त्या योजनेचें स्वरूप खालीलप्रमाणें होतें. (१) लढाई रेंगाळत ठेवूं नये; तडफेने निकाल लावावा. (२) प्रत्येक वेळीं एका दिशेलाच चढाई व लढाई करावी; अनेक बाजूंनी व अनेक पक्षांशी एकाच वेळीं लढाई सुरू ठेवूं नये. (३) शक्तिसर्वस्व एकवटून एकाच बाजूवर एकाच ठिकाणीं तुटून पडावें व कांही तरी निश्चित निकाल लावावा. ह्या तीन्ही गोष्टी इ. स. १९२० च्या रशिया–पोलंडच्या लढाईंत यशस्वी व निर्णायक ठरल्या. परंतु पहिल्या महायुद्धानंतर पंचवीस वर्षांनी युद्धसाहित्य सुधारणेचें व परिस्थितीचें स्वरूप निराळें झालें. यामुळे त्याशीं टक्कर देण्यायोग्य असे उपाय योजणें इष्ट व अ-निर्वाह्य झालें आहे. यामुळे त्या श्लीफेन योजनेला खालील गोष्टींची नवीन पुस्ती जोडण्यांत येऊन त्याला 'नवीन श्लीफेन योजना' असें म्हणण्यांत येऊं लागलें. (१) विमानी हल्ला तडफेने चढवावा, (२) जरूर तरच रासायनिकें वा विषारी पदार्थ यांचा उपयोग करावा, (३) असें करीत असतां शत्रूच्या विमानी हल्ल्यापासून आपल्या

---

* श्लीफेन हा जर्मन सैन्यांतील अधिकाऱ्यांचा मुख्य म्हणून इ. स. १८९१–१९०७ पर्यंत काम करीत होता. त्याचें महत्त्वाचें लष्करी लिखाण इ. स. १९१३ सालींच प्रसिद्ध झालें होतें— (German Stratagy in 1914 and 1940 – Foreign Affairs April, 1941.)

स्वतःच्या धंदेविभागाचें व शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांचें पूर्ण संरक्षण होईल अशी उपाययोजना करावी.

याचा अर्थ 'विमानी चढाई' यशस्वी करावयाची, तींत शत्रूवर वर्चस्व मिळवावयाचें व तें कार्य करीत असतांना रासायनिक युद्धसाहित्याने शत्रूला जमिनीवर नरम करून टाकावयाचा असा आहे. त्याचीं दळणवळणाचीं साधनें, रसद व कुमक हीं विमानी हल्ल्याने नष्ट करावयाचीं, अशा स्थूल स्वरूपाची ही 'न्यू श्लीफेन योजना' आहे.

सारांश, वर सांगितलेल्या स्वरूपाची जर्मनीच्या उद्धाराची व आकांक्षापूर्तीची योजना नाझी पक्षाने ठरविलेली असून तदनुरोधाने कार्य होत आहे. हिटलरच्या परराष्ट्रीय धोरणांत, तसेंच प्रत्यक्ष व्यवहारांत, इतर राष्ट्रांच्या मताने जरी धरसोड, अविश्वास, नीत्यनीतीची चाड नसणें ह्या गोष्टी दिसल्या तरी त्या गोष्टी वरील ध्येय साधण्यासाठी केलेल्या युक्त्या आहेत व त्या योगाने नाझी जर्मनी, ध्येयाच्या जवळ जवळ जात आहे असें जर्मनीला तर वाटतेंच, किंबहुना त्याची तशी निस्सीम श्रद्धाही आहे; तथापि एवढें खरें की, हे जर्मनीला मिळालेलें व मिळणारें यश टिकाऊ आहे की नाही याबद्दल सर्वांना शंका वाटते; तसेंच युरोपच्या नवीन घटनेचें जर्मनीचें ध्येय सर्व राष्ट्रांना पसंत आहे की नाही, तसेंच वास्तविकतः तें ध्येय व्यवहार्य आहे किंवा नाही, ह्याबद्दलही शंका उत्पन्न होते.

परराष्ट्रीय राजकारण

वरील वर्णनावरून जर्मनीचें ध्येय आणि तत्प्राप्त्यर्थ जर्मनीचे प्रयत्न ह्या गोष्टी ध्यानांत आल्या असतील. यानंतर नैसर्गिक संपत्तीची कमतरता अथवा उणीव आणि व्यापारोपयोगी जलमार्गावर (समुद्र, नद्या, इत्यादि) स्वामित्व नसणें किंवा त्यावरील अप्रतिहत

व्यापार व्यवहाराची उणीव ह्या दोन गोष्टी जर्मनीच्या परराष्ट्रीय राजकारणाचीं उपादान कारणें कशीं आहेत हें पाहणें अत्यंत आवश्यक आहे.

इटली हें जसें भूमध्य समुद्रांत कोंडलेलें राष्ट्र आहे, तसें जर्मनी हें मध्य युरोपांत कोंडलेलें राष्ट्र आहे. जलमार्ग हें व्यापारी व धंदेप्रधान राष्ट्राचें मुख असतें. उत्तर समुद्र व बाल्टिक समुद्र हे दोन बाह्य जगाशीं व्यवहार करण्याचे जर्मनीचे मुख्य दरवाजे आहेत. पण तेही त्याला पूर्णपणें मोकळे नाहीत. कारण बाल्टिक हा लहानसा भूपरिवेष्टित समुद्र वर्षांतून बराच काळपर्यंत गोठतो म्हणून, तसेंच स्वीडन, फिन्लंड, रशिया हीं कृषिप्रधान राष्ट्रेंही त्यावर ताबा चालवूं पाहतात म्हणून आणि जर्मनीला लागणाऱ्या महत्त्वाच्या कच्च्या मालापैकी थोडाच कच्चा माल त्या समुद्रामार्फत जर्मनीला मिळतो, अर्थात् त्या समुद्रावरील जर्मनीचा व्यापारही त्या मानाने कमी* म्हणून, तो दरवाजा व्यापारी जर्मनीला कमी महत्त्वाचा अर्थात् अर्धवट उघडा असा वाटतो. तो राजकीय महत्त्वाचा मात्र खास वाटतो. उत्तर समुद्र—याला कित्येक वेळां जर्मन समुद्र असेंही म्हणतात—हा जर्मनीचा दुसरा पण महत्त्वाने पहिल्या प्रतीचा दरवाजा आहे. पण त्याचा फारच थोडा किनारा जर्मनीला लाभलेला आहे. ह्या समुद्रामार्फत जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, बेल्जम, हॉलंड ह्या पश्चिम युरोपांतील राष्ट्रांशीं आणि अटलांटिक महासागरापलीकडील नव्या जगांतील राष्ट्राशीं जर्मनी व्यापार व्यवहार करूं शकतो. किंबहुना जर्मनीचा ८० टक्के व्यापार ह्याच समुद्रामार्फत चालतो. जर्मनीचा शेंकडा ६० टक्के

---

* The Baltic : *Hampden Jackson*–Oxford Pamphlets. The Baltic States–Economic Information Department Papers–H. B. S. O. London 1938.

निर्यात व्यापार करणारें हॅम्बुर्ग हें जगांतील सर्वांत मोठें बंदर ह्याच समुद्रावर आहे. **अर्थात् उत्तर समुद्र हेंच जर्मनीचें सर्वांत महत्त्वाचें द्वार आहे.** जुन्या काळची 'हंसा लीग' (व्यापारी मंडळ) व त्यांचीं व्यापारी महत्त्वाचीं ठाणीं ह्याच समुद्रावर होतीं. या सर्व कारणांमुळे जर्मनींतील व्यापारी धनिक वर्गाला अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवरील कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्या दक्षिण अमेरिका व पश्चिम आफ्रिका ह्यांतील देशांशीं व्यापार करावा, जमल्यास ते भाग आपल्या हाताखाली घालावे असें वाटल्यास तें राजकारणाच्या दृष्टीने चुकीचें आहे अथवा होतें असें म्हणतां येणार नाही. बिस्मार्कपासूनचे राजकारणी पुरुष या धनिक वर्गाच्या आकांक्षांना मूर्त स्वरूप दिल्याशिवाय राहिले नाहीत. तें मूर्त स्वरूप म्हणजे मुख्यतः आफ्रिकेंतील जर्मनीच्या ताब्यांतील प्रदेश हें होतें; पण पहिल्या महायुद्धांतील पराजयामुळे ते प्रदेश त्या वेळच्या विजयी राष्ट्रांनी आपापसांत वाटून घेतले! आणि अशा रीतीने जर्मनी पुन्हा कोरडाच राहिला! हे प्रदेश परत मिळण्याबद्दल इ. स. १९२९ सालपर्यंत डॉ. स्ट्रोसेमान व डॉ. ल्यूथर ह्यांच्या द्वारें व्यापारी धनिक वर्गाने पुन्हा मागणी केली; तसेंच लोकार्नोचा तह, शस्त्र-संन्यास परिषद, इत्यादिकांच्या वेळीं वसाहतींच्या परत मागणीची ओरड जोराची होती; पुढे इ. स. १९३३-३६ पर्यंत ती ओरड थंडावली होती.* तथापि त्यानंतर पुनः तिने उसळी मारली. ह्या वेळीं जर्मनीचा एक मुख्य अर्थशास्त्रज्ञ डॉ. श्चॅट ह्याने त्या मागणीला उचलून धरिलें. हें कां व कशासाठी, तसेंच जर्मनीला

* ह्या वेळींही एप् व गोअरिंग (गोअरिंगचा बाप नैऋत्य जर्मन आफ्रिकेचा कमिशनर होताच.) हे त्या मागणीस उचलून धरीत होते. पण हिटलर मात्र स्तब्ध होता.

वसाहती हव्या आहेत कां नको आहेत, हव्या असल्यास कशासाठी, हव्या आहेत, इत्यादि गोष्टींचा उहापोह पुढे येणारच आहे. सारांश, येथे सांगण्याचा मुद्दा एवढाच की जर्मनीच्या परराष्ट्रीय राजकारणांत वसाहतींच्या परत मागणीचें उपादान कारण जर्मनींतील हॅम्बुर्ग, ब्रेमेन येथील उत्तरसमुद्राभिमुख धनाढ्य व्यापारी वर्गांची मागणी हें होतें व आहे. स्वीडन, फिनूलंड, एस्टोनिया, लॅटव्हिया, लिथुॲनिया ह्या बाल्टिक समुद्रावरील लहान मोठ्या राष्ट्रां (?) बरोबरच्या जर्मनीच्या राजकारणांत अथवा ह्या राष्ट्रांचा दर्जा व व्यवहार ह्या बाबतींतील रशिया–जर्मनीच्या चुरशीच्या राजकारणांत, बाल्टिक समुद्रावरील अनिर्बंध अधिकार हें एक मुख्य गमक कसें आहे, हें मागे पाहिलेंच आहे. एवढेंच नव्हे तर स्पेनमधील यादवींत जर्मनीने जो भाग घेतला तो मुख्यतः खनिज संपत्तीसाठीच नसून स्पेनच्या द्वाराने व्यापाराला मोकळा अशा खुल्या समुद्रांत प्रवेश मिळावा म्हणून.* तसेंच आफ्रिकेंतील फ्रेंच साम्राज्यामार्फत जर्मनी थोड्या काळापूर्वी कारस्थान रचीत होता तें मुख्यतः वरील हेतूनेच होतें.

मध्ययुरोपांतील जर्मनीचें परराष्ट्रीय राजकारण, वसाहतींच्या राजकारणाइतकें जुनें नाही. कारखाने हा धंदेप्रधान जर्मनीचा प्राण आहे. यामुळे जर्मनींतील मुख्य कारखानदारांना आपल्या कारखान्याला लागणारा बराच कच्चा माल पूर्व व आग्नेय युरोप ह्या भागांत मिळण्यासारखा असून तेथे आपला पक्का मालही खपण्याजोगी परिस्थिति आहे म्हणून तो सर्वच प्रदेश आपल्या प्रभावक्षेत्रांत आणावा, अथवा जरूर तर ताब्यांत ठेवावा, असें पहिल्या महायुद्धापूर्वीपासून मुख्य जर्मन कारखानदारांना वाटत असे.


* Geography of the War–*J. F. Harrabin* 1940—V. C. Gollancz, London.

एवढेंच नव्हे तर इराण इराकमधील तेलही हाताखाली घालून भारतीय बाजारपेठ आपल्या ताब्यांत आणावी असे विचार त्यांच्या डोक्यांत घोळत आणि त्यामुळे 'बर्लिन-बगदाद' या मार्गाची योजना ठरविलेली होती. सारांश, समुद्रापलीकडील साम्राज्याकांक्षा बाळगणारा वर्ग व आग्नेय युरोपांतील साम्राज्याकांक्षा बाळगणारा वर्ग असे दोन वर्ग जर्मनींत होते व आहेत.

यापैकी दुसऱ्या म्हणजे आग्नेय युरोपांतील साम्राज्य विस्ताराचें राष्ट्रीय मनांत या वेळीं प्राबल्य झालें. हें प्राबल्य होण्याचीं मुख्य कारणें पुढे दिल्याप्रमाणे होतीं.

वसाहती परत मिळविण्यासाठी ब्रिटनसारख्या आरमारी सत्तेशीं झगडून पराभूत होण्याचा प्रयोग पुनः करून पाहणें बरोबर नाही, त्यापेक्षा आग्नेय युरोप काबीज करण्याचा प्रयोग केल्यास बरें, अशा विचाराचा एक ध्वनि उमटूं लागला; दुसरें व्हर्साइलचा तह करणारांनी जर्मनीच्या आग्नेय युरोपासंबंधीच्या आकांक्षा मुळांतच खुडण्याच्या इराद्याने अनेक प्रकारचे राजकीय डाव खेळून, विशेषतः आर्थिक मदत करून आग्नेय युरोपच्या लहान राष्ट्रांना आपल्या प्रभावक्षेत्रांत ओढून ठेविलें होतें. दोस्त राष्ट्रांनी जर्मनीला घेरून टाकलें होतें. एवढेंच नव्हे, तर अमेरिका इंग्लंड, व फ्रान्स ह्यांनी आपल्या भांडवलवाल्यांमार्फत जर्मनी व त्याच्या सभोंवतालचे कांही देश ह्यांचें वसाहतीप्रमाणें शोषण करण्याचे डाव टाकले होते.* व ती गोष्ट हिटलरला उलथून पाडावयाची होती. तिसरें कारण असें की 'बर्लिन-बगदाद' मार्गाच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी डॅन्यूब ह्या नदीवर पूर्ण ताबा मिळविणें इष्ट होतें. डॅन्यूब हा काळ्या समुद्रांत जाण्याचा मुख्य जलमार्ग असून ती नदी म्हणजे मध्य युरोपांतील सर्व

* Ibid-Geography of the War : *Harrabin*, 1940.



ब्रिटन व बर्लिन-बगदाद मार्ग

ब्रिटन व जर्मनी ह्या दोन धंदेप्रधान साम्राज्यपिपासु राष्ट्रांचे आशियांतील बाजार पेठांत उतरणारे हे दोन मुख्य मार्ग होत. जर्मनीचें पश्चिमेचें समुद्रद्वार लहान, तसेंच ब्रिटिश समुद्रमार्गावरोधित असल्याने जर्मनीने बर्लिन बगदाद मार्गाच्या द्वारें पूर्वद्वार उघडलें.

[पृष्ठ ७१ व २०८

लहान मोठ्या राष्ट्रांचा (ऑस्ट्रिया, हंगेरी, रोमानिया, बल्गेरिया व जुगोस्लॅव्हिया) व्यापारी महत्त्वाचा मुख्य जलमार्ग आहे. सदरहू राजकारण यशस्वी झाल्यास व्हर्साइलच्या तहांतील एका अपमानाचा वचपा काढल्याचें समाधान जर्मन जनतेला वाटणार होतें. म्हणून सत्ता हातीं येतांच नाझी पक्ष आपलीं व्यापारी जाळीं आग्नेय युरोपमध्ये झपाट्याने विणूं लागला; त्याचबरोबर त्याचे हेरही आपापलीं कारस्थानें सुरू करून राजकारणांत हात शिरकावून बसले! ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हॅकिया, पोलंड इत्यादि देशांबरोबर हिटलरने जे अनेक वेळीं तह केले ते त्याप्रमाणें वागण्यासाठी केलेले नसून आपलीं कारस्थानें त्या राष्ट्रांच्या, तसेंच, ब्रिटन, फ्रान्स व रशिया यांच्या डोळ्यांत न यावीं आणि आपल्याला सर्व जुळवाजुळव करण्यास वेळ मिळावा या हेतूने केलेले होते. ह्यामुळे योग्य संधि येतांच ते करारनामे हिटलरने मोडले व राष्ट्रांतरीय अविश्वासही उत्पन्न करून घेतला. ही झाली हिटलरच्या मध्य युरोपांतील परराष्ट्रीय राजकारणाची गोष्ट.

हिटलरच्या परराष्ट्रीय राजकारणाचें दुसरें दालन दक्षिण अमेरिका हें आहे. ह्या खंडांत दहा राष्ट्रें असून त्यांपैकी नऊ स्वतंत्र आहेत. तीं सर्व राष्ट्रें धंदेप्रधान नाहीत, कृषिप्रधान आहेत, असें म्हटल्यास विशेष चूक होणार नाही. पश्चिम युरोपांतील धंदेप्रधान राष्ट्रांना लागणारे खाद्य, पेय व कांही खनिज पदार्थ तीं पुरवितात. या खंडांतील तेल, टिन व तांबें ह्या यौद्धिक महत्त्वाच्या खनिज पदार्थांच्या व्यापारांत अमेरिका व इंग्लंड यांनी आपला बराच हात शिरकावून ठेविला आहे. तसेंच अर्जेंटिना ह्या महत्वाच्या कृषिप्रधान देशांत ब्रिटिशांचें बरेंच भांडवल गुंतलें आहे. तथापि या खंडांतील बहुतेक देशांतील शासक मध्य युरोपांतील

राष्ट्रांप्रमाणे जवळ जवळ हुकूमशहाच असून त्यांत शेती, मळे व व्यापारकाम ह्यांसाठी बरेच इटालियन व कांही जर्मन आलेले आहेत. त्यांची लोकसंख्या जरी त्या त्या देशांतील लोकसंख्येच्या दृष्टीने अल्प आहे तरी ती हिटलर, मुसोलिनीच्या ध्येयानुरूप चालणारी आहे. याचा फायदा हिटलरने घेतला. विशेषत: ब्राझील, अर्जेंटिना, चिले, ग्वाटिमाला, व सॉन्साल्वादोर ह्या दक्षिण व मध्य अमेरिकेंतील देशांत जर्मनीचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत. दक्षिण अमेरिका व युरोप यांतील हिटलरच्या परराष्ट्रीय राजकारणाचें अंतिम ध्येय पहिल्या महायुद्धांतील दोस्तांच्या, विशेषतः ब्रिटिशांच्या, राजकारणाला काटशह देऊन, त्यांचा सर्व बाबतींतील श्रेष्ठ दर्जा व त्यामुळे अंगीं आलेला चढेलपणा (?) नष्ट करणें हें आहे. अमेरिका (युनायटेड स्टेट्स) हें राष्ट्र ब्रिटनचें दोस्त आहे; पण तें अति मोठें, संपन्न व श्रेष्ठ राष्ट्र आहे. पहिलें महायुद्ध अमेरिकेच्या मदतीने दोस्त राष्ट्रें जिंकू शकलीं. या वेळीं तसें होऊं नये ह्या उद्देशाने अमेरिकेंतील प्रचार व व्यवहार-तंत्राचीं सूत्रें हिटलर हालवीत असून दक्षिण व मध्य अमेरिकेंतील कारस्थानें युनायटेड् स्टेट्सला शह म्हणून चालविलेलीं आहेत.

आशिया खंडांत जर्मनीचा व्यापारी हात ईस्ट इंडीजशिवाय फारच थोडा आहे; तथापि संधिसाधू व साम्राज्यपिपासू जपानशीं सूत जमवून रशिया, ब्रिटन व अमेरिका ह्या तिघांच्या हितसंबंधाला त्याने शह देऊन ठेविला. वायव्य आशियांतील इस्लामी राष्ट्रां-बरोबरचें राजकारण जरी अलीकडचें असलें तरी त्यांत हिटलरला जमल्यास बर्लिन-बगदाद योजना पूर्ण करावयाची आहे. या राष्ट्रां-पासून लोकर, क्रोम, तेल हे यौद्धिक महत्त्वाचे पदार्थ जर्मनीला मिळाले तर हवेच आहेत. सारांश, हिटलरचें परराष्ट्रीय राजकारणाचें धोरण आग्नेय युरोपांतील साम्राज्य कमविण्याच्या उद्देशाने, तसेंच ब्रिटिश

सत्तेला धोका पोचला म्हणजे आपोआपच पूर्वीच्या वसाहतींचा प्रश्न सुलभतेने सुटेल ह्या विश्वासपूर्ण भावनेने चाललेलें आहे असें दिसतें.

जर्मनी व वसाहती

जर्मनीला पूर्वीच्या वसाहती—मुख्यत: आफ्रिकेंतील प्रदेश—नको आहेत असें नाही. आपल्या वसाहतींचा प्रश्न सोडविण्याची जर्मनीची युक्ति वरवर दिसते तशी नाही. म्हणूनच तो प्रश्न जर्मनीने मागे टाकल्यासारखें वाटतें. तथापि त्या प्रश्नाचा जर्मनीने आपल्या मतें अगदी व्यवस्थित व पायाशुद्ध विचार केलेला आहे. इ. स. १९१९ सालीं व्हर्सेलिसच्या तहानंतर डॉ. श्नी ह्याच्या अध्यक्षतेखाली वसाहत कचेरी स्थापन करून पूर्वीच्या वसाहती परत मिळविण्याच्या प्रश्नाचा खल सुरू केला होता. इ. स. १९२५ सालीं लोकार्नोच्या तहाच्या वेळीं, तसेंच जर्मनी राष्ट्रसंघांत (League of Nations) सामील होण्याच्या वेळीं वसाहतीच्या परत मागणीची जोराने उठावणी करण्यांत आली. पण सामान्य जनतेने त्या वेळीं तितकें निकडीचें लक्ष त्या प्रश्नांत घातलें नव्हतें.

हिटलर सत्ताधीश होतांच सदरहू प्रश्न प्रचारतंत्र खात्याच्या पुरस्काराखाली जनतेपुढे ठेवण्यांत येतांच जर्मन जनतेला त्या वसाहती परत हव्यात असें कळकळीने वाटूं लागलें! इ. स. १९३६ व १९३७ या वर्षीं तर खुद्द हिटलर देखील वसाहतींची परत मागणी जोराने करूं लागला. हें इ. स. १९३७ साल म्हणजे जर्मनी-इटाली-जपान ह्या जूट राष्ट्रांच्या (Axis) गुप्त तहाचें होतें. ह्या वेळीं हिटलरने जर्मनीचें वसाहती साम्राज्य (Das Deutsche Kolonial Reich) नांवाचें हस्तपत्रक काढून तें 'खासगी व गुप्त' म्हणून इटाली व जपान ह्यांच्या अवलोकनार्थ व विचारासाठी परतभेट म्हणून पाठविलें. त्यांत स्वत:च्या जुन्या वसाहतींचाच विचार

नसून जगांतील सर्व साम्राज्यांच्या वसाहतींचा विचार असून त्यांची वाटणी पण सुचविलेली आहे. पण त्यानंतर तो विचार एकाएकी मागे टाकल्यासारखें करून आग्नेय युरोपच्या राजकारणावर हिटलर जोर कां देऊं लागला, हें पण वर सांगितलेंच आहे. सारांश, वसाहती परत मिळविण्याचें जर्मनीचें ध्येय सुटलें होतें असें नाही.

जर्मनीची मागणी व दोस्तांची टाळाटाळी

जर्मनी वसाहती परत मिळण्यासाठी पहिल्या महायुद्धांतील तहापासून सारखा कंठशोष करीत आहे अथवा त्यासाठी अनेक प्रकारचे डाव खेळत आहे हें खरें; पण वसाहतींच्या परतमागणीचीं कारणें मात्र सर्वच वेळीं सारखीं होतीं व आहेत असें नाही. तसेंच व्यापारी, धंदेवाईक वा अर्थशास्त्रज्ञ ह्या प्रत्येकाचीं त्यासंबंधाचीं कारणेंही एकसारखींच आहेत असेंही म्हणवत नाहीं. वसाहती ह्या आपल्या मालाचा खप करणाऱ्या बाजारपेठा आहेत, ह्या दृष्टीने व्यापारी वर्ग ह्या प्रश्नाकडे पाहतो, धंदेवाला वर्ग आपल्याला धंद्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा होईल म्हणून वसाहती हव्या म्हणतो, तर डॉ. श्चॅट सारखे अर्थशास्त्रज्ञ प्रथमयुद्धपूर्व व प्रथमयुद्धोत्तर कालांतील प्रत्यक्ष घडलेल्या व्यवहारांतील आंकडेशास्त्राच्या आधाराने असें म्हणतात की जरी वसाहतीबरोबरचा जर्मनीचा व्यापार फारच थोडा होता किंवा आहेही, किंवा धंदे कारखान्याला लागणारा कच्चा* माल देखील वसाहतींतून अल्प प्रमाणांतच आयात होतो, तथापि वसाहतींमधून मिळणारा कच्चा माल परदेशांत विकून त्या पैशाच्या जोरावर परराष्ट्रांपासून

* कोळसा, लोखंड, तेल, कापूस, रबर व तांबें, हे सहा पदार्थ डॉ. गोबेल्सच्या मताने जर्मनीला हवे असणारे यौद्धिक महत्त्वाचे पदार्थ आहेत. यांपैकी एकही पदार्थ जर्मन वसाहतींमधून मिळत नसे.

युद्धोपयोगी किंवा राष्ट्रीय जरूरीचे इतर पदार्थ नगदीने (कारण आंतरराष्ट्रीय बाजारांत जर्मनीची पत कमी होती) विकत घेण्यास मदत होईल म्हणून तरी वसाहती हव्यातच. या विचारपरंपरेचा जरा खोल विचार केल्यास केवळ आर्थिक मदतीसाठी वसाहती हव्यात असा वरपांगी मोघम व साधा उद्देश त्यांत दिसत नसून जेणें-करून जर्मनी शत्रु वा अमित्र राष्ट्रांवर कमी अवलंबून राहूं शकेल अशा स्थितीप्रत त्याला नेणें हाच अंतर्गत हेतु त्यांत दिसून येतो. म्हणजे व्यापारधंद्याकरिता व लोकवस्तीचा ताण कमी करण्या-करिता वसाहती हव्या हा जो पहिल्या महायुद्धापूर्वीचा वसाहती-संबंधाचा दृष्टिकोन होता तो पार बदलून केवळ स्वतःच्या स्वयंपूर्णतेला वा समृद्धीला मदत म्हणूनच वसाहती हव्यात, मग त्यांमुळे वसाहतीमधील प्रजाजनांचें कांहीही होवो, असा नवीन व केवळ स्वार्थी असा दृष्टिकोन ह्या वेळीं दिसूं लागला आहे असें दिसतें.

सारांश, वसाहतींच्या परत मागणीच्या बाबतींत जर्मनीचा दृष्टिकोन आर्थिक आहे, हें जरी खरें असलें तरी त्या परत मागणीच्या बाबतींत जर्मनी आज सुमारें वीस वर्षांपासून वारंवार जें अकांडतांडव करीत आला आहे असें मागें सांगितलें, तें आर्थिक कारणापेक्षा ज्यास्त महत्त्वाच्या अशा राष्ट्राच्या नैतिक इभ्रतीसाठी आहे, असें म्हणावें लागतें.

पहिल्या महायुद्धानंतर वसाहतींची वाटणी करतांना दोस्त राष्ट्रांनी, विशेषतः ब्रिटिशांनी जर्मनीच्या वसाहतींची विल्हेवाट लावीत असतांना जर्मनीवर कमी दर्जाच्या नीतिमत्तेचा जो खोटा शिंतोडा उडविला,* तो डाग मानी जर्मन राष्ट्रीय मनाला

* "Report on the Natives of S. W. Africa and on their treatment by Germany."

शल्यासारखा टोचत होता व आहे. आणि जर्मनीच्या केवळ राष्ट्रीय इभ्रतीचाच विचार केला तरीही ब्रिटिशांची तसा अहवाल प्रसिद्ध करण्यांत खोडसाळपणाची वृत्ति तर दिसतेच— इतर साम्राज्यवादी राष्ट्रांप्रमाणे या बाबतींत ब्रिटिशांचें माथें तरी कोठे उजळ आहे ? एवढेंच नव्हे, तर या बाबतींत ब्रिटिश मुत्सद्देगिरीच्या कांही चमत्कारिक अशा घोडचुकाही झाल्या आहेत असें म्हणावें लागतें. जसें:–(१) 'मँडेट' मध्ये सर्व राष्ट्रांना व्यापाराचा दरवाजा खुला असावा असा दंडक आहे. पण इ. स. १९३१ सालीं ब्रिटिशांनी बऱ्याच 'मँडेट्स' मध्ये तो दरवाजा बंद केला.* (२) जर्मनी राष्ट्रसंघांत दाखल झाल्यानंतर संघाच्या धोरणाप्रमाणे जर्मनीला 'मँडेट' मिळावयास हवी होती पण तीही गोष्ट केली गेली नाही. (३) ह्यापेक्षाही हास्यास्पद गोष्ट म्हटली म्हणजे ज्या जर्मनीमध्ये 'वसाहत शास्त्र व वसाहतींतील भाषा'† आणि 'उष्णकटिबंधांतील वैद्यक व कृषि'‡ ह्या गोष्टींचा सर्वांत चांगला व मोठ्या प्रमाणावर अभ्यास केला जातो, त्या जर्मनीचा एखाद्या मँडेटच्या कारभारांत अल्पसा हातही शिरकावूं देण्यांत आला नाही.

वरील वर्णनावरून जर्मनीची वसाहतींची मागणी न्याय्य आहे, पण ब्रिटन हें राष्ट्र जर्मनीच्या पूर्वीच्या वसाहती परत

---

* चर्चिल–रूझवेल्ट ह्यांच्या 'ॲटलांटिक करारांत' सर्वांना–अर्थात् सर्व स्वतंत्र राष्ट्रांना–कच्चा माल मिळण्याची व खुल्या व्यापाराची मुभा राहील ही जी घोषणा केली गेली त्याचें एक कारण वर उल्लेखिलेल्या व तशाच प्रकारच्या इतर चुकांचें परिमार्जन हें आहे.

† जर्मनींतील ३७ विश्व विद्यालयांमिळून २६५ जागा वरील गोष्टींचा विचार करतात.

‡ सर्व जर्मनींत केवळ या गोष्टींचा विचार करणाऱ्या आठ स्वतंत्र संस्था आहेत.

देण्यास तयार नाहीं असें वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुस्थिति अगदीच निराळी आहे ती अशी:- (१) युद्धांत मिळविलेले अनेक प्रदेश (बेटें, नाकीं इत्यादि) योग्य कारणासाठी ब्रिटिशांनी अनेक वेळां ज्याचे त्याला परत दिलेले आहेत.* व न दिले असेही आहेत. पण पूर्वींच्या जर्मनीच्या वसाहती आता वसाहती राहिल्या नसून त्यांना 'मँडेट' हा त्यांपैकी श्रेष्ठ असा राजकीय दर्जा प्राप्त झालेला आहे—निदान बाह्यत: तरी तसें भासविलें जातें. (जपान मात्र तो दर्जा मुळीच लक्षांत घेत नाही.) शिवाय त्या मँडेटस म्हणून ज्यांच्या ज्यांच्या ताब्यांत आहेत त्यांच्याही विचाराशिवाय एकट्या ब्रिटनला कांही करतां येत नाही. येथे ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट ही की खुद्द 'मँडेट' मधील लोकांच्या विचाराला कांहीच किंमत देण्याचा विचारही या राजकारणी पुरुषांच्या मनांत असल्याचें दिसत नाही! † (२) जर्मनी जरी राष्ट्रीय इभ्रतीची व आर्थिक परिस्थितीची सबब वसाहती परत मागण्यासाठी पुढे करीत आहे, तरी तो त्याचा खरा हेतु नसून राजकीय व यौद्धिक डाव आहे. 'जर्मनी स्वत:च्या आर्थिक समृद्धी-साठी शक्य त्या उपायांनी वसाहती उपयोगांत आणणार आहे, ‡

---

* ब्रिटिशांनी फ्रान्सला मार्टिनिक बेट तीन वेळां, ग्वाडेलप बेट पांच वेळां, क्युराको बेट दोन वेळां, व चंद्रनगर व पाँदिचरी एकदा परत दिली. असाच इतर अनेक बेटांचाही इतिहास आहे.

† सिरियामध्ये इ. स. १९४१ मध्ये ब्रिटिश घुसले व त्या मँडेटचा ताबा घेतला. सध्या त्यांना तात्पुरतें स्वातंत्र्य आहे पण अंमल लष्करी आहे.

‡ पुढील दहा वर्षांत वसाहतींची उत्पादन शक्ति १५६ मार्क वरून ५०० मार्क वर न्यावयाची असें जर्मनीने जाहीर केलें आहे, हें कोणत्या उपायांनी व दृष्टीने होणार हें सांगावयास नको. International Shareout, P. 15, 1938.

त्या त्या वसाहतींचा, यौद्धिक महत्त्वाचीं नाकीं म्हणून उपयोग करणार नाही,' अशी नाझी जर्मनी हमी देण्यास तयार नाही. (३) जर्मनीला वसाहती परत दिल्यास त्यांना तो 'मँडेट्स' म्हणून वागविण्यास तयार असल्याची हमी देत नाही व तसें न झाल्यास पहिल्या महायुद्धानंतर 'मँडेट्स' उत्पन्न करून राष्ट्रांतरीय नीतिमत्तेचें (International Jurisprudence) जें एक पाऊल पुढे पडलें आहे, तें परत मागे घेतल्यासारखें होतें. (४) जर्मनी वसाहती परत मागतो, तेव्हा जपानला मिळालेल्या त्याच्या वसाहतींच्या बाबतींत मूग गिळून बसतो.

वरील कारणांशिवाय जर्मनीला वसाहती परत मिळण्याच्या कांही अडचणी आहेत पण त्या गौण असून त्यांचा सांगोपांग विचार करण्याची आवश्यकता या ठिकाणीं नाही.

खंड चवथा : जगाच्या भावी घडणीच्या वाटेवर

प्रकरण चवदावें

जूट राष्ट्रें व जगाची विभागणी

संतुष्ट व असंतुष्ट राष्ट्रें

(१) असंतुष्टतेचें लक्षण—संतुष्ट राष्ट्र व असंतुष्ट राष्ट्र हे शब्द विशिष्ट परिस्थितींतील विशिष्ट राष्ट्रांना राजनैतिक अर्थानें लाविलेले शब्द आहेत. कारण वास्तविक पाहतां संतुष्ट असें एकही राष्ट्र जगांत नाही व पुढे असणार नाही.

जर्मनी, इटाली व जपान हीं असंतुष्ट (Have-nots) व ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स हीं संतुष्ट (Haves) राष्ट्रें होत, असे शब्द पहिल्या महायुद्धानंतर, विशेषतः इ. स. १९३० सालापासून, आढळूं लागले. या नांवाचा संबंध त्या त्या राष्ट्रांच्या राजकीय दर्जाशीं व आर्थिक परिस्थितीशीं आहे. तो कसा तें पाहूं.

ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड, जपान, युनायटेड स्टेटस, बेल्जम, इटाली, पोर्तुगाल व स्पेन हीं नऊ साम्राज्यधारी राष्ट्रें असून एका काळीं साम्राज्य असलेलें जर्मनी हें राष्ट्र व निमसाम्राज्यवालें रशिया हें राष्ट्र, हीं सर्व राष्ट्रें राजकीय व आर्थिक दृष्टया भिन्न भिन्न स्थितींत व दर्जामध्ये आहेत.

यांपैकी पोर्तुगाल व स्पेन हीं गतवैभवी; ब्रिटन, फ्रान्स हॉलंड व बेल्जम हीं स्थिरवैभवी, आणि जपान, इटाली आणि जर्मनी हीं वैभवेच्छु राष्ट्रें आहेत. पण युनायटेड स्टेट्स हें मात्र सर्वांपेक्षा निराळें असें राष्ट्र आहे.

मूळ राष्ट्र व त्याचें साम्राज्य ह्यांच्या क्षेत्रफळाच्या आकड्याकडे पाहतां साम्राज्याची वाटणी अगदी विषम प्रमाणांत झालेली आहे असें दिसतें. परंतु केवळ क्षेत्रफळाचे आकडे हे साम्राज्याचा भरीवपणा अथवा महत्त्वपूर्ण मोठेपणा दाखविण्यास असमर्थ असतात, हें विसरून चालणार नाही. कारण फ्रेंच साम्राज्यांत बराचसा भाग सहाराचें वाळवंट आहे. तर त्याच्या सुमारें एकषष्ठांश एवढया लहान क्षेत्राचीं डच ईस्ट इंडीज बेटें सुपीक असल्यामुळे किती तरी जास्त लोकवस्ती पोसूं शकतात! इटालीच्या साम्राज्यक्षेत्रांतही लायबिया हें असेंच मोठें वाळवंट आहे! ब्रिटिश साम्राज्यांतही थार, ऑस्ट्रेलिया, कलहारी इत्यादि वाळवंटी भाग व उत्तर क्यानडासारखे हिमाच्छादित ओसाड प्रदेश ह्यांचा भरपूर भरणा आहे. अशा स्थितींत असंतुष्ट (Have nots) राष्ट्रांची, संतुष्ट (Haves) राष्ट्रांविरुद्ध ओरड कोणत्या मापाने मोजावयाची? किंवा जास्त खोल गेल्यास, संतुष्ट व असंतुष्ट हीं नांवें तरी क्षेत्र, त्यांत पोसली जाणारी लोकवस्ती, लोकवस्तीचा क्षेत्रावरील ताण, जमिनीचा पिकाऊपणा, लोकांची उत्पादनक्षमता, मायदेश व साम्राज्यक्षेत्र यांतील प्रमाण यांपैकी कोणत्या गमकानुसार निश्चित करावयाचीं, असा प्रश्न पुढे उभा राहतो. जपान, इटाली व जर्मनी हीं असंतुष्ट राष्ट्रें असून इतर साम्राज्यधारी कोणतेंही राष्ट्र, असंतुष्ट राष्ट्रांच्या मताने 'संतुष्ट' राष्ट्र आहे. सारांश, संतुष्टासंतुष्टतेचें मोजमाप वरील प्रकारच्या आकडेशास्त्रावर खास निर्भर नाही असें म्हणावें लागतें.

सध्याचें दुसरें महायुद्ध सुरू होण्यापूर्वीचा जर्मनी, हा त्या अर्थानें 'असंतुष्ट' राष्ट्र होता. कारण त्याला साम्राज्य तर नव्हतेंच; उलट त्याचें पूर्वीचें राज्यही कमी झालेलें होतें. पण त्या अर्थानें इटाली व जपान हीं असंतुष्टतेच्या मालिकेंत कशीं बसतात? जर तीं असंतुष्ट राष्ट्रें म्हटलीं जातात तर पोलंड, झेकोस्लोव्हॅकिया, स्वीडन, हीं पण असंतुष्ट (Have-not) राष्ट्रें नाहीत असें कसें म्हणतां येईल? जपानला असंतुष्ट राष्ट्रांच्या मालिकेंत बसविणें हें तर जास्तच हास्यास्पद वाटतें. कारण जपान हें एक मोठें बलाढय राष्ट्र मानलें जातें. साम्राज्यधारी राष्ट्रांत लोकवस्तीच्या मानानें त्याचा चवथा नंबर लागतो. ब्रिटनच्या ताब्यांत जशी भारताची अडतीस कोट प्रजा आहे, तशी चीनची चाळीस कोटि प्रजा जपान ताब्यांत घेऊं पाहत आहे. पूर्वीच्या जर्मनीच्या कांही वसाहती जपानच्याच ताब्यांत आहेत. असें असून तें असंतुष्ट कसें? जर जपान चीन घशांत घालूं शकलें व त्याच्यासह पूर्व आशिया हा एक स्वतंत्र गट बनवूं शकलें तर लागलेंच तें 'संतुष्ट राष्ट्र' म्हणून संबोधिलें जाईल! किंवा पॅसिफिक महासागरावरील प्रभुत्व हें जर जपानच्या संतुष्टतेचें ध्येय असेल तर ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, हा विभाग त्याच्या आक्रमणक्षेत्रांत येईल व मग तें 'संतुष्ट' ठरेल!

ॲबिसीनिया घेतल्याशिवाय इटालीचें समाधान होणार नाही असें मुसोलिनीनें तेव्हा म्हटलें होतें! पण तसें घडलें तरी इटाली असंतुष्ट तें असंतुष्टच राहिलें!


द्वितीय महायुद्धपूर्व पोलंडची लोकसंख्या झपाटयानें वाढत होती; हॉलंड, बेल्जम, पोर्तुगाल किंवा स्पेन ह्यांपेक्षा ती मोठी होती, व फ्रान्सप्रमाणें लोकसंख्यावाढीचा ताण पोलंडला भासत होता. एवढेंच नव्हे तर पोलंडनें आपली ही असंतुष्टता जगांतील

महाजनांपुढे स्पष्टपणें व्यक्तही केली होती. असें असून पोलंड मात्र 'असंतुष्ट राष्ट्र' म्हटलें गेलें नाही.

सारांश, वरील सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे 'असंतुष्ट' (Have-not) असें कोणाला म्हणावें याचें गमक लक्षांत येतें तें असें:- "ज्या राष्ट्राला त्याची असंतुष्टता स्पष्टपणें भासते, जें असंतुष्टतेचें दुःख जगाच्या वेशीवर वारंवार व निःसंदिग्धपणें टांगतें, एवढेंच नव्हे तर ज्या राष्ट्राच्या मनगटांत शेजारी पाजारी राष्ट्रांना भिवविण्याचा जोर आहे, त्या राष्ट्राला असंतुष्ट राष्ट्र असें म्हटलें जाईल." असंतुष्ट राष्ट्राची व्याख्या ही अशी आहे !!!

संतुष्ट व असंतुष्ट राष्ट्र कोणाला म्हणावें व तीं राष्ट्रें कोणकोणतीं आहेत हें पाहिल्यानंतर, असंतुष्ट राष्ट्रें संतुष्ट राष्ट्रांविरुद्ध जी एवढी मोठी ओरड करतात ती कां, हें पाहणें जरूर आहे व तें पाहावयाचें म्हणजे साम्राज्यें व वसाहती ह्यांचा विचार करणें भाग पडतें. आणि त्यानंतर असंतुष्ट राष्ट्रांची मागणी काय आहे ह्याचाही विचार करावा लागतो. या सर्व गोष्टींचा सविस्तर ऊहापोह करणें शक्य नसल्याने त्यांचें विहंगावलोकन करणें बरें.

असंतुष्ट राष्ट्रांचा मुख्य रोख ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड, बेल्जम ह्या राष्ट्रांच्या साम्राज्यावर आहे. कारण ह्या सर्व राष्ट्रांच्या साम्राज्यविस्ताराचा, व्यापाराचा व आर्थिक परिस्थितीचा मोठेपणा असंतुष्ट राष्ट्रांच्या डोळ्यांत सलतो. त्याचबरोबर, तसें मोठेंपण आपल्याला असावें ही त्यांच्या मनांतील मुख्य इच्छा असते. ही असंतुष्ट राष्ट्रांची इच्छा पूर्ण होण्याच्या मार्गांत वसाहती हा एक काटा आहे असें असंतुष्ट राष्ट्रांना वाटतें ! पण त्यांपैकी कांही वसाहती असंतुष्ट राष्ट्रांना परत मिळाल्या तर तीच गोष्ट



ही आकृति इ. स. १९३९ च्या प्रारंभाचें दृश्य आहे. त्यानंतर दोस्त राष्ट्रांच्या स्वयंपूर्णतेंत बराच फरक पडला आहे. [पृष्ठ २२० व २६३

संतुष्ट राष्ट्रांना शल्यासारखी वाटल्याशिवाय राहील काय, हा विचार मात्र त्यांच्या डोक्यांत कसा येत नसेल याचें आश्चर्य वाटतें !! जर्मनीला पूर्वीच्या वसाहती— सध्या 'मँडेट' या नांवाखाली ब्रिटिशांच्या ताब्यांत असलेल्या वसाहती—परत हव्या आहेत, पण त्याच्या ज्या वसाहती जपान गिळून बसला आहे, त्यासंबंधाने मात्र जर्मनी अगदी मूग गिळून बसला आहे हें कसें? सारांश, असंतुष्ट राष्ट्रें देखील साम्राज्यपिपासु आहेत. संतुष्ट व असंतुष्ट ह्या दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांना त्या वसाहती अथवा साम्राज्य विभाग मूळ मायदेशाच्या हिताला उपयोगी पडावे वा पोषक व्हावे ह्या-साठीच हवे आहेत. **दोन्ही प्रकारचीं राष्ट्रें वसाहतींतील तद्देशीय लोकांच्या हिताचा विचार करण्याला मनापासून तयार नाहीत.** फरक इतकाच की इटाली, जर्मनी व जपान हीं 'फॅसिस्ट' किंवा तत्सम हुकूमशाही व क्षात्रवृत्तीच्या राजकीय विचारसरणीचीं राष्ट्रें वसाहतीकडे केवळ आपमतलबी दृष्टीने पाहतात; तर ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड हीं 'डिमॉक्रोटिक' पद्धतीच्या राजकीय विचार सरणीचीं राष्ट्रें–लोकमताला थोडा तरी मान देणारीं वैश्य वृत्तीचीं राष्ट्रें–वसाहतीचा क्वचित् प्रसंगीं सहानुभूतिपूर्वक विचार करण्याला तयार होतात. हीं वैश्य वृत्तीचीं राष्ट्रें आपमतलबासाठी हलवा-याच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्यास केव्हाही तयार असतात, (जसें पोर्तुगालच्या वसाहती त्याच्या विचाराशिवाय जर्मनीला देऊन युद्ध टाळतां येईल किंवा लांबणीवर टाकतां येईल तर पाहावें असा करार ब्रिटन जर्मनीबरोबर करावयास पहिल्या महायुद्धापूर्वी तयार होतें.*) तर हुकुमशाही क्षात्रवृत्तीचीं राष्ट्रें सबळ अथवा दुर्बळ राष्ट्रावर वा समाजगटावर आक्रमण करण्याला केव्हाही तयार

---

* International Shareout : *B. Ward*, P. 133. Thomas Nelson & Sons Ltd, London 1938.

असतात. त्यांना संतुष्ट राष्ट्राप्रमाणें न्यायदेवतेचा बाह्य देखावा करण्याचा विचार देखील शिवत नाही !

वसाहतींचा वा साम्राज्यविभागांचा उपयोग

वर सांगितलेलीं सर्व राष्ट्रें मायदेशावरील लोकवस्तीचा ताण कमी करण्यासाठी, राष्ट्रांतील धनिक वर्गाचें भांडवल फायदेशीर रीतीने गुंतविण्यासाठी, राष्ट्रांतील धंदेकारखान्यांना लागणारा कच्चा माल मिळविण्यासाठी व व्यापारवाढीसाठी वसाहती किंवा साम्राज्यविभाग हवे आहेत असें सांगतात व ह्या सर्व गोष्टी साध्य करण्याचा तीं सर्व राष्ट्रें प्रयत्नही करतात. सर्व साम्राज्यधारी राष्ट्रांचे हे प्रयत्न कितपत यशस्वी झाले, हें आर्थिक दृष्टया पाहिलें तर खालील गोष्टी दिसतात—

(१) विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत सर्व राष्ट्रांनी वरील बरेचसे हेतु साध्य केले.

(२) वसाहतीवर खर्च झालेला पैसा व त्यापासून मिळालेला आर्थिक मोबदला या बाबतींत हॉलंडशिवाय कोणतेंही राष्ट्र यशस्वी नाही. असें असूनही विसाव्या शतकांत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी ह्यांची आपापसांत फार जोराची व्यापारी चढाओढ सुरू झाली. तशांत जपानच्या उदयाने व व्यापारी चढाओढीने त्या त्या देशांच्या राजकीय सत्तेला या व्यवहारांत विशेष लक्ष घालावें लागलें. अमेरिकेचीं व्यापारी कारस्थानें आपल्या गोलार्धांत सुरू होतींच आणि अशा रीतीने राष्ट्राराष्ट्रांचे झगडे सुरू झाले व त्याचें मूळ कारण 'वसाहती' वा 'ताब्यांतील मुलूख' हें आहे असें भासूं लागलें; हा विसाव्या शतकांतील गेल्या वीस वर्षांतील काळ राजकीय ध्येयवादांचा (Political Ideologies) काळ होता. अजून जग त्याच फेऱ्यांत आहे.

विसाव्या शतकांतील या नवीन परिस्थितींमुळे व ध्येयवादी विचारप्रणालिकांमुळे साम्राज्याचे भाग व वसाहती ह्यांकडे पाहण्याचा संतुष्ट व असंतुष्ट राष्ट्रांचा दृष्टिकोनही बदलला. वसाहतीच्या उपयोगासंबंधाचे निरनिराळे विचार प्रवाह सार्वभौम सत्तेच्या मनांत येऊं लागले! त्याचबरोबर असंतुष्ट राष्ट्रांच्या मनांतही बदललेले विचारप्रवाह वाहूं लागले! आणि खास वसाहतींमध्येही अर्थात् कांही बदललेले नवीन विचारप्रवाह सुरू झालेले आढळतात!

असंतुष्ट राष्ट्रें वसाहतवादावर जोर देऊं लागलीं तेव्हा संतुष्ट राष्ट्रांनी मोठ्या धूर्तपणाने वसाहती ह्या कच्च्या मालाचें पुरवठा करण्याचें एक कोठार आहे ह्या महत्त्वाच्या व उपयोगी मुद्दयाला हरताळ फासण्याचा खटाटोप आरंभिला व आपलें म्हणणें टिकविण्यासाठी पुढीलप्रमाणे समर्थन करण्यास सुरवात केली.

गहू, मांस, दूध, लोणी, साखर, संत्रीं, केळीं, कॉफी, चहा, कोको व तंबाखू, हे पाश्चिमात्य लोकांचे मुख्य खाद्य पदार्थ आहेत. या यादींतील चहा, कोको व साखर हे पदार्थ सोडून सामान्यतः बाकीचा कोणताच पदार्थ वसाहतींतून मिळत नाही. तसेंच धंदे-कारखान्याला लागणाऱ्या कच्च्या मालांपैकी फारच थोडे पदार्थ केवळ वसाहतींतून मिळणारे आहेत. डॉ. गोब्रेल्सच्या मताने कोळसा, लोखंड, तेल, कापूस, रबर व तांबें हे पदार्थ आधुनिक धंदेप्रधानत्वाचे मूळ घटक आहेत. यांपैकी रबर व वनस्पतिज तेल हेच काय ते केवळ वसाहतींतून मिळणारे पदार्थ आहेत! पण या पदार्थांशिवाय खनिज तेल, शिसें, जस्त, कथील, अल्युमिनम, निकेल, पारा, अॅस्बेस्टॉस, पोटॅश, हे खनिज पदार्थ व ताग लोकर, रेशीम, पामतेल, सॉयबीन, इत्यादि पदार्थही धंदेकारखान्याला लागतात. यांपैकी पामतेल, सॉयबीन, कथील इत्यादि आणखी कांही पदार्थ केवळ वसाहतींतून मिळणारे आहेत हें खरें; पण सार्वभौम सत्तेचे

मूळ देश कृत्रिम पदार्थ बनवून, अथवा दुसरे पदार्थ उपयोगांत आणून वसाहतींतून मिळणाऱ्या त्या त्या पदार्थासंबंधाचें परावलंबित्व कमी करूं पाहत आहेत आणि अशा रीतीने कच्च्या मालाचें कोठार या दृष्टीने वसाहतीचें महत्त्व संतुष्ट राष्ट्रें कमी करूं पाहत आहेत; पण त्यांचें तें समर्थन समर्थनीय व टिकाऊ नाही असें थोडा जास्त विचार केला असतां ध्यानांत आल्याशिवाय राहत नाही.

वरील पदार्थांपैकी कांही पदार्थ फार मोठ्या प्रमाणांत भारतवर्ष, मँचूरिया, न्यूझीलंड, क्यानडा इत्यादि भागांतूनच सार्वभौम सत्तेला मिळतात. असें असतां ते देश 'वसाहती' नव्हेतच असा असमर्थनीय मुद्दा पुढे आणण्याचें संतुष्ट राष्ट्रें धाष्टर्य करितात! तथापि असंतुष्ट राष्ट्रें तोच मुद्दा निराळ्या पण वास्तविक रीतीने पुढे मांडतात, तो असा:—

(१) **ग्रेटब्रिटनः**—निम्यापेक्षा जास्त रबर, टिन, तांबें, पामतेल वा उद्भिज्ज तेल, ग्राफाइट, फॉस्फेट, अल्युमिनम, व थोडें खनिज तेल केवळ वसाहतींतून मिळवितें. तसेंच ८०% कोको, ५०% पेक्षा ज्यास्त चहा, सुमारें ९०% साखर, ९०% संत्र्यादिक फळें, ५० टक्के केळीं वसाहतींतून मिळतात.

(२) **फ्रान्सः**—बहुतेक सर्व निकेल, सुमारें तीनचतुर्थांश फॉस्फेटस व उद्भिज्ज तेल व थोडें ग्राफाईट, टिन व रबर हे पदार्थ वसाहतींतून मिळवितें आणि केळीं, साखर, तंबाखू व कोको हे पदार्थ पण वसाहतींतून मिळवितें.

(३) **हॉलंडः**—निम्यापेक्षा जास्त ॲल्युमिनम, रबर, टिन, बरेंच पेट्रोल, फॉस्फेट व पामतेल हे पदार्थ वसाहतींतून मिळवितें. त्याचप्रमाणे सुमारें निम्मा चहा, थोडी कॉफी, तंबाखू, चहा व साखर हे पदार्थ वसाहतींतून मिळवितें.

(४) स्पेन-पोर्तुगालः—ह्यांचे साम्राज्य विभाग खाद्य पदार्थ पुरविण्याचे बाबतींत भिकारी आहेत.

(५) जपानः—मँडेटमधून किंवा वसाहतींतून, म्हणजेच साम्राज्यविभागांतून, तांदूळ, कापूस, साखर, केळीं, तसेंच कोळसा, लोखंड, ग्राफाईट वगैरे पदार्थ थोडया फार प्रमाणाने मिळवितें.

याप्रमाणे इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, ह्या सार्वभौम सत्तांना वसाहतींचा उपयोग होतोच. शिवाय विशेषतः इंग्लंडच्या ताब्यांतील वसाहती किंवा देश महासागरांतील व्यापाराच्या दृष्टीने आर्थिक महत्त्वाचे व यौद्धिक महत्त्वाचे भाग आहेत. ही गोष्ट असंतुष्ट राष्ट्रांच्या मनांत वारंवार येऊन तीं मुख्यतः इंग्लंडवर दातओठ खातात. या वसाहती व्यापारी वा आर्थिक दृष्टया आपल्या गळ्यांत एक धोंड आहे असें कितीही कळकळीने संतुष्ट राष्ट्रें असंतुष्ट राष्ट्रांना सांगत असलीं, पांढऱ्या हत्तीप्रमाणे तीं केवळ वभवाचीं चिन्हें आहेत असेंही तीं सांगत असलीं, तरी असंतुष्ट राष्ट्रांना तें पटत नाही. इकडे संतुष्ट राष्ट्रें त्या वसाहतींना एकदम किंवा ठराविक कालाने स्वायत्त बनविण्याची भाषा देखील बोलत नाहीत, त्या अर्थीं या भांडाभांडीचा तद्देशीयांना कोणताच लाभ नाही, म्हणून ते उदासीन अथवा तळमळत असतात! कसेंही असलें तरी वसाहतींवरील सार्वभौम सत्तेची अदलाबदल झाल्याने जशी वसाहतींची राजकीय उन्नति होईल असें वाटत नाही, तशी तद्देशीयांची राजकीय व्यवहारांत एकजूट झाल्याशिवाय सार्वभौम सत्ता जागी होणें शक्य नाही, अथवा तद्देशीयांना स्वातंत्र्य मिळणें संभवनीय दिसत नाही! सारांश, वसाहतींचा प्रश्न संतुष्ट व असंतुष्ट या दोन्ही राष्ट्रांच्या यादवीने सुटत नाही. उलट तीं दोन्ही प्रकारचीं राष्ट्रें आपापल्या पोळीवर तूप ओढू पाहत आहेत.

एवढेंच नव्हे, तर संतुष्ट राष्ट्रांनी एके काळीं जें वैभव भोगिलें व अजून बऱ्याच अंशाने भोगीत आहेत, तसें अथवा त्यापेक्षा श्रेष्ठ असेंही वैभव आपणास उपभोगावयास मिळावें अशी असंतुष्ट राष्ट्रांची महत्त्वाकांक्षा आहे. जगाच्या पुनर्वाटणीचे जे विचार तीं राष्ट्रें करीत आहेत, त्यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसते. तें कसें तें पाहूं.

असंतुष्ट राष्ट्रांचें उद्दिष्ट

मागे सांगितलेंच आहे की जर्मनी, इटाली व जपान हीं तीन असंतुष्ट राष्ट्रें आहेत. राजकारण आणि बुद्धिमत्ता या बाबतींत जर्मनी हें राष्ट्र तिघांमध्ये श्रेष्ठ आहे. तिघांच्या आजच्या परिस्थितीचा व व्यवहाराचा विचार केला तर जर्मनी हें सर्व दृष्टीने प्रभावी राष्ट्र आहे, आणि त्याच्याच धोरणाच्या तालावर इटाली व जपान हीं दोन्हीं राष्ट्रें नाचत आहेत असें दिसतें.* आता एवढें खरें की जपान हें इटाली इतकें जर्मनीच्या आहारीं गेलेलें राष्ट्र नाही. कसेंही असलें तरी इ. स. १९३७ सालीं या त्रिवर्गांचा जो जुटीचा तह (Axis Pact) झाला, त्यांत जें उद्दिष्ट त्यांनी ध्वनित केलें आहे तें पाहणें जरूर आहे म्हणून त्याकडे वळूं.

वर सांगितलेला गट्टीचा तह करतांना त्यांत जर्मनीचाच वरचष्मा होता असें दिसतें. कारण त्यांतही जर्मनीच्या जगत्साम्राज्याची कल्पना असून त्यांतील 'जगाची नवीन वाटणी' हिटलरने स्वतःच्या मताने व हाताने केलेली असून त्या करारनाम्यावर प्रथम त्याची सही आहे. व जपानची मागणी अथवा उद्दिष्ट त्याला पुस्ती म्हणून जोडलेली आहे. ही सर्व योजना Das Deutsche Kolonial Reich' (German Colonial Empire—

---

*Japan is Hitler's Cage-bird, Will it sing ?— *Paul Grisor*, Austral-Asiatic Bulletin, August-Sept, 1941.

जर्मन साम्राज्य) ह्या नांवाच्या मासिकाच्या इ. स. १९३७ सालच्या जुलैच्या अंकांत केवळ नाझी पक्षाच्या माहितीसाठी 'खास खासगी' पत्रक म्हणून प्रसिद्ध केलेली आहे. त्यांत जगाची वाटणी पुढे दिल्याप्रमाणे मांडलेली आढळते.

मागे वर्णन केलेल्या थायसेन योजनेप्रमाणे युरोपांतील देश हें जर्मन राज्य असून आफ्रिका, अमेरिका व आशिया ह्या तिन्ही खंडांत पुढे दिलेले भाग हें जर्मनीचें साम्राज्य बनावयाचें आहे व त्यांत इटाली आणि जपान ह्यांचे संबंध व विभाग वाटलेले आहेत. ती योजना अशी:—

जर्मनी

(अ) आशियांत:— (१) ऑस्ट्रेलियापैकी दक्षिण ऑस्ट्रेलिया, व्हिक्टोरिया, प. आस्ट्रेलिया, तास्मानिया व न्यूझीलंड, हे भाग जर्मनीचे होतील.

(२) पॅसिफिक महासागरांतील इतर बेटांत विशेष व्यापारी सवलती मिळतील.

(३) चीनमध्ये विशेष व्यापारी हक्क जर्मनीला मिळतील.

(४) सिरिया, पॅलेस्टाइन, सिनाई द्वीपकल्प म्हणजे सुवेझच्या आसपासचा सर्व भाग आणि सैप्रस बेट.

(५) सर्व इस्लामी राष्ट्रें हीं जर्मन पंखाखालचीं राष्ट्रें (Sphere of Influence) म्हणून राहतील.

(६) भारतवर्ष स्वतंत्र राहील पण जूट राष्ट्राशींच व्यापारी संबंध राहतील.

(७) कोलंबो व सिंगापूर हीं जूट राष्ट्रांचींच आरमारी नाकीं राहतील.

(आ) आफ्रिकेंत:—(१) सर्व मध्य आफ्रिका, (नैऋत्य आफ्रिका, बेल्जम कांगो, टँगानिका, युगांडा, न्यॅासालँड, मोझांबिक, इत्यादि भाग, म्हणजे पूर्वीच्या सर्व जर्मन वसाहती, आणि बेल्जम व पोर्तुगाल ह्यांच्या ताब्यांतील भाग) व इतर उरलेल्या आफ्रिकेपैकी पूर्वीच्या जर्मन वसाहती हे भाग जर्मनीला मिळतील. दक्षिण आफ्रिकन संघ स्वतंत्र राहील पण त्यांत जूट राष्ट्रांना व्यापारी हक्क असतील.

(२) केप टाऊन हें जूट राष्ट्रांचें आरमारी नाकें बनेल.

(इ) अमेरिकेंत:—(१) मध्य अमेरिका, वेस्ट इंडीज बेटें, पनामा व पनामा कालवा हे सर्व भाग यौद्धिक दृष्टया जर्मनीच्या ताब्यांत राहतील.

(२) हे सर्व भाग व दक्षिण अमेरिकेंतील सर्व देश विशेषतः ब्राझील, अर्जेंटिना ह्यांत विशेष व्यापारी सवलती जर्मनीला मिळतील.

इटाली

(१) आफ्रिकेंत:—इजिप्त, लायबिया, अँग्लो इजिप्शियन सुदान, आबिसिनिया व सर्व सोमाली लँड हे इटालीला मिळतील.

(२) आशियांत:—इटालियन लोक असलेला ऑस्ट्रेलियाचा भाग म्हणजे क्वीन्सलँड, न्यू साऊथ वेल्स व उत्तर ऑस्ट्रेलिया हे भाग इटालीचे होतील.

(३) युरोपांत:—माल्टा, युगोस्लॅव्हियाचा पश्चिम किनारा.

जपान

(१) आशियांत पूर्वीच्या सर्व जर्मन वसाहती—ज्या सध्या जपानच्या ताब्यांत आहेत त्या व चीन व डच ईस्ट इंडीज बेटें हीं जपानने घेतल्यास चालतील, पण रशियाचा कोणताही भाग जपानला मिळणार नाही.

(२) सिलोन व भारत ह्यांत व्यापाराच्या सवलती जपानला मिळतील.

(३) दक्षिण अक्षांश १० व पूर्व रेखांश १६० ह्यांमधील सर्व बेटें जपानने घ्यावीं.

(४) पण आफ्रिकेंत त्यास कांही मिळणार नाही.

(५) दक्षिण अमेरिकेंत व्यापारी सवलती जपानला मिळतील.

सदरहू योजना ब्रिटनच्या पराभवानंतर दहा वर्षेंपर्यंत चालावयाची आहे.

वर सांगितलेली जगाची वाटणी, लोकसंख्या, लष्करी सामर्थ्य आणि जीवनार्थ कलहाची निकड अथवा जगण्यास लागणाऱ्या जागेची आवश्यकता (Lebensraum) ह्या तत्त्वांच्या आधारावर, ज्या युरोपियन राष्ट्रांना जगांतील कच्च्या मालाची निकडीची आवश्यकता आहे, त्यांच्याचसाठी मुख्यतः केलेली आहे, असें त्यांत हिटलरने स्पष्ट ध्वनित केलेलें आहे. अशीं युरोपियन राष्ट्रें म्हणजे जर्मनी व इटाली हींच आहेत, असेंही म्हटलें आहे. अर्थात् हिटलरने जपानला आपला साथीदार म्हणून घेतला तो राजकारणी डावपेचासाठीच घेतला असावा असें दिसतें. नाही तर जपान इतके दिवसपर्यंत ब्रिटिशांच्या विरुद्ध झाल्याशिवाय राहिला नसता. तसेंच जर्मनीला जपानने रशियाच्या बाजूला धक्का देऊं नये व अमेरिकेला दुखवूं नये असें इ. स. १९३७ च्या वर सांगितलेल्या जगाच्या वाटणीच्या योजनेंत स्पष्ट बजावण्याचें कारण नव्हतें. हा गर्भित अर्थ जपानच्याही ध्यानांत आला नसेल असें म्हणतां येत नाही. कारण तसें वारें जपानी मुत्सद्यांच्या विचारांतून वाहतांना दिसतें.* जूट राष्ट्रांनी हलवायाच्या घरावर

* Japan : Axis Puppet or Principal in the Pacific : *Masaru Hara*, Contemporary Opinions–Feb. 1941 and Soviet Union : *Yoshimichi Kububoi* M. P., Contemporary Opinions, March, 1941.

तुळशीपत्र ठेवण्याची अशी योजना काढली आहे.

वरील योजनेवरून पुढील गोष्टी स्पष्ट दिसतात:—

(१) ब्रिटिश साम्राज्य पार मोडावें.

(२) जिब्राल्टर, सुवेझ, माल्टा, सिंगापूर, कोलंबो, एडन, पनामा ह्या जगांतील महत्त्वाच्या नाक्यांची व्यवस्था ब्रिटिशांना पुनः आपलें साम्राज्य स्थापितां येऊं नये या दृष्टीने करावयाची आहे.

(३) आफ्रिका खंडांत आपलेंच वर्चस्व राहील अशीच त्या खंडाची वाटणी जर्मनीने केलेली आहे.

(४) भूमध्य समुद्र व हिंदी महासागर हे जर्मन वर्चस्वाखाली राहतील अशीच नाकेबंदी व विभागणी केलेली आहे.

(५) पॅसिफिक महासागरांत जपानला सहज शह देतां येईल अशी आपली सोय दक्षिण अमेरिकेचा पश्चिम किनारा आणि आस्ट्रेलिया, न्यूझीलंड, ह्यांत वर्चस्व स्थापून जर्मनीने करून ठेविली आहे.

(६) पश्चिमेचीं इस्लामी संस्कृतीचीं राष्ट्रें पंखाखाली घेऊन, पूर्वेचें चीन व आग्नेयेचीं ईस्ट इंडीज बेटें, तसेंच इंडोचीन वगैरे भाग जपानी वर्चस्वाखाली देऊन, दक्षिणचें सिलोन पंजाखाली घालून, आफ्रिकेचा पूर्व किनारा ताब्यांत घेऊन, म्हणजे भारताला चारी बाजूंनी घेरून त्याला पिंजऱ्यांतील पोपटाचें स्वातंत्र्य देण्याचें ढोंग केलें आहे.

(७) वरील सर्व योजनेंत अमेरिकेला सध्या तरी हात न लावण्याची सावधगिरी ठेवलली दिसत आहे.*

---

* युनायटेड स्टेट्सला बाधक होईल अशी दक्षिण अमेरिकेची वाटणी हिटलरने केलेली असल्याची योजना अमेरिकेच्या गुप्त हेर खात्याने उजेडांत आणली आहे, असें म्हणतात.

(८) आफ्रिकेंतील पोर्तुगालच्या ज्या वसाहती पहिल्या महा-युद्धाच्या वेळीं ब्रिटन जर्मनीला देऊन तें युद्ध थांबविण्यास तयार होतें, त्या वसाहती या योजनेंत जर्मनीनें गिळंकृत करण्याची योजना केलीच आहे.

(९) जर्मनीच्या या योजनेप्रमाणे जगांत जर्मनी (व त्याच्या सुरांत सूर मिळविणारीं फ्रान्स व इटाली हीं राष्ट्रें) जपान, अमेरिका व रशिया एवढेच महाजन जगांत शिल्लक राहावयाचे आहेत. अमेरिका व जपान यांना शहांत ठेवण्याची योजना त्यांत कशी आहे हें वर दाखविलेंच आहे. रशियाची परिस्थिति सध्या ध्यानांत घेण्याजोगी आहे. यावरून ही योजना म्हणजे हिटलरची जगत्साम्राज्याची योजना किंवा मागे सांगितल्याप्रमाणे मध्य युरोपांतील क्रूप, थायसेनसारख्या, कारखानदार भांडवलशाही कंपूची जगत्सार्वभौमत्वाची महत्वाकांक्षी आखणी, यांपैकी कोणत्या तरी सदरांत पडण्याजोगी खास आहे, असें म्हणावें लागतें.

जर्मनीची सदरहू योजना दहा वर्षें तरी टिकेल की नाही, सध्या जिंकलेलीं राष्ट्रें त्याला त्याच्या योजनेप्रमाणे आपल्या ताब्यांत ठेवतां येणें शक्य आहे किंवा नाही, त्याचप्रमाणे सध्या ज्यांना मागसलेले असें म्हणण्यांत येतें ते जगांतील समाजगट पुढील दहा वर्षांत तरी जर्मनीच्या आटोक्यांत राहतील अशा स्थितींत आढळतील की नाही, इत्यादि अनेक राजकीय भानगडींचा या ठिकाणीं जरी विचार करावयाचा नसला तरी, त्या मागसलेल्या समाजांची स्थिति काय आहे हें पाहणें जरूर आहे. कारण त्यावरून त्यांची कार्यक्षमता ध्यानांत येऊन आपला भारतीय समाजगट काय करूं शकेल याचाही अंदाज बांधतां येईल. म्हणून त्याकडे वळूं.

प्रकरण पंधरावें

भावी संघर्षाची पूर्वतयारी

कांही भानगडींची मीमांसा

आतापर्यंत आपण जगांतील मुख्य सामर्थ्यवान राष्ट्रांच्या राजकारणाचें–मुख्यत: आंतरराष्ट्रीय म्हणजेच राष्ट्रांराष्ट्रांतील राजकारणाचें—विहंगावलोकन केलें; त्यांच्या आपापसांतील भानगडी, राजकारणविषयक व व्यवहारकारणविषयक गुंतागुंती, आणि शह काटशह, ह्या गोष्टींची कल्पना स्थूल मानाने करून घेतली, त्यांचा विकासही थोडक्यांत पाहिला आणि त्या सर्वांचा मूळारंभ अर्थकारण कसें आहे हें पण पाहिलें. परंतु अर्थकारण म्हटलें म्हणजे त्याची अनिवार्य जरुरी लहान अथवा मोठ्या, समर्थ अथवा दुबळ्या, समृद्ध असमृद्ध किंवा अल्प समृद्ध, सुधारलेल्या अथवा मागसलेल्या सर्व राष्ट्रांना अथवा समाजगटांना आहे. अर्थात् त्यासाठी होणारे तंटे सहकारी तत्त्वाचा व्यापक प्रमाणांत आश्रय केल्यास सौकर्याने तुटण्याचा जास्त संभव आहे. परंतु जगांतील सर्व राष्ट्रीय अथवा सामाजिक मनाची व्यापक वृत्ति (परोत्कर्षसहिष्णुता) वाढलेली नाही, यामुळे ती गोष्ट साध्य होत नाही. सध्याच्या जगांत सर्वत्र जे डावपेच वा कारस्थानें चाललीं असल्याचें आढळतें त्याचें तात्कालिक कारण जरी आर्थिक परिस्थिति हें असलें, तरी त्याचें मूळ कारण सर्वत्र सारखेंच नसून निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळें आहे असें दिसतें. तें थोडक्यांत पाहणें हें जागतिक राजकारणाच्या अभ्यासाचें एक महत्त्वाचें अंग आहे, म्हणून तिकडे वळूं.

जगांत भौगोलिक अर्थाने मागसलेलीं व पुढारलेलीं (किंवा सुधारलेलीं) राष्ट्रें अथवा समाज आहेत, तशीं ऐतिहासिक दृष्टीने मागसलेलीं वा सुधारलेलींही राष्ट्रें आहेत. त्याचप्रमाणे सर्व राष्ट्रें वा समाज समान संस्कृतीचे नाहीत, भिन्न भिन्न संस्कृति असणारे आहेत; या कारणामुळेही आपापसांत तंटे उत्पन्न होतात. त्यांचा विचार केला असतां, त्यांचें स्थूल वर्गीकरण पुढे दिल्याप्रमाणे होतें. (१) युरोपांत उत्पन्न होणाऱ्या भानगडी मुख्यतः अल्पसंख्याक समाजगटांच्या असून राष्ट्रीयत्वाच्या अथवा संस्कृतीच्या विषमतेच्या आहेत, तर (२) इतर जगांत त्या वर्ण(Race)विषमतेच्या, वर्णद्वेषाच्या किंवा ऐतिहासिक मागसलेपणाच्या आहेत. त्या कशा तें थोडक्यांत पाहूं.

(१) युरोपांतील भानगडी

एकोणिसाव्या शतकांतील युरोपांतील राष्ट्रांची घडण राष्ट्रीयत्वाच्या पायावर झाली होती तर विसाव्या शतकांत थोडें पुढे जाऊन ती ‘ राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर ’ होऊं लागली. आस्ट्रिया–हंगेरी, व ओटोमन (तुर्कांचें) साम्राज्य ह्यांच्या नाशामुळे, तसेंच बाल्टिक राष्ट्रें स्वतंत्र करण्यामुळे राष्ट्रीयत्वाचे प्रश्न थोड्या फार प्रमाणांत सोडविण्यांत आले. रशियन राष्ट्रसंघांत जे अनेक स्वयंशासित गट उत्पन्न करण्यांत आले आहेत, तेही वरील स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावरच आधारलेले आहेत; तथापि युरोपांत अल्पसंख्यांकांच्या बऱ्याच भानगडी शिल्लक असून ते समाज स्फोटक दारूचें काम करतात. त्याचें दोन प्रकारांनी वर्गीकरण करतां येतें; तें असें:—

(अ) एकाच सत्तेखाली अनेक सांस्कृतिक गट.

(आ) एकाच संस्कृतीचे लोक अनेक सत्तांच्या अमलाखाली.

(अ) एकाच सत्तेखाली अनेक* सांस्कृतिक गटः —

(१) बेल्जममध्ये:—फ्लेमिश वॅलून्स व जर्मन आहेत. फ्लेमिश व फ्रेंच ह्या दरबारी भाषा चालतात.

(२) स्पेनमध्ये:—कॅस्टिलियन, क्याटेलन, बास्क व ग्यालिशियन लोक आहेत. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाप्रमाणे प्रत्येक जण स्वतंत्र होऊं पाहत होता.

(३) पोलंडमध्ये:—पोल्स, (शें. ६९), युक्रेनियन्स (शें. १४) श्वेत रशियन (शें. ४), जर्मन (शें. ४) व ज्यू (शें. ८) हे मुख्य समाजगट आहेत. (हे जर्मन आक्रमणापूर्वीचे आकडे आहेत.)

(४) झकोस्लोव्हॅकियांत:—झेक, स्लोव्हॅक (स्लाव्ह), जर्मन (लोकवस्तीचा सुमारें पांचवा हिस्सा) व युक्रेनियन्स आहेत.

(५) जुगोस्लॅव्हियामध्ये:—जरी $\frac{६}{७}$ दक्षिण स्लॅव्ह लोक आहेत तरी $\frac{३}{७}$ सर्व लोकांनाच राजकीय वर्चस्व आहे (जर्मन आक्रमणापूर्वीची स्थिति)! याशिवाय क्रोट, स्लोव्हीन्स, मॅसिडोनियन्स, जर्मन्स, हंगेरियन व तुर्क इतके भिन्न समाजगट आहेत.

(६) रुमानियामध्ये:—शेंकडा ७५ रुमानियन्स असून हंगेरियन, ज्यू, जर्मन व युक्रेनियन्स हे इतर लोक आहेत.

(आ) एकाच संस्कृतीचे लोक अनेक सत्तांखाली

(१) जर्मन:—हे युरोपांत अनेक राष्ट्रांत निरनिराळ्या सत्तांखाली राहत होते. युरोपांतील ८$\frac{१}{२}$ कोटि जर्मनांपैकी सुमारें ६$\frac{३}{४}$ कोटि खास जर्मनीमध्ये आहेत. इतर जर्मन लोक युरोपांतील

---

* जो समाजगट त्या राष्ट्राच्या लोकसंख्येपैकी निदान चौथ्या हिश्श्याइतका मोठा असतो असल्याच महत्वाच्या अल्पसंख्याक समाजगटांचा प्रस्तुत स्थलीं विचार केला आहे.

१९ देशांत पसरलेले आहेत व त्यांपैकी कांही सध्या तरी हिटलरने आपल्या सत्तेखाली आणिले आहेत. इतकेंच नव्हे तर, ते त्या त्या देशांतून जर्मनींत अगर जवळच्या देशांत आणिले आहेत. रशिया (व्होलगा जर्मन रिपब्लिकमध्ये) व लिथुअॅनिया ह्यांतच काय ते जर्मन पूर्ण स्वतंत्र असून इतर राष्ट्रांत त्यांना केवळ सांस्कृतिक स्वातंत्र्य आहे. आपली संस्कृति कायम ठेवणें व जमल्यास तिचा विस्तार करणें ह्या जर्मन वृत्तीमुळे स्वित्सलॅंड, लक्सेंबर्ग, व्होलगा जर्मन रिपब्लिक ह्यांसारख्या लहान देशांत ते स्वतंत्र आहेत. सर्व रशियांतील लोकसंख्येपैकी ०·८ इतके जर्मन आहेत. पण त्यांना स्वातंत्र्य आहे.

(२) **स्वीडिश लोक**—स्वीडनशिवाय फिन्लॅंडजवळचें आलंड-द्वीप व एस्टोनिया ह्यांत स्वीडिश लोक आहेत. ते जर्मनांप्रमाणे संघटित असून त्यांनी आपली संस्कृति कायम ठेविली आहे. स्वीडन व फिन्लंड ह्यांच्या गेल्या ३-४ शें वर्षांच्या इतिहासांत सांस्कृतिक दृटया संघटित असे स्वीडिश लोकच यशस्वी झाल्याचें आढळतें. व त्या त्या ठिकाणीं त्यांना बरेंचसें राजकीय स्वातंत्र्य आहे.

(३) **माग्यार लोकः**—हंगेरीमधील लोकवस्तीपैकी शेंकडा ९२ माग्यार लोक आहेत. तथापि रुमानिया (शें. ८) झेकोस्लोव्हॅकिया (शें. ५) जुगोस्लॅव्हिया (शें. ३) ह्या देशांतही माग्यार लोक आहेत. ते संघटित स्वरूपांत राहत असून नेहमी स्वायत्ततेसाठी धडपडत असतात.

(४) **फिन लोकः**—फिन्लंड मधील लोकवस्तीपैकी शें. ८९ फिन् लोक आहेत. पण याशिवाय रशियाच्या कारेलिया भागांत त्यांतील लोकवस्तीपैकी तिसरा हिस्सा इतके फिन् लोक आहेत. याच कारेलियासाठी फिन्लंड-रशियाची लढाई जुंपली. फिनिश भाषाभाषी लोक केवळ ३० लक्ष आहेत.

(६) **रशियन राष्ट्रसंघ**:—हें एक अठरा धान्यांचें कडबोळें आहे. ह्यांत निम्म्यापेक्षा जास्त जरी रशियन लोक आहेत, तरी श्वेत रशियन, युक्रेनियन्स, जॉर्जियन्स, यहुदी (ज्यू), जर्मन्स, ताझिक, तुराणियन्स व निरनिराळ्या जातींचे मोगल लोक आहेत. अगदी लहान सहान समाजगट धरल्यास **आज रशियन राष्ट्र संघांत सुमारें १८० निरनिराळ्या संस्कृतींचे समाजगट असून सुमारें १५० निरनिराळ्या भाषा बोलल्या** जातात! बहुसंख्य रशियन लोक हे स्लाव्ह वंशाचे आहेत. रशियाच्या पश्चिम सरहद्दी-वरील बल्गेरिया, रुमानिया व जर्मनी ह्यांच्या राजकीय डावपेचांच्या वेळीं पश्चिम बाजूच्या महत्त्वाच्या अल्पसंख्यांकांच्या मिषानेच पावलें पडत होतीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. रशियाच्या अकरा मुख्य राजकीय विभागांत अकरा निरनिराळ्या दरबारी भाषा आहेत.

श्वेत रशिया हा रशियाचा एक स्वतंत्र सुभा आहे. त्यांचे भाईबंद श्वेत रशियन-पोलंडच्या ईशान्य कोपऱ्यांत—व्हिल्ना-च्या आसपास अगदी संघटित असून स्वायत्त नाहीत. तशीच गोष्ट युक्रेनियाबाहेरील पोलंड व रुमानियांतील अल्पसंख्याक युक्रेनियनांची आहे. तशीच स्थिति झेकोस्लोव्हॅकियाच्या कार्पेथो-रुथेनिया* या भागांतील युक्रेनियन लोकांची आहे.

(७) **बल्गेरियन**:—बल्गेरियाशिवाय जुगोस्लाव्हिया, ग्रीस, रुमानिया व तुर्कस्थान ह्यांत ते संघटित असूनही त्यांना कोणत्याच प्रकारचे राजकीय हक्क नाहीत.

(८) **रुमेनियन**:—रुमानियाशिवाय मोल्डेविया या स्वायत्त भागांत संख्येने $\frac{1}{3}$ असूनही त्यांस राजकीय हक्क नाहीत.

---

* हिटलरच्या राजवटींत हा भाग हंगेरीला मिळणार आहे.

(९) ग्रीक:—ग्रीस देशाशिवाय सैप्रस (शें. ८३) इटालीच्या ताब्यांतील एजियन बेटें (शें. ८१), तुर्कस्थानच्या शेजारचीं इंब्रो व तेनेदो हीं बेटें, ह्यांत ग्रीक लोक बहुसंख्य आहेत. ईजिप्तमधील धंदेप्रधान भागांत ग्रीक लोकच प्रभावी आहेत. ग्रीक राजवंश व इंग्लिश राजवंश ह्यांचें नातें व वरील ग्रीक समाजगटाची परिस्थिति ह्यांमुळे ग्रीसचा दार्दानेलिसच्या सामुद्रधुनीवरील राजकारणांत केवढा महत्त्वाचा दर्जा आहे हें यावरून ध्यानांत येईल.

(१०) तुर्क:—सिरियाच्या उत्तर टोकाजवळचा संजाक प्रांत–सध्याचें 'हाटे' नांवाचें स्वतंत्र राज्य–तुर्कस्थानला देण्यांत येण्याचें (इ. स. १९३९) एक मुख्य कारण त्यांतील संघटित तुर्क हें आहे. शेजारच्या बेटांतही तुर्क (अल्पसंख्याक) आहेतच.

(२) इतर खंडांतील भानगडी

मागे सांगितल्याप्रमाणें इतर खंडांतील राजकीय भानगडी, वर्णविषमतेच्या किंवा वर्णद्वेषाच्या, धर्माच्या किंवा ऐतिहासिक मागसलेपणाच्या आहेत. तें कसें तें पाहूं.

(अ) वर्णद्वेषाच्या भानगडी

(१) कृष्णवर्णी निग्रो लोकांचा प्रश्न:—

आजच्या जगांत सुमारें १२॥ कोटि निग्रो लोक आहेत. त्यांपैकी सुमारें ९ कोटी १० लक्ष निग्रो फ्रेंच सत्तेखाली आहेत!

निग्रो हे मूळचे आफ्रिकेंतील राहणारे; व अजूनही जगांतील बहुतेक निग्रो लोक आफ्रिका खंडांतच आहेत.

विशेष भाषा, चालीरीति व धर्मविचार या दृष्टीने पाहतां निग्रो लोकांचा एक विशिष्ट समाजगट आहे. त्यांचें भाषावार वर्गीकरण खाली दिल्याप्रमाणें पडतें.

१ निग्रो भाषाभाषी –	सुमारें	९६० लक्ष
२ इंग्लिश भाषाभाषी	,,	१३० लक्ष
३ स्पॅनिश भाषाभाषी	,,	६० लक्ष
४ पोर्तुगीज भाषाभाषी	,,	४० लक्ष
५ फ्रेंच भाषाभाषी	,,	३० लक्ष.

असें असून लायबेरिया (पश्चिम आफ्रिका), डोमीनिकन रिपब्लिक व हैती (दोन्हीमध्य अमेरिकेंत) ह्यांतील **फक्त सुमारें ५०-६० लक्ष निग्रो स्वातंत्र्याचा उपभोग घत आहेत!** बाकीचे सर्व पारतंत्र्यांत आहेत. याचें मुख्य कारण त्या समाजगटाचा भौगोलिक व ऐतिहासिक मागसलेपणा हें आहे.

इ. स. च्या १७ ते १९ या शतकापर्यंतच्या दोनशें वर्षांतील गुलामांच्या व्यापारामुळे आफ्रिकेंतील बरेच निग्रो अमेरिकेंत आणले गेले व तेथे त्यांनी आपापल्या धन्यांच्या भाषा (जसें इंग्रजी, फ्रेंच, स्पॅनिश व पोर्तुगीज) व थोडीशी त्यांची संस्कृति उचलली. आणि आज कॅरेबियन समुद्राच्या आसमंताद्भागांत (जसें आग्नेय युनायटेड स्टेट्स, वेस्ट इंडीज बेटें व मध्य व दक्षिण अमेरिकेंतील किनाऱ्याचे कांही देश ह्यांत) ते बहुतेक ठिकाणीं बहुसंख्याक आहेत. पण ते बहुतेक पारतंत्र्यांतच आहेत. ह्याचें एक मुख्य कारण त्यांचा ऐतिहासिक* मागसलेपणा हें आहे.

पश्चिम, मध्य व दक्षिण आफ्रिकेंत निग्रो लोक बहुसंख्य असूनही त्यांना स्वातंत्र्य तर नाहीच पण महत्त्वाचे असे राजकीय हक्क आहेत असेंही कांही नाही.

---

* भौगोलिक परिस्थितीप्रमाणें न बदलणें हा भौगोलिक मागसलेपणा; बदलून वागणें हा भौगोलिक सुधारलेपणा; परंतु भौगोलिक दृष्ट्या सुधारलेल्या समाजगटाप्रमाणें भौतिक संस्कृति संपन्न न होणें हा ऐतिहासिक मागसलेपणा होय.

अमेरिकेंत थोडी निराळी स्थिति आहे. तेथे त्या त्या भागांत त्यांना कायद्याने समान हक्क दिलेले आहेत, तथापि व्यवहारांत ते पूर्ण विषमतेने व वर्णद्वेषाने वागविले जातात. ह्याचें अत्यंत दोष-पूर्ण, कमालीच्या विषमतेचें व वर्णद्वेषाचें चित्र युनायटेड स्टेट्स-मधील पूर्ण सुधारलेल्या अमेरिकन लोकांच्या निग्रो लोकांशीं होणाऱ्या वागणुकींत दिसून येतें! त्या देशांतील निग्रो तद्देशीय श्वेतवर्ण अमेरिकन लोकांपेक्षा कोणत्याही बाबतींत रतिभर कमी नसून त्यांना कोणत्याच प्रकारची समानता अथवा सवलत नाही!!

इंडियन लोकांचा प्रश्न

दोन्ही अमेरिकांतील मूळच्या लोकांना 'इंडियन' अर्थात् तांबडे इंडियन (Red Indians) म्हणत व म्हणतात. जगांतील कांही भागांतील मूळच्या तद्देशीय लोकांना नाहीसा करण्याचा शिस्तवार प्रयत्न त्या त्या भूप्रदेशांत मागाहून आलेल्या श्वेतवर्णीय लोकांनी जसा केला, तसे प्रयत्न अमेरिका खंडांतही झाले; पण त्यांच्या संस्कृतीमध्ये कांही महत्त्वाच्या गोष्टी आढळल्या म्हणून म्हणा, अथवा इतर जागतिक कारणांमुळे म्हणा, 'रेड इंडियन' लोकांसंबंधाचा अमेरिकन लोकांचा दृष्टिकोन आता थोडा बदललेला दिसतो.

सध्याच्या काळांत 'इंडियन' लोक मेक्सिको, मध्य अमेरिकेंतील बहुतेक देश, इक्वेडोर, पेरू आणि बोलिव्हिया ह्या सर्व देशांत बहुसंख्य आहेत; परंतु एकट्या मेक्सिको देशांत मात्र ताम्रवर्णी इंडियन लोकांना श्वेतवर्णी लोकांबरोबर व्यवहार व राजकारण ह्या दोन्ही बाबतींत पूर्ण समानता आहे. वरील सर्व देशांत ताम्रवर्णी इंडियन लोकांच्या स्वतंत्र राजमान्य भाषा असून त्यांची विशिष्ट संस्कृति पण आहे. एक तृतीयांश रेड इंडियन लोक स्पॅनिश भाषाभाषी आहेत. तथापि परतंत्र आहेत

यहुदी लोकांचा प्रश्न

पॅलेस्टाईन हा प्रांत यहुदी (ज्यू) लोकांचें मूळ घर. हे लोक ख्रिस्तपूर्वकाळापासून एका विशिष्ट संस्कृतीचे लोक आहेत असें समजलें जातें; हिब्रू ही त्यांची मूळभाषा.

परंतु आज ते सर्व जगभर पसरलेले असून भाषा व चालीरीति ह्या बाबतींत ते ज्या ज्या राष्ट्रांत अथवा समाजगटांत राहतात, त्यांच्याशीं अगदी एकजीव होऊन गेलेले आढळतात. पण धर्मानें मात्र ते स्वतंत्र अस्तित्व ठेवूं पाहतात.

जगावरच्या कोणत्याही एका समाजगटांत ते बहुसंख्य नाहीत; पण बौद्धिक सामर्थ्यांत श्रेष्ठ असल्याने, शिक्षण, कायदा, ब्यांका, राजकारण, मोठमोठे धंदे इत्यादि बाबतींत नांव कमावून आहेत; एवढेंच नव्हे, तर अनेक राष्ट्रांत वरील बाबतींत तेच खरे सूत्रधार आहेत. नाझी पक्षाला त्यांचें वावडें असण्याचें हें एक कारण आहे.

गेल्या पन्नास वर्षांपासून जगांतील सर्व यहुद्यांना एकत्रित करून त्यांचा सांस्कृतिक व राजकीय गट बनवून पॅलेस्टाईनमध्ये त्यांचें एक स्वतंत्र राज्य बनवावें ह्या हेतूने 'झीअनिझम' नांवाची एक जोराची चळवळ सुरू झालेली आहे. त्याबरोबर हिब्रू भाषेचेंही पुनरुज्जीवन करण्यांत आलें.

पहिल्या महायुद्धानंतर पॅलेस्टाईन हा प्रांत 'मॅंडेट' म्हणून इंग्रजांकडे आला. त्यामुळे त्या प्रांतांत त्यांना कांही विशेष हक्क देण्यांत आले व हिब्रू ही दरबारी भाषा मानण्यांत आली. त्यामुळे पॅलेस्टाईनमध्ये अनेक ज्यू येऊन राहूं लागले व अशा रीतीने त्यांनी आरंभिलेल्या एकराष्ट्रीयत्वाच्या मोहिमेला व प्रयत्नाला जोर चढला. त्यामुळे त्या प्रांतांतील बहुसंख्य अरबांच्या डोळ्यांत हें उंटाचें पिल्लूं सलूं लागलें.

तशांत इ. स. १९३४ सालीं रशियानें आपल्या राष्ट्रसंघांत अगदी पूर्वेकडे मँचूरियाच्या सरहद्दीपलीकडे 'विरोबिजान' या भागांत यहुदी लोकांचा एक स्वतंत्र प्रांत उत्पन्न करून 'यिद्दीश*' ही त्यांची स्वतंत्र भाषाही दरबारी भाषा म्हणून मान्य केली! पण अजूनपर्यंत कोणत्याही प्रांतांत ते बहुसंख्य नाहीत हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

किंबहुना पोलंड,† येमेन, टँजिअर (आंतरराष्ट्रीय विभाग) व खास न्यूयॉर्क या ठिकाणीं ज्यू हा फार महत्त्वाचा पण अल्प-संख्याकांचा एक गट आहे. मोरोक्को, अल्जिरिया व ट्यूनिस, लिथुआनिया, एस्टोनिया, रशिया व ग्रीस ह्या सर्व भागांत यहुदी लोक तद्देशीय भाषा बोलतात; तथापि तेथेही त्यांनी आपली संस्कृति कायम ठेविली आहे.

आज जगांत सुमारें १६० लक्ष यहुदी (ज्यू) असून त्यां-पैकी सुमारें ४९ लक्ष युनायटेड स्टेट्समध्ये, ३० लक्ष पोलंडमध्ये, ३० लक्ष रशियांत, १० लक्ष रुमानियांत, ७ लक्ष ब्रिटिश साम्रा-ज्यांत, ९ लक्ष फ्रान्स व त्याचें साम्राज्य यांत पसरलेले आहेत. जर्मनी, झेकोस्लोव्हॅकिया, हंगेरी ह्यांतील बरेच (सर्व मिळून सुमारें १९ लक्ष) ज्यू नाहीसे करण्यांत आले.

कांही झालें तरी नाझींच्याप्रमाणे अरबी समाजगटाला यहुदी शल्य कायमचें बोचत असून पॅलेस्टाइन हें एक त्या प्रश्नाच्या दारूचें कोठारच आहे. अरबी संघटनेच्या विचारविनिमयांत यहुदी लोकांच्या प्रश्नाकडे बारकाईने लक्ष पुरविण्यांत येत आहे.

* जुनी जर्मन, हिब्रू व स्लॅव्ह ह्या भाषांचें मिश्रण.

† मध्य यूरोप, पोलंड, इत्यादि भागांतून हुकूमशहा हिटलर ह्यानें ज्यू लोकांचें उच्चाटन केलें आहे.

वरील प्रश्न हे कांहंशीं ऐतिहासिक मागसलेपणाचे म्हणून म्हणतां येतील. परंतु मुसलमान व रोमन कॅथॉलिक ह्या दोन समाजगटांचे प्रश्न मागे सांगितलेल्या दोन्ही प्रकारच्या भानगडींचे आहेत. त्यांमध्ये, तसेंच चिनी व हिंदी समाजगटांच्या भानगडी-मध्ये आगामी अनेक वर्षांतील भयंकर व जगाला हालवून सोडणाऱ्या भावी प्रचंड सांस्कृतिक व राजकीय संघर्षाचीं बीजें आहेत. तीं कशीं तीं थोडक्यांत पाहूं.

इस्लामी गटाचें विविध पण प्रभावी स्वरूप

हिंदु, इस्लामी, ख्रिस्ती व बौद्ध हे जगांतील मुख्य धर्म असून त्यांपैकी ख्रिस्ती व इस्लामी हे दोनच धर्म जिवंत धर्म आहेत असें म्हणतात; व तें व्यवहारदृष्टया खरें आहे. कारण या दोन धर्मांच्या लोकांत जेवढें व्यावहारिक ऐक्य दिसून येतें तेवढें इतर-धर्मीयांत आढळून येत नाही. दुसरें असें की ह्या धर्मीयांची जशी जगद्व्यापी संघटना आहे तशी इतरांची नाही; आणि तिसरें म्हणजे या दोन गोष्टींमुळे जगांतील व्यवहारकारण व राजकारण ह्यावर जितका परिणाम ते करूं शकतात तितका इतरधर्मीय अद्यापि करूं शकले नाहीत.

या इस्लामी गटाचा धार्मिक व सांस्कृतिक दृष्टया विचार करणें जास्त महत्त्वाचें आहे.

ईजिप्त, अरबस्तान व हिंदुस्थान हे तीन देश इस्लामी धर्माचीं मुख्य धार्मिक केंद्रें आहेत. इ. स. १९२४ सालीं तुर्कस्थानने खिलाफतीची खिरापत केली, तोंपावेतों तोही देश एक मुख्य धार्मिक केंद्र होता. भारतांतील इस्लामी समाज राज-कीय स्वातंत्र्यासाठी बहिर्मुख आहे तर स्वतंत्र ईजिप्तमधील इस्लामी समाज केंद्रवर्ती वा अंतर्मुख असून निरनिराळ्या स्वतंत्र

सत्तांखालील इस्लामी समाजगटांना राजकीय दृष्टया एका सूत्रांत संघटित करण्याची हाव बाळगतो.

जगांत सुमारें ४० कोटी इस्लामी लोक आहेत व ते आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यापासून सारखे पूर्वेस मँचूरियाच्या पूर्व सरहद्दीपर्यंत पसरलेले आहेत! (नकाशा पहा) भारताच्या डोक्याभोवतीं पश्चिम, उत्तर, ईशान्य व आग्नेय ह्या बाजूंना इस्लामियांचा जणू वेढा पडलेला! तो समाज जगांत पुढे दिल्या प्रमाणे पसरलेला व विभागलेला आढळतो.*

उत्तर आफ्रिका	सुमारें ८	कोटि	मुसलमान
पश्चिम व मध्य आशिया	,, ७	,,	,,
इंडोनीशिया	,, ६	,,	,,
भारतवर्ष	,, ९¾	,,	,,
उत्तर चीन	,, ५	,,	,,
इतर जगांत	,, ५¼	,,	,,
	४०		

राजकीय स्वातंत्र्याच्या दृष्टीने पाहतां ह्या ४० कोटींपैकी सुमारे निम्मा इस्लामी समाज पारतंत्र्यांत आहे!— ऐतिहासिक मागसलेपणाचा हा परिणाम. तो असाः—

ब्रिटिश सत्तेखाली	सुमारें	९३०	लक्ष
फ्रेंच ,,	,,	३२०	,,
डच ,,	,,	५५०	,,
इटालियन ,,	,,	५००	,,

याचा अर्थ या चार राजसत्तांना मुसलमानांचा प्रश्न सारखा टोचीत असतो असा आहे. इटाली अथवा जर्मनी या दोन

* An explanatory Atlas of For Eastern Politics 2nd Ed 1942 Faber.

देशांना इस्लामी समाजाचा जो कळवळा आल्याचें राजकीय दृश्य दिसतें तो कळवळा कृत्रिम आहे. तो इस्लामी समाजाच्या कल्याणासाठी नसून ब्रिटिश सत्तेविरुद्ध त्या समाजाला उठवून आपला स्वार्थ साधण्यासाठीच आहे, हें स्पष्ट आहे! ऐतिहासिक दृष्ट्या सुधारलेल्या जपानलाही गेल्या ४-५ वर्षांत इस्लामियांचा जो कळवळा आल्याचें दिसलें तोही इटाली जर्मनीप्रमाणेच आहे.

अमेरिकेंत फक्त डच गियानामध्ये लहानसा इस्लामी समाजगट आहे; तर युरोपांत अल्बेनिया (शे. ७९ मुसलमान) तुर्कस्थानांत, कॉकेशियांत, त्याचप्रमाणें रशियांतील तातारिया व बक्शीरिया ह्यांत, जुगोस्लॅव्हिया (शे. १०), बल्गेरिया (सुमारें ८ लक्ष एवढा) या प्रमाणे भिन्न भिन्न देशांत विभागलेला इस्लामी समाज आहे.

रशियन राष्ट्रसंघाच्या ११ स्वायत्त विभागांपैकी ६ स्वायत्त विभागांत इस्लामी समाजगट महत्त्वाचा आहे.

तुर्कस्थान, ईजिप्त, इराक, इराण व अफगाणिस्थान ह्यांतील इस्लामी समाजगट स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहेत असें वाटतें; पण तें त्यांचें स्वातंत्र्य जागतिक राजकारणाच्या दृष्टीने अस्थिर आहे; किंबहुना तें धूर्त व ऐतिहासिक दृष्टया फार पुढारलेल्या ख्रिस्ती समाजगटाच्या जागतिक राजकीय आन्दोलनाचा धक्का सहन करण्यास असमर्थ आहे. अथवा त्यांच्या डावपेचांपुढे न टिकणारें आहे.

आझरबाइजान, कझाकस्तान, उझबेगिस्तान, तुर्कोमनिस्तान, ताझिकिस्तान व किर्घिजिया ह्या रशियन राष्ट्रसंघांतील इस्लामी समाजगट पूर्ण स्वतंत्र नाहीत!* या सर्वांचा अर्थ असा की एकाच

---

* नुकत्याच जाहीर झालेल्या रशियन धोरणाप्रमाणे रशियन राष्ट्रसंघांतील विभाग जवळ जवळ स्वतंत्र होतील. त्याचे राष्ट्रांतरीय पडसादही क्रांतिकारी होतील.

संस्कृतीचा इस्लामी समाजगट अनेक राजसत्तांखाली विभाजित आहे ! याचें ऐतिहासिक मागसलेपणाशिवाय दुसरें महत्त्वाचें कारण म्हणजे त्यांतील वंशभेद हें आहे. त्या दृष्टीनेही इस्लामी समाजगटाचा विचार करणें महत्त्वाचें व उद्बोधक आहे.

तुर्क, अरब, मोंगल व ताझिग हे चार महत्त्वाचे इस्लामी गट आहेत.

तुर्कः—केमालपाशाने तुर्कस्थानला स्वातंत्र्य मिळवून दिल्यापासून तुर्क महत्त्वास चढूं लागले. पहिल्या महायुद्धापर्यंत तर युरोपांतील ख्रिस्ती समाजगट 'युरोपांतील दुबळा किंवा रडया माणूस' (Sick man of Europe) म्हणून तुर्क लोकांची हेटाळणी करीत. त्याला युरोपांतून हाकलून देण्याचा प्रयत्न करीत व अजूनही तुर्कांसंबंधाची त्यांची दृष्टि पूर्ण बदललेली आहे असें नाही.

प्रस्तुत तुर्कस्थानांतील लोकवस्तीपैकी शें. ८६ लोक तुर्क आहेत. पूर्वी सिरियाच्या ताब्यांत असलेला उत्तर सरहद्दीचा जो संजाक* प्रांत त्यांत शेंकडा ३८ इतके तुर्क आहेत ! सायप्रस ह्या ब्रिटिशांच्या ताब्यांतील बेटांत शेंकडा १८ इतकेच तुर्क आहेत. आणि एजियन समुद्रांतील इटालीच्या ताब्यांतील बेटांत शें. १०·५ इतके तुर्क आहेत. ह्या सर्व भागांत 'तुर्की' ही दरबारी भाषा म्हणून मान्य आहे.

खिलाफतीची गादी म्हणून तुर्कस्थानचें पूर्वी महत्त्व होतें. पण खिलाफतच मोडल्यावर तें धार्मिक वजन कमी झालें ! तथापि पूर्व भूमध्य समुद्रांतील युरोपियन राजकारणाच्या दृष्टीने—रशियाचें काळ्या समुद्रांतील राजकारण, जर्मनीचें डॅन्युबच्या खोऱ्यांतील राजकारण व इटालीचें इजिप्त, लायबिया, सुवेझ, इत्यादि बाजूचें

---


* ह्याला 'हाटे' हें नवीन नांव मिळून तो स्वतंत्र प्रांत करण्यांत आला. पण अलीकडे तो प्रांत तुर्कस्थानला देण्यांत आला आहे.

राजकारण ह्यांच्या दृष्टीने—काळ्या व भूमध्य समुद्राच्या दरवाजा-वर—दार्दानेलिस व बास्पोरस ह्या सामुद्रधुन्यांवर—पहारेकऱ्याचें काम करणाऱ्या तुर्कस्थानचें महत्त्व फार आहे. शिवाय ऐतिहासिक दृष्टया मागे असलेल्या वायव्य आशियांतील इस्लामी राष्ट्रांमध्ये सर्वांत जास्त सुधारलेलें म्हणून पुढे असलेल्या तुर्की समाजगटाचें महत्त्व जास्त आहे. पश्चिम आशियांतील इस्लामी राष्ट्रें तुर्कस्था-नाला आपला मार्गदर्शक समजत व अजूनही समजतात.

अरबः—पहिल्या महायुद्धापर्यंत अरबस्थानांतील अरब स्वतंत्र होते. पहिल्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका ह्यां मिळून चार देशांतील अरब—जसें ईजिप्त, सौदी अरबस्थान, येमेन, इराक—स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहेत. तसेंच सिरिया व ट्रान्स जॉर्डीनिया ह्या फ्रेंच व ब्रिटिश मँडेट्स मधील अरब, फ्रेंच व स्पॅनिश मोरोक्को व टयूनिसमधील अरब, इराणी आखाता-वरील क्यूवेट, कतार, ओमान, बाहरेन, ह्या प्रांतांतील अरब, पॅले-स्टाइन व माल्टा ह्यांतील अरब, ह्यांना बरेंच स्वातंत्र्य आहे.

मोरोक्को व अल्जीरिया ह्यांतील अरब व मूर, टँजीअरमधील अरब, पश्चिम सहाराच्या स्पॅनिश सत्तेखालील विभागांतील अरब, इटालियन लायबियांतील अरब, आणि अँग्लो इजिप्शियन सुदान-मधील अरब, ह्यांनाही थोडया प्रमाणाने स्वातंत्र्य आहे. शिवाय मोरोक्को, टयूनिस, इजिप्त, अँग्लो-इजिप्शयन सुदान, इराक, अरब-स्थान, सिरिया, (लेबानन) इत्यादि भागांत, तसेंच झांजीबार, संजाक ह्या भागांत अरब अल्पसंख्याक असूनही अरबी ही दरबारी भाषा आहे!

इराण, केनिया व इरिथ्रिया ह्या भागांत अरब हीच मुख्य व्यापारी जात आहे.



अरबी राष्ट्रजाति

इस्लामी गटांच्या राजकारणांत अरबी गटाचें महत्त्व.

[पृष्ठ २४६

सारांश, उत्तर आफ्रिकेच्या पश्चिम टोकापासून अफगाणि-
स्थानच्या हद्दीपर्यंतचा इस्लामी भाग अरबी संस्कृतीचा आहे व तोही
कांही स्वतंत्र तर कांही परतंत्र आहे! एकंदर अरबी समाज सुमारें
५॥ कोटी असून त्यांपैकी सुमारें २॥ कोटी अरब स्वतंत्र असून १८०
लक्ष अरब फ्रेंच सत्तेखाली आणि १ कोटी ब्रिटिश सत्तेखाली आहेत!

इस्लामी संस्कृतीचे नैऋत्य वा पश्चिम आशियांतील देश
आशिया व युरोप ह्यांच्या राजकारणांत खळबळ उडविल्याशिवाय
रहाणार नाहीत. सर्व इस्लामी समाजगट ऐतिहासिक दृष्टया
मागसलेला आहे; पण त्यांचे देश कांही महत्त्वाच्या खनिज
संपत्तीने (जसें तेल, लोखंड, क्रोम, कोळसा) भरलेले असून ते
गट जिवंत धर्माची जाज्वल्य भावना उराशीं बाळगून आहेत.
तशांत हिंदुस्थान व चीन ह्या इस्लामी संस्कृतीशीं भिन्न अशा
संस्कृतीच्या, तसेंच ऐतिहासिक दृष्टया मागे असणाऱ्या व बव्हंशीं
स्वयंपूर्ण होऊं शकणाऱ्या अशा समाजगटाला कायमचा जखडून
टाकण्याची तयारी करून ठेविलेल्या व ठेवणाऱ्या युरोपांतील
खिस्ती समाजगटाच्या राजकारणाच्या मार्गावरील तो इस्लामी
समाजगट एका पायरीसारखा आहे, असें म्हटल्यास तें योग्य ठरेल.

अरब लोकांचा मूळ देश जो अरबस्थान त्याच्या उत्तर व पूर्व
बाजूला ब्रिटिश राजकारणाने उत्पन्न केलेले ट्रान्स जॉर्डिनिया,
क्यूवेट, ट्रुशल ओमान, ह्यांसारखे तुकडे हे सौदी अरबांच्या गळ्या-
भोवतालचे गळफास असून ते अरबी आकांक्षांना दिलेले पायबंद
आहेत! तसेंच इराणमधील ब्रिटिश व रशिया ह्यांची व्यापाराची
चुरस अरबस्थानांतील अमेरिकन तेल कंपन्यांमार्फत वाढणारें अमे-
रिकेचें प्रस्थ, अरबी तेलाचे नळ भूमध्य समुद्राकाठीं नेण्याचें
अमेरिकन व्यवहारकारण इ. स. १९४३ सालच्या तेहरान
परिषदेमुळे त्या भागांतील वाढणारें रशियाचें वजन, आणि बर्लिन-

बगदाद रेल्वेच्या राजकारणामागील जर्मनीचीं कारस्थानें, ह्या सर्व गोष्टींवरून पश्चिम आशिया हा इस्लामी गटाचा एक मध्यभागचा तुकडा युरोपांतील प्रभावी व महत्त्वाकांक्षी ख्रिस्ती समाजगटाला किती महत्त्वाचा वाटतो हें सहज ध्यानांत येतें.

मोगल:—मंगोलिया हें मोगलांचें मूळ घर. कुब्लाईखानाच्या राजवटीनंतर म्हणजे इसवी सनाच्या तेराव्या शतकानंतर मोगलांच्या या भागांतील सत्तेला उतरती कळा लागली. कांही शतकें पर्यंत त्यांना चिनी व रशियन लोकांच्या अमलाखाली राहावें लागलें. बाहेरील मंगोलिया इ. स. १९१२ सालीं चीनपासून वेगळा झाला, व इ. स. १९२१ सालीं तेथे अगदी स्वतंत्र पण रशियन पद्धतीचें राज्य बनलें! रशियन राष्ट्रसंघांतील बूरियट मोगल, कालमुक मोगल आणि ओर्याट मोगल ह्या लोकांची पण स्वतंत्र राज्यें आहेत. चीनच्या उत्तर भागांतील चहर व स्वीयुआन ह्या प्रांतांतील मोगलांना चीननेही स्वातंत्र्य दिलें. पण गेल्या तीन चार वर्षांपासून (इ. स. १९३७ पासून) जपानने त्यांना आपल्या ताब्यांत घेण्याचा प्रयत्न चालविला आहे. खुद्द मँचूरियांतील मोगल वस्ती असलेल्या चार खिंगन प्रांतांना जपानने थोडेसे हक्क दिले आहेत; तर आंतील मंगोलियांत नुकतेंच जपानने 'माँगूको' या नांवाने नामधारी स्वतंत्र राज्य उत्पन्न केलें आहे.

मोगल आज सुमारें ६० लक्ष आहेत. त्यांपैकी सुमारें ८ लक्ष मोगल बाहेरच्या मंगोलियांतील स्वतंत्र राज्यांत आहेत; ९ लक्ष रशियन राष्ट्रसंघांत आहेत; सुमारें १९ लक्ष मँचूरियांत आहेत !

वर सांगितलेल्या महत्त्वाच्या लोकांशिवाय ताझिक जातीचे इस्लामी लोक महत्त्वाचे आहेत. रशियन राष्ट्रसंघांत ताझिकिस्तान नांवाचा एक प्रांत अफगाणिस्थानाला लागून उत्तरेस आहे. त्या स्वायत्त प्रांतांत ताझिक ही दरबारी भाषा असून ताझिक लोक

बहुसंख्य आहेत. तेथे ते एकूण १० लक्ष आहेत. त्याच्या पश्चिमेच्या उजबेगिस्तानमध्येही ताझिक लोक थोडेसे आहेत. पण सर्वांत जास्त म्हणजे सुमारें ३३ लक्ष ताझिक अफगाणिस्थानमध्ये काश्मीरच्या शेजारीं आहेत. तथापि अफगाणिस्थानांत ते $\frac{1}{3}$ आहेत. अफगाणिस्थानच्या गेल्या सुमारें शंभर वर्षांच्या इतिहासांतील राजघराण्यांची आपसांतील चुरस, तसेंच इंग्रज व रशिया ह्यांचें अफगाणिस्थानांतील राजकारण, हिंदुस्थानाला लागून असणाऱ्या वरवान, बदक्शान, झालावान वगैरे भागांतील बंडाळी ह्या सर्वांचा समवायाने विचार केल्यास ह्या ताझिक गटाचें महत्त्व ध्यानांत येतें.

वरील सर्व वर्णनावरून इस्लामी समाजगटासंबंधाने पुढील गोष्टी स्पष्ट दिसतात. त्या अशा:—

(१) इस्लामी समाजगट धर्मदृष्टया जरी संघटित असला—तो संघटितपणा धर्मांतील विशिष्ट तत्त्वांमुळे आलेला असून समाजाच्या संघटनेमुळेच आलेला नाही असें म्हणण्यास विशेष आधार नाही—तरी राजकीय दृष्टया अखंड गट झालेला नाही. पण तसे प्रयत्न निदान अरबी गटाकडून थोडया फार प्रमाणांत होत आहेत.

(२) ख्रिस्ती समाजगटाप्रमाणे या इस्लामी समाजगटामध्येही जातीय उपभेद आहेत; पण ते थोडे आहेत, त्यांच्याइतके पुष्कळ नाहीत.

(३) निम्म्यापेक्षा जास्त (सुमारें २२ कोटि) इस्लामी समाजगट ख्रिस्ती लोकांच्या अमलाखाली पारतंत्र्यांत आहे.

(४) स्वतंत्र असलेला इस्लामी समाज बव्हंशीं ऐतिहासिक दृष्टया मागसलेला आहे.

(५) भारताशिवाय बाकी इतर भागांतील इस्लामी समाज

गट ज्या देशांत राहतो त्याच देशाला आपला देश मानून त्याच्या उन्नतीची इच्छा करतो व त्यामुळे बहिर्मुख होत नाही.

(६) सर्व इस्लामी समाजगट भारताच्या शेजारींच आहे.

(७) इस्लामी राष्ट्राराष्ट्रांत कोणत्याही प्रकारचें 'बफर'* राज्य नाही.

रोमन कॅथॉलिकांचा प्रश्न

ख्रिस्ती समाजगट, हा धार्मिक दृष्टया व राजकीय दृष्टयाही सर्वांत जास्त संघटित आहे. त्यापैकी रोमन कॅथालिक पंथीय समाजगट सर्वांत मोठा आहे. यामुळे **ख्रिस्ती राजकारणांत आणि म्हणून जागतिक राजकारणांत तो गट बराच प्रभावी आहे.**

जगांत सुमारें ३३ कोटी २० लक्ष रोमन कॅथॉलिक असून त्यांचा मुख्य 'पोप' ही व्यक्ति असते. पोपची सत्ता अनिर्बंध असते. पोपची गादी इटालीमधील 'व्हॅटिकन सिटी' या लहानशा शहरवजा राज्यांत असते.

सर्व दक्षिण अमेरिका (गियानांत फार कमी), मध्य अमेरिका, मेक्सिको; तसेंच **दक्षिण, पश्चिम व मध्य युरोप ह्या भागांत रोमन कॅथॉलिक लोक बहुसंख्य आहेत.** इंग्लंड व जर्मनी ह्यांत ते कमी आहेत. रशिया, नॉर्वे, स्वीडन ह्यांत अत्यंत कमी क्यानडा व युनायटेड स्टेट्स ह्यांमध्येही बरेच रोमन कॅथॉलिक आहेत. आशियांत केवळ फिलिपाईन्स, लेबानन व गोवा ह्यांमध्ये आणि आफ्रिकेंत मदीरा, क्यानरा, अझोरिस, केपव्हर्ड, सेशेलिस व मॉरिशस, ह्या बेटांतच रोमन कॅथॉलिक आहेत. त्यांची जगावरील विभागणी स्थूलमानाने खाली दिल्याप्रमाणे आहे. आंकडे इ. स. १९४३ चे.

---

* याला अपवाद अरबस्थानचा आहे, कारण क्यूवेट जेब्रल-इद-द्रूझ किंवा ट्रान्स जॉर्डीनिया ह्यांसारखे प्रांत 'बफर'च आहेत.

युरोप	२२००	लक्ष
द. अमेरिका	६१०	,,
उ. अमेरिका	४००	,,
आशिया	७०	,,
आफ्रिका	२०	,,
ऑस्ट्रेलिया	२०	,,
एकूण	३३२०	,,

सर्व जगांत ख्रिस्ती समाज सुमारें ६९ कोटि आहे. त्यापैकी सुमारें निम्मे रोमन कॅथॉलिक असून व्यवहार व राजकारण ह्यांत तेच प्रभावी आहेत.

चिनी व भारतीय समाजगट

चिनी व भारतीय लोकांचा राजकीय प्रश्न जरी मागे सांगितल्यापैकी दुसऱ्या वर्गांत म्हणजे मुख्यत: वर्णद्वेषाच्या किंवा वर्णहीनतेच्यां वर्गांत येतो तरी तो त्या सर्वांपेक्षा अनेक बाबतींत निराळा व जागतिक महत्त्वाचा आहे. ह्या दोन्ही प्रश्नांचा स्वतंत्र विचार करणें जास्त सोईचें आहे.

पिवळ्या बागुलबोवाचें भूत

जगांतील मानव जातींचें वर्गीकरण कांही पंडितांनी त्यांच्या रंगावरून केलें आहे. तर कांहींनी त्यांच्या केसांवरून तर कांहीनी त्यांच्या मस्तकाच्या आकारावरून केलें आहे.

पॅन इस्लामिझम, पॅन स्लॅव्हिझम, पॅन जर्मनिझम, पॅन अमेरिकॅनिझम वगैरे मानवी चळवळींवरून असें दिसतें की **मानव समाज आपली विभागणी सांस्कृतिक गटपद्धतीवर वरून घेण्याच्या कल्पनेच्या जवळ जवळ येत चालला आहे.** हें ध्येय गाठण्याला

अजून अवकाश आहे. सांस्कृतिक कल्पनेच्या विकृत दृष्टीमुळे उत्पन्न झालेला वर्णद्वेष, पाश्चिमात्य समाजगटांमध्ये फार आहे. यामुळे त्यांना स्वत:च्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाही.

त्यांच्या वर्गीकरणाप्रमाणे पीतवर्णी वा पिंगट वर्णाच्या लोकांमध्ये मुख्यत: मांगोलियन वंशांतील (जसें चिनी, जपानी, ब्रम्ही, सयामी, आनामी) थोडे मॅले लोक (जावा, सुमात्रामधील) व अमेरिकन इंडियन हे लोक येतात. या पीतवर्णी लोकांची संख्यावाढ फारच झपाट्याने होत आहे. त्यांच्या स्त्रीसमाजाची जननशक्ति पाश्चिमात्य स्त्रीसमाजापेक्षा जास्त आहे ही गोष्ट त्यांच्याविरुद्ध ओरड करणाऱ्यांना जास्त जाचक वाटते. ही ओरड करीत असतांना त्यांचा मुख्य रोख चिनी व जपानी लोकांच्या वाढीवर असे व आहे. जपान ह्या राष्ट्राने अगदी अल्पावधींत आपली उन्नति केली व तें राष्ट्र इंग्लंड, अमेरिका वगैरे श्वेतवर्णी राष्ट्रांच्या बरोबरीला आलें ही गोष्ट त्या श्वेतवर्णी राष्ट्रांना शल्यासारखी सलूं लागली. तशांत मजूर व वसाहतवाले म्हणून बाहेर गेलेले चिनी व जपानी लोक इतर श्वेतवर्णी लोकांपेक्षा अधिक उद्योगी व कार्यक्षम ठरूं लागले, त्यामुळेही श्वेतवर्णीयांचा त्यांच्या संबंधाचा वर्णद्वेष जास्त पेट घेऊं लागला; तेव्हा त्यांनी हे पीतवर्णी लोक आपण कांही प्रतिबंधक उपाय न योजिले तर लवकरच सर्व जगाला व्यापून टाकतील अशी या पीतवर्णी लोकांविरुद्ध युरोपीयांनी जी ओरड सुरू केली तिलाच 'पिवळा बागुलबुवा' असें म्हणतात. या त्यांच्या ओरडीमुळेच, 'जपानी मन्रोमत', 'व्हाईट ऑस्ट्रेलिया पॉलिसी', 'ग्रेटर एशिया मत' (डॉ. सन्यत्सेन ह्यांचें), 'अँटि एशियाटिक बिल' (दक्षिण आफ्रिकेंतील), 'ईस्ट एशिया डॉक्ट्रिन' (जपानी), हीं सर्व पिलें बाहेर पडलीं असें म्हणण्यास हरकत नाही! सध्याचा चिनी-जपानी लढा हा एक पाश्चिमात्यांच्या त्या ओरडीचा दूरान्वयी परिणाम कसा आहे

ह्याचें मागे थोडेंसें दिग्दर्शन आलेंच आहे. पाश्चिमात्त्यांच्या ह्या कावेबाजपणामुळे पूर्व आशियाच्या भावी राजकारणांत काय काय घोटाळे व भानगडी होतील ह्याचा कांही नेम नाही ! कसेंही असलें तरी आज ऐतिहासिक मागसलेपणामुळे चीनला कठीण परिस्थितींत दिवस काढावे लागत आहेत हें खरें !

आज जगांत सुमारें ४८ कोटि चिनी लोक असून त्यांपैकी सुमारें ४० कोटि चिनी खास चीनमध्ये आहेत. आणि बाकीचे चीनचे इतर भाग, मँचूरिया, हाँगकाँग (ब्रिटिश), मकौ (पोर्तुगीज), पेनँग, सिंगापूर, व मलायी वसाहती, फोर्मोसा, ह्या भागांत बहुसंख्य आहेत; तसेंच जावा, सुमात्रा, फिलिपाइन्स, सयाम, फ्रेंच इंडोचीन, बोर्निओ इत्यादि भागांत फार अल्प संख्याक (सुमारें शेंकडा १० ते १९) आहेत. तथापि आर्थिक व व्यापारी दृष्टया त्यांचें महत्त्व फार आहे. सारांश, चिनी बहुजन समाज जसा स्वतंत्र आहे, तसा तो जपान, इंग्लिश, फ्रेंच, अमेरिकन, डच इत्यादि भिन्न भिन्न राजसत्तांखाली भिन्न भिन्न पद्धतीने रगडला जात आहे. ह्याचें एक मुख्य कारण त्यांचा ऐतिहासिक मागसलेपणा हें आहे.

चिनी लोक अत्यंत कुशल, चिवट व कष्टाळू असे आहेत. ते चीनबाहेरही सर्व ठिकाणीं आपापल्या संस्कृतीला चिकटून राहिलेले आढळतात. मँचूरियांत शेंकडा ९० चिनी लोक आहेत, तसेंच तेथे चिनी हीच दरबारी भाषा आहे. तथापि तेथेही तो समाजगट नामधारी स्वतत्र आहे. (मँचूरिया जपानी सूत्राप्रमाणे हालतो). सिंक्यांगमध्ये चिनी लोक अल्पसंख्याक आहेत (मुसलमान लोक बहुसंख्य आहेत); तसेंच ते टानुटुवा व बाहेरील मंगोलिया यांतही अल्पसंख्याक आहेत. इ. स. १९१२ सालीं टानुटुवा व बाहेरील मंगोलिया ह्यांतील इस्लामी मोगल लोकांनी चीनविरुद्ध बंड केलें व त्याला रशियन सत्तेने मदत देऊन ते प्रांत स्वतंत्र केले. पण

सिंक्यांगमध्ये तशाच प्रकारचें तुर्की मुसलमानी बंड तेथील अल्पसंख्याक चिनी लोकांना रशियाने भरपूर मदत देऊन इ. स. १९३४ सालीं रशियन सरकारनेच मोडलें व त्यामुळे तो प्रांत चिनी अमलाखाली अद्यापि आहे! असें करण्यांत श्वेतवर्णी रशियन सरकारचें राजकारण होतें व आहे. तें असें:—बाहेरील मंगोलियांतील बहुसंख्य समाजगट जपानविरोधी होता. जपानसहकारी मँचूरियाच्या शेजारीं मंगोलियासारखें एक राजकीय बफर* राज्य रशियाला हवें होतें. त्यामुळे त्याने सिंक्यांगप्रमाणे अल्पसंख्याक चिनी गटाला मदत न करतां जपानविरोधी व चीनविरोधी मोगल समाजगटाला मदत देऊन तो प्रांत स्वतंत्र करविला. याच्या उलट

---

* आगगाडीच्या डब्याच्या शेवटीं टोकाला जे दोन वर्तुळाकार तवे असतात त्यांना 'बफर' (Buffer) असें म्हणतात. दोन्ही डबे एकमेकांवर आपटल्यास, डब्याचें होणारें नुकसान न व्हावें; किंवा या बफर मार्फत अपघात तरी कमी भासावा, ह्या हेतूने हे बफर्स केलेले असतात. दोन मोठ्या राजसत्तांमध्येही, लहान देश, सरहद्दी व मागासलेले देश अशाच स्वरूपाच्या उद्देशाने ठेविलेले असतात. चालचलाऊ किंवा तात्पुरते, स्वाभाविक, आर्थिक, किंवा राजकीय असे बफर्सचे अनेक प्रकार आहेत, आणि प्रत्येक खंडांत असे 'बफर्स' मोठ्या सत्ताधारी राष्ट्रांनी ठेविलेले आहेत. त्यांपैकी कांही:– **युरोपांत**–बेल्जम, हॉलंड, स्वित्झर्लंड, जुगोस्लॅव्हिया, ऱ्हाइन टापू, झेकोस्लोव्हाकिया, इ. **अमेरिकेंत**–सर्व लॅटिन अमेरिका, युरुग्वे, ग्रॅन शॅको, गिआना; **आफ्रिकेंत**–कांगो, युरुंडी, अबिसीनिया, पश्चिम-आफ्रिकेंतील लहान लहान तुकडेवजा भाग; **आशियांत**–अफगाणिस्तान, इराक, ट्रान्सजॉर्डिनिया, सयाम, ब्रह्मदेशांतील शानसंस्थानें, मँचूरिया, मंगोलिया, नेपाळ इत्यादि बफर्सच आहेत. हिंदुस्थानांत देखील संस्थानी हिंदुस्थानामध्ये आलेले ब्रिटिश हिंदुस्थानचे प्रांतभाग हे पण अशाच प्रकारचें काम करूं शकतात!

सिंक्यांगमधील अल्पसंख्य चिनी गटाला मदत देऊन—हे चिनी लष्करी अम्मलदार मँचूरियांतून आलेले व आणविलेले जपानविरोधी पण रशिया-सहकारी हद्दपार केलेले क्रांतिकारक होते—तुर्की-इस्लामी बहुसंख्य समाजगटाचें स्वतंत्रतेचें राजकारण हाणून पाडलें. कारण जर तें तुर्की गटाचें राज्य बनतें तर त्यामुळे त्याच्या शेजारच्या रशियन राष्ट्रसंघांतील कझाकस्तान, किर्घीजिया व उझबेगिस्तान, ह्यांतील इस्लामी गटांना 'स्वातंत्र्याची' चळवळ करण्याला उत्तेजन मिळालें असतें व तें रशियाला नको होतें व नको आहे.* **ऐतिहासिक मागसलेपणाचा फायदा इतर सुधारलेलीं राष्ट्रें कशीं घेतात ह्याचें हें एक भारताशेजारचें प्रचलित उदाहरण आहे.** आंतील मंगोलियांतील चिनी बहुसंख्य समाजगटांतही सुधारलेल्या जपानने अशाच प्रकारचा डाव टाकला. त्या भागांत चिनी बहुसंख्य असून ऐतिहासिक मागसलेपणामुळे प्रथम ते (साम्यवादाच्या प्रसारामुळे) रशियाच्या आहारीं गेले होते व इ. स. १९३७मध्ये सुरू केलेल्या चिनी युद्धाच्या मिषाने जपानने आंतील मंगोलिया व त्या शेजारचे चहर, अर्धा जेहोल ह्या भागांत प्रचारतंत्र व तरवार ह्या दोहोंच्या जोरावर आपलें जाळें टाकून जम बसविला; एवढेंच नव्हे, तर त्या भागाला 'मॉंगूको' असें नांव देऊन तो एक बाहुलेंवजा स्वतंत्र भाग बनविला ! अशा रीतीने रशिया, मँचूरिया व चीन ह्यांमध्ये जपानने एक तात्पुरतें 'बफर राज्य' उत्पन्न करून पाचर मारली !

कसेंही असलें तरी, **एकसंस्कृतियुक्त चिनी अनेक सत्तांखाली राबविले** जात **आहेत हें खरें. तसेंच समसंस्कृतिवाले जपानी आपल्याच जातबांधवांना चिरडूं पाहत आहेत हें पण खरेंच !** त्यांना जपानी लोक 'निकृष्ट राहाणीचे' समजतात. जपानच्या

---

* An Explanatory Atlas of Far Eastern politics Pp. 110-112, *Hudson and Rajchman*. (2nd Ed. 1942).

साम्राज्यपिपासेचा हा दोष, का श्वेतवर्णी पाश्चिमात्यांच्या कारस्थानांचा हा परिणाम ?

सारांश, सध्या तरी मागसलेला भासणारा चिनी समाज आमूलाग्र जागृत झालेला आहे. तो पूर्ण सामर्थ्याने व तेजाने जेव्हा चमकूं लागेल, तेव्हा कोठे तो भीतिदायक वाटण्याचा संभव; परंतु जपानचा विकास व चीनचा उदय ह्या दोन्ही अवश्यंभावी घटनांची पूर्ण कल्पना दूरदर्शी व कावेबाज श्वेतवर्णीयांना आगाऊच आलेली असल्याने त्यांनी 'चोराच्या उलटया बोंबा ' या न्यायाने ' पिवळ्या बागुलबोवाची ' बोंब मारण्यास फार पूर्वीच सुरुवात करून ठेविली आहे.

भारतीय समाजगट

परंतु बीजत:, तत्त्वत: व व्यवहारत: मागे वर्णिलेल्या सर्व समाजगटांपेक्षा निराळा असणाऱ्या भारतीय समाजगटाचा प्रश्नही निराळाच आहे. त्याच्या बीजभूत सामर्थ्याची आम्हांला नाही इतकी कल्पना श्वेतवर्णीयांना, त्यांतल्या त्यांत इंग्रजांना, नाही असें म्हणतां येत नाही. तथापि पाश्चिमात्यांच्या राजकीय व सामाजिक वाङ्मयांत तसेंच अलीकडे प्रामुख्याने पुढे आलेल्या किंवा उत्पन्न झालेल्या भौगोलिक राजनीतीच्या* (Geo-politics)

---

* कोणत्याही राष्ट्राचें राजनैतिक धोरण त्याच्या वांशिक व सांस्कृतिक किंवा ध्येयवादी विचार प्रणालिकेच्या आधारावर उभारल्यास तें जितकें निर्णायक व कार्यक्षम होतें, त्यापेक्षा जास्त निर्णायक व परिणामकारी भौगोलिक परिस्थितीच्या आधारावर उभारल्यास होतें. ही विचारसरणी गेल्या १०–१५ वर्षांत जर्मनींतूनच जास्त प्रामुख्याने पुढे आली आहे. जर्मनींत त्या संबंधीं एक विश्वविद्यालयवजा संस्था असून तिचा चालक डॉ.

(पुढील पानावर चालू)

वाङ्मयांत भारतीय बहुसंख्य हिंदी समाजगटाला स्थानच नाही,

(मागील पानावरून पुढे चालू)

हॉशॉफर (Haushofer) हा होता. जर्मनींत (1) Gietschrift fur Geo-politiks, (ii) Geopolitik; इटालींत Geopolitika Bulletins della Reale Secieta Geographica Italiana; स्वित्झर्लंडमध्ये Geopress; बाल्कन राष्ट्रांत Geografiska Vestnik हीं वरील विषयाला वाहिलेलीं मुख्य व भारदस्त नियतकालिकें असून Principles of Political Geography 1939 (Valkenburg) व The Earth & the state-1939 (Dr Whittlesey) हीं अमेरिकेंतील वरील विषयावरील अगदी अलीकडील सर्वमान्य व अधिकृत अशीं पुस्तकें आहेत. राष्ट्राराष्ट्रांच्या आक्रामक राजनैतिक धोरणाची सुंदर शास्त्रीय मीमांसा ' Proceedings of the Institute of World Affairs 1938-39' या अहवालामध्येही आहे. Dr. Haushofer ह्यांचें World Seas & World Power हें पुस्तक, जर्मनीच्या एतद्विषयाबद्दलच्या विचारसरणीचें उत्कृष्ट प्रतीक आहे. "Politische Geographie and Geopolitik" – *Walther Vogel* & Justus Perthus 1935 हा जर्मन ग्रंथ म्हणजे त्या विषयाचा अमरकोश आहे. "Geographic Aspects of International Relations", R. Hartshorn – Chicago University Press, 1938 हा पण या विषयावरील महत्त्वाचा ग्रंथ आहे. H. J. Mackinder ह्या इंग्रज भूगोलज्ञाचे Elementary Studies in Geography व Democratic Ideals and Reality (नवी आवृत्ति १९४२) हे दोन ग्रंथ या बाबतींतील इंग्रज भूमिकेचीं उत्कृष्ट प्रतीकें आहेत, एवढेंच नव्हे तर ते उदार धोरणाचे ग्रंथ आहेत. Spykman ह्या अमेरिकन ग्रंथकाराचा America's Strategy in the World Politics (1942) हा ग्रंथ अमेरिकन मनोवृत्तीचा अधिकृत मासला आहे. (1) Germany's Strategy of World Conquest : *Whittlesey*, Farar 1942, (2) The World of General Haushofer : *Dorpulen* 22, Farar 1942, (3) Ger-

(पुढील पानावर चालू)

इतिहासाच्या तौलनिक अभ्ययनावर जोर देणें हेंही तितकेंच अवश्य आहे.

वरील विचारसरणीबरोबर भारतीय समाजगट इतर समाजगटांमध्ये ज्या ठिकाणीं ठाण मांडून बसलेला आहे त्या परिस्थितीचेंही चित्र डोळ्यासमोर असणें इष्ट आहे. ती परिस्थिति अशी:— पूर्वबाजूस 'पिवळा बागुलबोवा' जागा होऊन हातपाय पसरूं पाहत आहे. त्यांतल्या त्यांत जागा झालेला, सुसंपन्न, जगांतील एक पंचमांश वस्ती असणारा, अर्धवट स्वतंत्र व यंत्रयुगीन सुधारणेची वाट चालणारा, चिवटांत चिवट, असा चीन धूर्तराष्ट्रांच्या जाळ्यांतून सुटूं पाहत आहे. पश्चिमेकडे स्वतंत्र, निम स्वतंत्र, यंत्रयुगीन सुधारणेचा गंध नसलेला तथापि तदुन्मुख परंतु कडव्या धार्मिक भावनांनी व बंधनांनी निगडित असलेला व म्हणून जिवंत वाटणारा इस्लामी समाजगट आणि त्याच्या पलीकडे पश्चिमेस धूर्त, कावेबाज, व आक्रामक अशा धर्मकारणाचा, राजकारणाचा व व्यवहारकारणाचा जागतिक सूत्रचालक असा ख्रिस्ती समाजगट बौद्ध, हिंदी व इस्लामी समाजगटरूपी कोणत्या डब्याला कसा, कोठे व केंव्हा 'शंट' करूं, याची प्रतीक्षा करीत एखाद्या धुरीण एंजीन ड्रायव्हरप्रमाणे ठाण मांडून बसलेला दृष्टीस पडतो. त्याच्याच बरोबर असेंही दृश्य दृष्टीस पडतें की बौद्ध समाजगटापैकी अति पूर्वेचा स्वतंत्र जपान ख्रिस्ती समाजगटाला प्रतितोड असा भासत असून तो चिनी समाजगटाला आपल्याकडे अथवा आपल्या पंखाखाली ओढूं पाहत आहे. तसेंच पश्चिमेच्या इस्लामी समाजगटांत जरी तुर्कीगट व अरबीगट असे दोन गट दिसत असले, तरी तेही ख्रिस्ती समाजगटाच्या जाळ्यांतून सुटूं पाहत आहेत. अशा या धकाधकीच्या मामल्यांत आमचा भारतीय समाजगट मध्येच सापडून चक्काचूर होतो, का पूर्व व पश्चिम या दोहोंचा

'बफर' बनून राहतो, का पूर्वेच्या समाजगटाला आपल्याकडे वेधून घेतो, का इस्लामी समाजगटावर आपटून विच्छिन्न होतो' का युक्तीने व संघटनेने व सुप्त सामर्थ्याच्या आविर्भावाने तीनही समाजगटांवर ताण करतो, हें सर्वभक्षक कालाच्या उदरांत दडलेलें असून तेथून तें किती लवकर बाहेर पडतें हें दिसावयाचें आहे.

प्रकरण सोळावें

उपसंहार

आतापर्यंत आपण प्राचीन व अर्वाचीन इतिहासांतील मुख्य च ठळक अशा राष्ट्रांच्या अथवा समाजगटांच्या जीवनक्रमाचें विहगावलोकन केलें. त्यावरून खालील गोष्टी ध्यानांत येतात: —

(अ) प्राचीन काळांत

(१) प्राचीन काळची भौतिक प्रगति अर्वाचीन काळाप्रमाणे प्रगल्भ नव्हती; म्हणून तत्कालीन राष्ट्रांची साम्राज्यांत होणारी वाढ मुख्यत: भौतिक परिस्थितीने मर्यादित झालेली होती;

(२) निरनिराळ्या साम्राज्यांत आर्थिक परस्परावलंबन नव्हतें;

(३) स्थलविस्तार हें साम्राज्यविस्ताराचें मुख्य लक्षण समजलें जात नसून संस्कृतिप्रसार हें साम्राज्यविस्ताराचें मुख्य माप व गमक समजलें जाई. पण,

(आ) अर्वाचीन काळांत

(१) भौतिक प्रगति फार प्रगल्भ झाली असल्याने भौतिक किंवा नैसर्गिक परिस्थितीचे अडथळे साम्राज्यविस्ताराला दुर्लंघ्य

वाटत नाहीत;

(२) भौतिक व शास्त्रीय प्रगतीमुळे व्यक्ति, समाज वा राष्ट्र ह्यांच्या गरजा वाढल्या व त्या भागविण्यासाठी आर्थिक चढाओढ, आर्थिक विषमता व त्यामुळे आर्थिक परस्परावलंबन ह्या गोष्टी वाढल्या;

(३) राष्ट्राच्या अथवा समाजगटाच्या जीवनांत भौतिक शास्त्रीय प्रगतीला प्रमुख स्थान मिळालें, त्यामुळे अर्थ व आर्थिक व्यवहार हेंच राष्ट्रीय जीवनाचें अंतिम साध्य होऊन बसलें;


(४) साम्राज्यतृष्णेचा जोरकस प्रवाह समर्थ समाजगटांच्या किंवा राष्ट्रांच्या जीवनस्रोतामधून धडाक्याने वाहूं लागला;

(५) सामर्थ्यवान राष्ट्रांमध्ये किंवा समाजगटांमध्ये कमालीची चुरस उत्पन्न झाली; युद्धें हा त्या चुरशीचा अपरिहार्य परिणाम झाला; तथापि साम्राज्यतृष्णा अपूर्णच राहिली;

(६) भौगोलिक व ऐतिहासिक दृष्टया मागसलेल्या समाजांची त्या समर्थ समाजगटांकडून स्वोद्दिष्टपूर्तीसाठी पायमल्ली झाली व होत आहे;

(७) 'समर्थतम प्राण्यवशेष' हें उत्क्रांतिवाद्यांचें तत्त्व जगांतील सर्व समाजांनी शिरोधार्य केलेलें दिसत आहे;

(८) झपाट्याच्या आर्थिक प्रगतीबरोबर पूर्वीचे राजकीय विभाग कृत्रिम वाटूं लागले आहेत. पूर्वीची स्वदेशभक्ति अपुरी वाटूं लागली आहे. आर्थिक परस्परावलंबनामुळे आर्थिक दृष्टया स्वयंपूर्णता हेंच राजकीय विभागांचें व स्वदेशभक्तीचें गमक होऊन बसलें आहे, व तदनुरूप साम्राज्यविस्तार आणि राष्ट्रांचे गट बनूं पाहत आहेत. यामुळे मानव्याचें उच्च ध्येय कोणत्याही राष्ट्रापुढे वा समाजगटापुढे राहिलें नाही.



ही आकृति इ. स. १९३९ च्या प्रारंभाचें दृश्य आहे. त्यानंतर दोस्त राष्ट्रांच्या स्वयंपूर्णतेंत [illegible]

राष्ट्रीय स्वयंपूर्णतेची अव्यवहार्य कल्पना

राष्ट्रीय स्वयंपूर्णता म्हणजे काय, याची स्थूल कल्पना मागील वर्णनांत दिलेली आहेच. उद्भिज्ज पदार्थ (जसें धान्यें), प्राणिज पदार्थ (जसें लोकर) व खनिज पदार्थ (जसें कोळसा) ही त्रिविध संपत्ति जगाच्या आर्थिक व्यवहाराचा मूळ घटक आहे. हे तीनही प्रकारचे पदार्थ प्रत्येक देशांत आहेतच असें नाही. कांही देशांत (जसें भारतवर्ष, आस्ट्रेलिया, अर्जेंटिना) कांही उद्भिज्ज व प्राणिज पदार्थ पुष्कळ आहेत, म्हणजे देशाच्या तत्कालीन गरजेपेक्षा जास्त आहेत, पण खनिज पदार्थ देशाच्या गरजेपेक्षा कमी आहेत. याच्या उलट, इंग्लंड, जर्मनी सारख्या देशांत मुख्यत: खनिज पदार्थ हीच राष्ट्रीय संपत्ति आहे व इतर दोन प्रकारचे पदार्थ फारच कमी आहेत. तर अमेरिका, रशिया ह्यांसारख्या कांही देशांत वरील सर्व पदार्थ राष्ट्राची गरज चांगल्या रीतीने भागेल इतके पुष्कळ आहेत. सारांश, सर्व देशांत वरील तीनही प्रकारच्या संपत्तीची वाटणी निसर्गानेच विषमतेने केलेली आहे, असें आढळतें. ज्या अर्थी ह्या तीनही प्रकारच्या पदार्थांची प्रत्येक देशाला आवश्यकता आहे, त्या अर्थी जरूर त्या पदार्थासाठी प्रत्येकाने दुसऱ्यावर अवलंबून असावें हाच निसर्गाचा हेतु आहे, असें स्पष्ट दिसतें. म्हणजे आर्थिक परस्परावलंबन हाच सुकर राष्ट्रीय जीवनाचा स्वाभाविक राजमार्ग आहे असें ठरतें. अर्थात् सर्व प्रकारच्या कच्च्या मालाच्या बाबतींत आपण अगदी स्वयंपूर्ण असावें अशी इच्छा करणें अगदी अव्यवहार्य आहे. तथापि साम्राज्यतृष्णेच्या जाळ्यांत सापडलेल्या समर्थ राष्ट्रांना सुलभ राष्ट्रीय जीवनाचा हा धोपटमार्ग नापसंत वाटतो. त्यांना जरूर असलेले पदार्थ ज्या देशांत असतील तो अथवा ते देश त्या पदार्थांच्या पुरवठ्यासाठी केवळ आपल्या एकट्याच्याच ताब्यांत असावा किंवा असावे असा अनिवार मोह

उत्पन्न होतो; आणि मग तें समर्थ राष्ट्र आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी किंवा त्या मोहाच्या समर्थनासाठी लोकसंख्यावाढीसारख्या अनेक सबबी पुढे करतें. किंबहुना वाढती लोकसंख्या हें राज्यविस्ताराचें, समाजगटांत लढाऊ वृत्ति उत्पन्न करण्याचें व साम्राज्यवादाच्या समर्थनाचें एक मुख्य साधन आहे व असतें.

आजचें जग डिमॉक्रसी, फॅसिझम व कम्युनिझम ह्या तीन प्रकारच्या राजकीय विचारप्रणालिकांच्या झगडयांत सापडलें आहे. डिमॉक्रसी ही जुनीच राजकीय विचारसरणी आहे. लोकसत्ता, राजप्रजासत्ता वगैरे निरनिराळ्या स्वरूपांत डिमॉक्रसी दिसते. ज्या भांडवलशाहीमुळे साम्राज्यतृष्णा वाढत असते, तें डिमॉक्रसीचें एक महत्त्वाचें अंग आहे. कम्युनिझम ही विचारसरणी नवीन असून ती जगांतील बहुजनसमाजाच्या गळीं उतरण्याला अद्यापि वेळ आहे व त्याला कारणेंही अनेक आहेत. पण फॅसिझम ही विचारसरणी जरी नवीन असली तरी ती एका दृष्टीने कम्युनिझम व डिमॉक्रसी ह्या दोहोंच्या मधील स्थिति असून तिचे अनुयायी सध्या तरी कम्युनिझमपेक्षा जास्त* आहेत. फॅसिस्ट पद्धतीच्या शासनपद्धतींतही भांडवलवाला समर्थ वर्ग असतोच. त्यालाही साम्राज्यतृष्णा असतेच. जर्मनी, इटाली, जपान, ह्या सध्याच्या जूट अथवा हुकुमशहाच्या राष्ट्रांची राष्ट्रीय स्वयंपूर्णतेसंबंधाची ओरड म्हणजे साम्राज्यतृष्णाच आहे, हें कसें तें मागे पाहिलेंच आहे. याचा अर्थ राष्ट्रीय स्वयंपूर्णतेसाठी धडपड म्हणजे साम्राज्यशाहीची नवीन नांवाखालील आवृत्ति असा आहे. ही नवीन आवृत्ति डिमॉक्रसीमधील भांडवलशाहीपेक्षा अधिक घातुक आहे. कारण डिमॉक्रसीमधील भांडवलवाल्यांचा एक कंपू असतो व तो आपल्या वजनाने व कारस्थानांनी राष्ट्रांतील शासक सत्तेचें धोरण कांहीं

* International Reference Service, N. York–1942.

अंशाने निश्चित करतो. पण फॅसिस्ट पद्धतीच्या राजवटींतील खुद्द शासक सत्ता हीच मोठ्या भांडवलशाही कंपूचें काम करते! स्टॅलिनचा कम्युनिझम प्रच्छन्न* स्वरूपाने तरी भांडवलशाही –अर्थात फॅसिस्ट पद्धतीपलीकडची–नाही असें नाही.

कसेंही असलें तरी वरील तीनही स्वरूपांच्या शासक सत्तांना परस्परांवर किंवा इतर स्वतंत्र देशांवर कोणत्या ना कोणत्या तरी कच्च्या अथवा पक्क्या मालासाठी अवलंबून राहावेंच लागतें. **सारांश, राष्ट्रीय स्वयंपूर्णतेची कल्पना अस्वाभाविक तर आहेच पण जुलमी व अव्यवहार्य आहे.**

सबळ व दुर्बळ समाजगट

कृषिप्रधान व धंदेप्रधान, मागसलेलीं व पुढारलेलीं, स्वतंत्र व परतंत्र, लहान व मोठीं, असें राष्ट्रांचें वर्गीकरण निरनिराळ्या तत्त्वांवर केलें जातें. समाजगटांची ही द्वंद्वात्मक स्थिति पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच रहाणार. तथापि भौतिकशास्त्रीय प्रगतीची पराकाष्ठा हेंच मानव्याचें अंतिम ध्येय आहे असें मानणाऱ्या समाजगटाप्रमाणे खऱ्या मानव्याचें अंतिम ध्येय त्या पराकाष्ठेपलीकडे असून तें आध्यात्मिक आहे असें मानणारे समाजगटही आहेत. भौतिक ध्येयवादी समाजगट मुख्यतः पश्चिमेकडे जास्त आहेत. अशा कांही समाजगटांचें राष्ट्रीय जीवन जरी दीर्घकालीन होतें तथापि जागतिक जीवनाच्या दृष्टीने विचार केल्यास ते समाजगट अल्पायुषीच झाले अशी साक्ष त्यांचा इतिहास देतो. अध्यात्म ध्येयवादी भारतीय समाजगटाचें राष्ट्रीय जीवन उपरिनिर्दिष्ट पाश्चिमात्य समाजगटापेक्षा जास्त दीर्घकालीन होतें तसेंच त्यांचें जागतिक

---

* Nakromandel and Comintern; Foreign Affairs–Oct. 1941.

जीवनही अल्पकालीन नसून दीर्घकालीन होतें व आहे असें त्यांचा इतिहास सांगतो. असें आहे, तथापि तें जीवन निस्तेज, निःसत्त्व व निरुपयोगी असें मात्र दिसतें. ह्याचें मुख्य कारण त्याने त्या अध्यात्मध्येयवादी जीवधारणेला अनिर्वाह्य उपयोगी व जरूर असलेल्या भौतिक ध्येयवादी स्थूलदेहधारणेकडे केलेलें अक्षम्य दुर्लक्ष हें होय, असें दिसतें.

दोस्त राष्ट्रें व त्यांचें ध्येय

दोस्त राष्ट्रांनी प्रारंभीं 'ॲटलँटिक चार्टर' मग 'पॅसिफिक चार्टर' इत्यादि रूपांनी आपल्या ध्येयांची सूत्ररूप मांडणी केली व प्रत्येक जण अजून ती करीत आहेत. सबब त्याचा सध्याच ऊहापोह करणें उतावळीचें आहे. तथापि दोस्त राष्ट्रांच्या युद्धानंतरच्या वैयक्तिक स्वरूपाची कल्पना असणें जरूर आहे व ती कल्पना येण्याइतके स्पष्ट डाव पडत आहेत; ते कसे व कोणते तें पाहूं.

भावी जगांत ब्रिटन

ब्रिटिश बेटें हें ब्रिटिश साम्राज्याचें-जगांतील सर्वांत मोठया अशा साम्राज्याचें-मूळ घर; पण या द्वितीययुद्धोत्तर कालांत तें निराळ्याच स्वरूपांत दिसण्याचे डाव पडत आहेत. ते असेः— स्वतंत्र आयर्लंडची त्रयस्थ तटस्थता; क्यानडा, द. आफ्रिकन संघ, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड ह्यांची पूर्ण स्वतंत्र होण्याची धडपड, ॲटलँटिक व पॅसिफिक चार्टरप्रमाणे भावी राजकारणांतील वाढतें वजन; क्यानडा व अमेरिका ह्यांतील भांडवलशाहीचें जमतें वाढतें सूत; ब्रिटिश भांडवलशाहीचा बदलून विनम्र होणारा नूर; त्याचप्रमाणें लंडन येथील शासक सत्ता साम्राज्याच्या मुख्य घटकांत कालपरत्वें फिरती राहावी असें वाटण्याइतका शासकसत्तेच्या

मनांत झालेला बदल, इत्यादि गोष्टी ब्रिटिश साम्राज्यसत्तेच्या भावी स्वरूपाची नांदी होणार, असें वाटतें.

भावी घडणींत अमेरिका

पश्चिम गोलार्धाच्या राज्यकारभारांत वाढणारें अमेरिकेचें प्रस्थ, इराणी आखातावरील व्यवहारकारणांत, तसेंच हिंदुस्थान व चीन ह्यांत, गुंतणाऱ्या अमेरिकन भांडवलाची वाढती कमान, जपानसंबंधाची अमेरिकेची वाढती तेढ, जगाच्या व्यापारांत अमेरिकेची वाढती पत, पण जागतिक राजकारणाची झळ युद्धोत्तर कालांत न लागेल तर बरें असें दाखविणारा अमेरिकन राष्ट्रीय मनाचा हलता काटा, ह्या व इतर अनेक गोष्टी अमेरिकेचें महत्त्व भावी कालांत फार वाढेल असें दाखवितात.

भावी जगांत रशिया

हें राष्ट्र अजून फार सावधगिरीने पावलें टाकीत आहे डिमॉक्रसीमधील भांडवलशाही सत्तेशीं आपलें कसें व कितपत जुळेल ह्याबद्दल अजूनही तो साशंक आहे. चर्चला मान्यता दर्शविणें; 'कॉमिंटर्न' बंद केल्याचें जाहीर करणें; आपल्या संघांतील घटकांना परराष्ट्रांशीं संधिही करण्याची परवानगी देणें; तेहेरान परिषदेंत इराणी आखातावरील राजकारणांत, अरबी-समुद्रावरील व परंपरेने हिंदीमहासागरांतील व्यवहारकारणांत श्रेष्ठ स्थान मिळवणें; जपानशीं केलेला अनाक्रमणाचा करार तसाच ठेवणें; उलट मासेमारी व तेलाचे हक्क ह्यांसंबंधीं वारंवार होणारे खटके बंद राहण्यासाठी जपानने रशियाशीं आपण होऊन मिळतें घेणें; इत्यादि डाव जागतिक राजकारणांत अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांमुळे रशिया जगांत सर्वश्रेष्ठ राष्ट्र होण्याचा डाव पडत आहे.

त्यामुळे रशियाची राजकीय सावधगिरी किंवा घुमेपणा दिसत आहे व डिमॉक्रेटिक शासक सत्तेकडे रशिया कसा साशंकतेने पहातो हें प्रत्ययास येत आहे. त्याचप्रमाणे रशिया हा यूरोपचाच नव्हे तर जगाचा 'लाल बावटा' तर होणार नाहीना अशीही भीति वाटते. त्याचबरोबर रशियाने आपल्या कर्तबगारीबद्दल, आपल्या शासन-प्रणालिकेबद्दल जगांत अत्यंत आदराचें स्थान पटकाविलें आहे. त्यामुळे जगांतील स्वातंत्र्योन्मुख समाजगटांच्या मनाला आपल्याकडे ओढून घेण्याची महनीय कामगिरी केली आहे असें म्हणावें लागतें.

समाप्त

परिशिष्ट पहिलें

लोकसंख्येची वाटणी

जगांत सुमारें दोन अब्ज लोक आहेत. ते ५६० लक्ष चौरस मेल प्रदेशावर पसरलेले आहेत. त्यांची राजकीय दृष्टया पुढे दिल्याप्रमाणे वाटणी झालेली आहे.*

—विभाग—	लोकसंख्या (लक्ष)
(अ) मुख्य सामर्थ्यवान सत्तांचे मूळ देश—ब्रिटिश बेटें, फ्रान्स, इटाली, जर्मनी, रशिया, अमेरिका व जपान या सात देशांत	५७६०
(आ) इतर स्वतंत्र पण महत्वाचे १३ देश ह्यांत	१६१०
(इ) वरील सात महाजनांच्या वजनाखालचे ३८ स्वतंत्र देश (त्यांत ५ ब्रिटिश डोमिनियन्सही आहेत.)	२३१०
(ई) तहादिकामुळे मर्यादित सत्ता असलेले देश-यांत सध्या जर्मनीने घेतलेले कांही देश आहेत-एकूण १७	४६६०
(उ) वसाहती, संरक्षित भाग, मँडेट्स वगैरे	६३१०

(या शेवटच्या सदराखाली ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, इटाली, जपान, हॉलंड, बेल्जम, पोर्तुगाल, स्पेन, डेन्मार्क, नॉर्वे ह्यांच्या ताब्यांतील देश येतात.)

राष्ट्रीय संपत्ति कोणती ?

पण लोकसंख्येच्या वाटणीचें महत्त्व लोकसंख्यावृद्धिशक्तीवर बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. कारण अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रांची

* हे आकडे इ. स. १९३८ अखेरचे व कांही १९३९ अखेरचे आहेत.

जशी झपाट्यानें वाढ झाली तशी त्याबरोबर त्यांची संहारकशक्ति पण वाढली आहे; यामुळे देशांतील लोकसंख्याबळ हें फार महत्त्वाचें वाटूं लागलें आहे. त्याशिवाय धंदेप्रधान व कृषिप्रधान ह्या दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांना मजूर व गिऱ्हाईक या दोन्ही दृष्टीनें देशांत लोकसंख्या जास्त असणें ओझें न वाटतां तिची अपरिहार्य आवश्यकता आहे, असें पण वाटूं लागलें आहे. अर्थात् देशांतील मनुष्यबळ ही एक राष्ट्रीय संपत्ति आहे असें म्हणावें लागतें; किंबहुना तीच सर्वांत महत्त्वाची राष्ट्रीय संपत्ति आहे.

लोकवस्ती व धंदेप्रधानत्व

एकोणिसाव्या शतकांत प्रथमतः युरोपांत धंदेप्रधानत्वाची लाट उठली. यंत्रयुगाचा प्रारंभ तेव्हापासून झाला असें म्हणतां येईल. या क्रांतीमुळे सर्व समाजांतही क्रांति झाली. समाजाच्या पूर्वीच्या घड्या विसकटल्या! ग्रेट ब्रिटन, बेल्जम, जर्मनी व स्वित्झर्लंड ह्या देशांत या दिशेनें प्रथम व झपाट्याची क्रांति झाली. ह्या देशांत सरासरीनें सुमारें शेंकडा ४० पेक्षा जास्त लोक धंदे कारखान्यांत गुंतलेले आहेत. याशिवाय आणखी बऱ्याच देशांत शेंकडा सुमारें २६–४० पर्यंत लोक धंदे कारखान्यांत गुंतलेले आहेत. अशा देशांचीही गणना धंदेप्रधान देशांत होते. ते देश, अमेरिका (यु. स्टे.), क्यानडा, फ्रान्स, इटाली, हॉलंड, ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हॅकिया, स्वीडन, नॉर्वे, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व रशियन राष्ट्रसंघ हे होत.

डेन्मार्क, फिन्लंड, लॅटविया, एस्टोनिया, पोलंड, हंगेरी ग्रीस, स्पेन, स्वतंत्र आयर्लंड, जपान, दक्षिण आफ्रिकन संघ, व चिली हे देशही धंदेप्रधान बनूं पाहत आहेत.

बाकीचे सर्व देश कृषिप्रधान आहेत.

लोकवस्तीचा विचार करतां, जगांत सुमारें दहा कोटि लोक धंदेकारखान्यांत गुंतलेले आहेत! ह्या दहा कोटींपैकी पांच कोटि वीस लक्ष लोक केवळ युरोपखंडांतीलच आहेत! व सुमारें दोन कोटि लोक उत्तर अमेरिकेंतील आहेत. आणि याच दोन्ही खंडांतील धंदेप्रधान समाज जगांतील कृषिप्रधान देशांवर राज्य करीत आहेत.

ह्या धंदेप्रधान समाजगटांचें अंतिम ध्येय जगत्साम्राज्य हें आहे. प्रस्तुतचें दुसरें महायुद्ध हा त्या घटनेंतील एक प्रवेश आहे. पण तें ध्येय साध्य होण्याच्या मार्गांत त्यांची आपापसांतील चुरस व कृषिप्रधान देशांची धंदेप्रधानत्वाकडील चढती कमान ह्या दोन मुख्य अडचणी आहेत!

जगांतील मनुष्यबळाची तुलना

राष्ट्रांतील लोकसंख्येचा वरील दृष्टीने विचार केला म्हणजे काय दिसतें तें पाहूं.

गेल्या १०।१९ वर्षांतील लोकसंख्यावाढीचा विचार करतां असें दिसतें की सर्व जगांत दरसाल सुमारें २३,७००,००० लोकसंख्येची वाढ होते; व ती वाढ पुढे दिलेल्या देशांत खालील प्रमाणांत होत असल्याचें आढळतें:—

देश	जगांतील वाढीपैकी टक्के
चीन	१६
ब्रिटिश भारत	१४–१९
रशियन राष्ट्रसंघ	१२
अमेरिका (यु. स्टे.)	६
ईस्ट इंडीज बेटें	६
जपान	४
ब्राझील	३
जर्मनी	२
पोलंड	२

त्याचप्रमाणे मुख्य सत्ताधारी राष्ट्रांच्या जननमरणाच्या नोंदीचा विचार करितां

(१) फ्रान्समध्ये दर हजारीं सुमारें एक, इतकीच जनन वाढ आहे (गेल्या ५०–६० वर्षांत).

(२) ग्रेट ब्रिटनमध्येही जवळ जवळ तीच स्थिति आहे.

(३) जर्मनी
(४) इटाली
(५) अमेरिका
(६) पोलंड
(७) जपान

ह्या सर्वांत वरील वाढीच्या कोठें दुप्पट तर कोठें तिप्पट जननवाढ, असें आढळतें.

(८) रशियांत मात्र सर्वांत जास्त जननवृद्धि असल्याचें आढळतें.

वरील दोन्ही गोष्टींचा विचार केला असतां

(१) राष्ट्राच्या आर्थिक दारिद्र्यामुळे अगर दुसऱ्या कोणत्याही सामाजिक वा राजकीय कारणामुळे राष्ट्रांतील मनुष्यबळ कमी करण्याचे प्रयत्न करणें हें किती अनुचित आहे हें दिसतें.

(२) धंदेप्रधान राष्ट्रांपेक्षा कृषिप्रधान राष्ट्रांतच लोकसंख्या जास्त असूनही जननप्रमाण जास्त आहे.

(३) जसजसें राष्ट्र जास्त धंदेप्रधान बनत जातें, तसतशी त्याची जननप्रगति वा लोकसंख्यावृद्धि स्थूल मानाने कमी होत जाते.

—इत्यादि अनुमानें निघतात व तीं **जनसंख्या ही एक मुख्य राष्ट्रीय संपत्ति आहे, ह्या दृष्टीने पाहतां फार महत्त्वाचीं आहेत असें म्हटल्याशिवाय राहवत नाही.**

परिशिष्ट २

कांही धार्मिक संख्याबळ

एकूण सर्व ख्रिस्ती	६७२,४००,०००	इ. स. १९३९ व १९४३ प्रमाणे
पुराणमतवादी } ख्रिस्ती	४८९,९००,०००	
नवमतवादी } ख्रिस्ती	२०६,९००,०००	
इस्लामी	४०९,०२०,०००	
कनफ्यूशस (व ताओ पंथी)	३५०,६००,०००	
हिंदू	२५४,८४०,०००	
बौद्ध	१९७,१८०,०००	
शिंतो (जपानी)	५२,०००,०००	

भाषाभाषीय संख्याबळ

इंग्रजी भाषाभाषी (अमेरिकेसह)	२२५,०००,०००	
चिनी	४७५,०००,०००	
हिंदी	२५०,०००,०००	(१९४१ प्रमाणे)
रशियन	१६०,०००,०००	
जपानी	९०,४००,०००	
स्पॅनिश	८०,१८९,०००	
जर्मन	८५,०००,०००	(इ. स. १९३९ पावेतों)
फ्रेंच	६[illegible],४१०,०००	
बंगाली	६१,३१०,०००	(१९४१ मधील)
पोर्तुगीज	४७,०००,०००	
जावानी	४२,०००,०००	
इटालियन	४१,०००,०००	
अरेबिक	२९,०२१,०००	

पुरवणी उपसंहार

युद्धसमाप्ती नंतरची* जगाची नवीन घडण

द्वितीय महायुद्धानंतरच्या जगाची घडण कशी असावी ह्याबद्दलची जूट राष्ट्रांची आखणी आपण प्रकरण पंधरामध्ये पाहिलीच आहे. पण दोस्त राष्ट्रांची जगाच्या भावी ठेवणीची आखणी अद्यापि पूर्ण स्वरूपांत प्रसिद्ध झाली नाही. तथापि पूर्वीच्या राष्ट्रसंघाप्रमाणे परंतु त्यापेक्षा जास्त व्यापक व आखणीने

---

* जगच्छांति व जगत्साम्राज्य ह्या संबंधाचा विचार प्रस्तुत महायुद्धापासून जितक्या प्रामुख्याने मुख्य राष्ट्रें करूं लागलीं आहेत तितक्या प्रामुख्याने 'अखिल जग'संबंधीचा विचार पूर्वीच्या काळीं तीं राष्ट्रें करूं लागलीं नव्हतीं. याचीं कारणें जशीं राजकीय परिस्थितींत आहेत, तशी झपाट्याने होणाऱ्या शास्त्रीय प्रगतींत आहेत. कसेंही असलें तरी जग व आपण एक आहों ही कल्पना या युद्धामुळे प्रामुख्याने पुढे आली; म्हणून त्या दिशेने मुख्यतः अमेरिकेंत जास्त जोराने प्रयत्न होत आहेत. (1) World Peace Foundation (2) Institute of Democracy and World Affairs. (3) The British American Council of World Government Organisation (London व New York) (4) United Nations Association (5) Citizens for Victory (6) American Free World Association (7) Fight for Freedom Asso. (8) United Nations Committee of Greater New York व (9) Americans United—ह्या संस्था वरील ध्येयाने काम करूं पाहत आहेत. त्यांना तृतीय महायुद्ध नको आहे. एवढेंच नव्हे तर मूलेकुठार घालून त्या विचारांचें उच्चाटन करावयाचें आहे (Free World Sept. 1944). व ह्यासाठी त्या संस्थांतील अनेक विद्वान व राजकारणी व्यक्ति भावी घडणीसंबंधाच्या कल्पना प्रसिद्ध करीत आहेत (संदर्भ पहा).

तरी कार्यक्षम असा 'संयुक्त राष्ट्रें' या नांवाचा एक राष्ट्रसंघ तयार व्हावयाचा आहे. त्यांत अमेरिका, ब्रिटन व रशिया हे तीन महाजन मुख्य असून जोडीला फ्रान्स व चीन हे देश आहेत. सध्या नाही तरी पुढे लायक झाल्यावर जर्मनी व जपान ह्यांचाही त्यांत समावेश होणार असें 'याल्टा'च्या बैठकींत धोरण ठेवलें होतें. पंच महाजन युद्धोत्तर जगाचे जणूं मालक 'ट्रस्टी' बनणार! त्यांच्या जोडीला इतर लहानमोठ्या राष्ट्रांचें एक सल्लागार मंडळ निवडलें जाणार! असें हें संयुक्त राष्ट्रसरकार जगाचें सर्वाधिकारी सरकार होणार! तें शक्य त्या उपायांनी जगांतील कोणत्याही राष्ट्राची व समाजगटांची आक्रामक वृत्ति दिसली तर ती नष्ट करणार. ह्या जागतिक सरकारचीं चार उपमंडळें असतील. तीं व त्यांचीं अपेक्षित कार्यक्षेत्रें पुढे दिल्याप्रमाणे राहतील.

विभाग	**कार्यक्षेत्र**
(१) संरक्षणविभाग (Security Council)	जगांतील सर्व सुसज्ज सैनिकांवर ताबा (भू-जल-वायु-दल)
(२) सामान्य मंडळ (General Assembly)	हें सर्व राष्ट्रांचें मंडळ सर्वसामान्य कामकाज पाहणार.
(३) राष्ट्रांतरीय न्यायसभा (International Court of Justice)	राष्ट्रांतरीय तंटे–राजकीय हद्दींचे, व्यापारांचे, कायदेकानूचे इ. इ.
(४) सेक्रेटरीएट	कार्यवाह कचेरी.

ह्यांशिवाय प्रत्येक मंडळाची कार्यपद्धति, कामाचें स्वरूप, उपाय-योजना इत्यादि बरीच माहिती प्रसिद्ध झाली आहे, पण तीही पूर्ण व कायमची नाही; तात्पुरती (tentative) आहे.

ही योजना अद्यापि सर्वमान्य व्हावयाची आहे. तसेंच रशियाही पूर्ण मोकळ्या मनाने वागत आहे असें दिसत नाही.

एवढेंच नव्हे तर ब्रिटन व अमेरिका ह्यांचें कम्युनिस्टांसंबंधाचें बेल्जम व फ्रान्स ह्यांतील विरुद्ध धोरण आणि चीनमधील कम्युनिस्टांतर्फे चँग कै शेकवर त्यांनी आणलेलें दडपण, हे दोन एकाच प्रश्नासंबंधाचे असंबद्ध राजकीय डाव* तसेंच इराणी तेलासंबंधाचें रशिया विरुद्ध ब्रिटन–अमेरिका असें पक्षभेदी कारस्थान, अरबी तेलाचा व नळाचा स्वतंत्र अमेरिकन परवाना, किंवा पूर्व युरोपांतील वाढत्या रशियन वजनाविरुद्ध काटशह म्हणून फ्रान्सचें वर्चस्व मध्ययुरोपांत वाढल्यास हरकत नाही अशाविषयीं फ्रान्सला ब्रिटनची थोडी मूकसंमति व थोडी सक्रिय सहानुभूति, किंवा डी गॉल-स्टॅलिन भेटीचा बनाव इत्यादि प्रसंग, ब्रिटन अमेरिका व रशिया हे तीन मुख्य दोस्त खांद्याला खांदा लावून कसून लढत असले तरी ते एकदिलानेच लढत आहेत किंवा प्रस्तुत युद्धानतर भावी जगांत पूर्ण शांतता, पूर्ण स्वातंत्र्य व निर्भेळ बंधुभावाचा आनंदीआनंद नांदावा ह्या उदात्त हेतूप्रीत्यर्थच लढत आहेत, याची खास साक्ष देतातच असें वाटत नाही. पूर्वी सांगितल्याप्रमाणें रशिया हा स्वतःला पूर्ण सुरक्षित व सज्ज राहतां यावें ह्या धोरणाने डाव टाकीत आहे. याल्टा बैठकींत रशिया, अमेरिका व ब्रिटन ह्यांचे सुद्धा गुप्त असे कांही करारमदार झाले व तेही पुढे युद्ध न व्हावें म्हणून. गोबेल्स लवकरच नवीन युद्ध होणार असें म्हणत असला, तरी तें होणें न होणें हें नवीन घडणींतील कार्यक्रमावर अवलंबून आहे. उलट प्रत्येकजण स्वार्थासाठी स्वमताने परस्परांशीं पेचप्रसंग करून झगडत असतां सर्वांच्या सामान्य शत्रूला नष्ट करण्यासाठीं लढत आहेत असें दृश्य दिसतें. दोस्तांचा विजय

* मंगोलिया व सिंक्यांग ह्या चीनच्या दोन भागांत रशियानेही असेंच दुटप्पी धोरण चीनविरुद्ध स्वीकारलें होतें त्याचा उल्लेख पृष्ठ १८९ व २५४ वर आलाच आहे.

खास होणार हें जरी स्पष्ट आहे तरी त्या विजयामुळे भावी जग निर्भेळ सुखी होईल असें नाही. याच्या उलट ब्रिटन अमेरिकेंतील लोकशाही-भांडवलशाही व रशियातील राष्ट्रीय मजूरसत्तेची संघटित निरंकुश सत्ताधारी भांडवलशाही ह्या तीन भांडवलशाही मिळून बनणारा एक गट हा 'फॅसिझमची एक विकसित आवृत्ति आहे' असें बर्नार्ड शॉ *१ सारख्यांना वाटत आहे.

कोणाच्या स्वातंत्र्यासाठी ?

वरील विचारसरणी बरोबर का चूक, ह्याचा विचार न करितां, लढणारीं राष्ट्रें व समाजगट कोणासाठी लढत आहेत हा प्रश्न विचारल्यास "आत्मनस्तु कामाय" हेंच उत्तर मिळतें. अगदी तात्पुरत्या व्यावहारिक भूमिकेवरून पाहतां शत्रुराष्ट्रें 'स्वत:ला स्वतंत्र व संपूर्ण समाधानी जीवन मिळावें म्हणून आम्ही झगडतों' असें सांगतात. शत्रुराष्ट्रें स्वहितासाठी दुबळ्या, लहान राष्ट्रांना गिळून आम्हां महाजनांवरही आक्रमण करितात; यामुळे स्वत:च्या व त्या लहान दुबळ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही लढतों असें दोस्त राष्ट्रें स्थूलमानाने सांगतात. ब्रिटन, रशिया व चीन हीं तीन महाराष्ट्रें त्यांवर शत्रूंनी प्रत्यक्ष आक्रमण केल्यामुळे लढतात; पण अमेरिका शत्रुराष्ट्रांच्या भावी आक्रामक कारस्थानांना हाणून पाडण्यासाठी, म्हणजे प्रथमत: स्वत:साठी व मग इतर दलित राष्ट्रांना स्वतंत्र करण्यासाठी लढते, असें सांगण्यांत येतें. ऑस्ट्रेलिया हा स्वत:साठी ब्रिटनच्या मदतीने लढतो. आपण अगदी स्वतंत्र व्हावें ही ऑस्ट्रेलियाची मनोवृत्ति आहे व तो आपल्या उपजीविकेला मदत करणारा आपल्याच हाडामांसाचा भाऊबंद आहे म्हणून ब्रिटन त्याला मदत करतो. क्यानडा

*1 Free Press Journal 10-10-44.

अमेरिकेप्रमाणे भावी भीतीने व ब्रिटनच्या रक्तानुसंबंधी संबंधामुळे लढूं लागला. दक्षिण आफ्रिकन संघ क्यानडाप्रमाणेच युद्धांत पडला. पण भारत? युद्धांत पडला तेव्हां अनाक्रमित होता. पुढे त्यावरही आक्रमण झालें, म्हणून तोही स्वस्वातंत्र्यासाठी लढत आहे, असें ओघानेच म्हणावें लागत आहे. पण त्याची राजकीय स्थिति ऑस्ट्रेलिया, क्यानडा वा दक्षिण आफ्रिका ह्यांपेक्षा अगदी निराळी असल्याने त्याला स्वतंत्रपणें लढतांच येत नाही. तथापि युद्धांत मात्र पडावेंच लागलें.

तयार* होत असलेले जगाच्या पुनर्वाटणीचे आराखडे

जगांत सुस्थिति नांदावी म्हणून जगाच्या पुनर्वाटणीचे आराखडे तयार होऊं लागले आहेत.* त्यांत उन्नतीचीं कांही आधारभूत तत्त्वें घेऊन त्या धोरणाने प्रादेशिक विभाग (Regions) पाडण्यांत येणार आहेत. अर्थात् हे विभाग अद्यापि पक्के नव्हत. त्यांत आफ्रिकेचे चार गट—वायव्य इस्लामी भाग अद्यापि अनिश्चित—नैऋत्य आशिया गट (इंडोचीन व ईस्टइंडीज), पॅसिफिक बेटें, क्यारेबियन गट इ० इ० गट हे अर्थात् परतंत्र वसाहतीचे झाले. यूरोपचे गट पडावयाचे आहेत. त्यांत आम्ही सुचविल्याप्रमाणे -हाइनगट वा -हूर—-हाइनगट तयार होत आहे. पण त्या मांडणींत भारताच्या तोंडाला अद्यापि पानेंच पुसलेलीं दिसतात! तो गटांच्या मोजमापांत बसण्याजोगा नाही एवढें मोघम म्हटलें आहे (P. 129 Fortune Oct. 1944). याचे अनेक अर्थ निघतात. संघटित होऊन आपलें दुःख आपण चवाठयावर ठेवण्यांतच आपलें हित आहे. जगांतील भावी शांतता स्वतंत्र भारतामुळेच राहणें शक्य आहे, हें जगाच्या निदर्शनास आणिलेंच पाहिजे.

* Half of One World – Fortune – Oct. 1944.

भारताचें जागतिक महत्त्व

युद्धोत्तर कालांत भारतवर्ष स्वतंत्रतेचा उपभोग घेणार असें आश्वासन ब्रिटन देतच आहे. पण तें स्वातंत्र्य कशा प्रकारचें— खरें खरें का मर्यादित ? व किती काळाने ? हा प्रश्न अद्यापि मोघमांतच आहे. तथापि स्वातंत्र्याची निश्चित घोषणा ब्रिटिशांकडून जाहीर झाली असतांनाही चर्चिल-स्टॅलिन भेटींत स्टॅलिनने भारतीय स्वातंत्र्याचा, तसेंच व्हाइस प्रेसिडेंट 'वॅलेस' ह्यांनीही तोच प्रश्न विचारावा हें घडलें तें कशासाठी ? ब्रिटिश साम्राज्यांतील इतर भागांसाटी तसा प्रश्न त्यांनी कां न विचारावा ? असाही प्रश्न मनांत येतो. ह्याचें समर्पक उत्तर जरी स्वतंत्र ग्रंथाशिवाय देतां येणें शक्य नाही, तथापि त्यांनी तो प्रश्न कां विचारला असावा, ह्याचें एका जागतिक दृष्टीने विचार केलेलें उत्तर दिग्दर्शित करतां येणें शक्य आहे, तें असें.

भारत हा भावी कालांतील विमानी, सागरी व व्यवहारीकारणांत हिंदीमहासागरावरील अत्यंत महत्त्वाचा – राजकीय, व्यापारी व यौद्धिक महत्त्वाचा - देश आहे. तो बऱ्याच अंशाने स्वयंपूर्ण होऊं शकेल. त्यांत जगांतील $\frac{1}{5}$ लोक राहतात. जनसंख्या ही एक अत्यंत महत्त्वाची—राजकीय, व्यापारी व यौद्धिक दृष्टया महत्त्वाची— राष्ट्रीय संपत्ति आहे. म्हणजे जगाची एकपंचमांश राष्ट्रीय संपत्ति भारतांत आहे. अमेरिका व क्यानडा ह्यांनी दोस्त राष्ट्रांना या युद्धांत जशी मदत केली, जवळ जवळ त्याच तोडीची मदत भारताने केली व तो करीत आहे. भारत ब्रिटिश साम्राज्याचा मेरुमणिच नव्हे तर प्राण आहे. दहापैकी नऊ ब्रिटिश लोक बऱ्याच बाबतींत भारतावलंबी आहेत. ब्रिटन, अमेरिका व रशिया, विशेषतः रशिया, यांना अगदी जवळची भारत ही मोठी व्यापारी पेठ आहे. आजच्या युद्धांत

चीनला जगवणें रशिया, अमेरिका व ब्रिटन ह्यांच्या दृष्टीने नितांत जरुरीचें आहे. त्याच्या जीवनाचे रज्जू भारताशींच निगडित आहेत. आग्नेय आशियाच्या भावी राजकारणांत व हिंदीमहासागरावरील भावी व्यवहारकारणांत भारताकडेच अग्रेसरत्व येणार आहे.

दोस्त राष्ट्रांच्या आर्थिक पार्श्वभागांत चहा, ताग, तेलबीजें (गळिताचीं धान्यें), लाकूड, अभ्रक, मंगल, लाख, प्राणिज पदार्थ ह्या बाबतींत सर्वांत जास्त उत्पादनाचें भाग्य भारतालाच लाभलेलें आहे व खाद्य धान्यें, कापूस, साखर, रबर ह्या बाबतींत दुय्यम प्रतीचें भाग्य लाभलें आहे. यामुळे पूर्वेच्या युद्धक्षेत्राला पोसणारा व तोंड देणारा खरा बालेकिल्ला भारतच आहे.

जपान व रशिया ह्या दोघांनाही राजकीय पायबंद देण्यासाठी ब्रिटन व अमेरिका ह्यांच्या दृष्टीने चीन जगणें-नव्हे स्वतंत्र राहणें-अत्यंत इष्ट आहे. (चीन दुबळा असेपावेतों तो 'बफरच' राहणार) पूर्व यूरोप व आशिया ह्यांच्या राजकारणांतील रशियाचें वाढतें वजन, ब्रिटन अमेरिकेला हवें आहे असें नाही; तसें जपानचें वाढतें प्रस्थही सर्वांनाच नको आहे. चँग काइशेकला चीनमधील भाईगट (कम्युनिस्ट) अगदी नकोसा असतांनाही त्याला त्याच्याशीं मिळतें घेण्याचा आग्रह ब्रिटन अमेरिका करीत आहेत. ह्यांतील रहस्य खालील गोष्टींत आहे.

कम्युनिस्टांच्या आपुलकीने वेळप्रसंगीं जपानला शह द्यावा. त्या योगाने चिनी जपानी लढा जोराने व लवकर निकालांत निघण्याचा संभव आहे. तसेंच रशियाला दुतोंडी लढाई पुकारावी लागल्यास अनायासें तोही खच्ची होऊन एका दगडाने दोन पक्षी मारल्याचें श्रेय साधल्यास बरें होईल, हाही ब्रिटनचा एक हेतु

नाही असें नाही. आणि ह्या सर्व गोष्टी साध्य होण्यासाठी भारताचें तात्कालिक महत्त्व फार आहे. तो लवकर स्वतंत्र झाल्यास ब्रिटनला धक्का बसेल. तथापि तो रशियाला जास्त उपयोगी वाटेल. आपल्या 'लाल' विचारसरणीच्या कक्षेंत भारतासारखें जगन्महत्त्वाचें सावज सापडल्यास अर्ध्या जगावर लाल बावटा लावूं शकल्याचा आनंद रशियाला होणार आहे (भारत तसा लाल होण्यास लायक आहे किंवा नाही, तसेंच तयार आहे किंवा नाही, आणि ती विचारसरणी भारतीय संस्कृतीच्या गळीं कायमची उतरेल किंवा नाही वगैरे विचार ह्या ठिकाणीं अप्रस्तुत आहेत.) सारांश, भारताच्या स्वातंत्र्याची आठवण होणाऱ्या महाजनांच्या मनःफलकांवर कोणत्या दृष्टीचे 'रेकॉर्डस' उठत असतील, ही एक तिऱ्हाइती विचारसरणी झाली.

भारत स्वतंत्र होण्यांत ब्रिटिश भांडवलशाहीचें मरण आहे असें तिला वाटतें. पण तें अदूरदर्शित्वाचें, संकुचित दृष्टीचें व स्वातंत्र्याच्या ढोंगी कळवळ्याचें निदर्शक आहे. अखंड भारता-विरुद्ध इस्लामी भारत (पाकिस्तान), संस्थानी भारत* (संस्थानि-स्तान-प्रिन्सिस्तान) वगैरे प्रयत्न स्वतंत्र भारताच्या मार्गांतील काटे आहेत. ऐतिहासिक मागासलेपणा टाकणें व 'भारती तितुका मेळवावा' अशी सुसंघटना करणें, त्यासाठी राष्ट्रीय शिक्षण योजना, धंदेवर्ती प्रवृत्ति, परदेशगमनप्रीति, परदेश प्रचार इत्यादि गोष्टी करणें हें काम जितक्या लवकर होईल तितका आत्मोद्धार जवळ. 'उद्धरेदात्मनात्मानम्' हेंच खरें.

---

* Nuffield Report – The Constitutional Problem of India – Oxford.

कांही संदर्भ ग्रंथ

GEO - POLITICS

American

1. *Issiah Bowman* : The New World - Problems in Political Geography, Harrap, London, 1929.
   फार महाग–राजकीय गुंतागुंतीचा खंडवार विचार करणारा ग्रंथ.
2. *Volkenburg* : Elements of Political Geography, Prentice Hall & Co., N. York, 1939.
   राजकीय भूवर्णनाचीं तत्त्वें देशादेशांना लावून दाखविणारा असा एक अधिकृत ग्रंथ.
3. *D. Whittlessey* : The Earth and the State - A Study of Political Geography, Henry Holt, New York, 1939.
   महाग, पण उत्कृष्ट असा अधिकृत ग्रंथ.
4. *R. Peattie Stewart* : Geography in Human Destiny, New York, 1941.
   महाग–कॉलेजच्या उपयोगाचा ग्रंथ.
5. *Peter Viereck* : Metapolitics, Knopf, New York, 1941.
   नाझी तत्त्वज्ञान व पक्ष ह्यांचें ऐतिहासिक व मानसशास्त्रदृष्ट्या विवेचन करणारा उत्कृष्ट ग्रंथ.
6. *S. W. Boggs* : International Boundaries, Columbia Uni. Press, New York, 1940.
   राजकीय सरहद्दींचा राजनैतिक शास्त्राप्रमाणें विचार करणारा ग्रंथ.
7. *Hans W. Weigert* : German Geopolitics, Oxford University Press, 1942.
   त्रोटक वर्णन देणारें हस्तपत्रक.
8. *Johannes Mattern* : Geopolitik - Doctrine of Self-sufficiency and Empire, John Hopkins, 1942.
   स्वस्त–जर्मनी व इतर देश ह्यांतील राजनैतिक भूवर्णनाच्या कल्पना देणारें पुस्तक.

9. *Andreas Dorpalen* : The World of General Haushofer, Farrar, 1942.

डॉ. हॉशॉफरच्या तत्त्वज्ञानाची कल्पना देणारा ग्रंथ.

10. *Derwent Whittlessey* : German strategy of World Conquest, Farrar, 1942.

जर्मनीच्या राजनैतिक ध्येयाचें अंतरंग उघड करून दाखविणारा, अनेक आकृति, नकाशे व त्या विषयावरील तज्ज्ञांचे अनेक संदर्भ देणारा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ.

11. *N. Spykman* : America's Strategy in World Politics, 1942.

अमेरिकन 'जीओपॉलिटिक्स' संबंधाचा उत्कृष्ट ग्रंथ.

12. *Hans W. Weigert* : Generals and Geographers, 1942.

'मला काय त्याचें' ह्या अमेरिकन ध्येयाला लगाम घालून उलट अमेरिकेच्या वाढत्या जबाबदारीची जाणीव देणारा ग्रंथ.

13. *J. Borkin and C. A. Welsh* : Germany's Master Plan, Duell, 1943.

जर्मनीच्या धंदेविषयक 'जिओपॉलिटिक्स'ला चवाठ्यावर आणणारा ग्रंथ.

ENGLISH

14. *Fairgrieve* : Geography and the World Power, London University Press, London, 1917.

राजनैतिक भूवर्णनाचा स्थूल विचार करणारा ग्रंथ.

15. *J. F. Horrabin* : Geography of the War, Gollancz, London, 1942.

स्वस्त–दुसऱ्या महायुद्धाच्या कारणांचा भौगोलिक दृष्ट्या विचार करणारा सुंदर ग्रंथ.

16. *Sir Halford McKinder* : Democratic Ideals and Reality, Penguin and Holt, New York, 1942.

स्वस्त–'जिओपॉलिटिक्स' ह्या विषयांतील तज्ज्ञ अशा इंग्रज माणसाचा सर्वोत्कृष्ट व अधिकृत असा ग्रंथ.

FRENCH

17. *H. Angel* : Geographie Des Frontiers, Gallimard, Paris, 1938.

सरहद्दीचा राजनैतिक भूगोल.

GERMAN

18. *K. Haushofer* : Geo-politics of the Pacific Ocean (Geo-Politik Des Pazifischen Ozeans, 3rd edition, Vowinkel, Berlin, 1938.

विशेषतः युरोप आशियाच्या भावी राजकारणाचा व राजनैतिक भूवर्णनशास्त्राचा जर्मनींतील वेदप्रमाण ग्रंथ. जास्त माहितीसाठी पृ. २९७ वरील टीप पहा.

GENERAL & ECONOMIC

AMERICAN

19. *Simonds and Emeny Brooks* : The Great Powers in World Politics, American Book Co., 1933.

राष्ट्राराष्ट्रांचे आर्थिक व राजकीय डावपेच विशद करणारा ग्रंथ.

20. *Leith* : World Minerals and World Politics, N. York, 1933.

धंदेप्रधान राष्ट्रांपैकी मुख्यतः अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स यांजकडून जगांतील मुख्य खनिज पदार्थ आपल्याच ताब्यांत रहावे यासाठी करण्यांत येत असलेल्या आर्थिक व राजकीय डावपेचांचा इतिहास. थोडक्यांत उत्तम.

21. *Hughes* : Background of International Relations, John Willy & ons, New York, 1933.

जागतिक राजकारणाच्या निरनिराळ्या अंगोपांगांचा तात्त्विक विचार करणारा महाग ग्रंथ.

22. *G. Clerk* : Balance-Sheet of Imperialism, N. York, 1936.

जगांतील भांडवलशाहीवाल्या राष्ट्रांच्या साम्राज्यकारभाराचा उत्तम आढावा देणारा ग्रंथ.

23. *S. N. Agnek* : Raw Materials, Population and War, World Peace Foundations, New York, 1936.

कच्चा माल, लोकसंख्यावाढ, व युद्ध ह्यांचा साधक बाधक प्रमाणांनी विचार करणार महाग पुस्तक.

24. *E. Stanley* : Raw Materials in Peace and War, Council of Foriegn Relations, New York, 1937.

उद्योगधंद्याला लागणाऱ्या पदार्थांच्या मालकीचा व त्याच्या परिणामांचा ऊहापोह करणारा उत्कृष्ट अमेरिकन ग्रंथ.

25. *Bienstock* : Struggle for the Pacific, Allen & Unwin, 1937.
पॅसिफिक महासागरावरील राष्ट्रांना आपल्या पंजाखाली ठेवण्यासाठी चाललेल्या युरोपियन राष्ट्रांच्या धडपडीचा रहस्यमय इतिहास.

26. *John Gunther* : Inside Asia, Harper, New York, 1939.
महाग. सदोष पण थोडक्यांत नवीन दृष्टिकोनाचा ग्रंथ. १९४१ च्या आवृत्तींत बरीच नवीन माहिती आहे.

27. Proceedings of the Institute of World Affairs, Vols. II & III, 1939.
फार महाग. पण जगांतील मुख्य पांच राष्ट्रांच्या भौगोलिक आकांक्षा व त्याला अनुकूल प्रतिकूल गोष्टी ह्यांची साग्र हकीगत देणारा ग्रंथ.

28. *W. H. Hoas* : The American Empire, University of Chicago, 1940.
स्वस्त. अमेरिकन साम्राज्याचा दृष्टिकोन.

29. *E. E. Scudder-Thomas* : Monroe Doctrine and the World Peace, Nelson, 1940.
स्वस्त. अमेरिकेच्या मन्रो मताप्रमाणें जगाचें अवलोकन.

30. *John Gunther* : Inside Europe, Hamish Hamilton, 1941.

31. *H. C. Wolfe* : The Imperial Soviets, Double Day, N. York, 1940.
रशियाचीही भांडवलशाही दृष्टि आहे ह्या दृष्टीने ऊहापोह करणारा ग्रंथ.

32. *Herbert Feis* : The Changing Pattern of International Economic Affairs, Harper Bros., 1940.
महाग. जगाच्या आर्थिक गुंतागुंती व त्यांची नवीन घडण याचा निःपक्षपाती ऊहापोह करणारा ग्रंथ.

33. *A. R. Chandlier* : The Clash of Political Ideals, Appleton Century, New York, 1940.
महाग. जगांतील निरनिराळ्या राजकीय ध्येयप्रणालिकांचा ऊहापोह.

34. *Alberton Viton* : British Empire in Transition, N. York, 1940.
ब्रिटिश साम्राज्याच्या संक्रमणावस्थेंतील गुणदोषांचें निःपक्षपाती विशदीकरण करणारा ग्रंथ.

35. *H. V. Morton* : Middle East, Dodd Mead, 1941.
इराणी आखात व पूर्व भूमध्यसमुद्र ह्यांवरील देशांचा मुख्यतः राजनैतिक दृष्ट्या विचार करणारा ग्रंथ.

36. *Van Nostrand* : Contemporary Europe, New York, 1941.
फार महाग. प्रथम महायुद्धोत्तरच्या युरोपच्या राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक घडामोडीचें फार स्पष्ट व निःपक्षपाती चित्र रेखाटणारा ग्रंथ.

37. *Claud A. Buss* : War and Diplomacy in the Far East, The Mac-Millan & Co., New York, 1941.

38. *Pelzar J. Kart* : Economic Survey of the Pacific Area, P. R., 1941-42.
महाग. पॅसिफिक महासागरावरील महत्त्वाच्या सर्व राष्ट्रांसंबंधीं व्यवस्थित, निःपक्षपाती, साधार पण अधिकृत अशा माहितीचें पुस्तक.

39. *W. Wilkie* : One World, Knopf, New York, 1943.
परतंत्र राष्ट्रांसंबंधीं प्रसिद्ध अमेरिकन माणसाचें स्वतंत्र मतप्रदर्शन.

English

40. *E. C. Eckel* : Coal, Iron and War, Harrap, London, 1932.
स्वस्त. कोळसा व लोखंड ह्यांना ताब्यांत ठेवण्यासाठी चाललेली राष्ट्रांची धडपड वर्णन करणारा ग्रंथ.

41. *Oxford* : British Empire-Its Structure & Problems, London, 1937.
ब्रिटिश साम्राज्याची घटना व गुंतागुंती ह्यांचा ऊहापोह करणारा ग्रंथ.

42. *Barbara Ward* : International Share-Out, Thomas Nelson, 1938.
पहिल्या महायुद्धानंतरच्या जगाच्या वाटणीचा राजकीय व आर्थिक दृष्ट्या साधक बाधक प्रमाणें देऊन केलेला उत्कृष्ट ऊहापोह. फार स्वस्त.

43. *W. G. Moore* : Geography of Capitalism, V. C. Gollancz, London, 1938.
भांडवलशाहीच्या कारस्थानांचें दिग्दर्शन. स्पष्ट, सडेतोड व स्वस्त.

44. *Elizabeth Monroe* : The Mediterranean in Politics, Oxford University Press, 1939.
भूमध्यसमुद्रासभोवतालच्या सर्व देशांच्या राजकारणावरील उत्कृष्ट ग्रंथ.

45. *Royal Institute of International Affairs* : China & Japan, 2nd Edition, London, 1339.
स्वस्त. थोडक्यांत बव्हंशीं निःपक्षपाती चीनजपानची माहिती.

46. *G. H. T. Kimble* : World's Open Spaces, Thomas Nelson & Co., London, 1939.
स्वस्त. जगांतील कमी वस्तीच्या पण वसाहतीयोग्य अशा भूभागांतील

स्थिति व सुधारलेल्या पाश्चिमात्यांचा त्या संबंधाचा अभिलाषी दृष्टिकोन ह्याचें स्पष्ट वर्णन करणारा ग्रंथ.

47. *H. G. Wells*: Fate of Homo Sapiens, Secker Warburg, London, 1939.

स्वस्त. जगांतील मुख्य जातीय घटकांचें भवितव्य सांगणारा ग्रंथ.

48. *J. F. Horrabin*: Out-line of Economic Geography, N. C. L. C. Publishing Co., London, 1934 & 1942.

जगाच्या आर्थिक भूवर्णनाचें थोडक्यांत उत्तम चित्र देणारा ग्रंथ.

FRENCH

49. *P. L. D. La Trameryé and C. L. Leese*: World Struggle for Oil, Allen & Unwin, London, 1938.

महाग पण सविस्तर, साधार अशी तेल, त्याचें उत्पादन, व्यापार आणि ताबा, तसेंच त्यासाठी राजकीय डावपेच, ह्यांची माहिती देणारा ग्रंथ.

GERMAN

50. *Herman Kranold*: International Distribution of Raw Materials, Routeledge, London, 1938.

युद्धोपयोगी कच्च्या मालाची वाटणी, उत्पादन व ताबा यांचा स्थूल विचार करणारा ग्रंथ.

51. *H. Rauschning*: Redemption of Democracy, 1941.

जूट राष्ट्रांविरुद्ध दोस्त राष्ट्रांनी काय करावें, तसेंच त्यांचे दोष ह्यांचा खल करणारा जर्मन अधिकारी व्यक्तीचा महाग असा ग्रंथ. ह्या ग्रंथकाराचे अनेक उत्कृष्ट ग्रंथ आहेत.

CANADIAN

52. *John McCornak*: America and World Mastery, Duell, New York, 1942.

महाग. अँग्लो सॅक्सन, विशेषतः ब्रिटन-अमेरिका, ह्या राष्ट्रांच्या गट्टीचें भवितव्य, दर्जा, ह्यांचें फार मार्मिक विवरण करणारा ग्रंथ.

WELSH

53. *Maurice Edelman*: How Russia Prepared - U. S. S. R. Beyond the Urals, Penguin, 1942.

अति स्वस्त. रशियाची सैबेरियांतील तयारी कशी आहे हें सांगणारा उत्तम ग्रंथ.

POLISH

54. *Stoyan Prebichevich* : Living Space - Story of S. E. Europe, Heinemann, London, 1940.

आग्नेय युरोपांतील राजकीय गुंतागुंतीवर, तसेंच जर्मनी, रशिया व ब्रिटन ह्यांचें त्या विभागांतील धोरण ह्यांवर प्रकाश पाडणारा उत्कृष्ट ग्रंथ.

JAPANESE

55. Japan Surveys European War, The Tokyo Club, 1940.

युरोपांतील युद्धाकडे पाहण्याचा जपानी दृष्टिकोन.

INDIAN

56. *K. M. Panikkar* : Future of S. E. Asia, Allen & Unwin, 1943.

आग्नेय आशियाच्या म्हणजे जगांतील अर्धी लोकवस्ती असणाऱ्या भागाच्या राजकीय भवितव्यांचा तज्ज्ञ व अधिकृत अशा हिंदी माणसाने केलेला स्वतंत्र विचार मांडणारा ग्रंथ.

POST WAR WORLD

AMERICAN

57. *N. Doman* : Coming Age of world control, Stanley Paul & Co. 1941.

महाग. जगांतील सर्व समाजगट नवीन घडणीच्या लोटयांत कसे सापडले आहेत हें स्पष्ट करणारा ग्रंथ.

58. *Geo Renner* : Global Geography, Crowell & Co., New York, 1944.

प्रस्तुत युद्धांतील उदाहरणें घेऊन भावी राजकारणांचा संबंध दाखविणारें सर्व राजकीय भूवर्णन.

59. *H. D. Falon* : Coming Struggle for World Government Oklahoma Uni. 1944.

युद्धोत्तर कालांत सुस्थिति प्राप्त व्हावी म्हणून ज्या आर्थिक, सामाजिक व राजकीय उपादानकारणांची जरूरी आहे त्यांची उत्कृष्ट छाननी करणारें, उत्तम नवीन नकाशे व आकृति असणारें पुस्तक.

60. *Andre Visson* : The Coming Struggle for Peace. Viking Press, New York, 1944.
दोस्त राष्ट्रांची आपसांतील राजकीय व व्यापारी ‘ रस्सीखेंच ’ स्पष्ट शब्दांत सांगणारा महाग ग्रंथ.

ENGLISH

61. *H. G. Wells* : Guide to the New World. V. C. Gollancz,1941.
स्वस्त. जागतिक क्रांतीच्या सर्व अंगोपांगांचा विधायक रीत्या विचार करणारें पुस्तक. भारत व ब्रिटन ह्यांचीं भावी दृश्यें मार्मिक आहेत.

62. *G. D. H. Cole* : Great Britain in the Post War World. Gollancz, 1942.
भावी काळांत ब्रिटनला आमूलाग्र कसें बदलावें लागणार, ह्याचा साधकबाधक विचार करणारा स्वस्त ग्रंथ.

63. *G. D. H. Cole* : Europe, Russia and the Future, Gollancz. 1941.
स्वस्त. रशियाचें जड पारडें, यूरोपची स्थिति व भवितव्य ह्यांचें उत्कृष्ट निःपक्षपाती विवरण करणारा ग्रंथ. प्रत्येकाने वाचावा.

64. *E. Culbertson* : Summary of the World Federation Plan. Faber & Faber, 1944.
भावी जगाची राजकीय घडी कशी असावी ह्याची थोडक्यांत रूपरेषा. महाग.

65. *Pring Beryl* : Education, Capitalist & Socialist. Methuen & Co. 1937 & 1942.
महाग. भांडवलशाही व समाजसत्तावादी विचारप्रणालिका व तिने राष्ट्रीय मतांचें केलेलें परिवर्तन ह्यांची तुलना करणारा उत्कृष्ट ग्रंथ.

66. *H. N. Brailsford* : Our Settlement with Germany. Penguin, 1944.
युद्धोत्तर जर्मनीचा विचार करतांना येणाऱ्या अडचणी व विचारणीय गोष्टी ह्यांची माहिती देणारें उत्तम पुस्तक.

67. *Duncan and Wilson* : Federation and World Order. Thomas Nelson, 1940.
स्वस्त. ब्रिटन व अमेरिका ह्यांतील प्रत्यक्ष अनुभवावरून भावी “जागतिक राष्ट्रसंघा”च्या स्वरूपाची रूपरेषा देऊन छाननी करणारा ग्रंथ.

69. *Duncan and Wilson* : Federation and World Order, Thomas Nelson, 1940.

स्वस्त. ब्रिटन व अमेरीका ह्यांतील प्रत्यक्ष अनुभवावरून भावी "जागतिक राष्ट्रसंघा"च्या स्वरूपाची रूपरेषा देऊन छाननी करणारा ग्रंथ.

70. *W. Padley* : The Economic Problem. of the Peace, Gollancz, 1945.

समाजसत्तावादी राजसत्ता पुढे यावी ह्या मताचा पुरस्कार करणारा ग्रंथ.

71. *Royal Institute of International Affairs* : The International Secretariet of the Future, 1944

जुन्या राष्ट्रसंघांतील कामाच्या अनुभवावरून भावी राष्ट्रांतरीय राष्ट्रसंघाच्या घटनेची व्यावहारिक मांडणी करणारा ग्रंथ.

ENGLISH AND INDIAN

72. *Broader and Datta* : The Meaning of Teheran, Peoples Publishing House, Bombay, 1944.

स्वस्त. तेहेरान परिषदेचें महत्त्व व परिणाम उघड करणारी पुस्तिका.

AFRICAN

73. *W. A. Hutt* : Plan for Reconstruction, Kegan Paul, London, 1944.

फार महाग. चालू युद्ध लवकर जिंकण्याचे उपाय व जागतिक शांतता प्रस्थापनेचे मार्ग ह्यांचें व्यावहारिक विधायक विवरण करणारा ग्रंथ.

GENERAL & ECONOMIC

AMERICA

74. *Hailey* : The Future of Colonial Peoples, Princolon University Press, 1944.

परतंत्र व वसाहतींतील लोकांच्या राजकीय जीवनाचा नवीन जागतिक दृष्टीने विचार करणारा ग्रंथ.

75. *Welles Summer* : The Time for Decision, Harper Bros, 1944

जगावरील प्रत्येक देशाला स्वातंत्र्य मिळावें. अमेरिकेने आपल्या गोलार्धाकडे विशेष लक्ष द्यावें असें प्रतिपादणारा, अधिकृत राजकारणी माणसाच्या लेखणींतून उतरलेला, गेल्या २५–३० वर्षांतील राजकारणांचा इतिहास-ग्रंथ. महाग.

GEO-POLITICS

6. *R. H. Fiefield* : Geo-Politics in Principles and Practical, Ginn & Co., 1944.

या शास्त्राचें कॉलेजासाठी उत्तम क्रमिक पुस्तक.

77. *Spykman* : Geography of Peace, Harcourt Bracal, 1944.

राष्ट्राराष्ट्रांची राष्ट्रीय संपत्ति—उद्भिज्ज, खनिज, प्राणिज, त्यामुळे त्यांचें परस्परावलंबन, त्यामागील राजकारणाचीं जाळीं ह्यांचें विशदीकरण करणारा महाग ग्रंथ. पुष्कळ उत्तम नकाशे.

AMERICAN

78. *R. H. Fitz Gibon* : Globul Politics, Berkeley, University of California, 1944.

जागतिक राजकारणांचा विचार करणारें तात्त्विक पुस्तक.

79. *Weigert* : Stifansson, Ccmpass of tbe World, The McMillon, New York, 1944.

भावी कालांतील विमानवाहतुकीच्या जगांत राजकीय व आर्थिक तसेंच यौद्धिक दृष्टया महत्त्वाचीं राष्ट्रें व नाकीं, तसेंच विषुववृत्ताच्या उत्तरेकडील राष्ट्रांचें महत्त्व, झगडयांचीं स्थळें ह्यांचें सुंदर चित्र रेखाटणारा ग्रंथ.

MAGAZINES

MONTHLIES

1. News Maps,-Geographical Publishing Co.
2. Geo-Press, Geneva.
3. Pan-Pacific, New York.
4. International Affairs and Bulletins, London.
5. Contemporary Japa n, Tokio.
6. Contemporary Russia, Moscow.
7. Asia & The Americas, New York.
8. Far Eastern Survey, New York.
9. Amrasia, New York.

10. Contemporary Review, London.
11. Eastern Asia Survey, Tokio.
12. Trans-Pacific, New York.
13. China Today, Shanghai.
14. Population Index, New York.
15. Inter-Allied Review, New York.
16. Free World, N. York.
17. International Reference Service, New York.
18. International Literature, Moscow.

QUARTERLIES

19. Foreign Affairs, N. York.
20. Geographical Review, American Geographical Society, New York.
21. Pacific Affairs, New York.
22. Political Science Quarterly, New York.
23. Far Eastern Review, New York.
24. Soviet Union Quarterly, New York.
25. Far Eastern Quarterly, New York.

BI-MONTHLY

26. Austral-Asiatic Bulletin, Melbourne.

ATLASES & REFERENCE

1. Atlas of Far Eastern Politics - Hudson & Rajchman. Faber and Faber & Co., 1942.
2. Atlas of to-day & tomorrow-A. Rado & Rajchman. V. C. Gollancz, 1938.
3. Serial Map Service :-- Begun from 1939.
4. Atlas of Current Affairs (News Maps), J. F. Horrabin. 3rd Edition, V. C. Gollancz, 1939.
5. Atlas of European History, J. F. Horrabin. V. C. Gollancz, 1938.
6. How Empires Grow - J. F. Horrabin, N. C. L. C., London. 1936.

7. An Atlas of Empire - J. F. Horrabin, V. C. Gollancz, London, 1937.
8. Environment & Conflict in Europe - American Geographical Society, New York, 2nd Edition, 1940.
9. Atlas of World Review - Clifford McFaden, T. Y. Crowell, New York, 1940.
10. World Almanac - New York, 1940.
11. Statesman's Year Book, 1939.
12. Soviet Union Year Book, 1939.
13. Global War - An Atlas of World Strategy - Mowrer & Rajchman, Faber & Faber, 1942.
14. Look at the World-R. C. Harrison, Knopf, 1944.
15. Atlas of Global Geography-E. Raisz, Harper, 1944.

सूची

(महत्त्वाचे विषय जाडया टाइपांत)

अ

अटलांटिक महासागर, ४
अथेन्स, १८
अफगाणिस्थान, १३६
अफूचें युद्ध, ८३
अबिसीनिया, १५१
अमेरिका, ४,५०,
अमेरिकन वसाहती, ६६
अरबांचा प्रश्न, २४५
अरबी संस्कृति, २१
अर्जेंटिना, ६९, १११, २०९, २१०
अलेक्झांडर, १८
अलेक्झांड्रिया, १८
अल्बेनिया, १५१,१५३
अल्सास, १६७
असीरियन्स, ११
असंतुष्ट राष्ट्रें, ४७, २१६, २२०
अँटिओक, १८
ॲमस्टरडॅम, १८

आ

आग्नेय आशिया, ७२,८०,८७
आग्नेय आशियांतील राजकारण, ८६,११०
आझरबाइजान, २४४
आफ्रिका–अज्ञातखंड, ३३
आयर्लंड, ९२, ९३
आर्मीनिया, १९
आशिया मायनर, १६३
ऑस्ट्रेलिया, १११,१९८,२१८,२१९
ऑस्ट्रिया, १५६,१५७,१६०,२०९, २४९

इ

इराक, ११
इराण, ११
इरिथ्रिया, १५१,१५७
इस्तंबूल, २१
इंडोचीनची–लचकालचकी, ११०

ई

ईजिप्त, ३,१०,१२,२१,६९
ईजिप्तचें महत्त्व, ९२
ईस्ट ॲंग्लिया, ४१
ईस्ट इंडीज, ८०,९१,९२,९६
ईस्ट प्रशिया, ४१

उ

उझबेग, १४५,२५४
उष्णकटिबंध, ७

ए

एजियन, १७,

एजियन संस्कृति, १७
एफिसस, १८
एब्र्ट, १७४, १७७
एल्ब, २३

ओ

ओटावा करार, ५८
ओपोर्टो, २६
ओमान, ७२
ओशियानिया, १०६

क

कझाक व कझाकस्तान, १४७, २४४
कम्युनिझम, १४२, १४५
कान्स्टँटिनोपल [इस्तंबूल], ७२
कामरान, ११०
कांबोज, ११०
कार्थेज, १८
कॉकेशस तेल, १४६
कॉरिंथ, १८
कॉर्सिका, १८, १५६
किर्कुक, १४६
किर्घिजिया, २४४
किर्डॉफ, १७७, १९२
कीव्ह, १२९
कुक, ३०
कुझ्नेटस्क, १३९
कुर्स्क, १३७
केड्डा [केदा], ११०
केलंतेन, ११०
कैसर, १६१
कोरिया, ९२
कोलंबस, २६
कोसॅक, १३१
क्यानडा-भरभराट, ३६
क्यानडियन पॅसिफिक, ३७
क्याचौ, ९०
क्यांग-चौ-वान, ८०, १०५
क्रप, ४८, १७७, १९२
क्रीट, १७
क्यूवेट, ७२, २४७

ग

गॉथ, २०
गियाना, २९
गोअरिंग, १७९
गोबेल्स, ४८
गोल्डकोस्ट, २५
गोर्की [नोव्होगोरॅड], २३, १२९
गंगा, १०
ग्यांबियस, २५
ग्यालीपोली, १७३
ग्रीक खत्ता, १८
ग्रीस, १७, ६६, ६९
ग्वाडेलूप, ३५

च

चायनीज ईस्टर्न रेल्वे, १३६
चिनी साम्राज्याचे लचके,
८५, ८९, ९३

चेंगीझ खान, १३०

ज

जपान असंतुष्ट, २१९
जमेका, ६६
जर्मन्स, २०
जिनीव्हा, १४२
जिनोवा, २२
जिबुटी, १५६
जिब्राल्टर ७३
जुगोस्लॅव्हिया १११, ११९, २०९
जूट राष्ट्रांचा गुप्त तह, ९१, १५२, २११, २१६
जेरुसलेम २२, १६७

झ

झेकोस्लोव्हॅकिया १११, ११२, ११८, १६७, २१८, २१९

ट

टर्क-सिव रेल्वे, ३८, १३५
टॅंजिअर, १५१, २४०
टायर, १८
टायरोल, १५१, १६५
टॅसर [ग्रेगरिक], १७९
टिमॉर, ८०
टैग्रीस, १०, ८१
टोस्क्यानेली, २६
टयूनिस, १५०, १५६
ट्रान्सिल्व्हानिया, १६५
ट्रॉय, १७
ट्रिआनॉन, १६४
ट्रिपोली, १५१, १५६
ट्रीस्ट, १५१
ट्रेंटिनो, १५१
ट्रोट्स्की, ७३

ड

डॅन्झिग, २००
डॅन्यूबचें खोरें, १४३
डॅन्यूबचें राजकारण, १७१, १७३
डाकार, १२२
डायाज, २५
डाल्मेशिया, १७२
डॉनेट्झ, १४१
डॉवेस योजना, ११८, १७७
डॉ. श्चॅट, २१२
डॉ. श्नी, २११
डॉ. हॉशोफर, २५६
डेन्मार्क, १६०
डोडेक्यानिस, १५१
डोमिनियन्स, ७६, ७७

त

ताझिक, ताझिकिस्तान, १४७, २४४
तास्मन, ३०
तास्मानिया, ३०
तिबेट, ८५
तुर्क, २४, २५, १४५, १४७, २४५

तैवान [फोर्मोसा], ८०

थ

थायसेन, ४८, १७७, १९२, १९६
थायसेन योजना, १९३, २२६
थीब्स, १८

द

दक्षिण आफ्रिकन संघ, ७७
दाईरेन, ८०, ९३
दार्दानेलिस, १४६, १४७

न

नाईस, १५६
नाझी पक्ष, १७९
नान्योची चळवळ, १०६
नार्विक, १९०
नॉमन, हर फ्रेडरिक, १६१
नॉर्वे, १४३
नीग्रो लोक, २३७
नील नदी, ११, १३
नोव्हगोरॅड, २३, १२९
न्यू ॲमस्टरडॅम, २९
न्यूझीलंड, ७५
न्यूयॉर्क, २९
न्यूवेलीचा तह, १६४

प

पनामा कालवा, ५९
पॅंटेलेरिया, १५०
पॅन अमेरिक्यानिझम, ६१
पॅरासेल बेटें, ११०
पॅलेस्टाईन, २४, १२४
पाऊन्सफोर्ट करार, ५९
पाफेनियस, २५
पॉलिनीशिया, १६५
पीटर धी ग्रेट, १३१
पेटसामो, १३९
पेरी कॅप्टन, ८७
पेस्क्याडोर्स बेटें, ९३
पोर्ट आर्थर, ८०, ९३
पोर्तुगीज, २५, २६
,, सत्ता, २७
पोलंड, १११, ११२, ११४, १६७
२१८
प्रॅटॉस, ९३

फ

फॅसिस्ट, २२१
फाबॅनचें जाळें, १९४
फिनीशियन्स, ५, १७
फिन्लंड, १७३
फिन् लोक, २३५
फिलिपाईन्स, ७९, ९१
फेडरल राज्यपद्धति, ११२, १७५
फोर्मोसा, ८०, ९३
फ्यूम, १५१, १७२

ब

बगदाद, १६१
बर्म्युडा, ६६
बर्लिन बगदाद रेल्वे, ३७, ३८,
१४३, १६१, २०८, २१०
बल्गेरिया, १७३

बहामा, ६६
बॅबिलोनियन्स ११,
बाकू, १४०
बाम (बैकल-अमूरिया) रेल्वे, ३८, १३६
बायझँटियम १७, १३०
बाल्कन राष्ट्रें, १८८, २००
बाल्टिक राष्ट्रें, १४१, २००
बाल्टिक समुद्र, १४१
बाहरेन, ७२
बॉश, ४८,१९२
बिस्मार्क, १६०
बेल्जम, १११, ११४, ११५
बोहीमिया, १७२
ब्राझील, २९
ब्रिटन [ब्रिटिश बेटें], ४,५
ब्रिटिश सत्ता, ६४
ब्रिस्टल, २७
ब्रेमेन, २२
ब्लॅक शर्टस्, १९९

भ

भांडवलशाही, ४८
भूमध्यसमुद्र, ५, ५१, १०९, १२३
भूमध्यसमुद्रांतील राजकारण ७१, ७२, १०९, १२३, १४६, १५०, १५२

म

मकौ, ८०, १०५
मध्य युरोपांतील राजकारण, ७१, १६४, १६७, २०९
मन्रो मत, ५१, ५८
मँचूक्युओ (मँचुरिया), ८०, ९३
मँडेट्स, २१४, २१५
मॅसिडोनिया, १८, १७३
माग्यार, १६५, २३५
मॉरीशस, २९
मॉर्गन, ४८
मार्टिनिक बेटें, ३५
मिट्ल् युरोपा, ४५, १६१
मित्सुई, ४८
मित्सुबिशी ४८
मीड्स, ११
मुसोलिनी, १०२, १४१, २१०
मेसोपोटेमिया, ११, १७, १८
मेमेल, २००
मेंफिस, १८
मोरोक्को, १२३
मोसल, १४६

य

यंग योजना, ११८
यासुदा, १०७
यांगत्सी, १०
युक्रेन, १३२, १३७, १७३
युक्रेनचें महत्त्व, १३७, १७३
युफ्रेटिस, १०, ८१

र

राइशस्टॅग, १७९

राजकीय सरहद्दी, ४३, ४४
राष्ट्रीयत्व, ४३
रुमानिया, १११, ११९, १७१, १७२, १७३
रूझवेल्ट, थिओडोर, ६०
रोझेनबर्ग योजना, १८२, १९७
रोम, १८
रोमन लोक, ५
रोमचें साम्राज्य, १९, २०
ऱ्हाईन, १२१
ऱ्हाईनलँड १५२, १६७, १७६
ऱ्हूर, ४२, ११६, १७६
ऱ्होडस, १८
ऱ्होम, १८०

ल

लॅगॉस, २७
लॅगोस्टा, १५१
लाओस, ११०
लायबिया, १५३
लिट्विनॉफ करार, १४१
लिस्बन, २६
लूना, १९६
लोरेन, ४१, ११६, ११७, १३७, १६७
ल्यूबेक, २७
ल्वांगप्रगंग ११०

व

वास्को-डि-गामा, २५
वॉल स्ट्रीट, ४८, ६२
विल्सन, १६५
वीमर रिपब्लिक, १७५, १७७
वेस्ट इंडीज २६, २९, ६५
व्हर्सेलिसचा तह, ४६, १५१, १५७
व्हर्सेलिसचा वचपा, २०९
व्हॅटिकन, २४९
व्हिश्चुला, २३
व्हेनिस, २२
व्हँडाल, २०

श

शांटुंग, ९०
श्लीफेन योजना, २०२, २०३

स

समशीतोष्ण, ७
सयाम, ९१, ११०
सरंजामी पद्धत, २१
संतुष्ट राष्ट्रें, ४७
संयुक्त संस्थानें, ५०, ५२
साएराक्यूज, १८
साघलीन ८०
साम्राज्यवाद, ८४, ९२
सायलेशिया, ११८
सार प्रांत, ११६
सार्डीनिया १८, १५६
सालोनिका, १७३
सिरिया, २१, १२३
सिसिली, १७, १५०, १५६
सिंक्यांगमधील राजकारण, १४५, २५३, २५४

सिंगटौ, ९०
सीमेन, १९२
सुधारलेलें राष्ट्र, ७८, ७९
सुमितोमो, १०७
सुवेझ कालवा, २७
सेल्यूकिया, १८
सेव्हर्स, १६४
सेंट जर्मेन, १६४
सेंट लॅरेन्स मार्ग, ६२
सेंट्रल जनरल केमिकल्स, १९७
सैप्रस, ७३
सैबीरिया, १३३
सोमाली लँड, १५१, १५६
स्कोडा, १७२
स्टार्म ट्रूप्स, १९९
स्टिन्नेस, १९२
स्ट्रालेसुंड, २७
स्पेन, २५
स्पेनची सत्ता, २७
स्प्रॅटली, ९३
स्वीडिश लोक, २३४

ह

हंगेरी, १५१
हंसा लीग, ५, २२, १३०, २०६
हॅप्सबर्ग, १६६
हॅंबुर्ग २२, २०६
हॉशॉफर, १६१
हॉंगकॉंग, ८०, ८३
हिट्लर, १०२, १६१, १७५, १७७, १८०, १९१, २१०
हिटलर यूथ शाळा, १९९
हिंडेन्बुर्ग, १७५, १७७, १७९
हिंदी महासागरांतील राजकारण, ७०
हूण, २०
हैनान, ९३
होआंगहो, १०

— १ —

जगाच्या

भावी घडणींतील

भारताचें स्थान !

याचा विचार करितांना

सदरहू ग्रंथांत पुढील गोष्टी आढळतील

(१) हें महायुद्ध शेवटचें आहे का ?

(२) पुढच्या युद्धाचा पाया ह्या युद्धांतून घातला जात आहे काय ?

(३) राष्ट्रीय स्वयंपूर्णता म्हणजे काय ?

(४) जगांतील राष्ट्रांची नवीन घडी कशी बसणार ?

(५) मागसलेल्या लोकांचें भवितव्य काय ?

Geo-politics

या अभिनव शास्त्रा वरील

आद्य व एकमेव ग्रंथ